प्रजासत्ताक दिन विशेषांक
१९८७ - दहा रुपये

# माणूस

## एकविसावे शतक कसे असेल?

कामगार वर्गाचा लोप!
स्त्री मुक्तीची पहाट!
नोकरशाहीचा ऱ्हास!
अनेक धर्मपंथांचा उदय!



टॉफलर पुस्तक पुरवणी

राजीव गांधी: दोन वर्षे
हिंदू लाट: एक चर्चा - एम्. व्ही. कामत,
रफिक झकेरिया, इक्बाल मसूद

**With Best Wishes From :**

Tel. : 221944
2049389
Telex : 11-2891-PSW IN

# APTE AMALGAMATIONS LIMITED

## Fine Chemicals Division

199, Churchgate Reclamation, Bombay 400 020.

*Manufacturers & Exporters of :*

**SULPHAMETHOXAZOLE I. P. / B. P.**
**TRIMETHOPRIM I. P. / B. P.**

*WORKS :*

Phone · 226 & 536

J/7 & J/8 M. I D C. Industrial Area,
Taloja. Tal. Panvel, Dist. Raigad
MAHARASHTRA

# माणूस

## प्रजासत्ताक दिन विशेषांक २६ जानेवारी १९८७



अनुक्रम :


**कथा**
अंजनी नरवणे / ४
भीमसेन देठे / ९७

**चर्चा** / ८
एम्. व्ही. कामत
डॉ. रफिक झकेरिया
इकबाल मसुद

**राजीव गांधी : दोन वर्षे–पुरवणी** / २५
वेहराम कॉन्ट्रॅक्टर
अभय गोखले
भाऊ पाध्ये
निळू दामले
संजय होनकळमे
माधव
विनय सहस्रबुद्धे
चारुदत्त देशपांडे

**विशेष वार्तापत्र** / १७
संजय संगवई

**पुस्तक पुरवणी** / ५७
भविष्याचा आघात, तिसरी लाट

**लेख**
मेधा राजहंस / १०२
निरंजन आगाशे / १०५


---


प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मताशी चालक सहमत असतीलच, असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.



गजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे नियतकालिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

वर्ष : सव्विसावे
अंक : १६ ते ३५
२१ सप्टेंबर १९८६ ते
३१ जानेवारी १९८७
किंमत : दहा रुपये
वार्षिक वर्गणी : साठ रुपये
पत्ता : १०२५ सदाशिव पेठ
पुणे–४११ ०३०
फोन–४४३४५९
व्यंगचित्रे
प्रशांत कुलकर्णी

संपादक
**श्री. ग. माजगावकर**
सहाय्यक
**दिलीप माजगावकर**
**सौ. निर्मला पुरंदरे**
या अंकाचे संपादन सहाय्य
**अविनाश कोल्हे**
मुखपृष्ठ
**संजय पवार**
आतील चित्रे
**वसंत हळबे, श्याम देशपांडे, सुरेश नावडकर**

# मनोगत

माणूस 'नवजागर' विशेषांक एक व दोन गेल्या ऑगस्ट महिन्यात प्रसिद्ध झाले. अशा विशेषांकावर वृत्तपत्रातून सहसा अभिप्राय येत नाहीत. पण कोल्हापूरच्या 'रविवार सकाळ'ने (४।१।८७) या दोन विशेषांकाची आवर्जून नोंद घेतली. 'मराठी वृत्तपत्राचा इतिहास' या प्रसिद्ध ग्रंथाचे लेखक श्री. रा. के. लेले यांनी या दोन अंकावर सविस्तर अभिप्राय या अंकात लिहिला आहे 'विचार-प्रवर्तक व वैशिष्ट्यपूर्ण नवजागर विशेषांक' या शब्दात श्री. लेले यांनी या दोन अंकाचे वर्णन केले आहे.

या अभिप्रायात श्री. लेले यांनी म्हटले आहे, 'सतत वाचकांना काही तरी नवीन देण्याची 'माणूस'ची गेल्या पावशतकाची परंपरा या दोन्ही अंकात कायम राखली आहे त्याबरोबरच संपादकाची जी एक वैचारिक बैठक आहे, तीही या खास अंकात जराही सुटलेली नाही'

या प्रजासत्ताक दिन विशेषांकात हीच परंपरा पुढे नेण्याचा प्रयत्न केला आहे

राजीव गांधी यांच्या नेतृत्वाखाली आपला देश झपाट्याने तंत्रवैज्ञानिक युगाकडे जात आहे हे तंत्रवैज्ञानिक युग कसे असेल, याची रूपरेषा देणारी 'टॉफलर पुस्तक पुरवणी' वाचकांना निश्चितच वेगळी वाटेल

पंतप्रधान राजीव गांधी यांच्या राज-वटीला दोन वर्षे पूर्ण झाली या दोन वर्षा-तील त्यांच्या कामगिरीचा आढावा विविध दृष्टिकोनातून या अंकी घेतला आहे तसेच सध्या ज्वलंत असलेल्या 'हिंदू लाट' या विषयावरही एक स्वतंत्र चर्चा आणि एक विशेष वार्तापत्र या अंकात आहे

अशा विशेषांकाची उभारणी सुरू झाली की यापूर्वी कै. प्रा स शि भावे यांचा सह-भाग हमखास असायचा ते आता आपल्यात नाहीत, ही उणीव या अंकाच्या पूर्वतयारीच्या वेळी तीव्रतेने जाणवली. 'उत्तरमीमांसा', 'अमेरिका नावाचे प्रकरण' या त्यांच्या लेखमाला 'माणूस' मधून प्रसिद्ध झाल्या व वाचकांनी त्यांचे भरपूर स्वागत केले. 'अमे-रिका नावाचे प्रकरण' पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाले आहे व 'उत्तरमीमांसा' प्रकाशनाच्या वाटेवर आहे

केवळ साहित्यातच नाही तर सामाजिक जीवनाच्या सर्व क्षेत्रात भावे यांना गती होती. दुर्मिळ अशा चिंतनशीलतेने त्यांचे लिखाण भारलेले असायचे. विवेचन तर्कशुद्ध, मांडणी सुस्पष्ट, ही त्यांच्या लेखनाची वैशिष्ट्ये होती. समीक्षक म्हणून त्यांचे स्थान फार वरचे होते 'स्वातंत्र्य' हे सर्वश्रेष्ठ मूल्य म्हणून त्यांनी मानले होते; त्यांच्या लेखना-तूनही या स्वातंत्र्याचा शोध ते सतत घेत राहिले. कदाचित या समानमूल्यभावामुळेच 'माणूस'चे आणि त्यांचे संबंध जुळत गेले, वाढत राहिले हे जुळलेले धागे अचानक तुटले त्यांच्याशी होणाऱ्या चर्चा, विचार-विनिमय संपला ही न भरून येणारी हानी आहे.

त्यांनी लिहिलेले एक पत्र संग्रही आहे त्यात त्यांनी लिहिले आहे–

प्रिय श्री. माजगावकर

सप्रेम नमस्कार

'माणूस' वाढदिवस अंकातील आपले मनोगत बरेच दिवस मनात सलते आहे शेवटी आज मन मोकळे करावे असे वाटले

'माणूस'च्या पंचविसाव्या वर्षी तो बंद करण्याचा विचार आपल्याला करावा लागावा ही गोष्ट खेदजनक असली तरी नवीन नाही. ध्येयवादी नियतकालिकांना हा शाप दिसतो. आपल्याकडेच नव्हे तर पाश्चात्य जगतातही.

याला उपाय काय ? सध्या दोन पर्याय आजूबाजूला दिसतात. एक म्हणजे फॅशनेबल 'चालू' होणे आणि विक्री वाढवणे. दुसरे म्हणजे या अमानुष स्पर्धेतून बाजूला होणे. हे दोन्हीही उपाय नसून अपायच आहेत, याचे खुलासेवार समर्थन करण्याची जरूरी नाही

तिसरा एक मार्ग आहे राष्ट्रवादी, प्रगति-वादी, परिवर्तनवादी अशी भूमिका गेली चोवीस वर्षे सांभाळणारा 'माणूस'. त्याने या मार्गाचा अवलंब करावा असे वाटते.

त्याने म्हणजे 'माणूस' ह्या चळवळीने. एका विचाराचे नियतकालिक, त्याचे वाढते कुटुंब एवढ्या मर्यादातून वाढत 'माणूस' ही एक चळवळ झाली आहे; विचाराची आणि समाजकार्याची एक दिशा झाली आहे ही दिशा टिकली पाहिजे ज्यांची ही दिशा आहे, त्यांनी एकत्र येऊन ती टिकवली पाहिजे 'माणूस' साठी कायमचा आर्थिक आधार निर्माण केला पाहिजे. हिशेब वगैरे त्या क्षेत्रातल्या तज्ज्ञ मंडळींचे काम आहे पण लाख दीड लाख रुपये दरवर्षी मिळत राहावे (जाहिरात – उत्पन्नाच्या जागी) अशी व्यवस्था सोपी नसली तरी शक्य आहे असे मला वाटते यासाठी व्यक्तिशः जे शक्य आहे ते मी करीनच.

मात्र, कोणत्याही संप्रदायाला अथवा सांप्रदायिकतेला न बांधलेला, मिंधेपणाचा मेनचटपणा न आलेला, सर्व विचारांना मोकळा वाव देणारा 'माणूस'चा माणसाचा आवाज बंद होता कामा नये अधिक भेटीत कळावे.

आपला मित्र

**स. शि. भावे**

□

'माणूस' नवजागर विशेषांक दोनमध्ये (१६–२३ ऑगस्ट १९८६) 'माणूस' प्रसिद्धीसंबंधीचे एक निवेदन दिले होते सध्या तरी काही काळ 'माणूस' विशेषांक स्वरूपात अधूनमधून वाचकांच्या भेटीस येत राहील, असे त्यात म्हटले होते त्याप्रमाणे हा प्रजासत्ताक दिन विशेषांक निघत आहे. वाचकांना तो वैशिष्ट्यपूर्ण, विचारप्रवर्तक वाटेल, असा विश्वास आहे

यापुढील माणूस विशेषांक पर्यटन विशेषांक म्हणून एप्रीलच्या पहिल्या आठवड्यात प्रसिद्ध होईल.

– संपादक



# खोट्या वाटणाऱ्या खऱ्या गोष्टी

**सौ. अंजनी नरवणे**

अहमदाबादला म्हणे एक खाटीक आहे.

आता ह्या विधानाला काही अर्थ नाही, कबूल. सगळीकडे खाटीक असतातच की, तसे अहमदाबादलाही एकच का, बरेच खाटीक असणार. शिवाय अलीकडच्या तिथल्या बातम्या वाचून, मधूनमधून खाटकाचा व्यवसाय 'पार्टटाईम' करणारेही तिथं बरेच असावेतसं वाटायला लागलंय! तो बिचारा आपल्या पोटासाठी तरी हे काम करत असतो–! पण ते सोडा–भलत्या विषयात शिरूयाच नको! तर, अहमदाबादला म्हणे एक खाटीक आहे, ज्याला तेवीस मुलं आहेत! असोत, असोत, किती बिब्या (बिबीचं बहुवचन काय?) आहेत ते माहीत नाही. पण कमाल एवढ्यानं संपली नाही. ह्या माणसाला म्हणे मुलं फार आवडतात. (ते दिसतंच आहे!) पण म्हणून तो करतो काय, की रस्त्यानं जातायेता त्याला जर कोणी स्वतःच्या मुलांना रागावताना, मारताना दिसलं, तर हा तिथे जातो नि त्या मोठ्यांना रागावतो (मारत नाही, नशीब!) नि म्हणतो एवढाली लहान मुलं, त्यांना रागावता काय नि मारता काय? नसली सांभाळता येत तर पाठवून द्या माझ्याकडे, माझी तेवीस, त्यात हे एक चोविसावं राहील' नाही, गोष्ट काल्पनिक नाही, खरी आहे!

पण स्वतःची दोन तीन मुलं मोठी करता करता काळधाचे पांढरे झालेले तुम्ही आम्ही ही गोष्ट ऐकून अनेक कारणांसाठी थक्क होतो! तेवीस मुलांना न रागावता न मारता मोठं करायचं ही अशक्य वाटणारी गोष्ट एक खाटीक करतो आणि वर अनोळखी आईबापांनासुद्धा ठणकावतो, ह्याला काय म्हणावं. का ऽऽ ही न म्हणता वासलेला 'आ' बंद करावा नि निमूट बसावं, अहमदाबादला रहात असला तर मुलांना रागवायच्या आधी आजूबाजूला बघून खात्री करून घ्यावी कोणी डोळे वटारून पहात नाहीयेना रस्त्यातनं!

कोण काय करेल ह्याचा नेम राहिला नाही हेच खरं! चुकून तुमच्या सायकल / मोपेड / स्कूटर / गाडीचा कोणाला धक्का लागला तर जरी फार लागलं वगैरे नसलं, तरी थोडी बाचाबाची (कधी कधी तर अगदी पु. लं. च्या भाषेत 'सर्व प्रत्यय लावून') होणार, आरोप, प्रत्यारोप होणार, मग नुकसान भरपाई देऊन आपआपसात मिटवायचं का पोलिसात जायचं ह्यावर चर्चा होणार; मग नुकसानभरपाई किती ह्यावर वाद होणार नि शेवटी एकदाचे तुम्ही नि धक्का लागलेला माणूस आपापल्या मार्गाला लागणार. पण धक्का लागलेला माणूस झाडावर चढून बसलेला पाहिलाय तुम्ही? जलानी नावाच्या श्री. नरवणे यांच्या एका मित्राची गोष्ट आहे ही. त्याचं असं झालं, की जलानी आणि त्यांचे दोघे भाऊ एक दिवशी त्यांच्या गाडीतनं कुठेतरी चालले होते. हे जलानी कुटुंब म्हणजे सगळीच राजा माणसं. हे पाच भाऊ आणि सगळे खूपच सारखंसारखे दिसतात. ह्या भावांना ह्या सारखं दिसण्याची मजा वाटते म्हणून ते काहीतरी गमतीजमती करत असतात. मधे एकदा चट्ट्यापट्ट्यांच्या रंगीबेरंगी टीशर्टस्‌च खूप पेव फुटलं होतं ना, तेव्हा ह्यांनी जाऊन एकासारखे एक पाच टीशर्टस् आणले! एक दिवस त्यातल्या तिघांना कुठेसं जायचं होतं. तिघांनीही ते टीशर्टस् अडकावले नि गाडीत तिघंही बसून निघाले. शहर तसं लहान, वेळ संध्याकाळची, त्यामुळं गर्दी बेताचीच रस्त्यानं. तिघं गप्पा मारत हाहाहीही करत चालले होते, एकदम कुठूनसा एक खेडूत सायकलीवरनं कडेच्या रस्त्यावरनं मोठ्या रस्त्यावर आला तो सरळ गाडीसमोर, नि ब्रेक लावेपर्यंत गाडीवर हापटलाच. नशिबानं सायकलला जरा नुकसान झालं पण त्याला काहीच झालं नव्हतं. म्हणजे शारीरिक इजा वगैरे पण मानसिक धक्का थोडासा पोचला असावा. त्याच्या मते त्याच्या अंगावर येणाऱ्या गाडीतल्या माणसांकडे गाडीवर हापटता हापटता त्यानं डोळे फाडून पाहिलं होतं आणि तो जाम घाबरला होता! खरं म्हणजे म्हणूनच कदाचित अॅक्सिडेंट झालाही असेल. चट्ट्यापट्ट्याचे टी शर्टस् घातलेले, एकासारखे एक दिसणारे तीन पहिलवानी खाक्याचे तगडे 'गुंड' लोक समोरच्या सीटवर चिकटून चिकटून बसलेत आणि गाडी आपल्या अंगावर घालतायत ह्या कल्पनेनं तो इतका भेदरला की सायकल हातातनं सोडून देऊन,



शेजारीच एक मोठं झाड होत (पुन्हा त्याच्या मते त्याच्या सुदैवानं ! ) त्यावर सरसर वर चढला नि तिथं झाडाला घट्ट धरून, बसून राहिला ! इकडं हे तिघं गाडीतनं उतरले, सायकल बाजूला केली नि त्याला खाली बोलवू लागले–नुकसान भरपाईच्या गोष्टी करायला. पण ते गाडीतनं उतरल्यावर तो आणखीच घाबरला नि खाली उतरायला मुळी तयारच होईना ! हा असं का करतोय हे ह्या तिघांना कळेना. ते गोंधळून एकमेकांकडे बघायला लागले तेव्हा त्यांना एकदम शंका आली की तो बिचारा माणूस त्यांना 'गुंडे' समजत होता नि स्वतःचा त्यांच्यापासून बचाव करण्याचा प्रयत्न म्हणून झाडावर चढून बसला होता !

□


हा माणूस भीतीपायी जमिनीवरनं झाडावर चढून बसला होता तर एक गाय जिना चढून मदत मागायला वर आली होती ! पुन्हा, गोष्ट काल्पनिक वाटेल पण खरी आहे ! फार वर्षांपूर्वी अण्णा, माझे मामंजी, मद्रासच्या बाजूला जंगलात, गॅरिमनपेंटामधे कॉपर प्रॉस्पेक्टिंग करत होते. तिथं सापच साप. किती तरी साप अण्णा काठीनं, बंदुकीनं मारायचे. ते जिथं रहात होते ते दुमजली घर जंगलात असल्यासारखंच होतं. तिथं त्यांनी एक गाय पाळली होती. ही गाय जरा जास्तच हुशार असावी आणि साप दिसला की अण्णा मारतात एवढं तिला समजलं असावं ! एका रात्री अण्णा झोपलेले असताना जिन्यावर धडाधड आवाज आला नि मग दाराला धडक्या बसू लागल्या. एवढ्या अपरात्री, जंगलात, अंधारात. कारण बाहेर धडक्या मारणाऱ्याजवळ कंदिल वगैरे असल्याचा उजेडही दिसत नव्हता– कोण आलं असणार आणि कशाला, ह्याचा विचार करीत अण्णांनी खोलीतला कंदील मोठा केला नि काठी हातात घेऊनच दार उघडलं, तर जिन्याच्या वरच्या चारपाच पायऱ्यांवर मिळून गाय उभी राहून भेदरलेल्या नजरेनं अण्णांकडे बघत होती ! तिच्या पायाला विळखा घालून एक भला मोठा साप बसला होता ! तो तिला न चावता एवढ्या सगळ्या गोंधळात तसाच बसून राहिला होता की चावलाही असेल. पण विषारी नसेल, कसं कळणार ? पण हा सगळा विचार करायची ती वेळही नव्हती. अण्णांनी साप मारला नि मग महाप्रयासानं त्या अरुंद जिन्यावरनं गाईला कशीबशी खाली नेली. रात्रीची बांधून ठेवलेली नव्हती म्हणून आणि अण्णांना उठवायला वर जायचं त्या मुक्या जनावराला कसं काय ते सुचलं म्हणून त्यादिवशी ती गाय वाचली !



ह्याच ठिकाणची दुसरी पण एक गमतीची गोष्ट अण्णा सांगायचे तिथल्या आदिवासींची. त्या भागात मलेरिया फार. त्या काळी मलेरियावर क्विनिन हे एकच औषध आणि आदिवासी लोक ही विलायती औषधं घ्यायला साफ नाकबूल ! काय करावं अण्णांना कळेना. आता प्रॉस्पेक्टिंग करता करता तिथल्या आदिवासींचं औषधपाणी करायचं काम काही अण्णांचं नव्हतं, पण त्यांना चैन पडायचं नाही. आदिवासी लोकांची मंतरलेल्या वस्तू, जादूटोणा असलेल्या गोष्टींवरची श्रद्धा बघून मग अण्णांना एक युक्ती सुचली. कोणाला ताप आला तर मंतरलेला विडा देऊन मला तो बरा करता येतो असं त्यांनी सगळीकडे पसरवलं नि विड्यात क्विनिन घालून आजारी माणसाला द्यायला लागले. बहुतेकांचा ताप मलेरियाच असल्यानं 'मंतरलेल्या विड्यानं' तो जायचा. अण्णा तिथं होते तोवर ही वैदुगिरी प्रॉस्पेक्टिंगच्या जोडीला करत होते !

□

ते आदिवासी बिचारे मंतरलेल्या विड्यातनं क्विनीन खायचे पण सगळेच लोक इतके साधे थोडेच असतात ? लोक तर काय कुत्रीमांजरं सुद्धा नसतात. आमच्या लहान-



पणी आमच्या घरी नेहमी दोनचार माजर नि एक कुत्रा असायचा. कुत्रा असायचा गावठीच पण दिसायला छान असायचा नि त्याच नाव नेहमीच अशा कुत्र्याच असतं तेच. टिप्या हे असायच ! तर त्यातल्या एका टिप्याची ही गोष्ट फार वस्ताद प्राणी. वर्तमानपत्र ह्या वस्तूवर त्याचा अतिशय राग. मागच्या जन्मी हा विरोधी पक्षाचा पुढारी असावा अस आई म्हणायची ! आम्ही रहात होतो त्या वाड्याला मोठा दिंडी दरवाजा होता, मग एक चौक नि मग आत घर. दिंडी दरवाज्यातन पेपरवाला पेपर टाकून जायचा तेव्हा आसपास आम्ही कोणी नसलो नि टिप्या मोकळा असला, की सपल– त्या दिवशी कोणालाही पेपर वाचायला मिळायचा नाही– टिप्यान खाऊन उरलेले दोन चार तुकडे फार तर बघायला मिळायचे ! पेपर दिसला की टिप्या त्यावर तुटून पडायचा नि त्याच्या चिंध्या चिंध्या करून टाकायचा एवढ्यानही त्याच समाधान व्हायच नाही, म्हणून बराचसा पेपर तो रागारागान चावून खाऊन पण टाकायचा आणि मग आमच्या रागापासून स्वत:चा बचाव करायला कुठे तरी लपून बसायचा ! पण म्हणजे टिप्या समोर दिसेल ते किंवा थाळीत पडेल ते खायचा अस मात्र मुळीच नाही. भाकरी खायची, ती त्याला अगदी चागल्या, पाढऱ्या जोधळ्याचीच हवी असे. बरेच दिवस आम्हाला हे ठाऊक नव्हत. दिवस दुसऱ्या महायुद्धाचे होते. रेशनवर लाल जोधळे मिळायचे, त्याना विचित्र वासही यायचा. पण ते कसे तरी करून खावे तर लागायचेच. म्हणजे आम्ही मुकाट खायचो; टिप्या पण आईनं करून दिलेली गरम गरम भाकरी मुकाट्यान उचलून बाहेर चौकात निघून जायचा. नतर बघाव तर पडवीतल्या त्याच्या थाळीत घातलेल दूध पिऊन मुकाट बसलेला असायचा. बरेच दिवस पत्ता लागला नाही, की हा लाल जोधळ्याची भाकरी असेल त्या दिवशी उपास काढतो पण ती खात नाही ! पत्ता लागणार कसा ? टिप्या मुकाट्यान चौकातली माती उकरून खड्डा करायचा आणि ती भाकरी पुरून टाकायचा ! चौकातली जमीन सारखी करायसाठी ती खणायला सुरुवात केली, तो जिथ तिथं पुरून ठेवलेल्या भाकऱ्याचे तुकडे !

टिप्याचा असला नबाबी नखरा, खाईन तर तुपाशी नाही तर उपाशी, अशापैकी प्रकार, तर माझ्या मैत्रिणीच्या चिंकीला तिच्या घरी येणाऱ्या – जाणाऱ्याशी गप्पा मारण्यात, मैत्रिणीन तिच्याकडे पुरेस लक्ष दिल नाही अस वाटल की राग यायचा. लाडावलेल्या मुलाची गत ! ही चिंकी म्हणजे माजरापेक्षा जरा मोठी, पाढरी स्वच्छ पोमरेनियन कुत्री. लाबलाब मऊ केस, लुकलुकणारे गोलगोल डोळे. मोठी ऐटबाज नि गोड दिसायची पण मालकिणीन फक्त तिचेच लाड करावे, तिच्याशीच बोलाव, तिला फिरायला घेऊन जाव, अशा अनेक मागण्या ! ते फिसकटलं की ज्याच्यामुळे फिसकटल असेल त्याचा सूड ती तऱ्हतऱ्हेन घ्यायची. एकदा मी सध्याकाळची फिरत फिरत ह्या मैत्रिणीकडे गेले. गप्पा रगल्या, बराच वेळ चकाट्या पिटत बसलो. दाराशी बसलेल्या चिंकीन मी आत शिरले तेव्हा जमेल तेवढा निषेध व्यक्त केला होता, पण थोड्या वेळान ती गप्प बसली. आमच्या गप्पाच्या नादात चिंकी एकदम गप्प आहे हे आमच्याही ध्यानात आलं नाही शेवटी दिवेलागणी होऊन गेल्यावर मी उठले नि बोलत बोलत मैत्रीण पण माझ्याबरोबर दारापर्यंत आली. तिच्याकडे बघून बोलता बोलताच मी चपलेत पाय अडकवत होते. पाय होता तर चपलेवरच, पण काही केल्या चपलेत तो अडकेच ना ! असं काय होतय म्हणन खाली पाहिल, तर एका चपलेला नुसता तळच होता ! वरचा अगठा नि पट्ट्या चिंकीनं चावून चावून खाऊन टाकल्या होत्या ! आम्ही ती आहे कुठं म्हणून बघायला लागलो, तर बाहेरच्या पायरीवर 'त्या गावचीच नाही !' अस तोड करून साळसूदपणे ती बसली होती ! तिन आपल्याकडन होईल तेवढीं शिक्षा मला केली होती ! ही चिंकी काय वाटेल ते खाते हे आम्हाला ठाऊक होतं. पिक्के टोमॅटो हे तिच फार आवडत खाद्य आणि एकदा तर मैत्रिणीच्या सासूबाईंच्या तुपात भिजवलेल्या वातीची वाटीच तिनं पळवली होती आणि च्यूइग गमसारख्या वाती चघळत बसली होती ! अर्थात चपलाच्या पट्ट्या ही आवडती वस्तू नसून माझ्यावर घेतलेला सूड असावा !

¤

चिंकीचा माझ्यावरचा राग एक वेळ समजण्यासारखा; पण भाजीमडईतल्या गाईच मी काय घोड मारलय ? नेहमी माझ्यावर पाळत ठेवून असतात एकदा माझ्या पिशवीत वरच ठेवलेली पालकची जुडी माझ्या लक्षात येतय न येतय तेवढ्यात उचलून एका घासात फस्त करून टाकली होती गाईन ! आणि परवा छान कोवळा कोवळा, मोठा लाब, दुधी भोपळा घेतला भाजीवाल्याकडन शहाण्यासारखे त्याचे तुकडे करून पिशवीत टाकायच्या ऐवजी तसाच अर्धा आत अर्धा बाहेर असा पिशवीत कोबला नि मटारच्या शेगा तपासायला लागले. पाठीमागन गाय लक्ष ठेवून असणार – तिनं येऊन सफाईन दूधी पकडला–'गाय–गाय !' 'भोपळा खाल्लान्' 'अहो बाई – सरका बाजूला, शिंग लागेल !' इत्यादी आरडाओरडा होऊन मी मागे बघायला काही सेकदच लागले असणार; मी पाहिल तेव्हा दुधीचा पाव तुकडा गाईच्या तोडाच्या बाहेर होता ! रागारागानं मी तो खेचून घेतला आणि पिशवीत टाकला ! मडईतल्या मडळीची करमणूक झाली पण मी डगमगले नाही, तो तुकडा तसाच घरी आणला ! 'चोराची हातची लगोटी' समजून ! पण घरी पोचेपर्यंत वाटायला लागल, 'शी. ! गाईच्या तोडातन हिसकावून घेतलेला तुकडा काय खायचाय' नि कोपऱ्यावरच्या कचऱ्याच्या ढिगात टाकून दिला तिथच उभ्या असलेल्या दुसऱ्या एका गाईन तो तत्परतेन खाऊन टाकला !

¤

हे प्राणी असे सधी साधून फजिती करायला टपलेले तर पोरही आपल्याकडन प्रत्येक दिवसाच्या 'टेन्शन कोटा' मध्ये भर टाकत असतात 'आमच्या बीनाला ती दोन वर्षाची असताना कोणीसं सीताफळ दिल आणि दिलेल मला कळायच्या आधीच, बाहेरच्या व्हराड्यात बसून तिनं सगळ्या बियासकट खाऊन टाकल ! शेजारच्या त्या प्रेमळ मावशी मग 'आवडल का बीनाला सीताफळ ?' विचारायला लागल्या तेव्हा कळल की हिन सगळ्या बियासकट सबध सीताफळ स्वाहा केलय् ! हे पहिलच कन्यारत्न, तेव्हा अनुभव शून्य. घाबरून डॉक्टरकडे पळाले. त्यानी ऐकून घेतल, हसले, नि म्हणाले,

'घावरू नको, उद्या सगळ्या बिया पडून जातील !' डॉक्टरांचं भाकीत खरं होईपर्यंत आम्ही आवले बीनावर पहारा ठेवून बसलेले! एक वर्षाच्या आलोकन तर एकदा एक महत्त्वाचं बिल बाहेरच्या टेबलावर चुकून राहिलं होतं तेच खाऊन टाकलं होतं ! कुठं गेलं म्हणून शोधून शोधून थकलो, एकमेकांवर रागवारागवी पण झाली. बिल काही सापडलं नाही पण बिलाचा कागद गुलाबी होता, म्हणून दुसऱ्या दिवशी सुप्रभाती लक्षात आलं की आलोकनं ते बिल खाऊन टाकलं होतं ! कोण काय खाईल ह्याचा काही नेमच राहिला नाही ! परवा पेपरमध्ये वाचलं की एका हत्तीनं माहुताच्या शर्टमधलं पैसेच खाऊन टाकले; बरोबर सिगरेटचं पाकीट नि लाइटर पण ! आता माणसंसुद्धा जिथे सर्रास पैसे खातात, तिथ हत्तीला का नाव ठेवावी ? सिगरेटचं पाकीट नि लाइटर त्यानं का खाल्लं कोण जाणे–कदाचित माहुताची सिगरेट मोडवायचा त्याचा हा प्रयत्न असेल ! एका बिचाऱ्या खलाशाची पिण्याची सवय सोडवायला एकदा त्याला मिलिटरी हॉस्पिटलमध्ये ठेवलं. म्हणजे झालं होतं असं, की ह्या खलाशाला असं सारखं पिताना कोणी पाहिलं तर नव्हतं; पण प्राणी नेहमी 'जरा जास्त झाली असावी' तसा जराजरा झिंगलेला ! खलाशी म्हणजे पीतच असणार अशी बिचाऱ्या खलाशांची कानफाट्यासारखी अपकीर्ति झालेली; त्यात हा खलाशी असा वेळो अवेळी झिंगलेला ! तो बिचारा जीव तोडून सांगायचा की मी 'प्यालेलो नाही हो !' पण कोण ऐकणार ? आणि का ? तो तर उघड उघड झिंगलेला. दिसायचा ! शेवटी त्याची सवय मोडण्यासाठी त्याला मिलिटरी हॉस्पिटलमध्ये ठेवलं, तिथं दारूचा थेंबही त्याला मिळणार नाही अशी व्यवस्था केली. तरी उजाडत ब्रेकफास्ट झाली की जरा वेळानं हा आपला झिंगलेला दुपारी जेवण झालं की तेच दरवेळी काही खाल्लन् की तेच ! शेवटी उलगडा झाला की त्याच्या पोटातच एक तऱ्हेचं यीस्ट होतं; जे खाई, त्यातनं अल्कोहोल बने ! 'बिन पिये नशा' चढत असते ना काहीजणांना त्यातला हाही एक प्रकार !

□

पिऊन झिंगलेली माणसं शुद्धीवर नसताच, तेव्हा त्यांनी घातलेला गोंधळ शेवटी माफ करावाच लागतो. पण चांगली शुद्धीवर असलेली, एरवी अगदी शहाणी सुरती माणसं रागाच्या भरात काही कमी गोंधळ घालतात का ? करायला जातात एक, होतं भलतच, नि मग भोवतालच्या माणसांना निस्तरता निस्तरता पुरे वाट ! सुधा माझी चांगली मैत्रीण तशी चांगली हुशार, शहाणी, पण मध्ये काही वर्षं तिची न् नवऱ्याची ह्या ना त्या कारणानं कडाक्याची भांडणं व्हायची. थोड्या दिवसांनी पुन्हा समेट, आणखी थोड्या दिवसांनी पुन्हा जोराचं भांडण, असा प्रकार चालला होता. सुधा जरा तशी तापट डोक्याचीच, हे माझी मैत्रीण असली तरी कबूल केलंच पाहिजे. अशीच एकदा भांडली नवऱ्याशी, नि डोक्यात राख घालून घेऊन करावंन् काय ? दोन चिठ्ठ्या लिहिल्या–एक नवऱ्याला नि एक मला. नवऱ्याला लिहिलंन् की 'आपल्या भांडणांना कंटाळून मी जीव देत आहे' आणि मला लिहिलंन् की 'मी 'ह्यां'ना अशी अशी चिठ्ठी लिहून ठेवलीय्, पण खरं तर मी जीव देत नाहीये, 'ह्यां'ना धडा शिकवायसाठी असं लिहिलंय्, आणि मी सांगलीला माझ्या बहिणीकडे जातेय् !' पण डोकं ठिकाणावर नव्हतंच, (ते दिसतच आहे !) त्यामुळं पुढे घोटाळा असा केलान् की नवऱ्याची चिठ्ठी मोलकरणीबरोबर मला पाठवलीन आणि माझी नवऱ्यासाठी ठेवून घरातनं निघून गेली ! मी ती चिठ्ठी वाचत होते नि मला शंका येतच होती काही तरी गडबड झालीय, ती काय झाली असणार ह्याची; तेवढ्यात माझ्या नावाची चिठ्ठी हातात घेऊन तिचा नवरा हजर ! सारा गोंधळ मिटवून त्यांचा समेट करून देता देता मला पुरेवाट झाली ! पण सुधाचा तापटपणा त्यानंतर कमी झाला किंवा नवरा तिच्या कलानं घ्यायला लागला; काही असेल, त्यांची भांडणं कमी झाली एवढं खरं !

□

अशा एकेक खोट्या वाटणाऱ्या खऱ्या गोष्टी, भाग एक. एवढ्या वाचून पटवून घ्या, की असतील बुवा खऱ्या, तोपर्यंत मी भाग दोन लिहिते, किंवा खऱ्या वाटणाऱ्या खोट्या गोष्टी तयार करते !

□




यंदाचा दुष्काळ खरंच भयानक दिसतोय पोरा ! उगाच नाही मंत्रीमहाशय नवव्यांदा पहाणी करताहेत तो ! !

# हिंदू लाट : एक चर्चा

अगदी अलिकडेपर्यंत, विशेषत: गांधी-नेहरू-काँग्रेस संस्कृतीचा प्रभाव म्हणून असेल, आपल्याकडील विचारवंतांना 'हिंदू' या शब्दाचेदेखील वावडे होते. 'हिंदू' हा शब्द जणू 'अस्पृश्य', जुनाट विचारसरणीचा प्रतीकच ठरला होता–ठरवण्यात आला होता. आता या स्थितीत स्वागतार्ह बदल होत आहे; ही चर्चा अशा बदलाचे एक उदाहरण.

ही चर्चा आजवर कुठेही प्रसिद्ध झालेली नाही. चर्चेत भाग घेत आहेत–

**एम्. व्ही. कामत** : 'इलस्ट्रेटेड विकली ऑफ इंडिया'चे माजी संपादक

**डॉ. रफिक झकेरिया** : माजी मंत्री, महाराष्ट्र शासन; मुस्लिम विचारवंत

**इक्बाल मसुद** : सुप्रसिद्ध स्तंभलेखक, चित्रपट-ग्रंथ समीक्षक, डावे विचारवंत

**झकेरिया** : आपल्याला असे दिसते की पजाबात घडणाऱ्या घटनामुळे कदाचित, पण एक विशिष्ट प्रकारचा हिंदू पुनरुज्जीवनवाद उदयास येत आहे. काही लोकाना वाटते की या पुनरुज्जीवनवादाचा उगम पंजाबात नसून आसाममध्ये आहे. तेथे हा प्रश्न परकीय नागरिक, बागला देशातून आलेले मुस्लिम वगैरेमुळे निर्माण झाला आहे. व्यक्तिश: असे वाटते की हा पुनरुज्जीवनवाद मुख्यत पजाब प्रश्नामुळे सुरू झाला. हिंदू मानसाला जोरदार धक्का बसला. सरहद्दीवरील राज्यात होणाऱ्या या सर्व घटनाचा एकत्रित परिणाम म्हणजे हिंदूना असे वाटायला लागले की, ते स्वत:च्या राष्ट्रात सुरक्षित नाहीत. मुख्य म्हणजे अल्पसख्याक ही परिस्थिती निर्माण करत आहेत.

हिंदू–शीख शतकानुशतके गुण्यागोविंदाने राहिले आहेत. (काही तुरळक अपवाद वगळता) पण हिंदूच्या प्रतिक्रियेला वाट सापडत नाही. नाही नर सहसा त्याची प्रतिक्रिया त्याचा ऐतिहासिक शत्रू मुसलमान त्याच्यावर उमटते.

काही लोकाना असेही वाटते की, पजाब प्रश्नातसुद्धा मुसलमानाचा हात आहे, कारण पाकिस्तान गुतले आहे. यानंतर मग मुस्लिम वैयक्तिक कायदा आला. आणि मग प्रतिक्रियेस सुरुवात झाली वर्तमानपत्रानीसुद्धा असे वातावरण निर्माण केले की, मुसलमानाच्या अन्यायी गैरवाजवी मागण्या मान्य केल्या जातात. याचे कारण ते सरकारला धमकावू शकतात. माझ्या मतदारसघात आणि इतरत्र घेतलेल्या सभातून माझ्या लक्षात आले की, या सर्वांमुळे 'हिंदू लाट' निर्माण झाली. हिंदू–मुस्लिमामध्ये या प्रकारचा ताण मी मराठवाड्याच्या खेड्यातून कधीही अनुभवला नव्हता. उत्तर प्रदेशातसुद्धा हिंदू-मुस्लिम सबध अत्यत ताणलेल्या अवस्थेत आहेत. आणि हा ताण सर्व पातळ्यांवर आहे–अगदी विचारवत, लेखक याच्यामध्येसुद्धा !

**मसुद** : ज्या तऱ्हेने हे सर्व आकारास येत आहे, त्यामुळे मी अस्वस्थ झालो आहे अरुण शौरीचे, 'इलस्ट्रेटेड विकली ऑफ इंडिया मधील लेख, गिरिलाल जैन यांचे 'टाईम्स ऑफ इडिया'मधील लेख, विनोद मेहताचा 'संडे ऑब्झर्वर'मधला लेख–'हिंदुना वाचवू नका !' मेहता आणि जैन दोघानी हिंदू लाटेवर लिहिले आणि दोघांनाही स्पष्टीकरणाची (माफी मागण्याची नव्हे) गरज भासली. भारतातील प्रथमश्रेणीच्या वर्तमानपत्राच्या सपादकाना स्पष्टीकरणाची गरज भासत असेल, तर निश्चित काही तरी चुकत आहे. शिवाय 'टाईम्स ऑफ इडिया'च्या पहिल्या पानावर प्रसिद्ध केलेला कृष्ण जन्म भूमी देवळाचा मोठा फोटो ! हे सर्व काही अपघाताने घडत आहे, असे नाही.

कामतानाही जयत पटेलच्या 'टाईम्स ऑफ इडिया'तील पत्रामुळे धक्का बसला. त्यानी (कामतानी) 'ऑर्गनायझर'मध्ये लिहिले की–मी जो कोणी आहे, तो स्वत:ची हिंदू म्हणून अस्तित्वाची चिकित्सा करत आहे काही तरी निश्चितपणे चुकत आहे

**कामत** . तुम्ही म्हणता हिंदू मानसिकतेला धक्का बसला. मला तर वाटते की हिंदूच काय पण मुस्लिम, शीख सगळ्याना धक्का बसला आहे. मी याची कारण शोधण्याचा प्रयत्न करत आहे एवढे मात्र नक्की की हे सर्व फक्त धार्मिक कारणामुळे होते. हे बरोबर नाही. प्रत्येक भाडणाला, वादविवादाला आर्थिक पार्श्वभूमी असतेच.

**झकेरिया** : आपल्या चर्चेचा विषय आहे– हिंदू लाट' तुम्ही फार तर असे म्हणू शकता की ८५% हिंदू आहेत, लाटेमध्ये आर्थिक कारणाचे प्रतिबिंब दिसते. पण तरीही या प्रकारची लाट...

**कामत** : कुठे जाणवते ?

**झकेरिया** : महाराष्ट्रात, मुंबईत, गुजराथेत, बिहारमध्ये उत्तरप्रदेशात—सर्वत्र.

**मसुद** : माझे कदाचित चुकत असेल; पण या 'हिंदू लाट' संकल्पनेलाच माझा विरोध आहे. तुम्ही निर्देश केलेला ऐतिहासिक शत्रू—मुसलमान—या प्रश्नाचे विश्लेषण करू. गेली २० ते ३० वर्षे डाव्या विचारसरणीच्या इतिहासकारांनी, विचारवंतांनी या प्रश्नाची दखल घेण्याचे नाकारले. त्यांचे म्हणणे असे की तुर्क आले, अरब आले, यांची आक्रमणं झाली. यांना 'मुस्लिम' अशी जातीय उपाधी देणे योग्य नाही.

खूप वर्षे मीसुद्धा ही विचारधारा प्रमाण मानत होतो. पण अलिकडच्या काळात मला असे वाटायला लागले की या इतिहासकारांचा दृष्टिकोन चूक नव्हता; पण वस्तुस्थितीच जास्त गुंतागुंतीची आहे. हिंदू मानस आहे, शीख मानस आहे, हे निश्चित. पण ज्या तऱ्हेने जातीय शक्ती त्याचा गैरवापर करत आहेत, त्या तऱ्हेने नाही. मुस्लिमांनी देवळं तोडून मस्जिदी बांधल्या. हे खरं. पण हेही तितकंच खरं की तंजावरच्या हिंदू राजाने नागपूर येथील देऊळ मुस्लिमांना दिले. पण इतिहासात याची नोंद सापडणार नाही. जो कोणी नागपूरचा इतिहास वाचेल त्याच्या मनावर चुकीचे संस्कार होऊ शकतील. पाठ्यपुस्तकांना दोष देण्यात अर्थ नाही. मुख्य अडथळा मानसिक आहे तो कसा ओलांडायचा, हा खरा प्रश्न आहे.

**झकेरिया** : दुर्दैवाने आपण सर्व काही कृष्ण—धवल रंगात बघतो. औरंगजेबाचे उदाहरण घ्या. सर्वसामान्य हिंदूंच्या दृष्टीने बघितल्यास औरंगजेब क्रूरकर्मा होता. हे खरं की त्याने खूप देवळांची तोडफोड केली, झिझिया कर बसवला. पण हे सुद्धा तितकचं खरं की त्याचे महत्त्वाचे सल्लागार, सरदार हिंदू होते. त्याने सुरुवातीला दक्षिणेतील आणि बंगालातील मुस्लिम राजवटीविरुद्ध मोहिमा केल्या आणि मग हिंदूंवर तो चालून गेला. किंवा शिवाजीचे उदाहरण घ्या. 'मुस्लिमांचा कट्टर वैरी' अशी त्याची प्रतिमा पण त्याचा नौदल प्रमुख मुसलमान होता. एवढेच नाही तर त्याच्या सैन्यात ३०—३५ पेक्षा जास्त मुसलमान होते.

**मसुद** : मला वाटते की, दोन्ही धर्मातील चांगले आणि वाईट गुण मान्य करून परत एकदा सुरुवात करावी. प्रश्न असा की हे शक्य आहे का ?

**कामत** : ज्या तऱ्हेने इतिहास लिहायला हवा होता, त्या तऱ्हेने लिहिला गेला नाही.

**झकेरिया** : तुम्हाला असे नाही वाटत का की या 'हिंदू लाटे'चा संबंध इतिहासाशी नसून अलिकडे घडलेल्या काही राजकीय घटनांशी आहे.

**मसुद** : गिरिलाल जैन, विनोद मेहतांसारख्या पत्रकारांनी अशा तऱ्हेचे लिखाण करावे, हे दुर्दैव आहे. गिरिलाल जैन यांच्या लिखाणातील मुख्य मुद्दा म्हणजे हिंदू व्यापक दृष्टी निर्माण करण्यात असफल ठरले. तर विनोद मेहतांनी त्यांच्या लेखाची सुरुवातच अशी केली



(डावीकडून) इक्बाल मसुद, डॉ. झकेरिया, एम. व्ही. कामत

'दोन शीख मारले गेल्यावरोबर सरकारने सैन्याला पाचारण केले.' लेखाच्या पुढच्या भागात दोघानीही त्याचे म्हणणे स्पष्ट केले. पण ज्या तऱ्हेने लेखाची सुरुवात झाली ते अस्वस्थ करणारे होते. कारण अशा तऱ्हेने त्या भावनांना तुम्ही वळकटी देता. मी सुद्धा पंजाबमध्ये होतो. हिंदूंशी, शिखांशी चर्चा केली. त्याचा एक वृत्तात लिहिला. पण हिंदू लोक शिखांविषयी, शीख मंडळी हिंदूविषयी जे बोलले, ते मात्र मुद्दाम प्रसिद्ध केले नाही. ज्या शिखांशी मी बोललो होतो, त्यापैकी कित्येकानी नतर मला पत्र पाठवून कळवले की तुम्ही ते छापले नाही, हे बरे केलेत. हे कळवणारे बहुधा अतिरेकी असावेत. कारण त्यानी पत्ता दिला नव्हता. माझा मुद्दा असा की अशा वेळेस 'हिंदूंच्या भावनाविषयी' या प्रकारचे लिखाण करणे बेजबाबदार-पणाचे नाही का?

**झकेरिया :** कामताना याबद्दल काय म्हणायचे आहे?

**कामत :** जखमावर मीठ टाकण्यात काही अर्थ नाही. हिंदू पुनरुज्जीवनवादाची भावना आहे. आपण हिंदू आहोत आणि त्याबद्दल आपण काही तरी केले पाहिजे, असेही भान आहे. पण नक्की काय करावे, याचा अदाज कोणालाच नाही. शीख दिवसाढवळ्या खून पाडतात आणि पसार होतात—हे चालू देता कामा नये. हे रोखण्यासाठी नक्की काय करायला पाहिजे, याबद्दल कोणाच्याच मनात स्पष्टता नाही.

**झकेरिया :** ही स्पष्टता फार महत्त्वाची आहे का?

**मसुद :** (कामताना उद्देशून) जयत पटेलचे पत्र वाचून तुम्ही अस्वस्थ झालात. त्या पत्रात त्यांनी लिहिले होते की आता हिंदूना भगवान विष्णूही वाचवू शकणार नाही—तत्सम भडकवणारी भाषा—'आणि हिंदूंनी लढायला पाहिजे!' 'टाईम्स ऑफ इंडिया' ने संपादकीय टिपणात म्हटले होते की, 'पत्रात व्यक्त झालेल्या भूमिकेशी

# कृपया हिंदूंना वाचवू नका!

## विनोद मेहता यांचा 'संडे ऑब्झर्वर' मध्ये प्रसिद्ध झालेला लेख

मी दिल्लीला एअर बसने जात होतो. शेजारी बसलेल्या प्रवाशाने विचारले, 'दोन शीख मारले गेल्यावरोबर सरकारने दिल्लीत सैन्याला पाचारण केले आणि तेच सरकार पंजाबमध्ये दररोज हिंदूची हत्या होत असताना काहीही पावल उचलत नाही.' माझ्या शेजारचा प्रवासी त्रिशूल वगैरे घेतलेला कडवा हिंदू नव्हता, तर एक साधा ६० वर्षे वयाचा शाकाहारी दक्षिण भारतीय होता. हा गृहस्थ अगदी हळू आवाजात बोलत होता; पण तरी कडवटपणा लपत नव्हता 'तुम्ही पत्रकार आहात. तुम्ही मला समजून सागा सरकारच्या या वागण्याचा अर्थ काय घ्यायचा? दोन शिखाचे जीव, पंजाबात मारल्या गेलेल्या हजारो हिंदूपेक्षा जास्त मोलाचे आहेत? आणखी किती काळ हिंदूना त्याच्या स्वतःच्या देशात अन्याय, अत्याचार सहन करावे लागतील?' बोलता बोलता ते थाबले हळूच इकडेतिकडे बघून आजूबाजूला कोणी पगडीधारी शीख नाही, याची त्यानी खात्री करून घेतली.

हिंदू भारत आज फार चिडलेला आहे. या आधीही खूप वेळा हिंदू भारत चिडला होता; पण यावेळेचे चिडणे फार वेगळे आहे. दिल्लीत तुम्ही कोठेही जा, गप्पागोष्टी हळूहळू पंजाबात होणाऱ्या खुनाकडे वळतात. आजकाल पजाब प्रश्नाचा उगम काय वगैरे-सुद्धा कोणी चर्चा करत नाही. मुख्य मुद्दा असतो— आणखी किती सहन करायचे? हिंदू फार सहनशील आहेत, पिढ्यान् पिढ्या अत्याचार सहन केलेत. हेही खरे की मुस्लिम, शीख, ख्रिश्चन इत्यादी इतर धर्मापेक्षा हिंदूच्या इतिहासात अगदी कमी हिंसा आहे. अस असताना त्यानी आता घेतलेला आक्रमक पवित्रा निव्वळ आव आहे का?

मला हे खरं वाटत नाही. स्वतंत्र भारतामध्ये बहुसख्य हिंदू असताना त्यांनी हे सर्व का सहन करायचे, असाही मुद्दा माडला जातो. खुनाखुनी, रक्तपात वगैरे म्हणाल तर हिंदूसुद्धा चटकन शिकू शकतात. रोपार किंवा टिळक विहार येथे एखादी बस थाबवून स्त्रिया, लहान मुलं आणि हिंदू यांना खाली उतरायला लावायचं आणि उरलेल्या प्रवाशांची कत्तल करायची — हे घडायला कितीसा वेळ लागेल?

आणखी एका गोष्टीचा विचार करू या. हिंदूना हिंसेची परपरा नाही आणि म्हणूनच जेव्हा हिंसा सुरू होईल तेव्हा हिंदू रागाने वेडे होतील. काही जातीय दंगलीमध्ये असं घडलं आहे अगदी अलिकडे इंदिरा गाधीच्या खुनानंतर दिल्लीत झालेल्या दंगली माझ्या म्हणण्याला साक्षी आहेत. हिंदूनी शिखाना भोसकले, जिवत जाळले, त्याच्या मृत देहावर नाच केला.

गेली तीन महिने मी जवळजवळ दर आठवड्याला मुंबई—दिल्ली फेरी मारतो. भारतभर हिंदू जागृत होत असल्याच वातावरण आहे. पण दिल्लीत विचारूच नका. सगळे शीख एकदम शात, अंतर्मुख, अबोल आहेत. क्षणार्धात ते भूमिगत होऊ शकतात आणि त्याची सपर्कयत्रणा एखाद्या कॉम्प्युटरला लाजवेल अशी आहे. पंधरा दिवसापूर्वी, सकाळी १० च्या सुमारास मी टॅक्सीने दर्यागंज भागात जात होतो. टिळक नगर भागात गडबड सुरू झाल्याच्या बातम्या येत होत्या. टॅक्सी ड्रायव्हर शीख होता. तो म्हणाला, 'साहेब, हे माझे आजच्या दिवसातील शेवटचे भाडे.' मग त्याने शहरात काय चालले आहे, याची इत्थंभूत हकिकत सागितली.

अतिशय जबाबदारीने मी म्हणू इच्छितो की, आज हिंदूचा मुड खुनशी आहे. एखादा बस कंडक्टर, ऑफिसमधील नोकर, डिफेन्स कॉलनीत राहणारा निवृत्त सैनिक अधिकारी किंवा गोल्फ लिंक रोडवर राहणारा एखादा उद्योगपती, कोणाच्याही मनात आज शीख समाजाविषयी सहानुभूती नाही किंवा पंजाबातील बर्नाला सरकारबद्दल प्रेम नाही. दिल्लीत राहणारे सरदारजी प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे दहशतवाद्याना मदत करतात, असा सगळ्याचा समज आहे

सूड ही फार वाईट प्रेरणा आहे दिल्लीतील हिंदूच्या मनात आज याखेरीज इतर भावना नाही. सगळ्याचं बहुधा या मुद्द्यावर एकमत आहे— 'मी शिखाविरुद्ध मुळीच

आम्ही सहमत आहोत, असे नाही. पण आम्हाला वाटते की पत्रात व्यक्त झालेली भावना लाखो हिंदूची आहे! आधुनिक पत्रकारितेमध्ये यापेक्षा भयानक घटना मी बघितली नाही. या पत्राने मला धक्का बसला आणि मला 'हिंदू आयडेंटिटी' विषयी प्रश्न विचारावासा वाटला–त्याना नक्की काय अभिप्रेत आहे?

**कामत** : मला वाटते, पहिल्यादाच अशी घटना घडते की जेथे प्रसिद्ध केलेल्या पत्राबरोबर संपादकीय टिपण प्रसिद्ध केले गेले, ज्यात सपादक वाचकाना सांगतात की, या पत्रात व्यक्त झालेली मते *आम्हाला मान्य नाहीत; पण लाखो हिंदूची ती भावना आहे. माझ्या* मते तसं नाही. तुम्ही जेव्हा हिंदूविषयी बोलता तेव्हा कोणते हिंदू तुम्हाला अभिप्रेत आहेत?

शीख वेगळे राज्य मागतात म्हणून अस्वस्थ असणे स्वाभाविक आहे. जेंव्हा तुम्ही शिखाविषयी विधान करता तेव्हा फारच काळजीपूर्वक विधान करावे लागेल. कारण खलिस्तान मागणारे शीख कदाचित अगदीच थोडे असतील. पण या मुठभर लोकामुळे एका समाजाला दोष देण्यात येत आहे.

**झकेरिया** : मी तुमच्याशी मुळीच सहमत नाही फाळणीच्या वेळीही याच तऱ्हेची कारण दिली जात होती. पण शेवटी देशाचे तुकडे झालेच. या प्रकारच्या भावनिक गोष्टी...

**कामत** : पण त्या अतार्किक आहेत.

**झकेरिया** : दुर्दैवाने राजकारणात अतार्किकच यशस्वी ठरते?

**कामत** : *म्हणून काय आपणही अतार्किकच व्हायला पाहिजे?*

**झकेरिया** : मसुद याना म्हणायचे आहे की, जनमानसात आदर असलेल्या व्यक्तीनी या प्रकारचे लेख लिहिल्यामुळे वातावरण खराब होते, असे नाही का तुम्हाला वाटत?

**कामत** : मी यासाठी अस्वस्थ झालो की भाजपमध्ये एवढें वजन

---

नाही. किती तरी शीख माझे चागले मित्र आहेत. पण सरकारने पजाब सैन्याच्या हातात द्यावा आणि पाकिस्तानजवळील सीमारेषेवर कडक गस्त ठेवावी' सैन्य पाठवल्यामुळे दहशतवाद्याचा नायनाट होईल, असे लोकाना वाटते. बव्हशी दिल्लीकर हिंदूना याची जाणीव आहे की, सत लोंगोवाल यांच्याशी केलेला करार यशस्वी होण्यासाठी राजीव गाधीनी सर्वस्व पणाला लावले आहे त्यामुळे रोज होणारी डझनभर हिंदूची हत्या ही त्याची किंमत आहे.

म्हणून हिंदू आत्मरक्षणार्थ सघटित होत आहेत, यात काय आश्चर्य? हिंदूचे छोटे–छोटे गट, तरुणाच्या हातात दिसणाऱ्या हॉकी स्टिक्स, प्रत्येक मोहल्ल्यामध्ये सुरक्षा समिती, इकडे तिकडे बनवलेले गावठी बॉंबस्... हे आत्मरक्षणार्थ सिद्ध झालेले हिंदू आहेत.

हिंदूची एक प्रचड लाट येत आहे. घोषणा एकच– 'हिंदूना वाचवा' मी धोक्याचा कदील दाखवतो, असे नाही, पण समजा जर मुक्तसरसारखी घटना परत घडली तर त्याचा बदला दिल्लीत ताबडतोब घेतला जाईल. हे बघून दहशतवादी जरी खुष होणार असले तरी दिल्ली शहरासाठी ही खासच चांगली बातमी नाही.

पुढच्या वेळेस पजाबात झालेल्या अत्याचाराचा बदला घेतला जाईल, तेव्हा फक्त दिल्लीतच नाही तर आख्खा उत्तर भारत, आणि अगदी महाराष्ट्रापर्यंत हे लोण येईल. फक्त सुरुवात दिल्लीत होईल. आणखी म्हणजे सघर्ष फक्त हिंदू–शीख एवढाच मर्यादित राहणार नाही तर मुस्लिमांनाही यात गोवण्यात येईल कारण या प्रश्नात 'पाकिस्तानचा हात' असल्याचा सशय आहेच.

भारताला जाती-लढा नवीन नाही. स्वातंत्र्यानतर भारताने आजपर्यंत परकीय शक्तीशी चार युद्धे केलेली आहेत. देशावर सकट येणे म्हणजे काय हे आपल्या परिचयाचे आहे. खर तर आपण हिंदूचे आभार मानायला हवे. बहुसख्याकाना जर वाटते की हा 'निधर्मीपणाचा धिंगाणा' बस झाला (लालकृष्ण अडवानी याला 'हिंदू–विरोधी' म्हणतात) तर पजाबमध्ये होणारे खून, अत्याचार अगदी बालबोध वाटावे एवढी तीव्र प्रतिक्रिया होईल.

हे येऊ घातलेले संकट आपण टाळायचे कसे? पजाब प्रश्न जरी ताबडतोब सुटला (तो तसा सुटणे जवळजवळ अवघड आहे) तरी हिंदूचा आजचा मूड जाणार नाही

मी स्वत हिंदू आहे त्याचा आताचा मूड जरी मला मान्य नाही तरी मी समजू शकतो दुखावले गेलेले शीख मानस, इंदिरा गाधीच्या शेकडो चुका, पोलिसानी केलेले अत्याचार वगैरे सव मान्य करूनही हे म्हणणे भागच आहे की स्वातंत्र्योत्तर भारताच्या इतिहासात अकालीचे आदोलन अगदी अनावश्यक, गैरलागू आहे.

भारतातील हिंदूच्यादृष्टीने आजचा काळ फार अवघड आहे. त्यानी चुकीच्या प्रचाराला बळी पडू नये त्यानी हेही लक्षात घ्यावे की त्याच्या अस्तित्वावर घाला आलेला नाही. मला नेहमीच जाणवत आले की, हिंदूची सुप्रसिद्ध सहनशीलता ही खरं पाहता वास्तवाची उत्तम समज आहे. भारताच्या आजपर्यंतच्या इतिहासात हिंदू नेहमीच बहुसख्य राहिले आहेत निरनिराळे धर्म, जाती, पथ या देशात आले, येथे स्थिरावले. त्याचे हिंदूनी स्वागत केले. यातसुद्धा 'तात्विक दृष्टिकोना'पेक्षा चाणाक्षपणाचाच भाग जास्त आहे म्हणून मीनाक्षीपुरम्, सौदी अरेबियातून येणारा पैसा, ख्रिश्चन मिशनऱ्याकडून फुकट दिली जात असणारी दुधाची पावडर, *वगैरे सर्व काही असूनसुद्धा भारतात* हिंदू ८५% आहेत

आणखी एक मुद्दा आहे, जो स्पष्टपणे समजून घेतलेला बरा– ज्या प्रकारचा देश आपण उभारण्याचे ठरवले आहे, त्यात अधून मधून जातीय तणाव निर्माण व्हायचेच. इराण किंवा पाकिस्तान याच्यासारख जर व्हायच नसेल तर त्याची म्हणून एक किंमत आहे त्यात अल्पसख्याकाचे लाड करणे, हेही येते. हे मान्य करायला जड आहे. याची मला जाणीव आहे, पण आपल्यासारख्या निधर्मी राज्यामध्ये अल्पसख्याकाना विशेष अधिकार द्यावेच लागतात. कधीकधी हे अल्पसख्याक (पजाबसारखे) वेडेवाकडे वागतात. अशा वेळेस बहुसख्याकासमोर दोनच पर्याय असतात– एक तर प्रतिहल्ला करून कायमचा नायनाट करायचा किंवा अतिशय समंजसपणे देशासाठी, समाजासाठी जे योग्य आहे, त्याचा अंगिकार करायचा.

**(१० ऑगस्ट १९८६)**

---

असलेल्या जयंत पटेल यांनी असे पत्र लिहावे ? आणि टाईम्स ऑफ इंडियाने ते प्रसिद्ध करावे ? शिवाय संपादकीय टीप द्यावी— जयंत पटेलच्या प्रत्यक्ष पत्रापेक्षा या इतर बाबींमुळेच मी जास्त अस्वस्थ झालो.

**मसुद :** जर प्रत्युत्तरादाखल तुम्ही पत्र लिहिले असते तर सामना बरोबरीचा झाला असता. मी मुद्दाम पत्र लिहिले नाही. कारण लोक म्हणाले असते— ते इकबाल मसुद ना, ते काय कम्युनिस्ट आहेत, जातियवादी आहेत इ. इ.

**झकेरिया :** टाईम्स ऑफ इंडियाने छापलेला तो कृष्ण जन्मभूमी मंदिराचा फोटो आणि शी र्षक 'ही भूमी मुक्त केली पाहिजे—' पंतप्रधानांनीसुद्धा यावर टीका केली होती. वस्तुस्थिती काय तर ६०–७० वर्षांपूर्वी वाद होता. उभय पक्षांना समाधानकारक वाटेल असा तोडगा खुद्द पंडित मदनमोहन मालवीय यांनी काढला होता. आता ते मंदिर इदगाहच्या बाजूला आहे. इदगाह म्हणजे एक भिंत – जेथे मुसलमान वर्षातून दोन वेळा दोन तास प्रार्थनेसाठी जातात आणि अशा भूमीची 'मुक्ती' हवी आहे ! आपण निधर्मी तत्त्वज्ञानाविषयी बोलतो आणि वर्षातून दोनदा दोन तास, तेसुद्धा प्रार्थनेसाठी जमलेले मुसलमान सहन होत नाहीत. तुम्हाला हेसुद्धा बंद करायचे असेल तर मला वाटते या देशात धर्मातीत लोकशाहीला काहीही भवितव्य नाही.

**कामत :** 'एक बेजबाबदार कृत्य' असं पंतप्रधानांनी केलेलं वर्णन बरोबरच आहे. शिवाय 'मुक्ति' या शब्दाचा वापर तर अत्यंत आक्षेपार्ह आहे. अशामुळे हिंदूंच्या मनात बऱ्याच गोष्टी येतात. मुख्य म्हणजे हा निर्णय होता तरी कोणाचा ? कदाचित सर्व काही एकदम उत्स्फूर्ततेने घडले असेल.

**झकेरिया :** टाईम्स ऑफ इडियामध्ये या आधी कधीही असे घडले नाही.

**कामत :** अरुण शौरींचे शरीयतवरील लेख, त्यांनी दाखविलेली विसंगती वगैरेनी मीसुद्धा अस्वस्थ झालो होतो. खरं तर कोणत्याही धार्मिक वाङ्मयामध्ये याप्रकारच्या विसंगती असणारच. मुद्दा असा की अशा वेळेस विसंगती दाखवाव्यात का ?

**मसुद :** मी अरुण शौरींना सांगितले की, अशा किती तरी विसंगती अभ्यासकांनी सोडवल्या आहेत. मुख्य म्हणजे त्यांच्या लेखांचा आधार आम्ही ज्याला secondary sources म्हणतो त्यावर आहे. त्यांनी Maxim Rodinson चे महंमदावरील पुस्तक वापरले. या Rodinson च्या वडिलांनी पॅरीसमध्ये ज्यु कामगारांची संघटना Jewish Workers League बांधली होती. म्हणजे इस्लामच्या राजकीय प्रभावाविषयी त्यांच्या मनात अढी असणार. अरुण शौरींनी अशा पुस्तकाचासुद्धा गैरवापर केला. अरुण शौरींनी अशी हुशारी केली की, त्या पुस्तकातील एखाद्या परिच्छेदातील एक ओळ घ्यायची आणि मग Rodinson काय म्हणतो ते सांगायचे. उदाहरणार्थ महंमदाने गरज होती तेव्हा ज्युंना जवळ केले. हे जे अरुण शौरींनी केले ते अक्षम्य आहे


**कामत :** या मागे एक प्रकारचा कट आहे की काय ? टाईम्स ऑफ इंडियाचे चालक...

**झकेरिया :** टाईम्सवर चर्चा केंद्रित करून आपण कदाचित त्यांच्या वर अन्याय करत असू.

**मसुद :** नाही, नाही. मला 'संडे ऑब्झर्वर' चा पण उल्लेख करावयाचा आहे.

**झकेरिया :** शाहाबानो खटला, मुस्लिम वैयक्तिक कायदा यानंतरचे वर्तमानपत्रातील लिखाण वाचले तर असे लक्षात येते की सर्वच वर्तमानपत्रातून हा प्रकार होता. फरक काय तो प्रमाणाचाच होता. काहींनी अतिशयोक्ती केली असेल तर काहींनी हळू आवाजात उद्‌गार काढले असतील. पण मध्यवर्ती मुद्दा हाच होता – मुस्लिम धर्मांध आहेत, त्यांना सुधारणा नकोत.

**मसुद :** मुस्लिमांवर सातत्याने होणाऱ्या हल्ल्याचाच हा प्रकार आहे. निव्वळ खप वाढावा, यासाठी प्रसिद्ध केले जात असावे, असे वाटते. या सातत्याने होणाऱ्या हल्ल्यातून एक गोष्ट स्पष्ट होते. आम्ही




**थोडक्यात काय, तर सार्वजनिक इस्पितळातील रोगी आता महाग औषधांनी दगावतील !**

मुस्लिम भारतात ज्युंसारखे होत आहोत. अल्पसंख्यांक म्हणून नव्हे तर बळीचे बकरे म्हणून ! देशाला भेडसावणाऱ्या समस्या काही लोकांना सोडवता येत नाहीत, मग जनतेचे लक्ष मुस्लिम प्रश्नावर वेधण्याचा प्रयत्न करतात.

**कामत** : मला हे मान्य नाही. सरकारच्या अपयशासाठी मुस्लिमांना बळीचे बकरे करण्यात येत आहे, हे बिलकूल खरं नाही.

**मसुद** : 'सरकारच्या अपयशाबद्दल' असे मला म्हणायचे नव्हते.

**कामत** : फक्त सरकारच त्यांना बळीचे बकरे करू शकते.

**मसुद** : लोकांचा मुड असा आहे की आपण सर्व हिंदू आहोत आणि हे मुस्लिम आपल्याला त्रास देतात.

**कामत** : मुस्लिमांना किंवा इस्लामला अपराधी ठरवण्याचा कट वगैरे काही नाही, अचानक, न ठरवता हे सगळं घडलं, हे मान्य आहे का ? जे काही घडतं आहे यात सातत्य निश्चित आहे, तरी पण एखाद्या मध्यवर्ती केंद्रातून या घटना दिग्दर्शित केल्या जात आहेत, असे मात्र मुळीच नाही.

**मसुद** : मलाही तसं वाटत नाही. तसे सांस्कृतिक वातावरण मात्र आहे.

**कामत** : हे सांस्कृतिक वातावरण अस्वस्थ करणारे आहे. खरा प्रश्न असा की इतर मुस्लिम राष्ट्रातील मुस्लिम खूप पुढारलेले, आधुनिक आहेत, मग तुम्ही का होत नाही ?

**झकेरिया** : त्यापैकी एकाही देशात लोकशाही नाही.

**कामत** : कारणं काय वाटेल ती असो, हिंदूंना असे वाटते की ते जर आधुनिक होऊ शकतात तर तुम्ही का नाही ?

**झकेरिया** : हेच जरा वेगळ्या शब्दात मांडता येईल. मुसलमानांचे उगीचच लाड केले जात आहेत, असं वाटतं.

**कामत** : हे अगदी बरोबर आहे. राजीव गांधी अजूनही मुसलमानांचे लाड करताहेत, असे जाणवते. हिंदूंची मतं मिळणारच हे गृहीत धरायचं; प्रश्न आहे तो मुसलमानांचा.

इतर मुस्लिम राष्ट्रांत मुसलमान आधुनिक, प्रगतीशील आहेत. फक्त भारतात मात्र सुधारणांसाठी तयार नाहीत. कधी कधी असे वाटते की तुम्ही जरुरीपेक्षा जास्त परंपरावादी भूमिका घेत आहात. असं का ? ही भावना सार्वत्रिक आहे.

**मसुद** : अगदी बरोबर ! ही भावना सार्वत्रिक आहे, पण आगीत तेल कोण ओतत आहे ? अरुण शौरी, विनोद मेहता, गिरिलाल जैन सारखे बुद्धिवंत– तेही मुद्दाम किंवा नकळत. असं बघा, फाळणीच्या वेळेस प्रत्येक हिंदू–मुसलमान मुळापासून हादरला होता. पण आता त्या भावनांना स्पर्श केलात तर दुखऱ्या जखमेला धक्का लागतो आणि मग अशा भावनांचे एका शक्तीत रूपांतर होते.

**झकेरिया** : मुख्य म्हणजे 'हिंदू लाट' आहे हे तरी कामत तुम्हाला मान्य आहे का ?

**कामत** : फारच अस्पष्ट, आकारहीन आहे. जेव्हा मुस्लिम वैयक्तिक कायदा संमत झाला, तेव्हा तात्पुरती अस्वस्थता असेलही. आता त्याची तीव्रता कमी झाली आहे. ती भावना कायम स्वरूपाची नाही. मध्येच काही तरी असं होतं आणि मग ते अस्वस्थ होतात.

**झकेरिया** : एक गोष्ट मला समजत नाही की अरिफ मोहम्मद खानसारखा बहुसंख्य मुस्लिमांना विरोध करणारा ताबडतोब 'हिरो' कसा काय होऊ शकतो ?

**कामत** : ती मंडळी प्रगतीशील आहेत.

**झकेरिया** : मग मी प्रगतीशील नाही, इकबाल मसुद नाही ?

**कामत** : अर्थातच आहात.

**झकेरिया** : पण आम्ही 'हिरो' नाही.

**कामत** : ( हंसत हंसत ) त्याला काही ऐतिहासिक कारणं असतील. मौलाना अबुल कलम आझाद यांचे उदाहरण घ्या. बॅ. जिना तर त्यांना कॉंग्रेसचा Showboy म्हणत असत. आता लोक म्हणतील की डॉ. झकेरिया कॉंग्रेसच्या बाजूने बोलत आहेत. कारण त्यांना निवडून यायचे आहे. म्हणूनच ते जे काय सांगतील त्याकडे आम्ही लक्ष देणार नाही. इकबाल मसुद या गटात मोडत नाहीत, कारण ते कॉंग्रेसचे सभासद नाहीत. जर ते कॉंग्रेसचे सभासद असते आणि अरीफ मोहमंद यांच्यासारखी विधानं त्यांनी केली असती तर मग लोक म्हणाले असते 'किती मोठा माणूस आहे !' हिंदूंना वाटते की



–प्रशांतकुलकर्णी

**सततचे दौरे केल्याचा हा परिणाम असावा सर! आपल्या देशात येण्याचं आमंत्रण तुम्ही त्यांना कसलं देताय? सध्या तुम्ही आपल्याच देशात आहात व ते आपले एक मुख्यमंत्री आहेत ! !**

जी व्यक्ती प्रागतिक विचारांची आहे, शिवाय मूल्यांचा आग्रह धरणारी आहे ( भले मग बहुसंख्य लोकांच्या भावनांना धक्का बसेना ) ती व्यक्ती आदरणीय आहे. अरीफ मोहंमद खान यांनी नेमके हेच केले.

**मसुद** : आज मुस्लिमांवर टीका करण्यात काही फारसा धोका नाही.

**कामत** : ज्या सरकारमध्ये अरीफखान मंत्री होते, त्या सरकार-विरुद्ध जाहीर भूमिका घेण्याचे धैर्य त्यांनी दाखवले.

**झकेरिया** : मी मंत्री होतो तेव्हा एका ज्येष्ठ काँग्रेस नेत्याने मला सांगितले की, तुम्हा मुस्लिमांमध्ये हीच खराबी आहे. तुम्ही तुमच्या समाजासाठी चांगले कार्य करता. तुम्हाला मग मंत्रीपद दिले जाते. मंत्रीपद मिळाल्याबरोबर तुमचा उपयोग शून्य ! कारण तुमचा तुमच्या समाजाशी संपर्कच तुटतो. तुम्हाला जर तुमच्या समाजाची प्रगती करायची असेल तर त्यापासून वेगळे राहून चालत नाही.

**कामत** : भारतामध्ये दोन वेगळे सांस्कृतिक प्रवाह असण्याला आक्षेप नाही. हे दोन प्रवाह एकत्र आलेच पाहिजेत असाही हट्ट नाही. मुसलमानांना जर अजूनही मध्ययुगीन संस्कृतीत वावरणं आवडत असेल तर तसं होऊ देत. किंवा निधर्मी पद्धतीने एकत्र येता येईल. उदा. समान नागरी कायदा. माझा अंदाज आहे की हिंदूंना वाटते की दोन्ही प्रवाह जवळ यावे, पण एका प्रवाहाला जवळ येणं नको आहे. त्यामुळे त्यांना प्रिय अशा भा`त जर कोणी बोलायला लागला तर हिंदूंना स्वाभाविकच त्याच्याबद्दल सहानुभूती, आपलेपणा वाटतो. ज्या क्षणी तुम्ही एखाद्या राजकीय पक्षात प्रवेश करता, त्याक्षणी मुस्लिम म्हणून तुमचे अस्तित्व सपते. मग तुम्ही समाजवादी होता, कम्युनिस्ट होता...

**झकेरिया** : हे फार चमत्कारिक आहे. जेव्हा एखादा मुसलमान मुस्लिमांची बाजू घेतो, तेव्हा भाजपवगैरे सारखे पक्ष त्याच्यावर टीका करतात. पण भाजपमधील मुस्लिम, मग ते कितीही परंपरा-वादी, जुनाट मतांचे असोत, ते त्यांना चालतात. कारण त्यामुळे त्यांचा निधर्मीपणा सिद्ध करता येतो.

**मसुद** : माझ्या विवंचनेचा आधार वर्ग आहे, जात नाही. फाळ-णीच्या वेळेस जनरल ऑचिनलेकचे खाजगी सचिव असलेले जनरल शहीद हमीद यांनी लिहिलेल्याDisastrous Twilight या पुस्तकाचे उदाहरण घ्या. हे शहीद हमीद पुस्तकाच्या पहिल्या पानापासून, ज्याला आपण जातीयवादी भूमिका म्हणतो, ती घेतात. त्यांना वाटते आपण मुस्लिम देशाभिमानी आहोत. ते नेहरूंचा हिंदू म्हणून आणि डावे म्हणून तिरस्कार करतात. पण मोरारजी देसाईबद्दल आदर व्यक्त करतात कारण त्यांनी मुंबईत मुस्लिमांचं रक्षण केले. सरदार पटेल त्यांना प्रामाणिक वाटतात. कारण सरदार म्हणत असत की काश्मिरचे काय होईल हे आम्ही बघून घेऊ, पण आम्हाला मुसलमान येथे नकोत.

फाळणीच्या वेळी एका विशिष्ट वर्गातील मुसलमानांची मानसिक स्थिती, दृष्टिकोन कसा होता, यावर हे पुस्तक प्रकाश टाकते. शहीद हमीद यांचा दृष्टिकोन असाच का ? कारण ते एका विशिष्ट वर्गातून आले आहेत. त्या एका विशिष्ट पातळीवर हे सर्व धर्माच्या लोकांबरोबर जुळवून घेऊ शकतात. आता मुस्लिम वैयक्तिक कायद्याचं उदाहरण घ्या. समजा मी जर विरोध केला असता तर नक्कीच जातिबाहेर फेकला गेलो असतो. मी जातीबाहेर फेकण्याला घाबरत नाही. पण मुस्लिम वैयक्तिक कायदा हा मुस्लिम मानसाचा एक भाग झाला आहे. मी या कायद्याला विरोध करून जनमताचा विरोध ओढवून घेण्यात कितीसा अर्थ आहे ? त्यामुळे त्यांचा दृष्टिकोन अनुकूल करण्याची जी काही संधी मला उपलब्ध आहे, तीसुद्धा मी गमावतो. आमच्याकडे




**एक विचित्र बातमी आहे साहेब !**
**पोलिसांनी एका अतिरेक्याला पकडलंय !**

-प्रशांतकुलकर्णी

इश्तिहाद ( अन्वयार्थ ) हे एक तत्त्व आहे. किती तरी गोष्टी याद्वारे साधता येतात मी जर मुस्लिम वैयक्तिक कायद्याला विरोधच करत राहिलो तर हा विरोध फक्त राजकीय कारणापुरता सीमित राहत नाही. एका फार मोठ्या सास्कृतिक प्रवाहापासून तुम्ही स्वत ला तोडून घेता. तुम्ही ब्राह्मण आहात, काहीही झाले तरी त्या सास्कृतिक प्रवाहापासून तुम्ही दूर जाऊ शकत नाही. या गोष्टीची दखल तुम्हाला घेतलीच पाहिजे. आम्ही आमच्या सास्कृतिक वातावरणावरणापासून अलग होणार नाही.

**कामत** : मग समाज सुधारकाची भूमिका काय आहे ? समाज सुधारक निश्चितपणे अशा गोष्टीच्या विरोधात उभा राहील त्याने निक्षून सागायला पाहिजे की हे चूक आहे. मग लोकाना हे आवडो अथवा न आवडो. महर्षी कर्वे, स्वामी विवेकानद वगैरेंनी हेच केले. आता तर डॉ. झकेरिया, इकबाल मसूद किंवा अरीफ मोहमदखान यानी असा मार्ग स्वीकारला तर त्याच्यावर टीका होईलही, पण नंतर तुमच्याविषयी लोकाना आदर वाटेल– आणि फक्त हिंदूनाच नव्हे तर मुसलमानानासुद्धा !

**झकेरिया** : ( कामताना उद्देशून ) तुम्ही ते गृहीत धरताहात की इस्लाममध्ये सुधारणा झाल्या नाहीत आणि तो धर्म आता मृतवत झाला आहे. प्रत्येक काळामध्ये इस्लामची सामाजिक–राजकीय सकल्पना बदलत गेली आहे.

**कामत** : मी तुमचे लेख वाचले आहेत. मला नाही वाटत की हा धर्म मृतवत आहे

**मसुद** : समजा मी जर मुस्लिम वैयक्तिक कायद्याविरुद्ध जाहीर भूमिका घेतली तर मग माझा उपयोग ना होईल तुम्हाला ना मुस्लिमाना !

**कामत** : हं बरोबर आहे.

**झकेरिया** : श्रीमती इंदिरा गाधी मुस्लिम कायद्याबाबत अस्वस्थ होत्या. एकदा त्यानी मला विचारले होते की, हा कायदा काय आहे, हे तुम्ही कृपया समजून घ्या. हा कायदा मुख्यत्वे तीन भागात आहे– (१) वारसाहक्क (२) लग्न (३) घटस्फोट आणि पोटगी. काही प्रमाणात भेट ( Gift ). बाकीचे शरियत कायदे ब्रिटिशानी केव्हाच मोडीत काढले मी श्रीमती गाधीना विचारले की, किती मुसलमान चार बायका करतात ? किती तरी देशामध्ये हा कायदा रद्दबादल ठरवला आहे. मुख्य अडचण वारसाहक्काची आहे कारण हा भाग कुराणात आहे कुराण म्हणजे इस्लाम जे स्थान येशुचे ख्रिस्ती धर्मामध्ये आहे, तेच स्थान कुराणचे इस्लाममध्ये आहे. आमच्या श्रद्धेप्रमाणे कुराण म्हणजे देवाचा शब्द ! मानवाला ज्यात बदल करण्याचा हक्क नाही. त्यामुळे वारसा हक्क हाच खग अडथळा. अर्थात त्याचीही काळजी करण्याची गरज नाही. ९९% मुसलमान मरतात, तेव्हा प्रेतयात्रेसाठी एक नवा पैसासुद्धा नसतो. उरता उरले १%. त्याना राहू देत तसेच मुस्लिम वैयक्तिक कायद्याविषयी एवढा गदारोळ केला, कशासाठी ? एक लग्न, घटस्फोट, वारसाहक्क वगैरेचे कायदे सोडल्यास बाकीचे इतर सर्व महत्त्वाचे कायदे सर्वांना सारखेच आहेत.

**कामत** : मी व्यक्तिश. या गोष्टीचा विचारसुद्धा केला नसता.

**झकेरिया** : सुप्रिम कोर्टाने शहाबानो खटल्यात उगीचच हा प्रश्न उपस्थित केला आणि तेव्हापासून हे सुरू झाले.

**कामत** : समाजातील काही लोकाना एका विशिष्ट तऱ्हेने जर जगायचे असेल तर जगू द्या. आता राहिला 'हिंदू लाट' चा प्रश्न. माझ्यामते लाट वगैरे काही नाही. मी पुष्कळ हिंदूशी बोललो. आम्ही याविषयी चर्चासुद्धा करत नाही.

**मसुद** : तुम्ही म्हणता हे ऐकून मला फार आनंद झाला.

**कामत** : 'हिंदू लाट आहे' वगैरे काही नाही. हिंदू मानस काहीसे अस्वस्थ आहे. कशामुळे ही अस्वस्थता आहे, हे आपल्याला शोधायचं आहे. इतिहास एकागीपणे लिहिला गेला. त्यामुळे कदाचित ही भावना मनात असेल. मला नाही वाटत की हिंदूना मुस्लिम कायद्याविषयी फार जिव्हाळा आहे. फारशी माहिती नसताना इतक्या वेगवेगळ्या प्रतिक्रिया दिल्या जातात. त्यामुळे हिंदू मानसाचे शिक्षण करणे आवश्यक आहे. बुद्धिवंताना घटनाचा अन्वयार्थ एका विशिष्ट पद्धतीने लावायचा असेल.

**झकेरिया** पण या बुद्धिवंताचा जनमानसावर प्रभाव असतो.

**कामत** : हे बरोबर आहे. तरी पण त्या मागे कटाची भावना नसावी. हे सर्व काही योजनापूर्वक घडविण्यात येत आहे, असे मला वाटत नाही. लोक काहीसे अस्वस्थ निश्चित आहेत.

**मसुद** : तुमचं निदान बरोबर ठरलं तर मला आनंदच आहे

**झकेरिया** : आपण हिंदू किंवा मुस्लिम लाटेविषयी चर्चा करतो, पण एक लक्षात घेतले पाहिजे की, या प्रकारच्या घटना एका समाजाला दुसऱ्याविषयी वाटणाऱ्या द्वेषातूनच निर्माण होतात.

निरोगी जातीयवाद ( Healthy Communalism ) मुळात वाईट नसतो. पण एखादा समाज दुसऱ्या समाजाचा द्वेष करू लागतो, ते मात्र चूक असते. दुर्दैवाने समाज द्वेषाइतका कोणत्याच भावनेनं उत्तेजित होत नाही. इग्लडमध्येसुद्धा वाशिक प्रश्न आहेत. बुद्धिवंत या प्रकाराना प्रोत्साहन देत असतात.

**कामत** : माझ्या मते या विकसनशील देशाच्या कळा आहेत.

**झकेरिया** : अगदी बरोबर.

**कामत** : या कळा आपल्याला स्वीकारल्याच पाहिजेत. त्याशिवाय आपण एकत्र असूच शकणार नाही. आपण आता आत्मपरिक्षण करत आहोत. मी स्वत च्या आत डोकावून पाहतो, तेथे मला द्वेष, तिरस्कार आढळत नाही.

**झकेरिया** : मी कोठल्या प्रकारचा मुसलमान आहे ? जर असे वाटत असेल की हिंदू संस्कृतीचा मुसलमानावर काहीही परिणाम झालेला नाही, तर ते चूक आहे आजचा भारतीय मुसलमान, एखाद्या अरबापेक्षा, इराण्यापेक्षा, तुर्कापेक्षा फार वेगळा आहे. त्याची जीवनपद्धती, रीतिरिवाज यात जमीन–अस्मानाचा फरक आहे.

**कामत** : आपण सुरुवात एका विशिष्ट विचाराने केली आणि आली मात्र नेमक्या विरुद्ध विचारावर. तुम्ही ज्याला लाट म्हणता, माझ्या मते ते आत्मपरिक्षण आहे. या प्रकारच्या आत्मपरीक्षणामध्ये लाट असण स्वाभाविक आहे पण त्याबरोबरच समन्वय आहे. हे सर्व झाल्यावरच आपण पूर्णपणे भारतीय समाज निर्माण करू शकू.

**मसुद** : सास्कृतिक पातळीवर हिंदू–मुस्लिम एकमेकाच्या जवळ येत नाहीत. त्यातल्या त्यात हिंदू लोक मुसलमानाच्या सस्कृतीमध्ये रस घेतात.

**कामत :** मुसलमान बहुसख्येने असलेल्या मतदार सघातून हिंदू उमेदवार आणि हिंदू बहुसख्य असलेल्या मतदार सघातून मुस्लिम उमेदवार उभे करावेत.

**मसुद :** पण सास्कृतिक कार्य सुरू राहिलेच पाहिजे. आणि यात मुसलमानानी वाटा उचलला पाहिजे.

**झकेरिया .** आणि वर्तमानपत्रानीसुद्धा. पंतप्रधानानी नागपूरला हे सांगितलेच आहे. लिखाण करताना डोळ्यासमोर नेहमी राष्ट्रीय हित ठेवावे. माझ्या लिखाणाने या हिताला बाधा तर येत नाही ना, हा विचार मनात सतत हवा. तुम्ही जर निधर्मीवाद स्वीकारला असेल, हजारो लोकाच्या प्राणाशी खेळ असेल तर तुम्ही लिखाणाविषयी जागरूक राहिलेच पाहिजे.

□

# हिंदू मानस

## जयंत पटेल यांचे टाईम्स ऑफ इंडियात प्रसिद्ध झालेले पत्र

महोदय,

भारतातील हिंदूना एकत्र येण्याची आजच्या एवढी तीव्र गरज पूर्वी कधीच नव्हती जगाच्या पाठीवर स्वतःच्या देशात ते अनाथ झाले आहेत. हिंदूच्या मतावर राज्यावर आलेले सध्याचे सरकार हिंदूनाच सावत्र मुलासारखी वागणूक देत आहे हा हिंदूचा फार मोठा विश्वासघात आहे. सत्ताधारी पक्षाने देशाची एकता या घोषणेवर निवडणूक जिंकली. पण आता मात्र सरकारची धोरण एकतेविरुद्ध जात आहेत देशावर लादलेला हा फार मोठा फ्रॉड आहे. पण आता सरकारचे पितळ उघडे पडले आहे. मुस्लिम वैयक्तिक कायदा संमत करून सरकारने उटाच्या पाठीवर शेवटची काडी टाकली.

हिंदू बुचकळ्यात पडले आहेत–ते भारतात राहतात की एखाद्या अरब राष्ट्रात ! हिंदू एकतेसाठी, सस्कृतीसाठी हिंदूनी जरासे काही केले तरी लगेच त्यावर 'जातीय' असा शिक्का मारण्यात येतो. सरकारच्या विकृत कल्पनेप्रमाणे 'चागला हिंदू' म्हणजे 'मुस्लिमाच्या बाजूने' 'हिंदूच्या विरुद्ध' आणि 'देशाच्या विरुद्ध' असा होतो प्रचाराचा रेटा एवढा जबदस्त आहे की, हिंदूना हिंदू म्हणवून घेताना शरम वाटते. मुस्लिम वैयक्तिक कायदा लोकसभेत समत केला गेला तेव्हाचे सत्ताधारी पक्षाच्या हिंदू खासदाराचे वागणे आठवून पहा. रसातळाला गेल्याचे आणि नपुसकत्वाचे ते उत्तम उदाहरण आहे

सामान्य हिंदूला त्यामुळे पोरक वाटत. राज्यकर्ता पक्ष, नोकरशहा, उच्चभ्रू लोक, प्रसारण माध्यम, विचारवत, याच्यात एक प्रकारचा अनैतिक समेट (Unholy alliance) झाला आहे ही सर्व मडळी स्वातत्र्य मिळाल्यापासून हिंदूच्या विरोधात आहेत. यापैकी प्रत्येक गटाने स्वत च्या स्वार्थासाठी हिंदू–विरोधी भूमिका घेतली. हिदूना वाटते की, भगवान विष्णुनी वैकुठातून खाली यावे आणि चक्र सोडून दुष्टाचा, अधर्मीचा नायनाट करावा. काय पण आशा ! हिंदूनी सघटित व्हावे, लढा करावा, त्याग करावा म्हणजे मग धर्माचे राज्य अवतरेल. अन्याय, अत्याचाराचा अतिरेक झाल्यावर किडा, मुगीसुद्धा प्रतिकारास सिद्ध होते हिंदूची सहनशक्ती किती आहे, हेच आता बघायचे.

आता तर हिंदूनी एकीने लढा दिला नाही तर त्याच्या हितचितकानासुद्धा त्याच्या विषयी तिरस्कार वाटेल मग मात्र त्याला स्वत लाच दोष द्यावा लागेल

२२ जुलै १९८६

(हे पत्र प्रसिद्ध करण्याचा आमचा निर्णय म्हणजे या पत्रात व्यक्त झालेल्या भूमिकेला आमचा पाठिंबा आहे, असे नाही. आमच्या मते, श्री जयत पटेल लाखो हिंदूच्या भावना बोलून दाखवत आहेत. हिंदूच्या या भावना, योग्य असोत ना नसोत, समजून घ्यायला हव्यात–सपादक, टाईम्स ऑफ इडिया)

कर्नाटकात गेल्याच महिन्यात धार्मिक दंगली उसळल्या होत्या. 'डेक्कन हेराल्ड' या पुरोगामी समजल्या जाणाऱ्या वृत्तपत्रात एक कथा प्रसिद्ध झाली हे निमित्त. या घटनेचा हा मागोवा. बंगलोर–म्हैसूरला जाऊन घेतलेला....

# हा नवा धर्मवाद तरुणांचा आहे, व्यावसायिकांचा, उच्चशिक्षितांचा, भौतिकता स्वीकारलेल्यांचा आहे....

**संजय संगवई**

बंगलोरला कर्नाटकात सर्वत्र बेंगरूळ म्हणतात, कटाक्षान तर बेंगळूरला जाताना आमच्या त्रासदायक, अडचणीच्या लक्झरी कोचमध्ये अंग आंबून गेली होती सुपर फास्ट गाडी ठिकठिकाणी थाबत होती. हमखास नादुरुस्त असलेल्या व्हिडिओविरुद्ध तक्रार करकरून शेजारचा इराणी शेवटी माझ्याकडे वळला. हा थेट इराणमधून आलेला. बरोबर बायको न् मुलगी. भारत पहायचाय कराड–कोल्हापूर पट्ट्यातली हिरवीगार बागायत पाहून हा माणूस म्हणतो की आमच्याकड अस काहीच नाही शेती नाहीच. पाऊस निश्चित नाही प्रचड दुष्काळ पडलेला होता जमीन नाही. इराणमध्ये सर्वात जास्त लोक तेल व खाण उद्योगात आहेत शेतकरी–शेतमजूर हा प्रकार थोडा. मात्र आमच्याकड सर्वांचं उत्पन्न आठवड्याकाठी २००–२५० रुपये–त्याहून जास्त आहे. सात वर्षांच्या इराण–इराक युद्धान मात्र आमची पार वाट लागली आहे चारशे जहाजं आखातात अडकून आहेत, किवा नष्ट झाली. तेल उत्पादन ६० लाख बॅरल (दर रोज) वरून २५ लाख बॅरलवर आलय या खोमेनीच्या राजवटीत आमच जीवन उध्वस्त झालय. स्वातंत्र्य नावाची चीज नाही. अहो साध मनोरजन नाही माणूस म्हणून जगायच कस ? आबादान, इस्फान, शत–अल–अरब सारख्या सुदर श्रीमंत शहराची वाट लागलीय. या मुल्लाना लोकाच्या समस्यातल, त्याची तड लावण्यातल काहीही कळत नाही. ते आल्यानतर आमची स्थिती from the best to the worst अशी झालीय.

एका तेल कपनीत डेप्युटी मॅनेजर पदावरचा हा गृहस्थ आपण होऊन भडाभडा बोलत होता. धर्म कधीही माणसाला सुखी जीवन पुरवू शकत नाही. या धर्मानच आमच्यात झगडे लावले धर्मान कधीही राष्ट्र-बांधणी होत नाही. आमचे भाषिक, प्रातिक प्रश्न आता डोकी वर काढू लागले आहेत– अस कडवटपणे तो बोलत जात होता

आपण ज्यासाठी जात आहोत त्या विषयाला अनुरूप उपोद्घात सहजच झाला होता –अन् हवा तसा देखील. बगलोरला 'डेक्कन हेराल्ड' या इग्रजी दैनिकात आलेल्या कथेच्या अनुषगान सुरू झालेल्या दगलीची आता काय परिस्थिती आहे, त्याचा तलास घ्यायचा होता म्हणून प्रथम मुक्काम बगलोर–फ्लॅशबॅक.

□

सात डिसेंबरच्या सकाळी 'डेक्कन हेराल्ड'च्या रविवार आवृत्तीत 'मुहमद द इडियट' ही कथा प्रसिद्ध झाली. त्यामुळे पूर्ण बगलोर शहर तणावाखाली होते. सकाळी दहा वाजताच पाच-सात हजार मुस्लिमाचा जमाव 'हेरल्ड'च्या महात्मा गाधी रस्त्यावरच्या (या रस्त्याला सर्वत्रच एम् जी. रोड म्हणतात !) कार्यालयासमोर जमला. पुण्यातल्या कॅपमधल्या एम् जी रोडसारखाच हा पॉश भाग. इग्रजी चित्रपट दाखविणारी चित्रपटगृहे, हाय-फाय-दुकाने, हॅंडिक्राफ्ट्स, जीन्सची दुकान, काफी हाऊसेस– बाजूच्या रस्त्यावर सरकारी कार्यालये. या जमावातील काहीजण इदिरा काँग्रेसचे माजी मत्री व आमदार सी. एम् इब्राहिम याच्याबरोबर 'हेरल्ड'च्या ऑफिसात गेले परत आल्यावर इब्राहिम यानी भडक भाषण केले असल्या गोष्टी सहन कशा करता ? असा सवाल विचारला प्रचड रेटारेटी सुरू झाली पोलीस व्हॅन्स पाहून जमाव चिडला त्याच्या हातात लाठ्या, काठ्या, सोडावॉटरच्या बाटल्या अस होतं. त्यानी व्हॅन्सवर हल्ला केला. पोलिसानी लाठीमार केला आश्रुधूर केला. तरीही जमाव हटत नाही म्हटल्यावर पोलीसप्रमुख हरळनकर यानी गोळीबाराचा आदेश दिला. त्यात पधराजण ठार झाले. त्याची प्रतिक्रिया तावडतोब उठली. एकतर या भागातल्या अनेक दुकानाची, वाहनांची मोडतोड, जाळपोळ झाली. 'हेरल्ड'चे मुख्य सपादक व सचालक मडळाचे एक सदस्य हरी कुमार आपल्या एका बातमीदारासकट शहरातल्या 'सालार' या उर्दू दैनिकाच्या कार्यालयात गेले. तिथं त्यांनी क्षमायाचनेची इग्रजी व उर्दूतली पत्रकं दिली ती मुस्लिम वस्त्यात

लावायला सांगितली. काही तासातच ही पत्रकं लागली. दुसऱ्या दिवशी, 'डेक्कन हेरल्ड'च्या पहिल्या पानावर क्षमायाचना, व मृताच्या नातेवाईकांना २५ हजार रुपये भरपाई देण्याची तयारी! खुद्द संचालक-मंडळात या रकमेसंबंधी मतभेद होते. हरी कुमार यांचे वडील 'द प्रिंटर्स (म्हैसूर) लिमिटेड' या 'हेरल्ड'च्या प्रकाशन कंपनीचे प्रमुख आहेत. त्यांनीच याला विरोध केला असं म्हणतात. संपादकीय वर्गातही या निर्णयाबद्दल दोन तट आहेत. 'डेक्कन हेरल्ड'चा संपादकीय वर्ग, बातमीदार या घटनेबद्दल काहीही सांगत नाहीत. ते संपादकाच्या केबिनकडे बोट दाखवतात. कार्यकारी संपादक यशवंतकुमार असले तरी 'ब्रेन बिहाइंड' मुख्य संपादक हरीकुमार आहेत. ते तर या प्रश्नाचा उल्लेख निघताच असे चपापतात! भेटायलाही नकार देतात! मात्र हा सगळा प्रकार सी एम्. इब्राहिम यांच्या चिथावणीनच घडला अशी इथल्या मंडळींची खात्री आहे. सी. एम्. इब्राहिम हे मूळचे मल्याळी, पण कर्नाटकात स्थायिक झालेले. ते व कूर्ग जिल्ह्याचे माजी मुख्यमंत्री गुंडूराव यांचे सहकारी एफ्. एम्. खान हे अव्वल गुंड व जातीयवादी म्हणून कर्नाटकात परिचित आहेत. इब्राहिम यांनी अनेक वेळा टोप्या बदलल्या. जनता लाटेत ते आमदार म्हणून निवडून आले. मात्र इंदिराबाईंची सरशी होतेय असं दिसताच ते फिरले. पुढे गुंडुराव मंत्रिमंडळात ते मंत्री झाले, पण सौदी अरेबियातून मिळालेल सोन्याचं घड्याळ, मुस्लिमांच्या स्वायत्तपणाविषयी केलेली विधानं, सरतेशेवटी एका महिलेला पळवून-डांबून ठेवल्यासंबंधीचा आरोप, अशा प्रकरणात ते अडकत गेले. यामुळे त्यांना राजिनामा द्यावा लागला ही सर्व प्रकरणे 'डेक्कन हेरल्ड'ने लावून धरली होती, म्हणून इब्राहिम यांचा 'हेरल्ड' वर राग आहे. दुसरीकडं दोन जानेवारीला कर्नाटकातल्या जिल्हा परिषदेच्या निवडणुका होत्या. त्याच दरम्यान हेगडे सरकारला अडचणीत पकडण्यासाठी ही संधी बरी आहे असं वाटल्यानं हा प्रकार झाला, हे अनेक निरीक्षकांच मत. नंतर झालेल्या निवडणुकात हेगडे सरकारची घटलेली शक्ती हे याच मूर्तरूप आहे असाही जनता पक्षधार्जिण्यांचा दावा आहे. या प्रकाराचे निवडणुकीवरील संभाव्य परिणाम लक्षात घेता मुख्यमंत्री हेगडेंनीही तांबडतोब गोष्टीचा निषेध व्यक्त केला

१९४८ पासून चालू असलेल्या 'डेक्कन हेरल्ड' या पत्राची प्रतिमा नेहमीच पुरोगामी. डावी व अल्पसंख्याकांना अनुकूल अशी राहिली आहे सर्वच हिंदुत्त्ववाद्यांचा 'हेरल्ड' वर व हरीकुमार यांच्यावर रोष दिसला त्यांच्या मते 'हेरल्ड' अवाजवीपणे मुस्लिमांची बाजू उचलून धरतो आणि यावेळी खुद्द मुस्लिमांकडूनच जोरदार धक्का मिळाला याबद्दल त्यांना आतून आनंदच होतो खेरीज या प्रकाशन संस्थेची, याशिवाय 'प्रजावाणी' (कन्नड दैनिक), 'सुधा' व 'मयूर' ही साप्ताहिके आहेत. सर्वच नियतकालिके ही largest selling publications in Karnataka अशी आहेत 'डेक्कन हेरल्ड' चा खप १ लाख ६० हजार, इंडियन एक्स्प्रेस ५० हजार तर टाइम्स ऑफ इंडिया ८ हजार असा जाणकारांचा आकडा आहे

अशा पत्रातून 'मुहम्मद' सारखी गोष्ट यावी याची दखल सर्वांनीच वेगवेगळ्या तऱ्हेन घेतली 'रेडियन्स' सारख्या मुस्लिम पाक्षिकानं या गोष्टीच्या वाईटपणावर शिक्कामोर्तब केलं. मात्र 'हेरल्ड' ला क्षमा केली. त्याउलट गुजरात, आंध्रमधील काही वृत्तपत्रांनी ही गोष्ट पुन्हा जशीच्या तशी छापली. बंगलोरच्या 'अभिमानी' 'या साप्ताहिकानं ३१ डिसेंबरच्या अंकात शब्दशः अनुवाद छापला त्याचे संपादक म्हणतात की, 'काय कारवाई किंवा प्रतिक्रिया होते याची मी वाटच पाहत आहे. मुस्लिमांची पुन्हा प्रतिक्रिया तर येऊ द्या-' कन्नड सिनेनट राजकुमार यांच्या चाहत्यांच्या पुरस्कारानं हे नियतकालिक चालू आहे. काही प्रतिक्रिया झाली तर कन्नड अभिमानी संघ बघून घेईल अशी आतली धमकी आहेच.

मात्र बहुसंख्य हिंदूंची प्रतिक्रिया या कथेच्या विरुद्ध आहे. त्यांचं म्हणणं असं की ही कथा कितीही वाङ्‌मयदृष्टया सरस असली तरी तिचा मथळा व शेवटचं वाक्य परधर्मीयांना डख करेल असंच आहे 'स्टार ऑफ म्हैसूर' चे संपादक के. एन. गणपती किंवा बंगलोरच्या 'विक्रम' या हिंदुत्त्वाभिमानी नियतकालिकाचे संपादक श्री. मल्लया यांच म्हणण असं की, 'शेवटी प्रत्येक धर्माचा आपण आदर करावा. इथं इतर धर्मांनाही काही स्थान असावं कथेत सीता, मधुसूदन अशीही नावं आहेत. पण कथेचा घाटच प्रेषित मुहम्मदाच्या चारित्र्याचं विकृत चित्रण करणारा स्पष्टपणे जाणवतो... किमान तो मथळा व शेवटचं वाक्य!'

¤

## म्हैसुरातील प्रतिक्रिया

बंगलोरला जे घडलं त्याची प्रतिक्रिया इतरत्र होणं स्वाभाविक होत. दुसऱ्या दिवशी म्हैसूरच्या मुडी मोहल्ल्यातील प्रमुख मशिदीत तिथल्या मुस्लिमांची सभा झाली. म्हैसूरमध्ये किंवा पूर्वीच्या म्हैसूर राज्यातच १९२८ मध्ये गणपती - उत्सवानिमित्त बंगलोरला झालेला हिंदू-मुस्लिम दंगा तेवढा जुन्या पिढीच्या स्मरणात आहे. उत्तर कर्नाटकात, पूर्वीच्या मुंबई इलाख्यात राजकीय जागृती, सामाजिक अस्तित्त्वाचं भान अशा गोष्टी आल्या. मात्र पूर्वीच्या म्हैसूर स्टेटमध्ये अशा जाणिवाच नव्हत्या. राजकीयदृष्टया सजग व आक्रमक असणारी लिंगायत मंडळी इथं जवळजवळ नाहीतच. कृष्णराज, चामराज कोडियार या राजांच्या अमदानीत इथं धार्मिक सलोखा होता. त्यांचा दिवाण मुस्लिम होता. त्यामुळं म्हैसूर संस्थानात मुस्लिम मुलींसाठी शिक्षणाच्या खास सोयी-सवलती उपलब्ध करून दिल्या गेल्या होत्या. दसऱ्याचा सण हा केवळ हिंदूंचा नसतो, तर आजही म्हैसूरमधल्या प्रत्येक कुटुंबाचा असतो. घरा-घरात दिवे उजळलेले असतात. इथल्या मशिदी - इदगाहमध्ये पूर्वी सायंकाळची खेळगडयांची वर्दळ असे.. नमाज पठणाची पद्धत फक्त शुक्रवारी असे.

असं शांत-स्वस्थ असलेलं म्हैसूर ८ डिसेंबरला रात्री सजग झालं त्या गोष्टीवर आपणही काही तरी करावं असं त्या मशिदीतल्या सभेत ठरलं. पण नुस्तं निवेदन द्यायचं का मोर्चा न्यायचा? नेहमी ज्यांना धर्मवेडे समजले जाते अशा मुल्ला-मौलवींनी फक्त निवेदन द्यावं असं सांगितलं पण तिथल्या दोन मुस्लिम नगरसेवकांनी मोर्चाच काढावा असा आग्रह धरला, हा पुन्हा मतं मिळवण्याचा डाव होता. त्यांच्या म्हणण्यानुसार

दुसऱ्या दिवशी दुपारी मोर्चा निघाला या नगरसेवकाची माणसच गिल्ला करत आली होती मोर्चा कलेक्टर कचेरीवर आला निवेदन दिल. मोर्चा परतताना काही गुडांनी एका महिलेशी असभ्य वर्तन केल तिथून गोंधळाला सुरुवात झाली. म्हैसूरचे जबाबदार नागरिक सागतात की या महिलेशी अतिप्रसग करणाऱ्या इसमाला पोलीस अधिकाऱ्याने पिस्तुलातून गोळी घातली. तो खाली पडला इथवर पोलीसही या (मुस्लिमाच्या) हुल्लडबाजीमुळ बिथरले होते हा माणूस पडल्यावर कोणताही अश्रुधूर हवेत गोळीबार न होता एकदम 'फायर', त्यात पाच माणस गेली. हा प्रकार झाल्यावर दुपारी हिंदूची टोळकी जमायला सुरुवात झाली त्यात केवळ समाजकंटकच नव्हते, तर मुस्लिमाबद्दल त्वेष असणारे मध्यमवर्गीय, व्यापारी, विद्यार्थी होते. श्री. गणपती म्हणाले की त्या दुपारनतर म्हैसूरमध्ये Law and Order आहे की नाही अशी स्थिती निर्माण झाली. मुडी मोहल्ल्यातील, बाजारपेठेतील मुस्लिमाची दुकान वेचून काढली ती लुटली, जाळली एकेका माणमाला बाहेर खेचल न् हाणमार केली. पोलीस मख्ख होते त्या रात्री अख्ख्या मुस्लिम वस्तीनं मशिदीत आश्रय घेतला होता. पोलिसानी कर्फ्यू लावला तरी तणाव चालूच होता. दोन दिवसानी म्हैसूर शात झाल. रामनगर, तुमकूरसारख्या शेजारच्या गावातही काही प्रकार झाले हळूहळू सगळच स्थिरावल वर्तमानपत्राचे रिपोर्टर्स आले. सरकारी पाहणी, अधिकारी, मत्री, विरोधी नेते, मुस्लिम, बिगर मुस्लिम वक्तव्य-नेहमीची वर्दळ सुरू झाली. आता तेही थडावल आहे आता न्यूज–एडिटर लोक हसत म्हणतात, 'सगळ सपल. जेवढ वृत्त यायच त्या पेक्षा अधिक काय सागणार? काहीच नाही'

¤

काहीच नाही सगळ सपल. जिल्हा परिषदेच्या निवडणुका होत्या. जनता–काँग्रेस स्पर्धा–राजकीय नेत्यांनी जनतेच्या भावनाचा फायदा घेतला आरभीच्या उद्रेकाचा समाज कटकानी फायदा घेतला. गरीबच शेवटी भरडला जातो. केवळ राजकीय हूल होती. वरवरची. आता ती सपली सूड घेऊन झाले होते. एवढंच ?

## धार्मिक जाणिवा

'पूर्वी कधी नसलेला जातीयवाद, धर्मवेडेपणा इथ आता पसरायला सुरुवात झाली आहे. गेल्या पाच वर्षात अनेक कृतक धार्मिक Psuedo religious सघटना पसरत आहेत. तबलीक–इ–जमात, तुल्बा, जमाते–इस्लामी आता ही स्टुडट्स इस्लामी ऑर्गनायझेशन या सघटना स्थापन झाल्या आहेत. मशिदी–मशिदीत मुल्ला–मौलवीच जाळं आहेच हे सर्व काय करतात म्हणून विचाराल तर, 'बगलोरमधले एक ज्येष्ठ समाजकार्यकर्ते डॉ मुमताझ अलिखान बोलत होते; समाजशास्त्रात डॉक्टरेट करून ते आता स्वत. 'सेटर फॉर रिसर्च अँड डेव्हलपमेंट ऑफ दलितस्' ही सस्था चालवतात. दलित समस्येवर, भारत व विशेषत: कर्नाटकातल्या मुस्लिम समस्येवर त्यानी अनेक पुस्तक लिहिली आहेत ग्रामीण भागातील बालकाच्या आरोग्य समस्या, शिक्षण समस्या यासाठी स्वत अनेक सस्था ते चालवतात. त्यासाठी नेदरलँडस्च्या सी इ. एफ् सस्थेची मदतही त्यानी घेतली आहे सुधारणावादी मुस्लिम विचारवताला ज्याप्रमाणे समाजातून उपेक्षा मिळेल तोच प्रकार त्याच्याबाबत आहे. पर्सनल लॉ, समान नागरी कायदा या बद्दल त्याची वेगळी मते आहेत मुस्लिमाचाच पर्सनल लॉ सुधारायला पाहिजे, तो धडपणे शरियतनुसारीही नाही, असं सागताना मुमताझ अली 'शरियत'च कशी सुधारणेला अनुकूल आहे या ग्रथप्रामाण्याचा आधार सोडत नाहीत. हमीद दलवाई सोडता कुणीही हे ग्रथप्रामाण्य नाकारलेले नाही.

डॉ. खान म्हणाले, 'तस केल तर मी मुस्लिमच राहू शकणार नाही हिंदु बुद्धिजीवीच बर आहे. त्यानी बडखोरी केली तरी ते समाजाच्या बाहेर जात नाहीत तुम्ही ईश्वर, मदिर, ग्रथ माना न माना पण इथे आम्ही कुराण–प्रेषित नाही मानल तर आमच मुस्लिम अस्तित्वच सपत' मग पुढे जाण्यासाठी, आधुनिकीकरणासाठी कुराणाचाच आधुनिक काळानुरूप अर्थ लावावा लागतो. यामुळे मुस्लिम समाज इथून विलग होण्याच काही कारण नाही स्वतंत्र अस्तित्व टिकवूनही या राष्ट्रात घटक म्हणून राहण त्यामुळ शक्य होईल असं त्याचं म्हणण.

'आमच्याकडे आधीच गरीवी, कर्नाटकात एकदर तीस टक्के ग्रामीण मुस्लिमापैकी १९ टक्के शेतमजूर आहेत. बहुसख्यजण लहानमोठे धदे करतात. जमीनमालकापैकी ८५ टक्क्यावर लोकांकडे ५ एकरापेक्षा कमी जमीन आहे सरकारात नोकऱ्याचे प्रमाण कमी पूर्वीप्रमाणे सेक्युलर शिक्षणाची परंपरा इथ राहिली नाही आमच्या समाजात, कुटुबात शिक्षणाची, सामाजिक कार्याची परंपराच नाही या उर्दू शाळानी, धार्मिक परपरानी आमच्याकड हाहा कार माजवला आहे आमच्या ६४ टक्के मुली उर्दू शाळात शिकतात–यामुळे ही माणस देशाशी identity च प्रस्थापित करू शकत नाहीत, आणि त्या शाळामध्येही काय चागल शिक्षण दिलं जातं म्हणता ?'

'या अवाजवी धर्मवेडामुळ या वेळेपर्यंत शात असलेल्या आमच्या म्हैसूर प्रातात आता धार्मिक ध्रुवीकरणाला सुरुवात झालीय' पहिल्या बोलण्याचा सदर्भ देऊन ते म्हणतात की, या नव्या धर्मवादी सघटनामध्ये केवळ तरुण, पौगडावस्थेतली मडळी नाहीत अनेक पत्रकार, प्राध्यापक, डॉक्टर, वकील वगैरे मंडळी आहेत. या सुशिक्षिताचा धर्मवेडेपणा फार भयकर. ही माणस सभा घेतात, मशिदीत नमाजाच्या वेळेला सागतात– कुटुबनियोजनाच्या विरुद्ध विषारी प्रचार चालू असतो. हिंदूमध्ये फार मिसळू नका, आपली शुद्धता राखा, वेगळेपण राखा असं बजावतात फिल्म, सगीत या सर्वांपासून दूर राहण्याचा उपदेश होतो. एकदर आपली स्वतत्र अस्मिता निर्माण व्हावी याचे प्रयत्न केले जातात. अनेक वेळा मला स्वत.ला या प्रवृत्तीचा त्रास झाला आहे धमक्या मिळाल्यात.

या सर्वांचा परिणाम ध्रुवीकरणात होईल का ? अस विचारल्यावर ते म्हणतात– काही प्रमाणात यामुळे ते सुरू झालय पण याला पूर्णता देतील, बळकट करतील ते हे राजकारणी लोक. वस्तुत. या मुस्लिमातही एकता कुठेय ? गरीब–श्रीमत भेद नमाजाच्या वेळेलाही दिसतो. सैयद, पटेदार, कच्छी–मेनन, या जाती–जमातीच्या भेदानी समाज पोखरला आहे. तरीही इस्लाम खतरे में है हा नारा लावला की ही सगळी मडळी एक

होतात. You don't know the psychology of our poor people. त्याना चागला खऱ्या अर्थान त्याचा पुढारीही मिळत नाही. इस्लामच्या नावाचे नारे लावतात पण या जमातीसाठी काहीच करत नाहीत !

—डॉक्टरसाहेब थाबायला तयार नव्हते. मात्र सर्व मुस्लिमाप्रमाणेच तेही हमीद दलवाईंचे तत्त्वज्ञान, सघटन व प्रचारावर नाराज होते. दलवाईंना कुणीच मुस्लिम मानायला तयार नव्हते— तो आमच्यादृष्टीन काफीरच आहे अस सांगताना ते म्हणाले की, आमच्याकडे मध्यमवर्गच असा कितीसा आहे ? हा मध्यमवर्गच थोडा फार पुरोगामी विचार करू शकतो. बाकी अतिश्रीमत व गरीब दोघेही धर्माच्या आहारी असतात. त्यासाठी त्याना न दुखवता सुधारणा करायची असल्यास सर्व मुस्लिमाचा एक समान नागरी कायदा हवा— कारण मुळात त्याच्यातच एक असा कायदा नाही.

¤

एक मान्य कराव लागेल इथल्या मुस्लिमाना हिंदू बहुसख्याकाची दडस वाटते— आणि खरी किंवा खोटी, पण आपल्याला दुय्यम दर्जाची वागणूक मिळत आहे असा त्याचा समज दिवसेंदिवस दृढ होत चालला. धार्मिक स्तरावरची ही गटबाधणी या भागात पूर्वी नव्हती. 'पूर्ण दक्षिणेत गोवा—कर्नाटक ही Islands of peace होती. तिथ अशी बाधणी सुरू झाली आहे.'—अशी कबुली म्हैसूर विद्यापीठाच्या पत्रकारिता विभागाचे प्रमुख के. व्ही. नागराज देतात. केवळ एकोणतिसाव्या वर्षी ते विभागप्रमुख झाले. तत्पूर्वी व आताही ते पत्रकारितेशी सबधित आहेत. नव्या धार्मिक जुळणीला सुरूवातच मुळी आपल्या निवडणूक पद्धतीतून झाली हे त्याचं ठाम मत. मुस्लिम जातीयवादाची लागण, किंवा एकदरच जातीयवाद हा विद्यापीठे, सरकारी कार्यालये व उच्चशिक्षित समाजाच्या वर्तुळातच असतो हा त्यांचा निष्कर्ष. त्याचा सर्वात मोठा आक्षेप मुस्लिमांच्या कुटुंबनियोजनविषयक भूमिकेला आहे. कुटुबनियोजनाला सतत विरोध करून आपली सख्या वाढवत राहिल्यानं बहुसख्याक हिंदूच्या मनात संशय निर्माण होतो. या हिंदू बहुसख्याकाना न दुखवताच मुस्लिम इथ राहू शकतील. हिंदू मेजॉरिटीनं का एकदा उग्र रूप धारण केल तर मुस्लिम समाज राहील का? म्हणून हा ड्रॅगन शात राहिलेलाच उत्तम.

**: म्हणजे मुस्लिमांनी नेहमीच हिंदूंना अनुकूल राहील, असंच वागत रहावं, त्यांच्या मर्जीप्रमाणं वागावं का ?**

या प्रश्नावर प्राध्यापकमजकूर म्हणाले, 'इथ धार्मिक पायावर जुळणी होत जाण अपरिहार्य आहे. हा अल्पसख्य, त्याचे विशेष हक्क, त्यातून येणारा असतोष— हे सर्व टाळण्यासाठी हा देशच हिंदूराष्ट्र म्हणून जाहीर करा न् अल्पसख्याकाना खास हक्क व सवलती जाहीर करा. अशामुळ खुद्द हिंदू लोकच आपली नैतिक जबाबदारी म्हणून मुस्लिमाची अधिक काळजी घेतील . आणि हे नाही झाल तरी हिंदूनीही शिक्षण, नोकऱ्या याबाबत थोडीतरी उदारवृत्ती, सहिष्णुता दाखवावी आणि मुस्लिमानी आपल्याविषयी इतराच्या मनात असलेला सशय दूर करावा

## राजकारणच प्रभावी ?

म्हैसूरमध्ये आता हा प्रकार दिसला, तरी मुस्लिम मूलवाद किंवा हिंदू मूलवाद वाढतोय, अस काऽही नाही. म्हैसूरमध्ये अस काही नव्हत, अन असलच तर जातीजातीतला सघर्ष आहे, अस प्रत्येक माहितगाराचं मत पडल उत्तर कर्नाटक, पूर्वीच्या मुबई इलाख्यातला व हैदराबाद सस्थानातला भाग गडबड करतात म्हणजे गुलबर्गा, रायचूर, बीदर, विजापूर या भागात मुस्लिमाची सख्या थोडी जास्त आहे. त्यातही उत्तर कर्नाटकात टिळकाच्या प्रभावामुळे राजकीय जागृती आहे. उत्तरेत १९२२ मध्ये स्टेट कॉंग्रेसची स्थापना झाली होती तर म्हैसूर प्राती कॉंग्रेस यायला १९३८ साल उजाडाव लागलं. त्यावेळी ब्राह्मण कॉंग्रेसमध्ये होते. म्हणून इतर सर्व जाती महाराजाच्या बाजूच्या. १९४७ पर्यंत म्हैसूर प्रांतात सर्व क्षेत्रात ब्राह्मणाचं व ब्राह्मणी सस्कृतीच वर्चस्व व आदर होता आजही वक्कलिग्ग जातीच्या या बालेकिल्ल्यातच मुख्यमंत्री हेगडे हे ब्राह्मण असल्याने जास्त मान्यताप्राप्त आहेत. उत्तरेत लिंगायत, मुस्लिम, हरिजन, इतर जातींचं आधिक्य आहे. या सर्व राजकीय दृष्ट्या जागृत आहेत. स्वातत्र्यानतर कर्नाटकातल्या बळजोर अशा लिंगायत व वक्कलिग्ग या दोन जातीच राजकारण सुरू झाल देवराज अर्स या माणसानं कर्नाटकातल्या गटबाजीच गणित बदलल. त्यानी सर्व मागास जाती व वक्कलिग्ग याची फळी उभारून ब्राह्मण, लिंगायत आदी assertive जातीची पीछेहाट केली. आज ब्राह्मण जमात ही प्रत्येक क्षेत्रातून माघार घेत आहे. त्याचबरोबर अर्स राजकारणामुळे मागासवर्गीय व मुस्लिमाना अनेक सवलती मिळाल्या अर्स याच्यानतर मात्र इथल्या जाती—जमातीच्या गणिताचे बारा वाजले निश्चित फळचाच नव्हत्या. अशावेळी कोणाचेच नसलेले म्हणून सर्वांनाच मान्य असलेले प्रथम गुडू राव (कॉंग्रेस) व नतर रामकृष्ण हेगडे (जनता) हे ब्राह्मण मुख्यमंत्री सत्तेवर आले. हेगडेना पहिल्या टप्प्यात वक्कलिग्ग जातीचा पाठिंबा नव्हता १९८४ च्या निवडणुकानतर मात्र हेगडेच आसन बळकट झाल आहे वक्कलिग्गाना दिलासा देण्यासाठी हेगडेंनी मागासवर्गीय आयोगाच्या शिफारशीवर अतिशय सधीसाधू भूमिका घेतली व वक्कलिग्गाना त्यात स्थान दिल. हेगडे आता उत्कृष्ट राजकारणी म्हणून ओळखले जात आहेत. दक्षिण कर्नाटकातले वक्कलिग्ग, मागासजमाती व मुस्लिम याची एक फळी उभारण्याचे हेगडे याचे प्रयत्न चालू आहेत. या व्यापक राज्य स्तरावरच्या राजकारणातून इथे धार्मिक, भाषिक वाद उभे राहतात, त्याचप्रमाणे याच राजकारणाच्या स्वयभू गतीतून या धर्मवादावर, जातीयवादावर नियत्रण येतात. जिल्हा परिषद, विधानसभा, लोकसभा निवडणुकात यापैकी एकही गट एकसध राहत नाही. अनेक प्रकारचे साटेलोटे चालतात. अशान या वाढत्या धर्मवादाची धार बोथट होते. पजाबमध्ये निवडणुका झाल्यानतर तिथल्या धर्मवादाच विरेचन राजकीय गटबाजीत झाल होत—तसाच प्रकार इतर धर्मवादाबद्दलही होतो

'निवडणुका या धर्मवादाला पार बोथट करतात अशी सरमिसळ नेहमी व्हावी, टोकाचा कुठलाच वाद राहू नये यासाठी तरी निवडणुका हव्यात' अस 'स्टार ऑफ म्हैसूर' चे सपादक गणपती म्हणतात परंपरेनच काय, पण आतादेखील इथले मुस्लिम ध्रुवीकरणाच, जमातवादी राजकारण करूच

शकत नाहीत अस त्याना वाटतं. या सर्वच गोष्टी ते सहजपणान घेतात. राजकारणाच्या शक्तीवर *त्याचा* ठाम विश्वास !

हिंदू-मुस्लिम अशी युद्धरेषा नसेल तर म्हैसूर शेजारीच रामनगर चन्‌पाटना, तुमकूर खुद्द बगलोर, म्हैसूर इथ या स्वरूपाची कुरबूर वाढत का आहे ? गेल्या एप्रिलपासून हिंदूच्या मिरणुकासबधी कुरापत, व त्याचा *परिणाम म्हणून आसपासच्या खेड्यातल्या* हिंदूनी—(त्यात मजूर, कामगार याचाच जास्त समावेश) मुस्लिमाना जबर मारहाण करणे हे प्रकार चालू आहेत. आज खेड्यातला माणूस हिंदू या भावनेने जागा होत आहे. मुस्लिम, हरिजन याच्याविरुद्ध पूर्वीपासूनच अशी पथ—जातभेद विसरून एकी होत होती. मात्र आज ती जाणीवपूर्वक होत आहे त्याचे राजकीय परिणामही डोळ्यासमोर असतात. सरकारी अधिकारी, पोलीस याच्यातही ही जाणीव येत चालली गेल्या ऑगस्ट महिन्यातच कूर्ग ( मडिकेरी ) जिल्ह्यात हिंदुत्ववादी जनजागरण सस्थेतर्फे जगल कत्राटदार व अधिकाऱ्याविरुद्ध मोर्चे काढले. गावातल्या देवराईची कत्राटं देण्यासबधी ही निदर्शन होती हे कत्राटदार प्रामुख्यान मुस्लिम. त्यामुळ सगळचा राजकीय पक्षानी त्याचा जातीयवादी म्हणून निषेध केला दुसऱ्या दिवशी मडिकेरी गावात मोठ्या प्रमाणात बद पाळला गेला. अनेक नेत्याना अटक झाली त्यावेळी मात्र राजकीय नेत्यानी आपली भूमिका बदलली. उघड पाठिबा नसला तरी अटकेविरुद्धची मवाळ, सदिग्ध निवेदन प्रकट केली होती.

हिंदूच्या सघटित होऊ पाहणाऱ्या शक्तीला राजकीय नेत्याचा हा प्रतिसाद आहे.

'म्हैसूर प्रातात हिंदूमध्ये आता हिंदू म्हणून एक होण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. मुस्लिमाच्या सधीसाधू जातीय राजकारणाची ही प्रतिक्रिया आहे त्यात अनेक *वर्गातले लोक आता येत आहे 'कर्नाटकच्या* रा. स्वयसेवक सघाचे प्रातकार्यवाह अजितकुमार म्हणतात. 'अर्थात ही नुसती जाणीव अस्पष्ट धूसर प्रेरणा आहे. त्यामुळे 'मार नही खायेंगे' ही जाणीव निर्माण झाली, व धार्मिक सघर्षात निश्चित बाजू घेण्यासाठी मनोवृत्ती तयार होत आहे. *ग्रामीण भागा*तला शेतकरी, मजुरही या मनोवृत्तीचा होत आहे. मात्र महाराष्ट्रात स्थानिक पातळीवर जशा सघटना उभारल्या आहेत, ते चित्र इथ नाही सघटनात्मक जागृत्ती आली नसली तरी जाणीव आहे मुस्लिमाच्या फळचा उभ्या राहत आहेत जास्तीत जास्त मागण्या करायच्या, तक्रारी करायच्या. मायनॉरिटिजच्या नावावर अधिकाधिक मिळवायच *आणि त्या बेसवर आणखी मागण्या करायच्या* अस त्याच धोरण आहे. 'डेक्कन हेरल्ड'च प्रकरण हे त्याचच उदाहरण आहे. त्यात सी. एम इब्राहिम वगैरेंचा काही हात नाही ही सगळी मुल्ला—मौलवीची बाधणी आहे.'

म्हैसूर प्रातात सध्या घडत असलेल जातीय राजकारण वेगळ आणि अन् पूर्ण धार्मिक पायावर होणार ध्रुवीकरण वेगळं. येथील 'सालार'सारख्या मुस्लिम मत व्यक्त करणाऱ्या वृत्तपत्राचे सपादक स्पष्टपण म्हणतात की, आखाती, अरब देशाकडून होणारे स्मगलिंग हे बहुशः मुस्लिमाकडून होते, त्यात आम्हाला काहीही वावग वाटत नाही. कारण या मुस्लिम देशाना आम्ही परकं मानतच नाही !' हे उदाहरण देऊन 'विक्रम'चे सपादक मल्ल्या म्हणतात की, 'हळूहळू इथल्या मुस्लिमानी हे स्पष्ट केलय की आम्हाला तुमच्याबरोबर राहायचं नाही. आम्हाला स्वतत्र रहायचंय. दार-उल-हरब म्हणजे हे जग आणि दार-उल्—इस्लाम एवढ्या दोनच सकल्पना या लोकाच्या मनात असतात. त्यामुळे तुम्ही एकतर सुलतान किंवा गुलाम असता राज्य काबीज करा किंवा तस नसल्यास सतत विरोधी, असतुष्ट राजकारण करत रहा एवढच त्याच्या मनावर बिबवल जात—त्यानुसारच त्याच वागण आहे. हे विश्लेषण हुमायून कबीरचं आहे आधुनिक राष्ट्रभावनेशी जुळवून घेणारी त्याच्यातील सुधारक मडळी अतिशय थोडी आहेत त्याच कुणीही ऐकत नाही.'

गेल्या वर्षी सप्टेंबरात विराजेपट इथल्या गणेशोत्सवात मिरवणुकीवेळी बॉबस्फोट झाला. त्यावेळेपासून हिंदूना समजलय की हे आमच्याविरुद्ध आहेत. आणि यापुढे दोन्ही समाजात दरी वाढतच राहणार आहे. तिचा कसा स्फोट होईल हे मी सागू शकत नाही. *सामान्य माणसं, सरकारी अधिकारी, पोलीस* राजकारणी याच्यातही ही जाणीव निर्माण होत आहे.

¤

व मुस्लिम बाजूच काय चित्र आहे ? जनता पक्षाचे सरचिटणीस सैयद शहाबुद्दीन याच्या बाबरी मस्जिदप्रकरणी प्रजासत्ताक दिनाच्या समारभावर बहिष्कार घालण्याच्या आवा*हनाचे प्रतिध्वनी उमटत होते. अशाच वाता*वरणात बगलोरला स्टुडट्स ऑफ इस्लामिक ऑर्गनायझेशन ऑफ इडिया या जमाते—इस्लामीच्या सघटनेच पहिल अधिवेशन भरलं होत. मुस्लिम व्यक्तिगत कायदा, शरीयत, शाहबानो खटला, बाबरी मस्जिद, डेक्कन-हेरल्ड प्रकरण ही सर्व ताजी प्रकरण होती. त्याच अधिवेशनात जनाब शहाबुद्दीन, जनाब इब्राहिम सुलेमान सैत, अब्दुल अझीझ सैत अशी मान्यवर मडळी बोलली. फक्त बनातवाला पथीयाचा समावेश नव्हता या अधिवेशनात मुस्लिम मानसाची थोडी फार कल्पना आली.

¤

## इस्लामचे वेगळे रूप

स्टुडट्स इस्लामिक ऑर्गनायझेशनच भारतातलं हे पहिलच अधिवेशन होत. पॅलेस ग्राऊड हे म्हैसूरच्या महाराजाच्या राजवाड्याभोवतालचं मैदान. प्रचंड तयारी होती. सर्व राज्यातील मिळून तीस हजारावर प्रतिनिधी या अधिवेशनाला आले होते. भारतातल्या विविधरगी मुस्लिम समाजाच चित्र होत. लखनौ, उत्तर प्रदेशातून चुडीदार पैजामा, नवाबी टोप्या घातलेले, सफै उर्दू बोलणारी जवान मडळी, तर पाढऱ्याशुभ्र रुळणाऱ्या दाढीसह, तसबीहचे मणी ओढणारे बुढ्ढेचाचा, काश्मिरमधील लालबुद फरकॅपमधील माणसं, बिहार, पूर्वी उत्तरप्रदेश, राजस्थानचे लाघवी हिंदीमिश्रित गोड उर्दू बोलणारे, महाराष्ट्रातले उर्दू बोलणारे तर दक्षिणेतल्या प्रातातील *कानडी, मल्याळी व* तमिळी प्रतिनिधी पाढऱ्याशुभ्र लुगीत (मुडू) होते हे सर्व आपापल्या मातृभाषेतून बोलत होते. प्रत्येक प्राताचे वेगवेगळे गट, घोळके फिरत होते. मुसलमानी 'अदब' ही फक्त उत्तरेकडील, हैद्राबादेतील कटाक्षाने उर्दू बोलणाऱ्यातच आढळत होती. बाकी सगळे

आपली प्रादेशिक अस्मिता टिकवून होते मात्र इतके दिवस कन्नड भाषेच्या वातावरणात राहिलेल्या मला इथल्या उर्दू-हिंदी वातावरणात फार मोकळ वाटत होत सहज वोलता येत होत. परभणी–औरंगाबाद, नादेडला गेल्यावर दखनी उर्दूत स्वैर बोलल की असच मोकळ वाटत. किंबहुना तिथल्या कन्नड, तमिळ मुस्लिमापेक्षा मीच जास्त सलगीन तिथल्या उर्दू भाषिकाबरोबर सपर्क साधत होतो महाराष्ट्रातन तीन हजारावर लोक आले होते बुलढाणा, सोलापूर, पुणे, धुळे, कोकण इथनं लोक गाड्या करून आले होते. माझ्याशी मराठीत बोलताना त्याची कोंडलेली वाफ मोकळी होत असल्यासारख वाटल. 'पन्नास टक्के मडळी केरळातलीच आहेत ' अस एक जण फणकाऱ्यान म्हणाला. पाढऱ्या शुभ्र मुंडुतली ही मडळी माझ्या आपल्याकडच्या मुस्लिमाच्या प्रतिमेत कुठच बसत नव्हती. प्रत्येक अधिवेशनात असल्याप्रमाण इथही पुस्तकाचे, कॅसेटचे स्टॉल होते इस्लामी नियतकालिकं, कुराणच्या आज्ञाचे कॅसेट्स याचबरोबर दलित साहित्य संघ या कर्नाटकातल्या सघटनेचा स्टॉल होता. Violence in Hinduism, हिंदूधर्मातील जाताधता, विषमता अशी राजशेखर रेड्डींची पुस्तकं तिथं माणस येत, पाहत. निघून जात. उजवीकड EXSIOचा स्टॉल. क्रिकेटपटू किरमाणीनं त्याचं उद्घाटन केल होत. त्यात सर्व वैज्ञानिक उपकरणं, माहिती, विशेषत कॉम्प्युटरची मॉडेल्स ठेवली होती. वळणावळणाची राग लागून होती तिथ.

मडपात वक्त्याची भाषणं ऐकण्यासाठी नेहमीप्रमाणच अर्धी–अधिक गर्दी होती. यापूर्वी मुस्लिम लिगचे इब्राहिम सुलेमान सैत याच जोरदार भाषण; कर्नाटकातले इंदिरा कांग्रेसचे अब्दुल अझीझ सैत याचही घणाघाती भाषण– 'मिल्लत ' च्या (समाजाच्या) प्रश्नावर भाषणं अपेक्षित होती. या दोघानी मिळून, मुस्लिम समाजाला एकट पाडून त्यांच्यावर हल्ला करण्याचे प्रयत्न चालू आहेत, असं सतत सागितलं. सरकारची धोरणही त्याला अनुकूलच आहेत. उर्दू भाषेचा मुद्दा दोघानी उचलून धरला. मुस्लिमांनी आपली इज्जत कायम ठेवावी. या देशात आता मानान जगण्याचीच मुष्किल झालीय. आमची अस्मिता ठेचण्याचा डाव चालू आहे असं खूप जोशात इब्राहिमसाहेब बोलले. उपस्थित सभाजन शातपणे ते ऐकत होते. टाळ्या नाहीत, घोषणा नाहीत. निर्विकारपणे एकामागून एकजण बोलत होता.

## नमाजाचे दृश्य

एवढ्यात नमाजचा टाइम झाला कित्येक भक्तानी भाषणं चालू असतानाच खुदाची करुणा भाकायला सुरुवात केली स्टेजवरून नमाजची सूचना, अरबीतले श्लोक सुरू होते. पंधरा–वीस हजाराचा विभिन्न भाषाप्रातातला, पोषाखातला तो समूह शातपणे गुडघ्यात वाकत होता, ओणव होत होता. पचवीस हजार शरीराची बैठक एकदम भुईला मस्तक टेकीत होती. एक शरीर असल्यासारखी. घोळदार कपड्याचा तेवढाच आवाज सहस्रशीर्ष, सहस्रबाहू – असा तो पुरुष होता. हा प्रत्यय प्रत्येकालाच येत होता अस नाही. ज्यानी नमाज पढला किंवा जे कार्यकर्ते होते त्याच वेगळच चालू होत. जीन, टीशर्ट, स्टोन–वॉशमधले सडसडीत, अस्खलित इग्रजी बोलणारे तरुण, प्राध्यापक फिरत होते, क्वचित इस्लामी, आयडेंटिटीची नियतकालिक खपवत होते. कॅनन, हॉट–शॉटचे फ्लॅश उडत होते अनेक स्तरातली मडळी एकेकटी–घोळक्यानं फिरत होती

महाराष्ट्रातले, कर्नाटकातले, तामिळनाडूचे तरुण माझ्याशी बोलले. SIO च्या ध्येयधोरणाचा पाढा वाचतानाच ते म्हणत होते की, आमच्या हिंदू शेजाऱ्यामध्ये आमच्याविषयी गैरसमज आहे हे खरं. पण करणार काय? या मुल्ला – मौलवीनी आमच्या भौतिक प्रगतीची दिशाच गोठवून टाकली. आमची चुकीची प्रतिमा आमच्यासमोर उभी केली भैया, विनाकारण आपण दुश्मनी ओढवून घेतो, स्वत चेच मार्ग बद करून घेतो. आम्ही काही गद्दार नाहीत. हे हिंदूदेखील–सगळी या पॉलिटिशियन्सची करणी – बघा ना ! मी म्हटल, कॉमन सिविल कोड, शाहबानो, तलाक याबद्दल काय? इथ मडळी सावध. प्रत्येक मजहबच ( धर्माच ) स्वतत्र स्थान राखायला नको का ?

सचमुच, आमच्यातली बायकाची स्थिती हे लोक सागतात तेवढी वाईट नाही. कुराणात सागितलेल्या तलाकाच्या पद्धतीला आमच्यातल्या मूर्ख लोकानी विकृत केलं. जो धर्म शेजाऱ्यावर प्रेम करा, स्वत चा अर्धा वाटा शेजाऱ्याला द्या, त्याची जात–पात विचारू नका असं सागतो, तो भला इतका क्रूर असेल ? आमच शरियत वेगळ हव– कारण–आमच्या धर्मानुसार आहे ते. इथ प्रत्येक धर्म, गटाला त्याच्या मर्जीप्रमाणं राहू द्याव का सगळ्यावर एकच कायदा लादावा ? कोणत न्याय्य वाटत तुम्हाला ? इत्यादी

'आणि ती डेक्कन हेरल्डमधली गोष्ट?'

तुम्हीच सागा आमच्या पैगंबराला असं म्हणणं तुम्हाला योग्य वाटत का ? त्या लेखकान हे सगळ जाणून-बुजून केल आमच्या लोकानी जरा जास्तच रिॲक्शन दिली. पोलिसानीही विनाकारण लोकाना गोळ्या घातल्या इतर वेळी दगे–फसाद होतात, आंदोलनं होतात कर्नाटकात बॅकवर्डक्लास कमिशन आयोगाविरुद्ध निदर्शन झाली. हिंसाचार, जाळपोळ मोडतोड झाली तिथ गोळ्या झाडल्या नाहीत. गोळ्या झडतात त्या मुस्लिमावरच सरकार मृताचा आकडा १५ सागते, पण खर तर पन्नास–साठावर लोक ठार झाले.

एका स्टॉलवर 'रेडियन्स ' या मुस्लिम मत माडणाऱ्या पाक्षिकाचे अक विक्रीला असतात. Banglore erupts. Long story of a short story असे मथळे. शेजारी निळ्या सूटमधली, पाढरी होऊ घातलेली दाढी, स्टाइलिश भाग असलेली, प्रौढ नजर गॉगल–अशी उच व्यक्ती. 'लीजिए इंडिया के मुसलमानो का सही पिक्चर देनेवाला यह मॅगझीन है ।' शात स्वरात ती व्यक्ती म्हणाली.

प्रेस ऑफिसमध्ये पुन्हा परस्पराना भेटलो हा एम्. ए. सिराज. ब्रिटनमधल्या 'अरेबिया'चा, हैदराबादच्या 'न्यूज टाइम्स'चा व इतर अनेक नियतकालिकाचा वार्ताहर लेखक तो सरळच म्हणतो, 'या देशात मुस्लिमाच्या जिवाला काहीच किंमत नाही. काश्मीरमध्ये दोन हिंदू मारले गेले तर सरकार खारिज करता. इथं पंधरा मुसलमान, भिवंडीला शभरावर, मुरादाबादला इतके...तरी कोणालाच त्याची पर्वा नाही.' इत्यादी...

त्याला म्हटलं की, इथ सध्या आपल्या

'राज्य' (राष्ट्र जाऊच द्या) या सकल्पनेलाच हादरे बसताहेत, तर अशा वेळी मुस्लिमासारख्या वेगवेगळ्या गटाचा 'स्टेट' विषयी काय दृष्टिकोन आहे, हे फार महत्त्वाच ठरत. इथं सिराज म्हणतात, 'हे कुठं एकसध राष्ट्र आहे ? भारत एक होता कधी ? इथ निरनिराळे लोकसमूह परस्पराच्या पद्धतीचा आदर करून रहात आले आहेत. इथ आता केंद्रीकृत सरकार आलं म्हणून सगळ्या अडचणी आहेत इथ हिंदू मुस्लिम, उत्तर-दक्षिण, सवर्ण-हरिजन, भाषावर तणाव आहेतच. या सगळ्याच वेगवेगळ्या अस्मिता आहेत. त्या सगळ्याना स्थान असेल अशी Federal व्यवस्थाच इथे हवी मुस्लिम सर्वप्रथम आपल्या धर्माशी एकनिष्ठ आहे त्याशिवाय तो मुस्लिम राहूच शकत नाही पण त्याची स्वतंत्र आयडेंटिटी इथं सुरक्षित राहू शकत नाही. भारतामध्ये मुस्लिमाच्या अस्तित्वालाच सर्वात जास्त धोका आहे इथं सर्वार्थान फेडरल स्टेट आणा तोच उत्तम उपाय आहे '

'आम्ही या अधिवेशनाच्या निमित्तान इस्लाम, एक पर्यायी मूल्यव्यवस्था, विचारप्रणाली म्हणून लोकापुढे माडत आहोत. 'Islam for Peace Progress & Salvation' भारताची आताची भ्रष्ट स्थिती सावरण्यासाठी, इथली ढासळती मूल्यव्यवस्था पुन्हा उभी करण्यासाठी इस्लामी व्यवस्था हाच एक पर्याय आहे हे आम्ही आता पुढे आणणार आहोत. इस्लामच खरं, कल्याणकारी स्वरूप लोकासमोर ठेवण, आमच्या नव्या पिढीत इस्लामची खरी मूल्य बिबवण यासाठी आता काम करावं लागेल आमची गोची म्हणजे या मुल्ला मौलवीचा पगडा. त्याचा मूलवाद पहायचा असला तर त्याची पुराण मदरसा-यत्रणा पहा ही माणसं आमच्या समाजाला पुढे जाऊ देत नाहीत नव ज्ञान, तत्रज्ञान, शिक्षण आत्मसात करायचय. आणि हे सर्व इस्लामी मूल्यव्यवस्थेत. भारताला ही व्यवस्था हवी आहे. लोकाचे धर्म काहीही का असेनात, आमचा Way of life त्यानी स्वीकारला म्हणजे पुरे. इस्लामी कायदा, अर्थव्यवस्था, सामाजिक व्यवस्था, राजकीय रचना या समता, शांततेला अधिक पोषक आहेत. असं आम्ही सांगणार आहोत.'

यानतर असं कसं शक्य यावर खडाजगी इराण, कराची, पाकिस्तान, बांगलादेश, आखाती देश, अरब यादवी अशी उदाहरण एकदम अगावर आल्यानंतर थकून सिराज म्हणतो की, 'अखेर या सर्व देशात भारतापेक्षा कमी संघर्ष, कटुता आहे. तिथ अशी पिळवणूक नाही. तथाकथित लोकशाही, स्वातत्र्यापेक्षा नैतिक समाजव्यवस्था असण चागल नाही का !

## नॉर्थवाले दादा

'आणि आम्ही हे करणार ते वेगळ्या तऱ्हेनं इस्लाम हा काही शत्रू नाही. त्यानं प्रत्येक भागात तिथल्या सस्कृतीच्या, भाषेच्या अनुषगानं जावं. हा विशिष्ट मुस्लिम पोषाख, अचकन, रुमी टोपी, तिथली सस्कृती, भाषा ही काही इस्लामची लक्षण नाहीत. ही तर यू.पी. वाल्यांची दादागिरी आहे हे नॉर्थवाले आम्हा साऊथवाल्याना खालच समजतात...'

सिराजच्या बोलण्यातला सगळा पेच सहज समजण्यासारखा होता. एकीकडे स्वत ची वेगळी अस्मिता वाढवायची, ती वेगळ्या उद्दिष्टानी, अंगानी. पारपारिक मुल्ला-मौल्वीच्या मार्गानं इथं मुस्लिम समाज जिवत राहू शकणार नाही, वाढणार नाही, पसरणार नाही. आपण 'स्व'त्व गमावू न देता, नव्या जगाशी जुळवून घ्यावं, सुधाराव. त्याचबरोबर आपल्या Penetration ची पद्धत बदलावी ती अधिक जुळवून घेणारी, विधायक असावी. त्याचबरोबर नॉर्थ-साऊथ, भाषावाद हा पुन्हा या तथाकथित एकसध धर्मभावनेला तडा देणारा ठरतो. असगर अली इजिनीअर या इस्लामी धर्माच्या अभ्यासकानी म्हटले आहे की–

'Two hostile communities, it is interesting to note, always look upon each other as monolithic and one's own community as deeply divided. However, any shreud observer of the Islamic world knows... emotional unity must not be confused with the unity of interests. The former unity crumbles as soon as the cause of emotional upheaval vanishes'

पाटण्याहून निघणाऱ्या EXACT या मुस्लिम मत माडणाऱ्या वृत्तपत्राचे सपादक एस् एम् इक्बाल भेटले. आज मुस्लिमासमोरचा सर्वात मोठा धोका म्हणजे– 'के इस देश में हम कैसे जिएँ। यहाँ अपनी हैसियत क्या होगी ? गेल्या चार-पाच वर्षापासून हे फारच वाढत आहे. सरकारी व सघटनात्मक कडवा हिंदुत्ववाद आम्हाला शिल्लक ठेवणार आहे का ? हम मुस्लिम करके जिएँ या नही।' अतिशय खानदानी मवाळपणान बिहारी लहज्यात ते बोलत होते. टाइम्स ऑफ इडियाचे सपादक गिरीलाल जैन यांच्या भारतातील मुस्लिमाच्या धर्मवादाबद्दलच्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या लेखावर ते फार नाराज होते. 'या जुन्या गोष्टी कशाला उगाळून काढता. नव्या पिढीला त्याचा सदर्भही माहीत नाही. जुन्याबरोबर जुन जाऊ द्या ना ! पाकिस्तानला गेलेला गट गेला तिकडे. इथे राहिलेल्या मुस्लिमांनी कस रहावं हाच मोठा प्रश्न आहे इस्लाम हा काही दुष्मनीचा धर्म नाही सही इस्लाम गैर-मुस्लिमांपुढे आम्हाला माडायचा आहे. भारतातले अनेक लोक इस्लाम जाणू पाहतात.'

तिकडं तुबळ भाषण चालू झाली एक वक्ते म्हणाले, तिकडं हिंदू समाजात भयकर भेदभाव आहेत. आपण दहा-पधरा टक्के असलो तरी वीस टक्के दलित, आदिवासी व आपण असे मिळून किती टक्के होऊ ? एवढाच उल्लेख ! इतर राणाभीमदेवी आक्रस्ताळा आवेश सोडता प्रस्थापित राज्यांच्या चौकटीला, सरकारला आव्हान द्यावं अस बाकी वक्त्याच्या भाषणात नव्हत. प्रत्येक वक्त्यान सरकारपासून अनेक गोष्टीच्या अपेक्षा व्यक्त केल्या. मागण्या पुढे केल्या. सरकारच्या कल्याणकारी योजनाची माहिती करून घ्यावी, त्याचा लाभ घ्यावा अस कुणी सुचवलं कायद्यावर बोलताना दिल्ली विद्यापीठाच्या कायदा विभागाचे अधिष्ठाता डॉ. ताहीर महमूद यानी समान नागरी कायदा करण्याचा प्रयत्न हा भारतीय राज्यघटनेतील प्रेरणेच्याच विरोधी असल्याच सागितल. पुन्हा इथे भारतीय 'राज्य' व 'सरकार' निगडित करण्याचा प्रयत्न दिसला. शीख, इतर उप-सस्कृतीप्रमाणे व्यवस्थेपासून फटकून राहण्याचा, स्वत:ला वेगळं समजण्याचा प्रयत्न इथं नव्हता. उलट व्यवस्थेचे लाभ, तिथ वाढतं स्थान कसं मिळेल यावरच जास्त भर होता

अधिवेशनापूर्वीच अजमल अर्शद हा त्याचा प्रसिद्धीप्रमुख म्हणाला की इस्लाममध्ये अतर्गत सुधारणा करण्याची आणि आमची चागली प्रतिमा बाहेर निर्माण करण्यासाठी चार वर्षापासून आम्ही काम करत आहोत. जमाते–इस्लामी पक्षाची युवक आघाडी असलेल्या या सघटनेचे सध्या चौदा राज्यात १ हजारावर केद्रामध्ये वीस हजारावर नोदणीकृत कार्यकर्ते आहेत. सर्वात जास्त काम व सख्या केरळात. तिथ ४५० केद्रातून ७ हजार सदस्य आहेत. महाराष्ट्रात ६० ठिकाणी काम आहे कर्नाटकात ६७ ठिकाणी काम आहे यानी मुलासाठी पुस्तक, अक्षर-ओळख आदीचे वर्ग सुरू केले. अश्लीलता-विरोधी सप्ताह चालू आहेत.

कुठल्याही समाजातलं हे अपरिहार्य द्वद्व मुस्लिम समाजात सुरू झालेल आहे. नव्यान अस्मितेचा पुकारा करणारी मडळी ही पूर्वीच्या मुल्ला–मौलवीसारखी नाहीत. या उलट जुन्या नेतृत्वाशी झगडा व त्याचबरोबर स्वत च स्वतत्र अस्तित्व राखण्यासाठी बाहेरच्या प्रवाहाशी झगडा–अशा दोन्ही स्तरावर हा पेच असतो. त्यातही मुस्लिम समाजाच्या मुस्लिमपणातील खास भाग– पहिल्यादा धर्म त्यानतर इतर सर्व – या भागाचाही नव्या मूल्याशी होत असलेल्या ताणाचा प्रत्यय येत होता या अधिवेशनात किंवा विचारवतानी आपल्या मुस्लिम स्वायत्ततेचा पुकारा केला होता. ' राज्या ' कडून आपल्यावर होत असलेल्या अन्यायाचा घोशा लावून Sence of deprivation निर्माण करण्याचा प्रयत्न चालू होता त्याचबरोबर ' राज्या ' कडून, शासनाकडून अनेक अपेक्षा व्यक्त करून, मागण्या करून या व्यवस्थेशी नातही प्रस्थापित केल आहे सरकारवर घणाघाती वगैरे टीका करतानाही व्यवस्थेला आव्हान असा प्रकार नव्हताच. त्यातही मुस्लिमाच्या तथाकथित monolithic एकत्वाच्या स्वरूपाच्या कल्पनेचा फोलपणाही प्रत्ययाला येत होता. तरुण मुलाची तर गोष्ट वेगळी होती. आपल भाडकुदळ, अलगतावादी स्वरूप आता कमी करून पुढे जाव ही भावना वाढत आहे मात्र त्याचबरोबर इस्लामी identity ची कल्पनाही आधुनिक रूपान बळकट होत होती. आजचा धर्मवाद हा तरुणाचा, नव्या व्यावसायिकाचा, उच्च शिक्षित, नवी जीवनमूल्ये, भौतिकवाद स्वीकारलेल्याचा आहे. हिंदू धर्मवादाइतकीच ही गोष्ट मुस्लिम धर्मवादाच्या सदर्भातही स्पष्ट आहे. त्यानुसारच त्याला वळण लागत राहणार. हा नवा धर्मवाद त्यामुळे जास्तीत जास्त राजकीय स्वरूपाचा राहील विकासाबरोबरच प्रत्येक गटाला या विकासाचा जास्तीत जास्त लाभ घेण्यासाठी हा परंपरागत धर्मवाद नव्या रूपात निखरून येत आहे. हा धर्मवाद पूर्वीचाच राहिला नाही. त्याच ध्रुवीकरणही आता पूर्वीसारख राहणार नाही हे दिसत होतं.

मग शहाबुद्दीनच्या रूपान पुढे येत असलेल्या धर्मवादी राजकारणाच काय? याच उत्तरही बहुशी राजकारणात आढळत. कर्नाटकातला हिंदू किंवा मुस्लिम धर्मवाद हा हेगडे सरकारच्या जाती–जमातीच्या हाताळणीवर अवलवून रहाणार आहे. शहाबुद्दीन याचा प्रयत्नही राष्ट्रीय पातळीवर मुस्लिमाचं नेतृत्व करण्याचाच आहे. ते उठवत असलेले मुद्देही याच प्रयत्नाकडे निर्देश करतात शहाबुद्दीन हे काही जीनाच्या दर्जाचे नेते नाहीत. त्याचा प्रयत्न राष्ट्रीय पातळीच्या नेतृत्वासाठी आहे. आज त्याना सुप्त पाठिंबा हा पुन्हा केंद्रातील सत्ताधारी काँग्रेस (आय) पक्षाचा नाही का ? धर्मवाद हा वाढतोय हे खरच आहे, पण तो जसा स्वत.च्या जोरावर–केवळ धार्मिक अगान वाढतोय, तसाच तो व्यापक राष्ट्रीय राजकारणातूनही वाढत आहे. राजकारणाच्या फेरबदलानुसार त्याच स्वरूपही बदलत जाणार आहे हे मुस्लिम धार्मिक राजकारणावरून दिसतच आहे

दुसऱ्या बाजूला मुस्लिम धार्मिक राजकारणाला प्रतिक्रिया म्हणून हिंदूच्या जाणिवा अधिक प्रखर होण स्वाभाविक व त्याला प्रत्यक्ष सघटनात्मक रूपही येत आहे. त्याची दखल इथल्या राजकारणाला घ्यावी लागेल. या हिंदू प्रतिक्रियेमुळे समाजाच्या व मुस्लिमाच्या स्तरावर मुख्य स्त्रोत Mainstream ही जाणीव नव्यानं विकसित होत आहे. म्हैसूरसारख्या भागात ही नवी घडामोड आहे ती क्रिया–प्रतिक्रियेची प्रक्रिया जशी घडत जाईल, ते इथल्या ' राष्ट्र ' बाधणीच्या स्वरूपान महत्त्वाच ठरेल □

*With Best Compliments From*

**Associated Textile Engineers Pvt. Ltd.**

BOMBAY

## राजीव गांधींची कामगिरी – लंडन टाईम्स



अल्पकाळात कठीण असे राजकीय निर्णय घेण्याबाबत पंतप्रधान राजीव गांधी यांनी लौकिक मिळविला आहे, अशा शब्दांत ' लंडन टाईम्स ' या ख्यातनाम वृत्तपत्राने भारतीय पंतप्रधानांच्या कार्यकर्तृत्वाचे वर्णन केले आहे.

राजीव गांधी यांनी पंतप्रधानपद स्वीकारल्याला नुकतीच दोन वर्षे पूर्ण झाली. त्या निमित्त त्यांच्या कामगिरीची लंडन टाईम्सने प्रशंसा केली आहे. विकसनशील आणि अलिप्त राष्ट्रांच्या हक्कांसाठी त्यांनी केलेल्या कार्यामुळे, तसेच दक्षिण आफ्रिकेच्या वर्ण-द्वेषी सरकारच्या धोरणाच्या विरुद्ध त्यांनी चालवलेल्या मोहिमेमुळे श्री. राजीव गांधी हे आंतरराष्ट्रीय राजकारणात ' जागतिक नेते ' म्हणून तळपू लागले आहेत.

' लंडन टाईम्स ' ने पुढे म्हटले आहे......

पंतप्रधानपद स्वीकारल्यावर श्री. राजीव गांधी यांनी सार्वत्रिक निवडणूक घेऊन जनतेचा कौल मिळवला. देशांतर्गत समस्या सोडविण्यास प्राधान्य दिले. पक्षांतरविरोधी कायदा, पंजाब, आसाम व मिझोरामचा प्रश्न, नवे शैक्षणिक धोरण, कररचना तर्कसंगत करणे आदी प्रश्नांवर त्यांनी लक्ष केंद्रित केले.

औद्योगिक प्रश्नावरही श्री. राजीव गांधी यांनी भारतात नवे पर्व सुरू केले. निर्बंध शिथिल करून आधुनिकीकरणाला महत्त्व दिले. अत्याधुनिक यंत्रसामग्री आयात करण्यास मुभा दिली. औद्योगिकतेला चालना देत असतानाच पंतप्रधानांनी ग्रामीण भागात दौरे करून हलाखीचे जीवन जगणाऱ्या आदिवासींच्या समस्या दूर करण्याचे प्रयत्न चालू केले.

---

## ब्राझिल आणि भारत

कर्जबाजारीपणामुळे लॅटिन अमेरिकन देश ( अर्जेन्टिना, ब्राझिल, मेक्सिको, चिली इ. ) आज आर्थिक संकटांच्या जाळ्यात सापडले आहेत. त्यांच्यावर काखा वर करण्याची पाळी आली आहे. ज्या गतीने भारताचा परकीय कर्जबाजारीपणा वाढत आहे ती गती भारताला दिवाळखोरीच्या अशाच एखाद्या टोकाकडे नेत आहे का ?

—माधव

---

## किसको है फुरसद ?

आपल्याला ज्वालामुखीच्या तोंडावर बसण्यासाठी राजीव गांधी मिळालेत. आपण निवडणुकीत मतदानाचे पवित्र कर्तव्य पार पाडून आपापल्या दैनंदिन व्यवहारात गर्क असतो. यापुढे कुणी काही दिवाणे शहाणपण सांगू लागले तर आपण एवढेच म्हणावे– ' किसको है फुरसद, जो थामे दिवानों के हाथ ?'

—भाऊ पाध्ये

---

# राजीव गांधी राजवट –दोन वर्षे



# सुरुवातीचा पंतप्रधान अननुभवी पण चांगला आताचा पंतप्रधान अननुभवी पण उर्मट


## बेहराम कॉन्ट्रॅक्टर

**मुंबईहून प्रसिद्ध होणाऱ्या 'आफ्टरनून डिस्पॅच अँड कुरीयर' या इंग्रजी सायंदैनिकाचे संपादक**


पंतप्रधानपदाची धुरा वाहायला लागल्यापासून राजीव गांधी जास्त आत्मविश्वासाने, अधिकाराने वावरताना दिसतात. अलीकडे तर ते खरोखरच पंतप्रधानाला शोभेलसे वागतात मातेच्या चितेजवळ उभे असताना पाणावलेले डोळे लपवणारा, अश्रू नसून कचरा आहे असे सांगणारा तरुण (खरं तर तितकासा तरुण नसला तरी फारसा म्हाताराही नव्हे) आता राहिला नाही.

या दोन वर्षांत निरिच्छ राजकारणी व्यक्ती ते आत्मविश्वासाने वावरणारा पंतप्रधान हा बदल निश्चितच कौतुकास्पद आहे. शिवाय पंतप्रधानाला असणारी सत्ता त्यांना आवडत आहे, हेही स्पष्ट दिसते. आता राजकारणाला रामराम ठोकून परत वैमानिक होण्याची शक्यता जवळजवळ नाही, कारण आता त्यांनी सत्तेची चव चाखली आहे.

ज्या तऱ्हेने त्यांची पंतप्रधानपदी निवड झाली, ती काही लोकशाही पद्धत म्हणता येणार नाही. परिस्थितीमुळे त्यांचे नेतृत्व आपल्या देशावर जवळजवळ लादलेच गेले. असे असूनसुद्धा त्यांच्या नेतृत्वाचे आम्ही स्वागतच केले. नेहरू घराण्याकडे नेतृत्व असण्याची परंपरा त्यामुळे पुढे चालू राहिली, फरक फक्त नवीन व्यक्ती असण्याचा होता. त्यांच्या राजवटीचे पहिले सहा महिने तर फारच चांगले गेले. अगदी लाल बहादूर शास्त्री यांच्या राजवटीची किंवा जनता पक्ष राज्यावर आलेला असतानाच्या वातावरणाची आठवण करून देणारे सहा महिने होते. आजूबाजूला असलेल्या गोंधळाला शिस्त लावण्याचा प्रयत्न राजीव गांधी करत आहेत, असे दृश्य दिसत होते. सुरुवातीला साऱ्या देशाची सहानुभूती त्यांच्या बाजूला होती. सर्व म्हणत होते– त्यांना आणखी वेळ द्यायला हवा. एवढ्यात त्यांच्यावर टीका करणे योग्य नाही

खरं पाहता त्यांना वेळ नकोच होता. मॉस्कोला दिलेल्या भेटीपेक्षा अमेरिकेला दिलेल्या भेटीने त्यांना बराच आत्मविश्वास आला होता. राष्ट्राध्यक्ष रीगनशी केलेली चर्चा, अमेरिकन कॉंग्रेससमोर दिलेले भाषण, अमेरिकन वार्ताहरांना दिलेल्या मुलाखती वगैरेंनी ते जास्त सफाईने वावरायला लागले होते

जागतिक राजकारणातसुद्धा त्यांच्या वागण्यातील सफाई लक्षात येत होती. आईकडून त्यांच्याकडे वारसाहक्काने फक्त पंतप्रधानपदच चालून आले, असे नव्हे तर अलिप्त राष्ट्र परिषदेचे अध्यक्षपदसुद्धा आले. शिवाय राष्ट्रकुल परिषदेत भारताला नेहमीच महत्त्वाचे स्थान होते. अशा महत्त्वपूर्ण देशाचे पंतप्रधान म्हणून राजीव गांधी मार्गारेट थॅचर यांच्याशी चर्चा करू लागले.

माझे मन एका गोष्टीबाबत निर्णय देऊ शकत नाही– ती म्हणजे राजीव गांधींना नशिबाने खूप गोष्टी खूप लवकर मिळाल्या, की खूप गोष्टी खूप उशिरा मिळाल्या ? ज्या वेगाने ते राजकारणात आले, तसं कदाचितच कोणी राजकारणात आले असेल. एका क्षणाला इंडियन एअरलाईन्सचे वैमानिक, तर धाकट्या भावाच्या मृत्यूनंतर लोकसभेचे सदस्य, मातेच्या खुनानंतर भारतासारख्या खंडप्राय देशाचे पंतप्रधानपद ! किती झटपट झाले सर्व काही ! असेही म्हणता येईल की हे सर्व मिळायला किती उशीर झाला ! पंतप्रधानपदावर असलेली आई, धाकटा असून भारतीय राजकारणात महत्त्वपूर्ण भूमिका बजावत असलेला भाऊ... हे सर्व काही असूनही स्वतःवर मात्र कधीही प्रसिद्धीचा झोत नाही

### वाढते खुषमस्करे

राजीव गांधींचा विचार करता असेही वाटते की त्यांची योग्य तुलना नवश्रीमंत वर्गाशी करणे जास्त सयुक्तिक ठरेल. विशेषतः अचानक हाती आलेल्या अमर्याद सत्तेच्या संदर्भात !

सत्ता नेहमीच भ्रष्ट करते, असे नाही. विशेषतः सत्तेमुळे राजीव गांधी भ्रष्ट होतील, असे मला वाटत नाही, पण सत्ता माणसाच्या डोक्यात जाऊ शकते, त्याचा तोल बिघडवू शकते. राजीव गांधींच्या बाबतीत असे घडण्याची दाट शक्यता आहे. त्यांना सल्ला-मसलत देणारी मंडळी अगदी खुज्या व्यक्तिमत्त्वाची, स्वार्थी आहेत. राजीव गांधी यांना खुषमस्करे आवडत जरी नसले तरी त्यांच्यावाचून त्यांना जगणे अवघड आहे नाही म्हटलं तरी हे खुषमस्करे त्यांच्या अहंकारावर फुंकर घालतात. एका विशिष्ट तऱ्हेचा मानसिक आधार देतात.

म्हणून मग जाहीरपणे आपल्या मंत्रिमंडळातील सहकाऱ्यांचा पाणउतारा, (विठ्ठलराव गाडगीळांना जवळजवळ हाकलूनच दिले ) लहानमोठ्या अधिकाऱ्यांवर ओरडणं, टीव्हीवर एखाद्या तलाठ्याला किंवा मामलेदाराला धारेवर धरणं, हे सर्व याच भावनेतून उद्भवते त्यांना कदाचित या गोष्टीची जाणीव नसेल की, दूरदर्शनच्या लाखो प्रेक्षकांसमोर एखाद्या मामलेदाराची उलटतपासणी ( ते सुद्धा त्या प्रश्नाच्या सर्व बाजू समजून न घेता ) घेतल्यामुळे तो गरीब

बिचारा आयुष्यातून उठायचा.

कमलापती त्रिपाठी वगैरेंसारख्या म्हाताऱ्या राजकारण्याच्या शहाणपणावर कधीच विश्वास नव्हता. ही मंडळी तरुणपणीसुद्धा देशाच्या फारशी उपयोगाची नव्हती. पण म्हणून का त्यांचा अपमान करायचा? (कमलापती त्रिपाठींसारखे लोक स्वत: स्वत:चाच अपमान करतात) मुळात त्यांना पक्षात महत्त्वाच्या जागांवर का ठेवायचे? त्यांचा हवा तेव्हा अपमान करता यावा म्हणून? प्रणव मुखर्जी, गुंडू राव यांना पक्षाबाहेर काढायचे आणि शरद पवार यांना मानाने प्रवेश द्यायचा, यामागे कोणते तर्कशास्त्र आहे? एन. टी. रामाराव यांच्या माकडचेष्टा चालू द्यायच्या आणि हेगडें-सारख्या सुसंस्कृत मुख्यमंत्र्याकडे दुर्लक्ष करायचे?

तरुणांच्या राजकारणाला माझा हार्दिक पाठिंबा आहे पण तरुणवर्ग म्हणजे राजीव गांधींचे मूठभर मित्र नव्हेत की त्यांच्या बरोबर डून स्कूलमध्ये शिकलेले त्यांचे मित्र नव्हेत. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे म्हातारपणाकडे झुकलेल्या या तरुणांनी गेल्या दोन वर्षांत देशासाठी काय असे मोठे केले?

फक्त जुन्या टाळ्या मिळवून देणाऱ्या घोषणांऐवजी ('गरीबी हटाव') '२१ व्या शतकाकडे वाटचाल' 'व्यवस्थापन तंत्रावर आधारित देशाचा कारभार' अशा नवीन घोषणा दिल्या.

राजीव गांधींना राज्यकारभाराचा अनुभव नाही, ही गोष्ट तर रोज प्रकर्षाने जाणवते. रातोरात केलेला पंजाब करार, आसाम करार, मुंबई शहराच्या विकासासाठी जाहीर केलेली १०० कोटींची योजना (यापैकी एक नवा पैसा तरी कोणाला दिसला आहे का?) गुरखाभूमीबद्दल रोज बदलणारी सरकारी भूमिका, मंत्रिमंडळाची खादेपालट– जणू काही सोनिया गांधी गृहसजावट बदलत आहे– सुरुवातीला मंजुळ वाटणाऱ्या पण आता मनस्वी कटाळा आलेल्या आवाजात ऊठसूठ मिळेल त्या संस्थेला दिलेला उपदेश. सुरवातीचा पंतप्रधान अननुभवी पण चांगला होता, आताचा पंतप्रधान अननुभवी पण उर्मट आहे.

याच उर्मटपणापायी एका मंत्र्याचे अधि-कार हळूहळू कमी करण्यात येतात आणि नंतर एकदम त्याचे मंत्रिपदच जाते. याच उर्मटपणापायी एक कुशल वैमानिक विमाना-तील बिघाडामुळे निलंबित होतो, राष्ट्रपती-कडे जाहीररीत्या दुर्लक्ष करण्यात येते. कोणत्याही पंतप्रधानाला राष्ट्रपतींचा असा अपमान करण्याचा हक्क नाही. त्यांचे वैयक्तिक मतभेद काहीही असोत. लोकशाही परंपरेवर राजीव गांधींचे असलेले प्रेमच यातून व्यक्त होते.

त्यांच्याजवळ असलेल्या मित्रांशी त्यांचे संबंध कसे आहेत, याचासुद्धा अंदाज बांधता येत नाही. अरुण नेहरूंचे मंत्रिपद काढून घेण्यात आले, अरुणसिंगचा दबदबा कितपत आहे (सोनिया गांधी आणि अरुण सिंगच्या बायकोचे पटत नाही, वगैरे प्रचाराकडे दुर्लक्षच केलेले बरे) अर्जुनसिंगांचे पारडे कधी जड होते तर कधी हलके होते. अर्थात अर्जुनसिंगांना राजीव गांधींचे मित्र म्हणता येणार नाही, खर तर त्यांची उपयुक्तता भलीबुरी राजकीय कामे करणारी व्यक्ती हीच आहे अमिताभ बच्चनला मित्र म्हणता येईल, पण दोन वर्षे झाली तरी त्याला काही महत्त्वाची कामगिरी दिली नाही. खुद्द त्यांच्या भाषणात इंदिरा गांधींचा उल्लेख क्वचितच येतो.

दोन वर्षांपूर्वी राजीव गांधींचे सरकार आले तेव्हा काही मूलभूत बदल केले जातील, अशी अपेक्षा होती पण अजूनही सर्व जुनेच प्रकार चालतात. अजूनही मुख्यमंत्री ऊठसूट दिल्लीला जातात, तासन्तास राजीव गांधींची वाट पाहतात. पंतप्रधान जेव्हा परदेश दौऱ्याला जातात, तेव्हा आख्खे मंत्रिमंडळ निरोप देण्यासाठी विमानतळावर हजर असते, आणि जेव्हा ते दौऱ्यावरून परत येतात, तेव्हा परत पूर्ण मंत्रिमंडळ स्वागता-साठी हजर! असेही दिसते की राजीव गांधींना हा प्रकार आवडत असावा. काही दिवसांपूर्वी पंतप्रधान माहिती आणि नभो-वाणी खात्याच्या मंत्र्यावर नाराज असल्याचे वृत्त होते का तर म्हणे पंतप्रधानांचे दर्शन सातत्याने दूरदर्शनवर दाखविण्यात येते आणि पंतप्रधानांना हा प्रकार आवडत नाही. आता तर अशी कारणेही दिली जात नाहीत


विरोधी पक्षाकडे नेहमीप्रमाणे दुर्लक्ष केले जाते, त्यांची मदत कधीही घेतली जात नाही मंत्रिमंडळातील खादेपालट करताना जुनीच पद्धत वापरण्यात येते. आपल्या सह-काऱ्याला सभ्यपणे सांगण्याचा शिष्टाचारही पाळण्यात येत नाही.

आता दोन वर्षांच्या कारकिर्दीच्या शेवटी राजीव गांधींनी पंतप्रधान म्हणून काय केले, काय केले नाही वगैरेचा आढावा घ्यावा, मुख्य म्हणजे पंतप्रधानपदाची आकांक्षा असलेले राजीव गांधी तेच आहेत की त्यांच्यात बदल झाला? या प्रश्नाचे उत्तर फक्त तेच देऊ शकतील. □




वा! आजच तुम्ही कॉंग्रेसमध्ये आलात न् तुम्हाला अधिकार कसे मिळतील? यांच्याकडे पहा, हे कालपासून वाट पहाताहेत!!

# राजीव गांधी
## स्वच्छ आणि प्रामाणिक प्रशासक?




**अभय गोखले**

'राजीव गांधी'– 'दि प्रॅगमॅटिक प्राईम मिनिस्टर ऑफ इंडिया' हे सत्यव्रत पोंक्षे यांनी लिहिलेले व भाटे अँड पोंक्षे पब्लिकेशन्सने प्रकाशित केलेले पुस्तक, अगदी थोड्या अवधीत राजीव गांधी यांच्या व्यक्तिमत्त्वाचे निरनिराळे पैलू व त्यांची निरनिराळ्या क्षेत्रांतील कामगिरी आणि त्यांच्याबद्दलच्या अपेक्षा या विषयांची यथोचित मागणी करणाऱ्या मोजक्याच पुस्तकांपैकी एक आहे व त्याबाबतीत राजीव गांधी यांच्या कारकिर्दीबद्दल अगदी ताजी माहिती वाचकांपुढे सादर करण्यात पोंक्षे यशस्वी झाले आहेत. हे कबूल करावे लागेल. राजीव गांधी यांच्या कारकिर्दीचा आलेख मांडताना पोंक्षे यांनी नि:पक्षपाती दृष्टिकोण ठेवल्याने पुस्तक वाचनीय झाले आहे. पुस्तकाच्या आकर्षकपणाचे श्रेय किर्लोस्कर प्रेसला देतानाच पुस्तकाची किंमत मात्र (रुपये दीडशे फक्त) जरा जास्त वाटते.

पुस्तकाच्या सुरुवातीच्या प्रकरणात पोंक्षे यांनी पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या निधनानंतरच्या घटनांचा (पार्श्वभूमी) धावता आढावा घेतला आहे. हा आढावा घेताना बराच विस्कळितपणा आला आहे. लालबहाद्दूर शास्त्री यांचा नुसता उल्लेखच आहे. त्यांच्या कारकिर्दीतील भारत–पाकिस्तान युद्धाचा उल्लेख नाही. शास्त्रींनंतर इंदिरा गांधी पंतप्रधानपदी कशा आल्या हे अगदी थोडक्यात दिले आहे. त्याकामी कामराज वगैरे नेत्यांनी कोणती भूमिका बजावली होती त्याबद्दल काही माहिती आढळत नाही. थोडक्यात जी माहिती हाताशी आली ती माहिती धावता (१०० मीटर रनिंग?) आढावा घेताना वापरलेली दिसले. १९७६ च्या निवडणुकांचा उल्लेख आहे परंतु राज्याराज्यांतील संयुक्त मंत्रिमंडळांच्या (विरोधीपक्षांच्या) प्रयोगाचा उल्लेख आढळत नाही. इंदिरा गांधी यांना केंद्रात काठावर सत्ता राखता आल्याने कोणत्या समस्यांना तोंड द्यावे लागले आणि त्याची परिणती काँग्रेसमध्ये अखेर फूट पडण्यात कशी झाली याबाबत थोडक्यात लिहिले असते तर बरे झाले असते. आश्चर्याची गोष्ट म्हणजे इंदिराजींनी राष्ट्रपती पदासाठीच्या निवडणुकीत आपल्याच पक्षाच्या उमेदवाराला कसे पाडले याचा पुसटता उल्लेखही नाही. १९७१ च्या निवडणुकांतील प्रचंड विजयाने इंदिराजींना आता कोणावर विसंबून राहावे लागणार नव्हते. पुस्तकामध्ये बांगलादेश मुक्ती संग्रामाबद्दलही फारच थोडे विवेचन आढळते. पाकिस्तान सरकारच्या (पंजाबी वर्चस्व) दडपशाही प्रवृत्तीने पूर्व बंगालमधील लोक कसे पेटून उठले व लोकशाही मार्गांनी जिंकून सुद्धा त्यांना जेव्हा हक्क नाकारण्यात आले तेव्हा त्यांनी स्वातंत्र्याकरिता कसा प्रखर लढा दिला व कोणत्या परिस्थितीत भारताला त्यांच्या बाजूने उतरावे लागले व भारतीय लष्कराने पाकिस्तानी लष्कराला कशी धूळ चारली याबद्दल थोडे विस्तृत लिखाण अपेक्षित होते. मात्र पोंक्षे यांनी या पुस्तकात इंदिराजींनी पाकिस्तानचे दोन तुकडे कसे केले एवढे सांगून या विषयाची बोळवण केली आहे. नंतर एकदम १९७४ च्या जयप्रकाश नारायण यांच्या भ्रष्टाचार विरोधी आंदोलनावर उडी मारण्यात आली आहे. भ्रष्टाचार, वाढती महागाई, ढासळलेली कायदा व सुव्यवस्था, बेकारी, राजकीय गुंडगिरी, सत्तेचे अनावश्यक केन्द्रीकरण, वाढते व्यक्तिस्तोम, राज्याराज्यांतील काँग्रेस नेत्यांमधील लाथाळी यांना याच काळात उत आला. त्याबद्दल थोडेसे विवेचन असते तर बरे झाले असते. गुजराथमधील विद्यार्थ्यांच्या नवनिर्माण चळवळीने प्रथम या आंदोलनाला सुरुवात झाली व त्यापासून प्रेरणा घेऊनच जयप्रकाशजींनी बिहारमध्ये आंदोलन उभारले. या भागाला लेखकाने स्पर्शही केलेला नाही. ललित नारायण मिश्र यांची हत्या ज्या परिस्थितीत

झाली तो एक टर्निंग पॉइंट होता त्याचा उल्लेख या घटनेच्या संदर्भात व्हायलाच हवा

## आणीबाणी व जनता पक्ष

अलाहाबाद हायकोर्टाने इंदिराजींच्या विरुद्ध (त्यांच्या लोकसभेतील निवडणुकीच्या संदर्भात) निकाल दिल्यावर जे राजकीय नाट्य दिल्लीत घडले त्याचा पुसटता उल्लेखही नाही आपली खुर्ची वाचवण्यासाठी इंदिरा गांधींनी ज्या खटपटी–लटपटी केल्या त्याबद्दल थोडक्यात माहिती दिली असती तर बरे झाले असते इंदिराजींनी पंतप्रधानपदाचा राजीनामा तर दिला नाहीच, परंतु आणीबाणी जाहीर करून विरोधकांची, व्यक्तिस्वातंत्र्याची, वृत्तपत्रांची कशी गळचेपी केली याचा थोडक्यात आढावा हवा होता जयप्रकाशजींच्या आंदोलनाबाबतही व त्यांना संपूर्ण भारतातून कसा प्रचंड पाठिंबा मिळाला याबद्दल थोडक्यात विवेचन करायला हवे होते पोक्षें यांनी म्हटल्याप्रमाणे आणीबाणीत इंदिराजींनी घेतलेले बरेचसे पवित्रे लोकप्रिय झाले होते या म्हणण्यात तथ्य नाही. तसे ते लोकप्रिय असते तर त्यानंतर घेण्यात आलेल्या निवडणुकात, इंदिराजींचा स्वतःचा व त्यांच्या पक्षाचा एवढा दारुण पराभव झाला नसता आणीबाणीतील सर्व अत्याचाराचे व दुष्कृत्याचे खापर एकट्या संजयच्या डोक्यावर फोडण्यात काही अर्थ नाही. जनता पक्ष कोणत्या परिस्थितीत सत्तेवर आला, निरनिराळ्या विचारसरणीचे पक्ष एकत्र आणण्यात जयप्रकाशजींना कसे यश आले, जनता पक्षाचा प्रयोग का व कसा फसला, आणीबाणीमधील अमानुष अत्याचार जनता पक्षाने कसे चव्हाट्यावर आणले, जनता पक्षाच्या पाडावानंतर जनतेने इंदिराजींना प्रचंड पाठिंबा देऊन सत्तेवर का व कोणत्या परिस्थितीत बसवले याबद्दल फारच थोडी माहिती पुस्तकात आढळते. धावता आढावा घेताना हे मुख्य मुख्य मुद्दे डावलणे योग्य वाटत नाही. इंदिराजींच्या व्यक्तिगत जीवनाचा धावता आलेख अप्रस्तुत वाटतो. इंदिराजींची हत्या व त्यानंतरचे संदर्भ यात नावीन्य वाटत नाही अर्थात ही सर्व माहिती देताना काही ठिकाणी पुनरावृत्ती झाली आहे. निरनिराळ्या राज्यांच्या मुख्यमंत्र्यांना, ( इंदिराजींच्या हत्येनंतर ) ते दिल्लीत आलेले असताना, त्यांच्या राज्यातील कायदा व सुव्यवस्था कायम राखण्यासाठी राजीव गांधींनी ताबडतोब परत पाठवले, या घटनेचा उल्लेख पुस्तकात दोनतीन वेळा आला आहे.

## विरोधी पक्षांचे पानिपत

संजय गांधींच्या अकाली मृत्यूमुळेच राजीव गांधी राजकारणात आले व इंदिरा गांधींच्या हत्येनंतर एका विशिष्ट परिस्थितीत ते देशाचे पंतप्रधान झाले. राजीव गांधींचे राजकारणात येणे किंवा पंतप्रधान होणे हा एक अपघातच समजला पाहिजे. १९७७ मध्ये इंदिराजी व त्यांच्या पक्षाच्या पराभवानंतर, राजीव गांधींनी, आपल्या कुटुंबासह, इटलीमध्ये स्थायिक होण्याचा विचार केला होता, ही गोष्ट विसरता येणार नाही. इंदिराजींच्या हत्येनंतर देशामध्ये जी सहानुभूतीची लाट निर्माण झाली त्याचा पुरेपूर उपयोग करून राजीवजींनी लोकसभेच्या निवडणुका प्रचंड बहुमताने जिंकल्या व विरोधकांचे अक्षरशः पानिपत केले विरोधकांचे त्यांनी कंबरडेच मोडले व त्या धक्क्यातून विरोधक अजूनही सावरलेले नाहीत. लोकसभेच्या निवडणुकीत विरोधकांना मिळालेल्या जागांची आकडेवारी पाहिली तर भाजप दोन जागा, जनता अकरा जागा, लोकदल दोन जागा ! यांना अखिल भारतीय का म्हणावे असा प्रश्न पडतो. त्यापेक्षा तेलगु देशम तीस जागा, मार्क्सवादी कम्युनिस्ट एकवीस जागा, अण्णा द्रमुक बारा जागा, आसाम गण परिषद सात जागा, अकाली दल सात जागा या प्रादेशिक पक्षांचे कौतुक करावयास पाहिजे विरोधकांची एवढी बुरी हालत नेहरू व इंदिराजी यांच्या कारकिर्दीतही झाली नव्हती राजीव गांधी यांची जनमानसात स्वच्छ व प्रामाणिक अशी प्रतिमा होती व त्यांना संधी देण्याकरिता जनतेने प्रचंड प्रमाणात निवडून दिले

## वेगळे वारे

राजीवजी सत्तेवर आल्यावर त्यांच्यासमोर सर्वात प्रथम आसाम व पंजाबची समस्या होती. त्या अगोदर इंदिराजींच्या हत्येनंतर, त्या घटनेची प्रतिक्रिया म्हणून, दिल्लीत व भारताच्या इतर भागात ज्या शीखविरोधी दंगली झाल्या व ज्यात शेकडो निरपराध शीखबांधवांना आपले प्राण गमवावे लागले त्या दंगली ताबडतोब आटोक्यात आणणे ही सर्वात मोठी कामगिरी राजीव गांधींसमोर होती दिल्लीत हिंसाचाराने कहर केला होता. दिल्लीतील दंगल उशिराने का होईना आटोक्यात आणण्यात राजीवजी यशस्वी झाले. मात्र या दंगलीतील कॉंग्रेसी गुंडांचा उत्साह व त्याला आवर घालण्यासाठी राजीव गांधींची दिरंगाई या गोष्टीवर त्यानंतर बरीच टीका झाली. आता त्यासंबंधी नेमलेल्या मिश्रा आयोगाचा अहवाल जेव्हा लोकसभेसमोर येईल तेव्हा बऱ्याच गोष्टी उजेडात येतील. राजीवजींनी सत्तेवर आल्यावर त्यांच्या मंत्रिमंडळातील खात्यांची जी पुनर्रचना केली त्यावरून वेगळे काहीतरी करण्याची त्यांची प्रवृत्ती दिसते. उदाहरणार्थ टेलिकम्युनिकेशन्स डिपार्टमेंट पोस्ट व टेलिग्राफपासून अलग करून त्याची आर्थिक परिस्थिती मजबूत करणे, कोळसा, पोलाद व खाणी या डिपार्टमेंटना जोडून उत्पादक व गिऱ्हाईक यांना जवळ आणणे, समाजकल्याण व स्त्रीकल्याण यांना एकत्र जोडून नवीन विभाग निर्माण करणे, जंगल विभाग शेतीपासून अलग करून पर्यावरण खात्यास जोडणे इत्यादी निरनिराळ्या पदाधिकाऱ्यांची उचलबांगडी व बदली या गोष्टीही राजीवजींच्या रिझल्ट ओरिएंटेड व झटपट निर्णय घेण्याच्या शक्तीची चुणूक दाखवतात. उदाहरणार्थ ते सत्तेवर आल्यावर ताबडतोब त्यांनी प्लॅनिंग कमिशनच्या दोन सभासदांची बोळवण केली, रिझर्व बँकेच्या गव्हर्नरपदामध्ये बदल झाला, जागतिक बँक व इंटरनॅशनल मॉनेटरी फंड यावरील नियुक्त भारतीय सभासद बदलण्यात आले, पंतप्रधानांचे विशेष सहाय्यक आर. के. धवन यांना राजीनामा देण्यास सांगण्यात आले, निरनिराळ्या राज्यांच्या केंद्रातील सचिवांना, ज्यांची ठरवून दिलेली मुदत संपली होती किंवा वाढवून देण्यात आली होती, त्यांना राज्याकडे परत पाठवण्यात आले.

पोक्षे यांनी पुस्तकात राजीवजींना कोणत्या समस्या हाताळावयाच्या आहेत याचा ऊहापोह करताना भारतातील अन्नधान्याची

परिस्थिती, वाढत्या लोकसंख्येचा प्रश्न, गरिबी, वाढती महागाई याबद्दल चांगली माहिती आकडेवारीसह दिली आहे ती मुद्दाम अभ्यासण्यासारखी आहे. किंमतीबद्दल ते लिहितात की, गेल्या पचवीस वर्षांत रुपयाची किंमत (मूल्य) इतकी घसरली आहे की एखादी वस्तू घेण्यासाठी १९६१ साली जिथे २५ रुपये मोजावे लागत होते तिथे आता १५० रुपये मोजावे लागत आहेत. आयात व निर्यातीतील दरीही मोठ्या प्रमाणात रुंदावली आहे.

### कॉम्प्युटर क्रांती

'राजीव गांधी, द प्रॅगमॅटिक प्राईम मिनिस्टर ऑफ इंडिया' या पुस्तकाच्या नावाच्या संदर्भात लेखकाने प्रॅगमॅटिझमवर बरेच काही लिहिले आहे. प्रॅगमॅटिझमच्या निरनिराळ्या व्याख्या अभ्यासण्यासारख्या आहेत.

In short, pragmatism means achieving results by getting things done in business or public affairs. "A person who exercises powers within him for successful pursuit of practical and specific objectives is called pragmatic." राजीवजींनी मागे एका भाषणात सांगितले की भारताने औद्योगिक क्रांती चुकवली पण कॉम्प्युटर क्रांती चुकवणे भारताला परवडणारे नाही. राजीवजींना नवीन तंत्रज्ञानाचा वापर शिक्षण व आरोग्य यामध्ये करावयाचा आहे. त्यांना कॉम्प्युटरचा वापर प्रथम शहरी शाळांपेक्षा खेडेगावातील शाळांतून करावयाचा आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रातून टीव्ही व व्हीसीआरचा उपयोग जास्तीत जास्त करून गावकऱ्यांना आयोग्यविषयक बऱ्याच गोष्टी शिकवता येतील. मात्र या गोष्टींवर जोर देताना खेडेगावातून अपुरी आरोग्य केंद्रे, अपुऱ्या शाळा, तेथील अपुरी सामग्री, गरिबीमुळे काही तरी जोड उत्पन्न मिळविण्यासाठी मुलांना शाळा सोडावी लागणे, आरोग्यकेंद्रातील औषधांची टंचाई या महत्त्वाच्या समस्यांवर प्रथम लक्ष केंद्रित करावयास हवे. नवीन तंत्रज्ञानाचा उदा. कॉम्प्युटर, टीव्ही व्हीसीआर याचा आरोग्यसेवा, शेती, अन्नधान्यावरील प्रक्रिया, पशुसंवर्धन, कुटुंबनियोजन, हवामानाचा अंदाज, खेळ, सांस्कृतिक चळवळी याकरिता बराच उपयोग होऊ शकेल व त्यावर राजीवजी जास्तीत जास्त भर देत आहेत.

राजीवजीपुढील समस्यांचा उल्लेख करताना लेखकाने आसाम प्रश्नावर स्वतंत्रपणे लिहिले आहे. पूर्व बंगालमधील आता बांगला देशातील निर्वासितांनी आसाममध्ये घुसखोरी करून तेथे बरेच कुटिल प्रश्न निर्माण केले. निर्वासितांच्या लोंढ्यामुळे तेथील मूळ आसामी लोकांचे अस्तित्व धोक्यात आले. मग ऑल आसाम स्टुडंडस् युनियन व ऑल आसाम गण संग्राम परिषद यांच्या झेंड्याखाली एकत्र येऊन आसामी लोकांनी १९७९ मध्ये निर्वासितांच्या प्रश्नावर आंदोलन सुरू केले. हे आंदोलन बरेच दिवस शांततामय होते. परंतु दिल्लीश्वरांनी हा प्रश्न गंभीरपणे न हाताळल्याने नंतर या आंदोलनास हिंसक वळण लागून नेल्लीचे महाभयंकर हत्याकांड झाले, ज्यामध्ये शेकडो निरपराध जिवांना प्राणास मुकावे लागले. इंदिराजींनी तेथे निवडणुकांचा फार्स घडवला परंतु लादलेल्या निवडणुकांना लोकांनी प्रतिसाद दिला नाही व भारतीय निवडणुकांच्या इतिहासात लोकांनी सर्वांत कमी प्रतिसाद दिलेल्या निवडणुका-एक फार्स अशी या घटनेची नोंद झाली. निर्वासितांच्या प्रचंड लोंढ्याची कल्पना मतदारांच्या याद्यावरून येऊ शकेल. १९७२ च्या निवडणुकांत मतदारांची संख्या ६३ लाख होती ती १९७७ मध्ये ७२ लाख झाली, १९७८ मध्ये ७९ लाख झाली तर १९७९ मध्ये ती जवळजवळ ८७ लाख होती. राजीवजी सत्तेवर आल्यावर त्यांनी ताबडतोब आसाम समस्येबद्दल सर्व माहिती घेऊन आंदोलनाच्या नेत्यांना चर्चेला बोलावले. त्यानंतर जो ऐतिहासिक आसाम करार झाला त्याप्रमाणे १ जानेवारी १९६६ ही तारीख (हे वर्ष) परकीयांच्या डिटेक्शनकरिता मूळ वर्ष मानले जाईल असे ठरवण्यात आले. १९६५ च्या भारत-पाकिस्तान युद्धात जे निर्वासित बंगाली हिंदू आसाममध्ये आले त्यांना या करारामुळे संरक्षण मिळणार आहे १ जानेवारी १९६६ ते २५ मार्च १९७१ या दरम्यान जे निर्वासित आसाममध्ये आले त्यांची नावे मतदार याद्यातून दहा वर्षांसाठी वगळण्यात येतील, आणि जे निर्वासित २५ मार्च १९७१ नंतर आसाममध्ये आले आहेत त्यांची छाननी करून त्यांना परत पाठवण्यात येईल त्यानंतर आसाममध्ये निवडणुका घेण्यात येऊन आंदोलकांचे म्हणजेच आसाम गण परिषदेचे सरकार सत्तेवर आले आहे आसाम करार करून राजीवजींनी बरेच यश मिळवले, मात्र या कराराची अंमलबजावणी नीटपणे होत नसल्याने आसाम गण परिषद सरकारला मोठ्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे.

निर्वासितांची आवक अद्याप चालूच आहे. सीमेवर ( भारत-बांगलादेश ) कुंपण घालण्याचा प्रश्न रेंगाळला आहे, आसाममधील बंगाली भाषिक लोकांवर आसामी भाषा लादल्यावरून असंतोष धुमसत आहे. तरीसुद्धा पंजाब कराराप्रमाणे आसाम करार संपूर्णपणे मात्र पोकळ ठरलेला नाही.

### पंजाबची समस्या

ऑपरेशन ब्ल्यू स्टारच्या कारवाईमुळे इंदिराजींना आपले प्राण गमवावे लागले. त्यानंतर पंतप्रधान झालेल्या राजीवजींपुढे सर्वांत ज्वलंत समस्या पंजाब ही होती. पंतप्रधानपदी आल्यावर ताबडतोब त्यांनी पंजाब प्रकरणी सर्व माहिती घेऊन आंदोलक नेत्यांशी-लोंगोवाल, बर्नाला यांच्याबरोबर थेट बोलणी सुरू केली. पंजाबची समस्या हा एक काँग्रेसी राजकारणाचा परिपाक आहे. पंजाबमध्ये अकालींना शह देण्यासाठी भिंद्रनवाल्यासारख्या अतिरेकी लोकांना काँग्रेसने हाताशी धरले व तेच शेवटी त्यांच्या मानगुटीस बसले. पंजाबमध्ये भिंद्रनवाले व त्यांच्या साथीदारांनी खून, दरोडेखोरी यांना उत आणला व त्याची परिणती शेवटी सुवर्ण मंदिरात लष्कर घुसवण्यात झाली. पंजाब करार करताना राजीवजींनी सर्वांत मोठी घोडचूक केली ती म्हणजे लोंगोवाल व बर्नाला यांच्याबरोबर त्यांनी पंजाबमध्ये सर्वांत लोकप्रिय असणाऱ्या प्रकाशसिंग बादल यांनाही बोलण्यामध्ये समाविष्ट करून घेतले नाही ही, परंतु तेथे पुन्हा एकदा राजकारण आडवे आले व त्याचे परिणाम आजही भोगावे लागत आहेत बादल व त्यांचे साथीदार बर्नालांना जितके अडचणीत आणता येईल तितके आणत आहेत. पंजाब करार अयशस्वी ठरला आहे, तो विसरलेलाच बरा ! चंदीगड पंजाबला द्यायचा प्रश्न लोंबकळत पडला आहे. अर्थात अतिरेक्यांना त्याचे सोयरसुतक

नसल्याने उद्या चंदीगड पंजाबला दिले तरी त्यांच्या कारवाया थांबतील असे मानणे मूर्खपणाचे ठरेल. नद्यांच्या पाणी वाटपाचा प्रश्न, सतलज–यमुना जोड कालव्याचा प्रश्न सर्वच गोष्टी अतिरेक्याच्या प्रचंड हिंसाचाराने रंगाळल्या आहेत. या हिंसाचाराचा कधी अंत होणारच नाही का, अशी निराशा पसरली आहे. खुनावर खून पडत आहेत. प्रथम बाबा गुरूबचनसिंग, लाला जगतनारायण, इंदिराजी, लोंगोवाल, जनरल वैद्य असे कित्येक मोहरे अतिरेक्याचा हिंसाचारात बळी पडले. पंजाबमध्ये हिंसाचार चालूच आहे बर्नाला येवोत नाहीतर आणखी कोणी येवो, अतिरेक्याचा कारवायात फरक पडत नाहीये. बर्नाला सरकार केंद्राचे बाहुले ठरले आहे. बर्नाला सरकार ही एक प्रकारची केंद्रीय राजवटच आहे. आणखी राष्ट्रपती राजवटीची काय आवश्यकता आहे? जास्तीत जास्त हिंदूचे खून पाडून अतिरेक्याना देशभर हिंदू व शीख याच्यात संघर्ष निर्माण करावयाचा आहे. अजूनपर्यंत तरी त्यांना यात यश आले नाहीये, परंतु हे असे किती दिवस चालणार? पंजाबमधून घाबरलेल्या हिंदूचे स्थलांतर मागेच सुरू झाले आहे. त्याची प्रतिक्रिया मधूनमधून होतच असते. हिंसाचार काबूत आणण्यासाठी रिबेरोंना आणण्यात आले. बिचारे रिबेरो काय करणार? संपूर्ण पंजाब पोलिसदलच आतून बाहेरून किडले आहे तेथे रिबेरो काय करणार? म्हणून तर पोलिस कॉम्प्लेक्समध्ये रिबेरोंवर, त्याच्याच हाताखालच्या लोकांकडून प्राणघातक हल्ला होतो! संपूर्ण पंजाब पोलिसदलाची नुसती फेररचना करून भागणार नाही, तर ते पंजाबमधून पूर्णपणे काढून घेऊन तेथे सी. आर. पी. एफ. व बी. एस. एफ. ला तैनात करावयास हवे, तरच अतिरेक्याना लगाम घालता येईल अतिरेक्याना पोलिसाची सहानभूती आहे, गावकऱ्याची सहानभूती आहे. विश्वास तरी कोणावर ठेवणार व कसा? अतिरेक्याचा हिंसाचार काबूत आणण्यासाठी सी आर. पी. एफ. व बी. एस एफ चे लोकच उपयोगी पडू शकतील व तेच सध्या आपला प्रभाव पाडत आहेत. अजूनही बादल यांच्याशी समझोता करून बर्नालाच्या जागी त्याना बसवल्यास ते परिस्थिती आटोक्यात आणू शकतील. बादल याच्याजवळ गट्स् आहेत, ते बर्नालाप्रमाणे मवाळ नाहीत, ते कणखर आहेत. आणि महत्त्वाची गोष्ट म्हणजे बऱ्याच वेळा मुख्यमंत्रिपद उपभोगल्याने त्याना सर्व प्रश्नांची माहिती आहे. ते सध्या अनपेक्षित वक्तव्ये करत असले तरी ती केवळ निराशेपोटी करत आहेत सिद्धार्थ शंकर रे याच्या जागी राज्यपाल म्हणून पंजाबची साकल्याने माहिती असलेल्या निवृत्त मेजर जनरल जे. एस. अरोरा याची नेमणूक उपयुक्त होऊ शकेल अशा परिस्थितीत त्याच्या लष्करी ज्ञानाचा उपयोग करून घेता येईल.

पंजाब कराराच्या अमलबजावणीला आता फारसे महत्त्व उरलेले नाही. पंजाबमध्ये कोणतीही किंमत देऊन शांतता प्रस्थापित करणे ही तातडीची गरज आहे. लोकाचा कायदा, सुव्यवस्था, सरकार याच्यावरचा विश्वास उडायला लागला आहे पंजाबमध्ये हिंदू कधीही नव्हते इतके असुरक्षित बनले आहेत, या गोष्टीचा स्फोट भारताच्या कानाकोपऱ्यात होऊ शकेल. पंजाबचा प्रश्न पंजाबपुरता मर्यादित न राहाता देशात सर्वांत मोठी समस्या बनत आहे काहीच्या मते अतिरेक्याशी सरकारने प्रत्यक्ष बोलणी करावीत. हा विचार तसा काही वाईट नाही, परंतु त्यात काही अडचणी आहेत. एक तर अतिरेकी पुरेसे संघटित नाहीत. केवळ हिंदूना मारण्यावरून व खून–दरोडे घालण्याच्या बाबतीत त्याच्यात स्पर्धा चाललेली असते. नाही म्हणायला खलिस्तान कमांडो फोर्स व खलिस्तान लिबरेशन फोर्स असे दोन संघटित गट अतिरेक्याच्यात आहेत; पण इतरही अनेक गट आहेत. तेव्हा त्याच्याशी बोलणी करावयाचे म्हटल्यास एकाला पटलेला निर्णय दुसऱ्या गटास पटायला हवा नाहीतर त्या बोलण्याना अर्थ उरणार नाही.

## काश्मीर–शहाबानो

जम्मू–काश्मीर ही नेहमीच भारताची डोकेदुखी बनून राहिली आहे महाराजा हरिसिंगच्या आडमुठेपणामुळे भारताला काश्मीरचा काही भाग नाहकपणे (पाकिस्तानकडे) गमवावा लागला. त्यानंतर मग शेख अब्दुल्लाची मर्जी सभाळता सभाळता दिल्लीश्वराच्या नाकी नऊ आले शेख अब्दुल्लाच्या कारकिर्दीत देशद्रोही प्रवृत्तीचे लोक संघटना याच्यात आजच्या इतकी ताकद नव्हती हे कबूल करावे लागेल. शेख अब्दुल्लांच्या लोकप्रियतेमुळे तसे झाले असावे. त्याची जनमानसावर चांगली पकड होती. शेख अब्दुल्लानंतर त्याचे पुत्र फरूक अब्दुल्ला हे जम्मू–काश्मीरचे मुख्यमंत्री झाले. वडिलांप्रमाणे तेही काश्मीर खोऱ्यात लोकप्रिय आहेत. परंतु दिल्लीश्वराना अवदसा आठवली व त्यानी शेख अब्दुल्लाचे जावई जी. एम. शहा याना हाताशी धरून फरूक याना मुख्यमंत्रिपदावरून खाली खेचले. जी. एम. शहा याच्याबरोबर नॅशनल कॉन्फरन्समधून बाहेर पडलेले म्हणजेच त्याना पाठिंबा देणारे सर्व लोक मंत्री झाले. शहा याना फरूक इतकी लोकप्रियता मिळणे कधीच शक्य नव्हते. त्याच्या कारकिर्दीत भारत विरोधी शक्तीनी काश्मीर खोऱ्यात धुमाकूळ घातला. त्याच्या राजवटीत भ्रष्टाचारही शिगेस जाऊन पोचला. आता दिल्लीश्वराना शहाणपण सुचले असून त्यानी फरूकच्या पक्षाबरोबर समझोता केला व फरूकचे लोकप्रिय सरकार पुन्हा एकदा (कॉंग्रेसशी सहयोग करून) सत्तेवर आले आहे.

शाहबानो केसमधील सुप्रीम कोर्टाच्या निकालानंतर (घटस्फोटित मुस्लिम स्त्रीला पोटगी देण्यासंबधी) देशभर मुस्लिम समाजात खळबळ माजली. मुस्लिम समाजातील जातीयवादी शक्तीनी सुप्रीम कोर्टाच्या निकालाबाबत आरडाओरड करण्यास सुरुवात केली सुप्रीम कोर्टाच्या निकालामुळे घटस्फोट देताना मुस्लिम नवऱ्याना आता दहा वेळा विचार करावा लागणार होता घटस्फोटित मुस्लिम स्त्रीला तर सुप्रीम कोर्टाचा निकाल म्हणजे वरदानच ठरणार होते परंतु मुस्लिम समाजातील अशिक्षितपणाचा प्रभाव व दारिद्र्य यामुळे मुल्लामौलवीचा समाजावर जास्त प्रभाव आहे. मुल्लामौलवींना आपले नेतृत्व टिकवून ठेवण्यासाठी असे विषय हवेच असतात समाजात पुरुषाचे जास्त वर्चस्व आहे पंजाब, आसाम, जम्मू–काश्मीर याच्या समस्यानी वैतागून गेलेल्या राजीवजीनी आणखी एक डोकेदुखी नको म्हणून, मुस्लिम जातीयवाद्याच्या सूचना लक्षात घेऊन नवीन मुस्लिम वुमेन (प्रोटेक्शन ऑफ राईटस् ऑन डायव्होर्स) बील संसदेत मजूर करून घेतले या बिलाच्या

तरतुदीप्रमाणे घटस्फोटित मुस्लिम स्त्रीस इद्दतच्या काळात नवऱ्याकडून उदरनिर्वाहासाठी पुरेशी मदत मिळेल तिला लग्नाच्यावेळची मेहरची रक्कम व नवऱ्याने आणि नातेवाईकानी दिलेली पॉपर्टी मिळेल. याबाबतीत नवऱ्याने नकार दिला तर तिला मॅजिस्ट्रेटकडे जाता येईल व मॅजिस्ट्रेटला महिन्याच्या आत तिच्या नवऱ्याला तसे करण्याचा हुकूम काढता येईल घटस्फोटित मुस्लिम स्त्रीचे नातेवाईक तिची आर्थिक जबाबदारी पेलण्याच्या परिस्थितीत नसतील तर स्टेट वक्फ तिला मदत करेल. अशा प्रकारे मुस्लिम स्त्रीच्या हिताचा बळी देऊन शातता मिळवण्यात राजीवजी यशस्वी झाले आहेत.

## परराष्ट्र धोरण

देशाबाहेर श्रीलकेतील तामिळीचा प्रश्न भारताची डोकेदुखी होऊन बसला आहे. तामिळीवरील सिंहली लोकाच्या डॉमिनेशनमुळे त्याना नेहमीच दुय्यम दर्जाची वागणूक दिल्याने, श्रीलकेत तामिळी लोकानी उठाव केला व त्यातून आदोलन भडकले. आज त्याच्यात कित्येक अतिरेकी सघटना तयार झाल्या असून त्या स्वतत्र तामीळ राष्ट्राची मागणी करत आहेत. या बाबतीत भारताने नेहमीच सामजस्य व सामोपचाराची भूमिका घेऊन, श्रीलकेचे तुकडे न होता, शाततेने ही समस्या मिटावी म्हणून, दोन्ही पक्षाना वाटाघाटी करण्यासाठी एकत्र आणण्याचा प्रयत्न केला आहे. या बाबतीतील राजीवजीचा प्रयत्न अत्यत प्रामाणिक आहे. पाकिस्तानची पजाबमधील अतिरेक्याता असलेली सहानुभूती व मदत आता गुप्त विषय राहिलेला नाही. राजीवजीनी वेळोवेळी या विषयीच्या गाभीर्याची कल्पना झियाना दिलेली आहे. अमेरिकेचा पाकिस्तानला होणारा मोठ्या प्रमाणावरील अत्याधुनिक शस्त्रास्त्राचा पुरवठा ही भारताच्या चिंतेची बाब होऊन बसली आहे कारण त्याचा दुरुपयोग भारताविरुद्धच होणार हे उघड आहे पाकिस्तानमध्ये जेव्हा अस्थिरता माजते व समस्या निर्माण होतात तेव्हा तेथील जनतेचे लक्ष दुसरीकडे वळवण्यासाठी भारतावर आक्रमण करण्याचा बेत रचला जातो. याचा अनुभव आपल्याला १९६५ व १९७१ मध्ये आलाच आहे. राजीवजीनी निरनिराळ्या सधीचा फायदा घेऊन वेळोवेळी निरनिराळ्या परिषदामध्ये झिया याच्याशी बोलणी करून भारताच्या काळजीची त्याना कल्पना दिली आहे व भारत आणि पाकिस्तान याचे सबध चागले नसले तरी आणखी बिघडू नयेत याची दक्षता घेतली आहे त्याचबरोबर पाकिस्तानने पुन्हा एकदा आगळीक केल्यास त्याना सणसणीत धडा शिकवण्यात येईल अशी तबी दिली आहे चीनबरोबरील भारताचा सीमाविषयक तटा मिटलेला नाही. नवीन नवीन भारतीय प्रदेशावर आपला हक्क सागण्याची चीनची आगळीक मधून मधून चालू असते. नुकताच अरुणाचल प्रदेश सबधीचा चीनचा दावा हा त्यातलाच प्रकार आहे मात्र त्यावरील राजीवजीचे भाष्य सदिग्ध व त्या विषयाची नीट माहिती न घेता केल्यासारखे वाटते. चीनबाबत राजीवजीना कठोर भूमिका घ्यावी लागणार आहे

भारताचे परराष्ट्र धोरण व त्याबाबतीतील राजीवजीची कामगिरी याबाबत लेखकाने विस्ताराने लिहिले आहे तो भाग अभ्यासण्यासारखा आहे. भारताचे अमेरिका व रशिया बरोबरचे सबध, अलिप्तता चळवळीतील नेता म्हणून भारताची कामगिरी याबाबत लेखकाने सुदर विवेचन केले आहे. जाताजाता अलिप्तता चळवळीबद्दल एकच गोष्ट सागावीशी वाटते, ती म्हणजे ही चळवळ हे एक थोताड होऊन बसले आहे पाकिस्तान, क्युबा यासारख्या चळवळीच्या सभासदामुळे अलिप्तता हा एक विडबनाचा भाग होऊन बसला आहे. चळवळीतील बरीच राष्ट्रे एकतर रशिया किंवा अमेरिकेशी जवळीक साधणारी असल्याने या चळवळीला अलिप्ततावादी का म्हणावयाचे हाही एक प्रश्न आहे. शिवाय या चळवळीत माडले जाणारे ठराव याना कितपत वजन असते व त्याकडे कितपत गाभीर्याने पाहिले जाते व अमेरिका व रशियासबधीच्या निषेध ठरावाना कशी केराची टोपली दाखवली जाते हे कठोर सत्य मागे लिबियाच्या कर्नल गडाफीने अलिप्त राष्ट्राच्या परिषदेत सागितले होतेच. अलिप्तता चळवळीच्या आजवरच्या कामगिरीचा आढावा हा एक स्वतत्र लेखाचा विषय होऊ शकेल. पतप्रधान झाल्यावर राजीवजीनी ज्या निरनिराळ्या महत्त्वाच्या देशाना भेटी दिल्या त्या भेटीचा समग्र वृत्तात लेखकाने एका प्रकरणात दिला आहे ' इकॉनॉमी इन राजीव रेजीम ' या प्रकरणातील आकडेवारी व माहिती सूक्ष्मपणे अभ्यासण्यासारखी आहे याकरिता लेखकाने बरेच परिश्रम घेतल्याचे जाणवते. पचवार्षिक योजना, बजेट, गरिबी कमी करण्यासाठी सरकारने योजलेल्या उपाययोजना इत्यादी विविध विषयावरील सखोल माहिती आपणास वाचावयास मिळते ब्लॅकमनी हे प्रकरणही अभ्यासपूर्ण आहे ब्लॅक मनी किती आहे हे सागताना लेखक लिहितात की एकूण ग्रॉस नॅशनल प्रॉडक्टच्या १८ ते २१ टक्के ब्लॅक मनी भारतीय अर्थव्यवस्थेत अस्तित्वात आहे आकडेवारीत सांगावयाचे झाल्यास सुमारे ३१ ते ३७ हजार कोटी रुपयापर्यंत ब्लॅकमनी असावा– ब्लॅकमनी कसा तयार होतो, तो कसा वापरला जातो व त्याच्यावर मर्यादा आणण्यासाठी काय करावयाला हवे हे माहीत करून घेण्यासाठी हे पुस्तक मुद्दाम आवर्जून वाचायला हवे.

राजीवजीच्या स्वच्छ व प्रामाणिक प्रतिमेबद्दल बरेच काही लिहिले व बोलले जाते परतु काही गोष्टी अशी साक्ष देत नाहीत. जम्मूकाश्मीरमधील भ्रष्टाचारी शहा राजवट राजीवजीनी बराच काळ खपवून घेतली. अतुले व गुडू राव याच्यासारखे भ्रष्टाचाराचे आरोप असणारे लोक काँग्रेसबाहेर फेकले गेले त्याचे क्रेडिट राजीवजीना कितपत देता येईल ? आजही भ्रष्टाचाराचे असख्य आरोप असणारे भजनलाल केंद्रात मत्री आहेत तर बन्सीलाल हरयाणाचे मुख्यमत्री आहेत. जगन्नाथ मिश्र याना ते बडखोरी करूनसुद्धा पक्षात खपवून घेतले जात आहे दार्जिलिंगमध्ये गुरखालँडसबधी जे आदोलन चालू आहे त्याबाबतही राजीवजीची भूमिका पुरेशी प्रामाणिक नाही बगालमधील निवडणुकावर डोळा ठेवून वक्तव्ये केली जात आहेत. नाहीतर या चळवळीत देशविरोधी असे काहीही नाही असे भाष्य करण्याची पंतप्रधानाची हिंमत झाली नसती. राजकीय फायद्याकरिता चळवळीचा नेता सुभाष घैसिंग याला कोणत्याही प्रकारची सहानभूती दाखवण्याचा प्रयत्न झाल्यास भिद्रनवाल्याप्रमाणे त्याचे स्तोम माजेल व तो त्याच्याप्रमाणे भूत होऊन काँग्रेसवाल्याचा व पर्यायाने देशाच्या मानगुटीवर बसू शकेल ही शक्यता, हा धोका राजीवजीनी लक्षात घ्यावयास हवा इदिराजीनी जी चूक मागे केली तिची पुनरावृत्ती राजीवजीनी करता कामा नये, नाहीतर इतिहास त्याना क्षमा करणार नाही पतप्रधान राजीव गाधीवरील एक अभ्यासपूर्ण पुस्तक म्हणून या पुस्तकाचा उल्लेख करावा लागेल. □



# परकीय कर्जबाजारीपणा ब्राझिल आणि भारत

संजय होनकळसे

ऋण काढून सण साजरा करू नये. अशी एक म्हण आपल्याकडे प्रचलित आहे. परंतु आजच्या व्यापारयुगात भरभराटीचा व प्रगतीचा दिवाळसण साजरा करण्यासाठी उत्पादनवाढ व विविधता आवश्यक आहे व त्याकरता लागणाऱ्या वाढत्या खर्चाशी हातमिळवणी करण्यासाठी उधारी वा कर्जाच्या आधाराची जरुरी आहे. तसं नसतं तर आजचं अत्याधुनिक औद्योगिक कारखाने व व्यापारी कंपन्यांचं युग अवतरलंच नसतं व समाज वाढत्या गरजा व पारंपरिक उत्पादन पद्धती व प्रकार यांच्या गर्तेत अडकलेला असता व आजची प्रगती दिसलीच नसती. तात्पर्य कर्ज हे व्यक्तिगत व सामाजिक वा राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय उन्नतीचं प्रमुख साधन आहे. म्हणूनच आज अमेरिकेसारख्या प्रगत देशात पंच्च्याहत्तर टक्के व्यापार व्यवहार उधारी व कर्जावर चालतात. तसेच तिसऱ्या जगातील राष्ट्रे त्यांच्या प्रगतीसाठी आज गेली चाळीस वर्षे आंतरराष्ट्रीय व्यापारी वा विकास बँकांकडून जागतिक कर्ज काढत आहेत. त्यामुळे दक्षिण कोरियासारख्या देशात जी प्रगती झाली आहे त्यात या साधनांचा वाटा नाकारता येणार नाही.

परंतु कर्ज हे जरी प्रगतीचे प्रमुख साधन असले तरी कर्जबाजारीपणा वा दिवाळखोरी ही नामुश्की आहे. कर्जबाजारीपण वा दिवाळखोरी म्हणजे फेडण्याची क्षमता नसणे व ती निर्माण न करणे. तर दिवाळी साजरी करण्यासाठी कर्जापासून उत्पादन व उन्नती साधणे आवश्यक आहे. नाहीतर दिवाळीच्या ऐवजी दिवाळं निघतं. नेमका हाच अनुभव आज बहुतेक लॅटिन अमेरिकन देशांत दिसतो. ब्राझील, मेक्सिको, अर्जेन्टिना, पेरू, कोलंबिया इक्वॉडर, वेनेझुला इ. बहुतेक दक्षिण अमेरिकन देश आज कर्जबाजारीपणाच्या आपत्तीत सापडलेले आहेत. याची कल्पना त्या देशांच्या थकबाकीवरून दिसून येते. खालील तक्ता क्रमांक एक वरून पंधरा लॅटिन अमेरिकन देशांची आंतरराष्ट्रीय वित्तीय व्यवस्थेकडील थकबाकीची कल्पना येते.

कर्जबाजारीपणात आज ब्राझिलचा उच्चांक आहे व त्या पाठोपाठ मेक्सिकोचा नंबर लागतो. भारत या शर्यतीत कालपर्यंत मागे होता. परंतु १९८१–८२ पासून भारताने याबाबतीत आघाडी घेतली ती दोन मोठी कर्जे घेऊन. एक ६८० दशलक्ष डॉलर राष्ट्रीय अल्युमिनियम ( NALCO ) व दुसरे २०० दशलक्ष डॉलर ONGC चे. १९८१ साली सर्वांत मोठे म्हणजे पाच लक्षकोटी डॉलरचे कर्ज आंतरराष्ट्रीय नाणे निधीकडून काढले गेले. १९८२ साली तीन मोठी कर्जे काढली गेली. ६०० दशलक्ष डॉलरचे NTPC चे, जवळजवळ २०० दशलक्ष डॉलर AIR-INDIA चे व ११० दशलक्ष डॉलरचे Coal India १९८१ व ८२ साली प्रतिवर्षी ८० कोटी डॉलरचे (८०० दशलक्ष डॉलर ) कर्जे घेतली गेली ती मुख्यत्वे करून ONGC विझाग स्टील, I. C. I. C. I. EXIM-BANK इ. साठी १९८२ साली भारताचे एकूण कर्ज १९.४८७ लक्ष कोटी डॉलर झाले व कर्जबाजारीपणाच्या शर्यतीत भारताचा १९८३ साली नववा नंबर लागला ३१ मार्च १९८४ ला भारताचे एकूण परकीय कर्ज २४,१२१ कोटी रुपये एवढे झाले व एव्हाना ते ३०,००० कोटींच्या घरात गेले आहे.

जरी भारताचा याबाबतीत आतापर्यंतचा व्यवहार सुलभ व सुरळीत झाला असला तरी ज्या गतीने गेल्या सहा वर्षात भारताने या क्षेत्रात मजल मारली आहे व कर्जाचे प्रमाण वाढत आहे, त्यामुळे कित्येकांच्या मनात शंकेची पाल चुकचुकते आहे, की भारतही दक्षिण अमेरिकी राष्ट्रांप्रमाणे कर्जाच्या डोंगरांखाली पिचून जाईल काय ? भारतास त्या देशांप्रमाणे बिकट व दोलायमान परिस्थितीस तोंड द्यावे लागेल काय ? असे जर असेल तर यापुढेही भारताने असेच कर्ज उचलत जावे काय ? कर्जबाजारीपणामुळे लॅटिन अमेरिकन देश आज आर्थिक संकटाच्या जाळ्यात सापडले आहेत व आज त्यांच्यावर काखा वर करायची पाळी आली आहे व याचा दुष्परिणाम जागतिक वित्तव्यवस्था कोलमडून जाण्यात होईल. खरे म्हणजे हा विषय इतका नाजूक व गुंतागुंतीचा आहे त्यावर अचूक व बिनतोड निष्कर्ष काढणे व उपाय सुचवणे कठीण आहे तरीही त्या देशांचा भारताशी तौलनिक अभ्यास करून काही निष्कर्ष काढता येतो का हे या लेखाचे मुख्य सूत्र आहे. त्यादृष्टीने ब्राझिल त्या देशांचा प्रतिनिधीक धरून त्याचा भारताशी तुलनात्मक विचार आपण करू या.

### खंडप्रायता, शेतीप्रधानता

ब्राझिलच या दृष्टीने निवडण्याची प्रमुख कारणे दोन. (१) ब्राझिल हा आज नंबर एकचा कर्जबाजारी देश आहे. लेने गयी पूतको खो आई खसमको अशी अवस्था आज ब्राझिलची आहे. (२) ब्राझिल व भारत यांमधील भौगोलिक, सामाजिक, आर्थिक तुलनात्मक साम्य यादृष्टीने आपल्याला थोडी ब्राझिलविषयी माहिती उपयुक्त ठरेल.

पंधरा एप्रिल १५०० ला ब्राझिलचा शोध पोर्तुगीज अॅडमिरल पेद्रो अल्वारीस कॅब्रल

याना लागला व तेथे पोर्तुगीज वसाहत सुरू झाली तोपर्यंत तेथे काही इन्डियन्स वस्ती करून होते. जवळजवळ साडेतीनशे ते चारशे वर्षांच्या पोर्तुगीज वसाहतीनंतर (काही काळ १५०० ते १६४० स्पॅनिश वसाहत) १५ नोव्हेंबर १८८९ ला प्रजासत्ताक ब्राझिलचा जन्म झाला व १९४६ साली २१ प्रांत व ४ केंद्रशासित प्रदेश असलेल्या आजच्या संयुक्त प्रजासत्ताक ब्राझिलची स्थापना झाली थोडक्यात अर्वाचीन भारताप्रमाणेच परकीय वसाहत व प्रजासत्ताक ब्राझिलची ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे.

भौगोलिक दृष्ट्याही ब्राझिल हा भारताप्रमाणेच, ३३ लाख चौरस मैल व्याप्ती असलेला, खंडप्राय देश आहे जगातील पाचवा मोठा भूखंड ब्राझिलने व्यापला आहे तर भारत हा सातवा मोठा प्रदेश हवामान भारताप्रमाणेच उष्ण व दमट ४६००मैलाचा समुद्र किनारा व अफाट जलसंपत्ती विविधता व खंडप्रायता ही ब्राझिलचे भारताशी साम्य दर्शवते. भारताप्रमाणेच सण व उत्सवप्रियता ही सांस्कृतिक वैशिष्ट्ये.

ब्राझिलची लोकसंख्या जरी भारताच्या मानाने बरीच कमी असली तरी (१२.५ कोटी) लोकसंख्या वाढीचे प्रमाण फार आहे व भारताप्रमाणेच लोकसंख्या असमतोल आहे– काही प्रमुख शहरे व ग्रामीण विभाग. सुधारलेली शहरे व मागासलेला ग्रामीण विभाग असा आर्थिक द्वैतवाद ब्राझिल, साओ पावलो, रीओ डी जानेरीयो, बेलो, सॅल्वाडोर ही मोजकीच शहरे

भारताप्रमाणेच ब्राझिल हा शेतीप्रधान देश आहे पन्नास टक्क्यापेक्षा जास्त लोकसंख्या शेती व्यवसायात गुंतलेली. कॉफी, कापड, भात, कोको ही मुख्य शेती उत्पादने पशुपालन हाही एक महत्त्वाचा उद्योग लोह ही खनिज संपत्ती, लीड मॅंगेनिझ, क्वार्टझ्, क्रिस्टल, बॉक्साइट ही इतर खनिज संपत्ती

खाद्यउत्पादने, कापड गिरण्या व पोलाद ही प्रमुख औद्योगिक उत्पादने. निर्यात व्यापार भारताप्रमाणेच कुठल्यातरी एका वा मोजक्याच वस्तुवर आधारित, उदाहरणार्थ कॉफी ब्राझिल लाकूड–ज्यावरून ब्राझिलला ब्राझिल म्हटले जाते ते साखर, रबर इ. साक्षरता बरीच कमी शेतीप्रधानता असल्याने उत्पन्न बचत व भांडवल कमी व त्यामुळे आर्थिक विकासासाठी लागणारे भांडवल परकीय कर्जाद्वारे उपलब्ध करण्यावाचून गत्यंतर नाही परंतु समस्या वाढतच राहिल्या व त्या सोडवण्यासाठी आणखीन कर्ज अशा दुष्टचक्रात ब्राझिल गुरफटून गेलाय व आज ब्राझिलला कारवा वर कराव्या लागत आहे. कारण आज दारिद्र्य, बेरोजगारी, आर्थिक विषमता, अज्ञान, महागाई, वाढती लोकसंख्या, असाक्षरता, असमतोल, राजकीय अस्थिरता व अनेक प्रश्न ब्राझिलला भेडसावत आहेत. २७,०००,००० लोक दारिद्र्य रेषेखाली जीवन काढतायत महागाईने पण तेथे उच्चांक गाठला आहे महागाईचा दर १९८४ मध्ये २३४% आणि १९८५ मध्ये दर दिवशी अर्धा टक्का या दराने भाववाढ होत आहे. ८६ डिसेंबरमध्ये भाववाढ दर ५००% झाला असेल. अशा परिस्थितीत कर्जाचा डोंगर वाढतच आहे. १९८५–८६ पर्यंत १०७ ३ लक्षकोटी डॉलर एवढ कर्ज झालं आहे व त्यात निर्यात घट व व्याजभारामुळे दिवाळखोरीची समस्या निर्माण होत आहे त्यामुळे जागतिक वित्तीय बाजारपेठेत खळबळ माजली आहे यामुळे नऊ प्रमुख अमेरिकन बँका बुडीत निघतील व वित्तीय अस्थिरतेचा धोका माजण्याचा संभव आहे त्यामुळे अधिक कर्ज मिळवणे कठीण होत आहे तर आई जेवू घालीना, बाप भीक मागू देईना, अशी अवस्था आज

### तक्ता क्र. १ :
### लॅटिन अमेरिकन देशांची आंतरराष्ट्रीय कर्जाची थकबाकी
### बिलियन डॉलरमध्ये

| | १९८१ | १९८३ | १९८५ | १९८६ |
|---|---|---|---|---|
| अर्जेन्टिना | २२.९ | २७.९ | २८.९ | २९.१ |
| बोलिविया | ० ९ | ० ७ | ० ६ | ० ६ |
| ब्राझिल | ४९ ६ | ७१ २ | ७६ ९ | ७७.३ |
| चिली | ९ ६ | १३ ० | १४.३ | १४.२ |
| कोलंबिया | ४.९ | ७ ५ | ६ ५ | ६.३ |
| इक्वॉडर | ४ २ | ५.१ | ५ २ | ५ २ |
| मेक्सिको | ५५ ५ | ७१.९ | ७५ ० | ७३ ५ |
| पेरू | ४ ३ | ६ ५ | ५.६ | ५.४ |
| रूगे | ० ९ | १ ९ | २ ० | २ २ |
| वेनेझुला | २२ ३ | २८ ३ | २५.९ | २५ ७ |
| आयव्हरीकोस्ट | २.८ | ३.१ | २ ९ | ३.० |
| मोरोक्को | ३ ३ | ४.४ | ४ ८ | ५.० |
| नायजेरिया | ४ ७ | ९.३ | १३ ४ | ८ ८ |
| फिलिपाइन्स | ७.२ | १३.७ | १०.५ | १३.९ |
| युगोस्लाविया | ९.९ | ९.९ | १०.५ | ९ ९ |
| एकूण | १९५ ८ | २७३.१ | २८१.६ | २८०.३ |

पण या बाबतीत पूर्वयुरोपीय राष्ट्रे, पूर्व अशियाई राष्ट्रे या बरोबरच भारतही मागे नाही हे खालील तक्ता क्र. २ दर्शवते.

### तक्ता क्र. २
### परकीय सार्वजनिक कर्ज : ( अमेरिकन दक्षलक्ष डॉलरमध्ये )
### १९८२ साली

| | | | |
|---|---|---|---|
| द. कोरिया | २००६१ | इजिप्त | १५४६८ |
| भारत | १९४८६ | अल्जेरिया | १३८९७ |
| इन्डोनेशिया | १८४२१ | इस्रायल | १४९०० |
| तुर्कस्तान | १५९३१ | पाकिस्तान | ९१७८ |

ब्राझिलची झाली आहे. काही उपाय सुचवले व अवलबले जात आहेत. बेकर प्लॅन, ब्रॅडले प्लॅन MYRA (Multi-year Rescheduling Arrangements) इ. अशा परिस्थितीत एक तर ही कर्ज खोडून टाकावी लागतील किंवा आतरराष्ट्रीय नाणे निधीला कडक धोरणे अवलबावी लागतील या दोन्ही गोष्टी पेच निर्माण करणाऱ्या आहेत कर्ज खोडून टाकली तर जागतिक बँकिंग व्यवस्था कोलमडण्याचा धोका आहे व दुसऱ्या उपायाने मदी व इतर आर्थिक सकटे उचलखाण्याचा धोका तर असे इकडे आड तिकडे विहीर अस ऱ्यागड ब्राझिलमध्ये निर्माण झाल आहे.

## भारतास लाल कंदील

यावरून भारताने धडा घेतला पाहिजे अशी कुजबुज सुरू आहे आतरराष्ट्रीय सस्था भारतास कर्ज देण्यास अनुकूल आहेत. भारताची परिस्थिती अतिबिकट नसली तरी भारत दरीच्या काठावर उभा आहे मुख्यत्वेकरून खालील मुद्द्याचा लाल कदील भारतास सावधानतेचा इशारा देत आहे

(१) मॉर्गन गॅरटी ट्रस्टच्या १९८६ च्या अहवालानुसार सार्वजनिक सस्थाचे भरपूर कर्ज स्वस्त दराने घेण्याचे प्रमाण हे दक्षिण अमेरिकन देशातील परिस्थितीचे मुख्य कारण आहे त्यामुळे खाजगी क्षेत्राकडे कर्जपुरवठा कमी पडला, खाजगी क्षेत्रात एकूण बचत ठेवीच्या १० ते १२ टक्केच पुरवठा त्या देशात होऊ शकला भारतात हे प्रमाण १४ टक्के आहे. या उपर स्वस्त कर्ज अतीभाडवली गुतवणुकीसाठी वापरल्याने बेकारी वाढली. भारतात पण १९५४–५५–५६ साली साधन सपत्ती लोहउद्योगात वापरल्यामुळे औद्योगिक व शेती व्यवसाय गतीला समतोल ढळला व काही समस्या निर्माण झाल्या त्या फोफावत गेल्या भारताच्या बाबतीत भाडवल-उत्पादन प्रमाण capital output ratio वाढत गेले ते आज ६ १ असे आहे म्हणजेच एक रुपयाचे उत्पादन करण्यासाठी सहा रुपये एवढे भाडवल लागते. ते पुरवण्यासाठी राष्ट्रीय बचत अपुरी पडल्याने ब्राझिल इ. देशाप्रमाणेच भारतास परकीय कर्ज काढावे लागले

(२) या व्यतिरिक्त आणखी काही बाबीमुळे सकटाची चाहूल लागते त्यापैकी एक म्हणजे International Development Agency (IDA) कडून मिळणारी हलकी कर्जे गोठवली जाण्याची दाट शक्यता आहे मुख्यत्वेकरून चीन पण या कर्जं काढण्याच्या प्रवासात उतरल्यामुळे

(३) एशियन डेव्हलपमेंट बँकेने भारताची दोन लक्ष कोटी डॉलरची कर्जयाचना फेटाळून लावून फक्त २०० दशलक्ष डॉलरचे कर्ज मजूर केले, ते भारताने फेटाळून लावले आहे

(४) आतरराष्ट्रीय नाणे निधीकडून पाच लक्ष कोटीपैकी काढलेले तीन पूर्णांक नऊ कोटी डॉलर कर्ज परत उपलब्ध होणार नाही याउलट द्याव्या लागणाऱ्या व्याजाची रक्कम यानतर वाढतच जाणार आहे उदाहरणार्थ, १९८३-८४ ला एकदर व्याज ९७५ कोटी रुपये व मूळ परतफेडीची रक्कम १०४५ को रु असे मिळून २०२० कोटी रुपये ही रक्कम १९८२–८३ च्या पेक्षा ३३ टक्क्यानी जास्त आहे अशा रीतीने भारताची एकूण जबाबदारी वाढत जाणारी आहे हे खालील * तक्त्यावरून समजते.

(५) १९८६–८७ नतर आखाती देशातील मदावलेल्या आर्थिक परिस्थितीमुळे परकीय चलनाचा प्रवाह मदावेल व कर्जाचा बोजा वाढल्यासारखे होईल

(६) अशा परिस्थितीत जर प्रगतीचा वेग पाच टक्केपर्यंत न्यावयाचा असेल तर आणखीन चार ते पाच दशलक्ष कोटी डॉलरचे परकीय भाडवल लागेल ते निर्यातीतून मिळणार नाही. म्हणजेच भारतास आणखी कर्ज काढावे लागेल.

(७) पण आता यापुढे भारतास व्यापारी कर्ज काढावी लागतील कारण विकास-कर्जाचा लोढा वर सागितल्याप्रमाणे कमी झाला आहे व्यापारी कर्जाचा व्याज दर जास्त आहे व त्यामुळे भारताचे एकूण कर्जाचे ओझे ( अधिक व्याज दरामुळे ) वाढणार आहे व भारतास कर्जबाजारीपणाच्या दरीला तोड द्यावे लागेल.

(८) यावरोबरच जे कर्ज घेतले गेले त्याचा बराचसा भाग ब्राझिलप्रमाणेच उत्पादन क्षमता वाढवण्याकडे गेला नाही. त्यामुळे परतफेडीच्या क्षमतेवर परिणाम होईल.

(९) या सर्वांवर वरचढ म्हणजे वाढती लोकसख्या परिस्थिती जैसे थे ठेवील, कारण वाढीव क्षमता वाढीव लोकसख्या खाऊन टाकेल

(१०) याचबरोबर ब्राझिलप्रमाणे राजकीय अस्थिरता भारतात वाढत असल्याने परिस्थिती बिकट होऊ घातली आहे.

परतु या सर्व कारणामुळे जरी भारत दरीच्या काठावर उभा असला तरी मार्ग सुधारण्यासारखा आहे. कारण भारताचे एकूण कर्ज वाढत असले तरी त्याचे राष्ट्रीय उत्पन्नाशी प्रमाण सरासरी तीन टक्क्यापेक्षा जास्त नाही व आतापर्यंतचे कर्ज भारताने सावधानतेने व काटेकोरपणे वापरले आहे व आयात पर्याय धोरणही याबाबतीत आशेचा किरण जागवीत आहे आणखी म्हणजे आतरराष्ट्रीय नाणे निधीच्या कडक कार्यक्रमाची अमलबजावणी भारताने माफक प्रमाणात केली आहे उदा. महागाईचा दर ११ टक्क्यापर्यंत मर्यादित ठेवला आहे, सुलभ तत्रज्ञान आयात पद्धती, निर्यात वाढ, यावरोबरच आणखी काही उपाय मार्ग सुकर करू शकतील. त्यापैकी काही उपाय खालीलप्रमाणे –

(१) अधिक परकीय चलन लागणाऱ्या योजनाची फेररचना.

(२) राष्ट्रीय मागणीवर कमी परिणाम करणारे आयात धोरण

(३) त्वरित उत्पन्न देणाऱ्या योजना आखणे.

(४) आयात पर्याय धोरण (Import Substitution)

(५) बहुराष्ट्रीय गुतवणूक भारतात वाढवणे.

(६) अनिवासी भारतीयाची गुतवणूक उत्तेजित करणे

(७) भारतीय बहुराष्ट्रीय कपन्याकरवी भारताचे कर्ज विकत घेणे

(८) निर्यात वाढवण्याच्या योजनाची आखणी

एकदरीत ब्राझिल व इतर राष्ट्राची दिवाळखोरी नैसर्गिक कारणाव्यतिरिक्त मानवनिर्मित आहे त्यासाठी योग्य व सावध मानवनिर्मित उपायाचा अवलब जरूर आहे ◻

| * वर्ष | मूळ कर्ज को. रु | व्याज को. रु. | एकूण जबाबदारी को. रु. |
|---|---|---|---|
| १९८५–८६ | १,४८३ | १,४०५ | २,८८३ |
| १९८६–८७ | १,९८७ | १,४६९ | ३,४५६ |
| १९८७–८८ | २,३५५ | १,४८३ | ३,८३८ |
| १९८८–८९ | २,५९६ | १,४४९ | ४,०४५ |

# ज्या लोकशाहीने आम्हाला राजीव मिळवून दिला....

## भाऊ पाध्ये

काही सुचत का ? – एका मित्राचा राजकारणाच्या सदर्भात सवाल.

–' नाही '

–मग हल्ली करता काय ?

–राजीववर भरवसा ठेऊन गप्प बसलो आहे.

¤

हा मानसिक विकलता आहे का बौद्धिक चलाखी ?

माझ्याजवळ उत्तर नाही. तस म्हटल तर आपल्याला ज्या गोष्टी अनिष्ट वाटतात किंवा भविष्यकाळामध्ये एखाद्या अगावर फुटणाऱ्या भीतिदायक रोगाप्रमाणे फुटतील या भीतीने चिताग्रस्त करतात, त्याच्याविषयी आज म्हणावे तर आपण काय करू शकतो ? वसईतला शेतकरी बिल्डर्सना जागा विकत सुटलाय किंवा पोलिसामध्ये भरती करताना आता हिंदू पोलिस, मुसलमान पोलिस अशी भरती केली जाते, इथपासून, तर भारतीय क्रिकेट सघामध्ये शिवलाल यादव, राजू कुलकर्णी आणि सदानद विश्वनाथ याना समाविष्ट केले जात नाही इथपर्यंत, प्रत्येक गोष्ट तशी मला अस्वस्थ करणारी आहे. पण मग लक्षात येत की या गोष्टीमुळे माझ काय बिघडत ? मला येऊन भिडेल, स्पर्श करून जी गोष्ट माझ्या अस्तित्वालाच धोका निर्माण करू शकेल अशी कुठली गोष्ट आहे कुठलीच नाही ! भारताचा क्रिकेटमध्ये पराजय झाला, बिल्डर्सनी आणखी काही इमारती बाधल्या, किंवा जातीय दगलीमध्ये हिंदूच्या मोहोल्यात हिंदू – मुसलमानाच्या मोहोल्यात मुसलमान पोलीस गस्त घालू लागले तरी त्यात माझे काय बिघडणार आहे ? आपण कित्येक वर्षं तगादा लावल्याप्रमाणे जातीय ऐक्याच्या पाठीमागे लागतोय–!, पण कुठे घडून आले जातीय ऐक्य ?

¤

भांडे निर्वात राहू शकत नाही तसेच काही तरी मेंदूचे असावे मेंदूमध्ये विचार घुसतातच !

' बेकेट ' नाटकातील हेन्री राजा एकदा आपल्या हस्तकाना सवाल करतो. मित्रानो, तुम्ही कधी विचार करता का ?... तस म्हटल तर मला अस कोणी विचारल तर मी म्हणेन– आता मी विचार करायच सोडूनच दिल आहे ! आपण आपले इमानदारीतच जबाब देतो आपल्याला अलीकडे प्रश्न कसे निर्माण होतात तेच समजत नाही उदाहरणार्थ काही वर्षांपूर्वी आम्ही सहलीसाठी उत्तरेला गेलो होतो. एका हिंदूच्या धर्मस्थानाला आम्ही भेट दिली असता, त्या धर्मस्थानाजवळ धाबा होता. सरदारजीचा. त्यानी आम्हाला आग्रह करकरून बोलावले आणि प्रेमाने खाऊ–पिऊ घातले ही माणस आज आपली जाती दुष्मन झाली ! – हे मनाला पटावे कसे ? देशाच, समाजाच हित व्हाव म्हटल म्हणजे आपल्या माणसावर विश्वास हवा. मी गढवाल जिल्ह्यातून फिरत असताना, माझ्याबरोबर एक सरदारजी होता. तो म्हणाला, ' इथले हिंदू लोक दारू पिऊन बायकाना मारतात आणि आयुष्य आळसात घालवतात आम्हा सरदारजीच्या ताब्यात हा जिल्हा असता तर आम्ही या जिल्ह्याच सोन बनवल असतं.' मी त्याला म्हणालो– ' काय करणार ? मी या देशात कोणी नाही एरव्ही मी तुम्हाला हा जिल्हा दिला असता ! ' पण कल्पना करा की माझी ही इच्छा पूर्ण करण्यासारखी परिस्थिती असती तर– बहुगुणा गरजले असते– गढवाल जिल्हा गढवालीचा ! सरदारजीनी काय म्हणून त्याचा विकास करावा ! एकूण गढवाल आळशी आणि व्यसनाधीन लोकानी अविकसित ठेवला तरी चालेल परतु सरदारजी विकास करू गेल्यास त्याचा विकास कुणालाही खपणार नाही उलट तो राजकारण करण्यासाठी एक उत्तम प्रश्न होईल राजकारण्याना

राजकारणी मडळी सध्या राजकारण करण्यासाठी हल्ली विषयच शोधताहेत असे दिसते केरळमध्ये ' झोर्बा धी ग्रीक ' सारख्या दर्जेदार कलाकृतीमुळे कझाटकीसचे नाव सर्वमुखी झाले नाही तर तेथल्या धर्मवेड्या ख्रिस्त्याच्यामुळे झाले. ' इन्साफ की आवाज ' मधल्या माखनचोर कृष्णाच्या प्रदर्शनावरही विश्वहिंदु परिषदेने मोर्चा आणला. वर्षानुवर्ष गौळणीचा माल चाखणाऱ्या तमाशावद्दल कुणी आक्षेप घेतला नाही. पण आता राजकारण्याना विषय कमी पडले आहेत आणि निरनिराळ्या सस्थाच्या पडद्याआड राहून राजकारणाची कडू भागवणाऱ्याना, काही तरी शोधून काढून आपल्या कर्तृत्वाचा टिऱ्या बडवायचा आहे. तसं काही कुणाच राजकारण चालेल अस वाटत नाही जोपर्यन्त राजीव आहे, तोपर्यंत, त्याला जॉर्ज फर्नांडिस निष्क्रिय म्हणू दे, किंवा आणखी कोणी काही म्हणू दे, –राजकारण तोच करील ! जॉर्ज फर्नांडिसवर भरवसा कोण ठेवील ?

¤

### इंग्लिश, इंग्लिश

गोव्यामध्ये कोकणीवाद्यानी जाळपोळ, खूनखराबा चालवला आहे, पूर्वी एखाद्या देवस्थानावरून मिरवणूक नेल्याच्या निमित्ताने दगा पेटायचा. तशीच काहीशी ही परिस्थिती.

चंद्याचे वडील म्हणाले–ही भाषिक राज्ये निर्माण केली हीच मोठी चूक झाली.

भाषिक राज्याची रचना करण्याचे आश्वासन कॉंग्रेस पक्षाने स्वातत्र्यप्राप्तीपूर्वीच दिले होते. ती त्यानी आश्वासनपूर्ती केली! .. ही कशी काय चूक ठरते ?

सयुक्त महाराष्ट्राची मागणी स्वातत्र्या-

पूर्वीची आहे. बॅ. रामराव देशमुखांच्या अध्यक्षतेखाली शिवाजीपार्कच्या मैदानावर संयुक्त महाराष्ट्राची मागणी करण्यासाठी जे अधिवेशन भरले होते, त्या अधिवेशनाच्या व्यासपीठावर चक्क महात्मा गांधींचेच भाषिक राज्याच्या निर्मितीला पाठिंबा देणारे उद्गार ठळक अक्षरामध्ये प्रदर्शित केले होते. महात्मा गांधींचे ते उद्गार चूक होते ?

एकदा भाषिक राज्ये करायची नाहीत असे म्हटले की मग दुसरा एकच मार्ग उरतो. इंग्रजी भाषेचा ! इंग्रजी भाषा या देशातील जनतेला समजो न समजो, परंतु आपल्याला त्याच भाषेतून सर्व व्यवहार करावे लागणार !

इंग्रजी भाषा ही इंग्रजाबरोबर जाणार–हे आपल्या देशामध्ये लोकांना फारसे आवडले नसावे. स्वातंत्र्यलढ्याच्या काळात मी एकदा पट्टाभी सितारामैया असे नाव असलेल्या पुढाऱ्यांच्या भाषणाला गेलो होतो. तो भाषणाला उभा राहिला नि त्याने 'बहिनो और भाईयो' वगैरे सुरुवात केली. त्या सभेत एकच हलकल्लोळ आला इंग्लिश...इंग्लिश'. स्वातंत्र्य प्राप्त आले. काँग्रेस पक्षाने आपल्या आश्वासनपूर्तीसाठी भाषिक राज्ये बनवली नि इंग्लिशवाल्यांच्या सोईसाठी इंग्रजी भाषाही ठेवली. इंग्लंड–अमेरिकेला जाऊन शिक्षण घेणाऱ्यांची सोय नाहीतरी व्हायला हवीच होती. अशा रीतीने त्रिभाषिक–सूत्र या देशामध्ये जन्माला आले.

असो, सद्य:स्थितीत तरी चंद्याच्या वडिलांचे ते भाषावार प्रांतरचनेसंबंधीचे विचार मला मंजूर करण्यासारखी परिस्थिती निर्माण झाली. भाषावार प्रांतरचना रद्द करावी किंवा एकूण ती झालीच नसती तर काय झाले असते ? कायदेमंडळात, महापालिकेत, जिकडे तिकडे ऐटबाज इंग्रजी भाषणे करून गुंगवणारे पुढारी जन्माला आले असते. भाषा आपली नाही, पण आमचे प्रेम इंग्रजीवरच आहे. दुसऱ्याच्या बायकोवर प्रेम करण्यासारखीच आपली ही तऱ्हा आहे. दुसऱ्याच्या बायकोवर प्रेम करणे हे पाप आहे, असे समजत असूनही तिच्यावर लाईन मारण्याची खोड जाऊ नये, तसेच मला वाटते की या देशातला माणूस आपल्या भाषा, आपली संस्कृती किंवा आपले भवितव्य याचा विचार न करताही इंग्रजीवर प्रेम करण्याचे पाप करतच राहील. इंग्रजी भाषेतून राज्यकारभार म्हणजे राजीवला वरे! ...

एरव्ही राजीव आज त्रिभाषिक सूत्र वगैरे असतानाही 'आरामसे' आपले शासन आणि आपला पक्ष सांभाळतो आहे– मग इंग्रजी भाषा जिकडे तिकडे झाली म्हणजे काय– ? त्याला या देशातली कुठचीच बाब हाताळण्यास मुष्किल वाटणार नाही.

मला वाटतं की ह्या भाषेच्या प्रश्नाचा विचार इथेच थांबवावा. राजीव इज धी बेस्ट मॅन टू हॅंडल इट ! ... म्हणजे पहा ना, की त्याची भेट घेण्यासाठी गोव्याचे मंत्री दिल्लीला गेले होते, पण त्यांना राजीवने भेट दिली नाही ! ... म्हणजे वाटतं की राजीव आपल्या मनासारखंच करतो आहे. तसं खूनखराबा, जाळपोळ सर्व जगभरच आहे. फक्त गोव्यातील लोकांनी ती केली याचंच आश्चर्य वाटतं ! आणि असं वाटतं की भाषेचा हा प्रश्न कायमचा गाडून टाकावा ! ... आपण कशाला विचार करावा या गोष्टीवर ! आपण कोकणी भाषिक नाही की गोमंतकीय मराठी भाषिक नाही. राजीव ही गोष्ट पाहीलंच ना !

¤

रेमकुऱ्यांच्या शैलाला नवऱ्याने मारहाण करून रक्तबंबाळ स्थितीमध्ये माहेरी पाठवले. तिला पाहताच माझे रक्त सळसळले. शैलाला मारहाण करण्याचे कारण– रेमकुऱ्यांनी जावयाला अद्याप कलर टीव्ही घेतला नाही, हे.

मी बडवू शैलाच्या नवऱ्याला ?

तुम्ही गप्प बसा हो. मारामाऱ्या करून कधी हे प्रश्न सुटतात का ?

रेमकुऱ्यांना जावयाला कलर टीव्ही घेऊन द्यायचा नव्हता नि त्याला सरळही करायचं नव्हतं– ते आपले त्याच्याकडे जाऊन वायदे करत असत. आणि तिला सासरी पाठवून देत असत. मात्र वायदा पाळत नसत. ते म्हणत तिच्या पाठीवर मंगल माझ्या पदरात आहे. आता तिचंच एकटीचं करू की मंगलची पुढची तयारी करू !

म्हणजे ते शैलाच्या नवऱ्याचा वायदा पूर्ण करणार नाहीत. आणि शैला पुन्हा नवऱ्याच्या हातचा मार खाणार ! रेमकुरे परिस्थिती गुंतागुंतीची करत होते. मी रेमकुऱ्यांना म्हणालो– यातून काही मार्ग काढा ना ! ... तोच तोच काय रिपीट शो !

यावेळी नवऱ्याने शैलाला जाळण्याची धमकीच दिली– माहेरी पाठवताना.

शैला साफ टरकली होती. ती काही सासरी परत जायला तयार नव्हती. अर्थात रेमकुऱ्यांना, तिची सासरच्या मंडळींनी काहीही वासलात लावली तरी चालली असती. ते एकदा म्हणालेच 'जाळा लेको, माझ्या पोरीला ?– काही अंगाशी आलं तर ते तुमच्याच येईल !' शिवाय त्यांच्या मुलीचं नाव, फोटो, रेमकुऱ्यांचं स्टेटमेंट हेमुद्धा दै. लोकसत्तेसारख्या कनवाळू पेपरमध्ये छापून येईल ! रेमकुरे म्हणजे मढ्यावरचं लोणी खाणारा माणूस आहे. जावई परवडला !

माणसाला स्वस्थ बसवत नाही अशा वेळेला. एखादा हुंड्यासाठी लालचावलेला माणूस, बायकोला जाळायला निघाला म्हणजे तो बायकोला पेटवूनच देतो. मला शैलाबद्दल फारच कळवळून आले. रेमकुऱ्यांना आणखी



बोलणे शक्य नव्हते ते म्हणाले, 'तुम्हाला शैलाविषयी काही वाटत असेल तर करा!' मग मी सौ रेमकुऱ्याना म्हणालो, 'वहिनी, तुम्ही मुलीच्या आई आहात मुलीच बर–वाईट झाल तर?' सौ. रेमकुऱ्याच्या डोळयात पाणी 'बाबारे, तुझ्या हातून तिच्या नवऱ्याला टिकाणावर आणता आल तर बघ.' त्याचे व्याकूळ उद्‌गार मी म्हणालो 'मी महिला दक्षता समितीकडे जाणार आहे. प्रमिला दडवते, मृणाल गोरे वगैरे पुढारणीच्या कानावर ही गोष्ट घालीन. तुम्ही मोर्चाला तयार असायला हव' 'अरे कशाला मी मोर्चामध्ये येऊ? माझ काय काम आहे?' सौ. रेमकुऱ्याचे, प्रत्यक्ष आईच काय काम होत?...

मग काय माझ होत ?

*पण शैलावर ओढवणारा प्रसग अखेर* आज महिलाच्यावर होणाऱ्या अत्याचाराचाच एक भाग नाही का? त्या म्हणाल्या, राजीवला या प्रश्नाविषयी फार कळकळ आहे आम्ही जी प्रकरण त्याच्यावर घातली त्यामुळे त्याच्या डोळयात पाणी आल. वगैरे

एकूण शैलाच प्रकरणही लिहून राजीवला कळवणे हाच मला मार्ग खात्रीचा सुकर वाटतो राजीवही पत्राना उत्तर पाठवतो म्हणे!' शैलाला तिच्या नवऱ्याने भस्मसात करेपर्यंत राजीवला माझे पत्र पोहोचो! आणि त्यामुळे काही चक्रे हालली तर नशीब शैलाचे.

*खर तर शैला ही माझ्या शेजाऱ्याची* मुलगी. यापुढे तिचा नि माझा काय सबध? राजीवची ती निदान मतदार आहे! राजीवने काही तरी करून तिला नवऱ्याच्या तावडीतून सोडवावे! निदान त्यामुळे त्याच्या पार्टीला तिचे मत तरी मिळेल!

## लोकसंख्यावाढ

'टेस्ट ट्यूब बेबी'च्या प्रयोगाना अधिक वाव हवा!' एका शास्त्रज्ञाची मागणी.

ही सूचना मला भयावह वाटते.

यासबधी एका डॉक्टरशी वाद घालताना त्याने टेस्टट्यूब बेबीमुळे होणारे फायदे विशद करून सागितले उदाहरणार्थ, प्रत्येक स्त्रीला मातृत्वाची भावना असते तिला स्वत.चे मूल हवे असते. टेस्ट-ट्यूब बेबीमुळे त्यांची मुले होण्याची इच्छा पूर्ण करता येईल.

एकूण आपल्या देशाच्याही जननसख्येत वाढ होईलच!

डॉक्टराच्या मते प्रत्येकाचा घर, अन्नवस्त्र शिक्षण याप्रमाणे अपत्यप्राप्ती हा देखील मूलभूतच अधिकार गणला जावा (घटनाकारानी याची नोद घ्यायला हवी होती!)

पण, मग, टेस्ट ट्यूब बेबीना वाव आणि कुटुबनियोजन याचा मेळ कसा बसवावा? कुटुबनियोजन 'हम दो हमारे दो' अशी घोषणा करते, पुढे या दोनचे चार होतात. चारचे आठ होतात. लोकसख्या वाढतच राहाते...

तसे नसबदीचे वगैरे आकडे गावस्करच्या धावाच्या विक्रमाला लाजवतील असेच वाटतात. पण मग लोकसख्येला काही आळा बसल्याचे दृष्टोत्पत्तीस येते का?

चड्ढाचे वडिल म्हणतात– 'लोकसख्या नुसती शहरात वाढते हे झूट आहे. लोकसख्येची वाढ खेडयापाडयातही होतेच आहे. शहरात येणाऱ्या माणसाच्या लोढयाइतकीच खेडयामध्येही लोकाची तेव्हढीच गर्दी शिल्लक राहाते. अत्यत विषण्ण करणारे हे निरीक्षण होय.

या देशातील लोकसख्येला खरोखर आळा कसा घालायचा! शास्त्रज्ञाना नवीन बेबी निर्माण करण्याचे प्रयोग करायचे आहेत, काही धर्मांना कुटुबनियोजन मान्य नाही. मदर तेरेसा, दीन दुबळयाचे अश्रू पुसताना, *त्याचा अश्रुपात वाढवण्यास कारणीभूत* होणाऱ्या प्रजननाला आळा घालण्यास विरोध करतातच!

आपला औद्योगिक विकास चागला होतो आहे म्हणतात. एकटा पजाब एव्हढया अशांत परिस्थितीमध्येही विक्रमी गहू-तादुळाचे उत्पादन करत आहे. पण म्हणे हे विकासाचे फायदे वाढत्या लोकसख्येमुळे आपल्याला दिसत नाहीत. आपले राष्ट्रीय उत्पन्न वाढूनही माणसाच्या रहाणीमानाचा दर्जा वाढत नाही तोड जास्त झाली आहेत. म्हणजे भीक मागावी लागते. या देशामध्ये लोकशाही पद्धतीने एक गोष्ट होणे शभर टक्के अशक्य आहे. ती म्हणजे कुटुंब नियोजन! तुम्ही शालेय शिक्षण सक्तीचे केले आहे ना. मग कुटुबनियोजन का नाही सक्तीने करत?... कुटुब नियोजन सक्तीचे झाले की त्याचे राजकारण होणारच! आणीबाणीच्या काळात काय घडले हे आपण पाहिलेच! आणीबाणीमुळे जर कुणाचा बळी पडला असेल तर कुटुब नियोजनाचा. आता करणार आहे कुटुबनियोजन?

टेस्ट–ट्यूब बेबीवाल्या शास्त्रज्ञानाही इथे टेस्ट ट्यूब बेबी काढण्याचे स्वातत्र्य आहे– मौला–मौलवी-पाद्री यानाही कुटुब-नियोजन नको आहे. थोडक्यात हा लोकसख्येच्या प्रश्नाचा राक्षस वाढतच रहाणार आणि त्याच्या मुसक्या कोणीही बाधणार नाही!

आपण तरी काय करणार? राजीवकडे पाहाणार! त्यानेच करावा या गोष्टीचा विचार, नाही का!

¤

'सफरचदं बाजारामध्ये बरीच आली आहेत!' मी सतीशबरोबर स्टेशनच्या आसपास हारीने बसलेल्या सफरचदवाल्याकडे पाहून म्हणालो

सतीश म्हणाला- 'ही काश्मीरहून येणारी सफरचदे एक दिवस काश्मीरच्या नदनवनाला उजाड बनवणार आहेत हे तुला ठाऊक आहे का?'

'*कशी काय?' मी वृक्षप्रेमी सतीशला* सवाल विचारला

'तू पर्यावरणावर जे भाषण सेट्रल लायब्ररीत झाले त्याला आला नव्हतास का? त्या भाषणात आम्हाला ही माहिती समजली. ही जी झाडाची कापणी सफरचदाचे पेटारे *बनवण्यासाठी होते, तिचे प्रमाण* इतके वाढले आहे की हा वृक्ष एक दिवस काश्मीरमध्ये पाहाण्यास मिळणार नाही!

भयकर अस्वस्थ करणारी माहिती. या देशात वृक्षतोडीपासून बचावलेले एक राज्य म्हणून आपण काश्मीरकडे पाहातो. तो काश्मीरच उद्या उघडा–बोडका दिसू लागेल. माझे मन चरकते.

## दुष्काळ, दुष्काळ

वृक्ष नाही म्हणजे पाऊस नाही पाऊस नाही म्हणजे दुष्काळ. दुष्काळाची व्याप्ती दिवसेंदिवस वाढतेच आहे! मराठवाडा, मध्यप्रदेशमधील ४० जिल्हे, राजस्थान, बिहार, उत्तरप्रदेश. मध्यप्रदेशमध्ये फिरताना तेथील मडळीनी म्हटल, इथली जमीन इतकी सुपीक आहे की शेतकऱ्याने फक्त बियाण टाकायचं आणि मग कापणीला शेतावर

जायचं, त्या मध्यप्रदेशमध्ये ४० जिल्ह्यामधून दुष्काळाची बातमी कानावर येताच, म्हणा-वस वाटल...आता आणखी काय राह्यलंय?

कॉलेजमध्ये भारताच्या अर्थशास्त्राचा अभ्यास करताना मला प्राध्यापक राम जोशी यानीच शिकवलं होतं. भारताची शेती हा पर्जन्याचा जुगार आहे, त्यावेळी देशाला स्वातत्र्य मिळालं नव्हत आणि प्राध्यापक राम जोशी त्या उप्पर आम्हाला सागायला मोकळे होते की स्वातत्र्य मिळाल्यानतर ही परिस्थिती पालटावी लागेल वृक्षारोपणाच्या योजना हाती घ्याव्या लागतील.

म्हणजे खेरवाडीमध्ये नगरपालिकेने झाडे लावून जाळ्या वगैरे बसवल्या. काही दिवसातच काही उनाड मुलानी त्या जाळ्या उघडल्या आणि झाडे उपटून टाकली हे सर्व दृश्य मी हळवे होऊन पहात होतो मला वाटत, वृक्षतोडीबद्दल हळवे होऊन उपयोग नाही सर्व देशच खेरवाडीतल्या उनाड मुलाच्यासारखा वागतोय. पर्यावरण हा काही महत्वाचा विषय नाही, दुष्काळ तर नाहीच नाही दुष्काळ झाला म्हणजे काय करायचे ठरलेलेच असते. सिने-नाटकाचे करमणुकीचे कार्यक्रम, क्रिकेटर्सचे सामने व निधी गोळा करणे. निधी गोळा केल्याने पुढारी जन्माला येतो, हे मी फार पूर्वीपासून पाहात आलो १९४५ साली वगैरे, बगाल-मध्ये जो दुष्काळ पडला, त्यावेळीही निधी गोळा करण्यात आला व निधी जमा कर-णारे पुढारी आले आणि कलकत्त्याच्या फूटपाथवर भुकेकगाल लोकानी आपले दम तोडले. अर्थात, अशा रीतीने मेल्याबद्दल या देशामध्ये कुणाला काही वाटत अस नाही. दरवर्षी उन्हाळ्यात चार-पाचशे, थडीत थडीमुळे-चार-पाचशे माणसे मरतात बहु-तेक अर्थशास्त्रज्ञाच हे मत असाव की माल्थ-सची थियरी अशा रीतीने मरणाऱ्याच्या बाबतीत लागू पडते-आणि ते योग्यच. 'हो लोक दरवर्षीच मरतात!' एक अर्थशास्त्रज्ञ मला म्हणाला होता या बाबतीत हळवं होऊन चालणार नाही. देशाच्या विकासाचा जेव्हा असा टप्पा येईल ..'

देशाच्या विकासाचा तो नक्की टप्पा येईल की तोपर्यंत वृक्षतोडीसारखे प्रकार आपला अतिम टप्पा गाठतील!

झाडे तोडू नका – नवीन लावा अशी सागणारी पोस्टरे पहायला मिळतात. आपल्या बेकार तरुणानी का हे काम हाती घेऊ नये? – तिथे चीनमध्ये म्हणे माशा मारण्याची मोहीम आखण्यात आली होती.

आता कम्युनिस्ट माशा मारतात म्हणजे जणू काही माणसच मारतात अशा रीतीने चिरडीला येऊन तुम्हाला विद्वान सागतील– या भाकडकथा आहेत!

थोडक्यात आपल्याकडचे विद्वान असेच म्हणतील – 'तुम्ही काही करू नका!' आणि वर कम्युनिस्ट देशाचे उदाहरण देऊ नका!

थोडक्यात झाडे अशीच तोडू द्यावीत?

राजीव सरकारने त्या झाडे वाचवण्या-साठी प्राणाची बाजी लावणाऱ्या सुदरलाल बहुगुणा वगैरे चिपको मडळीचा गौरव केला आहे. म्हणजे राजीवला या प्रॉब्लेमची जाणीव आहेच समजा विद्वानानी वृक्षतोडी-सबधात काय करावे काय नाही याची काथ्याकूट केली तरी आपल्या हिशेबात परिस्थितीत काय फरक पडतो! – राजीवच जे काही करेल ते अखेर आपण मजूर करून घेणार आहोत की नाही!

¤

इदिरा गाधींची हत्या झाली त्यावेळी आपण अक्षरश. हादरलो होतो, अमान्य कशाला करा. तसे आपण गाधी-हत्येनंतर हादरलो नव्हतो, पडित जवाहरलाल नेहरू याच्या निधनानंतरही हादरलो नव्हतो. आपल्या डोक्यावर या देशाच्या भवितव्याची चिंता का बसली आहे कुणास ठाऊक; पण इदिराजी गेल्या नी वाटल – सगळीकडे अधकार पसरला आहे. आपल्या देशात राजकीय अधकाराची आपल्याला फारशी सवय नसावी – कुणास ठाऊक?

म्हणजे एखाद्या राष्ट्रामध्ये वर्षानुवर्ष रक्तपात होतो, लढाया होतात, खूनखराबा होतो. पण आपल्याकडे होत नाही मला आठवत आपले एक मान्यवर नेते स्व. बॅ. नाथ पै, पं. नेहरू गेल्यावर म्हणाले होते, 'पहा, प नेहरू होते म्हणून आपल्या देशात खूनखराबा, क्रांती वगैरे काही झाल नाही. जगात असल्या गोष्टी सर्वत्र झाल्या!' आपल्या देशात लोकशाही सरकार, लोकांना सर्व प्रकारचे स्वातत्र्य घटनेने बहाल केले असूनही, कोणी असा प्रयत्न केला नाही की, आपल्या सगळ्या पुढाऱ्याना गोळ्या घातल्या नि आपण देशाचे शहानशहा झाल्याची ग्वाही फिरवली.

लोकशाहीमुळे, आपल्याला देशाचे नेते यूही मिळत गेले. पडित नेहरूनंतर इदिराजी, इदिराजीनतर राजीव मला आठवतं कॉलेज-मध्ये असताना आपले एक विचारवत प्राध्यापक गाधी-हत्येनतर भाषण करत होते ते म्हणाले, 'गाधीची परिस्थिती एखाद्या ज्वालामुखीच्या तोंडावर बसलेल्या झाकणासारखी होती' गाधीनतर या भारत नामक ज्वालामुखीच्या तोंडावर प जवाहर-लाल हे त्याचे सद्शिष्य बसले. त्याच्या निधनानतर इदिराजी बसल्या, त्याच्यानतर राजीव. लोकशाहीमुळे आपल्याला ज्वाला-मुखीच्या पोटात उकळत असलेल्या लाव्हा-सारख्या पदार्थांचा सामना करण्याची वेळ येत नाही – कारण आपण परस्पर मत-दानाचा योग साधून ते काम राजीव वगैरेंवर सोपविलेले असत आपल्याला पजाब-समस्या, आसाम-समस्या, गुरखा लॅंडचा प्रश्न, कोकणी-मराठी वाद, दुष्काळ, थडीत होणाऱ्या मृताची सख्या अशा समस्याचे प्रज्वलित लोळ या मुखातून फेसाळून बाहेर ओसडताना दिसतात, त्यामुळे आपण अस्वस्थ होतो, चिताग्रस्त होतो. कुणीतरी त्या आगीवर पाणी ओतून तो शात करावे असा कल्लोळ करतो. खरं म्हटलं आपण ज्याला मत दिलेले असते, त्याचे या आगीकडे पाहाणे हे कामच असते आणि तो त्या ज्वालामुखीच्या तोंडावर बसल्यामुळे पहिली धग त्यालाच सोसावी लागणार असते!

एकूण आता या देशाच्या ज्वालामुखीच्या पोटात चागलेच गडगडू लागले आहे. म्हणजे प्रथमच लोकाना हा ज्वालामुखीच्या तोंडावर बसलेला राजीव आतील स्फोटक पदार्थांना रोखून धरू शकेल काय याचीही चिंता वाटू लागणेही स्वाभाविक आहे. या ज्वाला-मुखीच्या पोटामध्ये समस्याच समस्या चागल्या धगधगताहेत. काही विचारवत मंडळी एखादे वेळेला मजूर करतात की, हे आपल्या देशातले जुनेच रोग असून आपल्या धुरीणानी चिघळू दिले आहेत? कोण हे देशाचे धुरीण? त्याचा नामोल्लेख या विद्व-

नांनी का केला नाही? या देशामध्ये घटनाकारांनी माणसाला विचारस्वातंत्र्य, उच्चारस्वातंत्र्य असे बहुमोल मूलभूत हक्क दिले आहेत, त्याचा इस्तेमाल करून हे विद्वान कुणाकडून ह्या रोगांकडे दुर्लक्ष केले गेले ते तरी सर्वांना का सांगत नाहीत? पण ही मंडळी उघड बोलत नाहीत. म्हणजे साक्षात बहुमोल हक्कांना डावलतात किंवा स्वतःच पडण्याची शक्यता असण्याची त्यांना भीती वाटते. विद्वान मंडळीही बोलताना 'सेफ पोझिशन' घेऊन वगैरे बोलत नाहीत काय?

'पंजाब या देशामधून फुटेल का?'... या प्रश्नाचे उत्तर असे दिले जाते. 'राजीव तो फुटून देणार नाही!'

फाळणीपूर्वी आम्ही ज्येष्ठांना सवाल विचारत असू, 'पाकिस्तान होणार काय?' ते जबाब देत– 'बापूजींनी स्पष्टच सांगितलं नाही का, माझ्या देहाचे प्रथम तुकडे होतील मग देशाची शकले होतील!... यापुढे आणखी तुम्हाला काय हवं?' (झालं उलटंच!)

एकूण दोन गांधींच्या दरम्यान संबंध देशकाळ वर्तमान जिथल्या तिथेच आहेसं वाटतं.

राजनीतिज्ञ म्हणतात की, प्रत्येक देशातील लोक आपल्या–आपल्याला योग्य असे सरकार सत्तेवर आणतात. आपल्याला ज्वालामुखीवर बसण्यासाठी राजीव मिळालाय! आणि आपण निवडणुकीत मतदानाचं पवित्र कर्तव्य पार पाडून आपापले दैनंदिन व्यवहार पार पाडण्याच्या चिंतेत गर्क असतो! या पलीकडे कुणी काही दिवाणे शहाणपणा सांगू लागले तर आपण एवढेच म्हणावे 'किसको है फुरसद, जो थामे दिवानोके हाथ.' □

# आर्थिक धोरण : नवे-जुने



**माधव**

**लो**कमताचा कौल घेऊन श्री. राजीव गांधी यांच्या नेतृत्वाखालील सरकार सत्तेवर आले त्याला नुकतीच दोन वर्षे पूर्ण झाली. या दोन वर्षांच्या कालावधीत आर्थिक आघाडीवर अनेक धोरणात्मक बदल जाहीर करण्यात आले व धोरणात्मक परिवर्तनाची ही प्रक्रिया अजूनही चालूच आहे. एकविसाव्या शतकाकडे भारताला घेऊन जाण्याची राजीव गांधी यांची घोषणा नाट्यपूर्ण तर होतीच पण या घोषणेतून भूतकालीन धोरणांचे ओझे झुगारून देऊन नवी वाट चोखाळण्याची दिशा सूचित होत असल्याने नवीन आर्थिक धोरणांकडे सर्वसामान्यपणे आशेने पहाण्यात आले. स्वातंत्र्य–प्राप्तीनंतर नियोजित मिश्र-अर्थव्यवस्था स्वीकारून सुरू झालेली जलद आर्थिक प्रगतीच्या मार्गावरील वाटचाल कालांतराने मंदावली. स्वातंत्र्योत्तर काळात शेती उत्पादनात लक्षणीय वाढ झाली असली व औद्योगिक क्षेत्र अधिक व्यापक बनले असले तरी बेकारी व दारिद्र्य निवारणाच्या क्षेत्रातील प्रगतीचे वर्णन असमाधानकारक याच शब्दात करावे लागते. या पार्श्वभूमीवर आर्थिक धोरणाची फेररचना, नवीन धोरणाच्या परिणामकारकतेविषयी वाटणाऱ्या खात्रीमुळे नव्हे तर भूतकालीन धोरणांच्या अपयशामुळे स्वागतार्ह मानली गेली यात फारसे नवल नाही.

गेल्या दोन वर्षांच्या कालावधीत सरकारने दोन अंदाजपत्रके सादर केली. परवाना पद्धत व मिरासदारी कंपन्यांबाबतचा कायदा यांत सुधारणा जाहीर केल्या. वस्त्र, इलेक्ट्रॉनिक्स, स्वयंचलित वहाने इ. उद्योगांबाबतच्या धोरणांची फेररचना केली. दिर्घकालिन वित्तीय धोरणाचा मसुदा, सार्वजनिक उपक्रमांबाबतचा अहवाल व नियंत्रित किंमतींबावत धोरण-विषयक निवेदन जाहीर करण्यात आले. कंपन्यांना थेट जनतेकडून मोठ्या प्रमाणावर भांडवल उभारणी करणे शक्य व्हावे म्हणून अनेक उपाय योजण्यात आले. आधुनिकीकरण व नव्या तंत्रज्ञानाचा वापर करणे सुलभ व्हावे या दृष्टीने आयात–निर्यात धोरणांत बदल करण्यात आले. सातव्या योजनेचा मसुदाही याच काळात जाहीर करण्यात आला. या व अशा इतर धोरणात्मक निर्णयांवरून नवीन आर्थिक धोरणाची दिशा आता स्पष्ट झाली आहे. मात्र अजूनही या धोरणांच्या परिणामावरून या धोरणाची इष्टानिष्टता ठरवणे बरेच कठीण आहे. यापैकी कित्येक धोरणात्मक बदलांचे परिणाम स्पष्टपणे समोर येण्यास अजून काही कालावधी लागेल. या स्थितीत नव्या आर्थिक धोरणाच्या इष्टानिष्टतेबाबतचा विचार करताना नव्या आर्थिक धोरणाचा वर्तमान आर्थिक समस्यांच्या संदर्भातील संभाव्य परिणामांचाच प्रामुख्याने विचार करावा लागेल.

### जुन्या धोरणाची वैशिष्टचे

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर जे आर्थिक धोरण अवलंबिण्यात आले त्याची मुख्य वैशिष्टचे




परवाना पद्धत स्वीकारण्यात आली.

पुढीलप्रमाणे माडता येतात :

(१) भाडवली साधनाची कमतरता असल्याने भाडवलाचा सामाजिकदृष्टचा योग्य वापर व्हावा म्हणून परवाना पद्धत स्वीकारण्यात आली.

(२) औद्योगिक विकासात अवजड व भाडवली वस्तूची निर्मिती करणाऱ्या उद्योगाचे महत्त्व ओळखून व अनेक कारणामुळे खाजगी क्षेत्र या उद्योगात गुतवणूक करण्याची शक्यता कमी असल्याने सार्वजनिक क्षेत्राला विशिष्ट उद्योगात प्राधान्य देण्यात आले.

(३) औद्योगिक केंद्रीकरण व विषमता यापासूनचे दुष्परिणाम टाळण्यासाठी छोटचा उद्योगाना प्रोत्साहन देण्यात आले तर मोठचा कंपन्याच्या विस्तारावर बधने टाकली गेली.

(४) परकीय चलनाचा सामान्यत. तुटवडा असल्याने परकीय चलनाचा काटकसरीने वापर व्हावा म्हणून परकीय चलनाच्या व्यवहारावर कठोर निर्बंध ठेवण्यात आले. याच कारणामुळे व स्वावलबनाच्या हेतूने आयातीस पर्यायी असणाऱ्या वस्तूचे देशातर्गत उत्पादन वाढावे म्हणून आयातीवर निर्बंध घालण्यात आले. परदेशी भाडवलाच्या उपयुक्ततेविषयी शका असल्याने त्यावर नियंत्रण घातले गेले.

(५) राष्ट्रीय उत्पन्नाची सरासरी पातळी कमी असल्याने, विकास खर्चाचा भार जास्त उत्पन्न मिळवणाऱ्यावर पडावा म्हणून प्रत्यक्ष करांची रचना प्रागतिक पद्धतीने करण्यात आली. चैनीच्या वस्तूवर अप्रत्यक्ष कराची आकारणी, याच हेतूने, जास्त प्रमाणात करण्यात आली.

## नवे आर्थिक धोरण

'जुन्या' आर्थिक धोरणाची ही वैशिष्टचे मान्य केली तर 'नव्या' आर्थिक धोरणाचे वेगळेपण स्पष्टपणे समजून घेण्यास मदत होते. नवीन आर्थिक धोरणे वरीलपैकी प्रत्येक बाबतीत परिणामाची भिन्न दिशा दर्शवतात. परवाना पद्धत शिथिल करण्यात आली, सार्वजनिक क्षेत्राची वाढ सीमित करण्याचे ठरवले, मोठचा कपन्याच्या विस्तारावरील निर्बंध शिथिल करण्यात आले, परकीय भाडवलावरील नियत्रणे कमी करण्यात आली व आयात धोरणाची फेररचना अशा पद्धतीने करण्यात आली की ज्यामुळे आयात सुलभ झाली. प्रत्यक्ष कराची फेरआखणी करताना उच्च उत्पन्न गटावरही कराचे दर तुलनात्मकरीत्या जास्त प्रमाणात कमी केले गेले, कपनी क्षेत्रावरील प्रत्यक्ष कराचा भार हलका करण्यात आला तर चैनीच्या समजल्या जाणाऱ्या वस्तूवरील अप्रत्यक्ष कर घटविण्यात आले. लघु-उद्योगाना प्रोत्साहन देण्याच्या धोरणात तेवढा बदल झालेला नाही.

वर उल्लेखिल्याप्रमाणे काही ठळक बाबीच्या सदर्भात केवळ नवीन आर्थिक धोरणाचा परिणाम 'जुन्या' आर्थिक धोरणाच्या परिणामाच्या उलट होणारे आहे म्हणून, अर्थातच नवीन आर्थिक धोरण जसे चागले ठरत नाही तसेच ते वाईटही ठरत नाही. जुनी आर्थिक धोरणे विशिष्ट परिस्थितीच्या संदर्भात आखली गेली. वास्तवतेचे सदर्भ बदलले म्हणजे आर्थिक धोरणे बदलणे शक्य आहे एवढेच नव्हे तर ते इष्टही ठरते.

थोडक्यात नवीन आर्थिक धोरणाची इष्टानिष्टता ठरवताना खालील गोष्टीचा उहापोह अपरिहार्य आहे.

स्वातत्र्योत्तर काळातील आर्थिक प्रगती असमाधानकारक असली तरी त्या स्थितीची नेमकी कारणे काय आहेत ?

वर्तमान आर्थिक समस्याच्या सदर्भात आर्थिक प्रगतीचे स्वरूप काय असावे ?

नवीन आर्थिक धोरणामुळे अर्थव्यवस्थेत काय बदल होतील व हे बदल वर्तमान आर्थिक समस्या सोडविण्याच्या दृष्टीने उपयुक्त ठरतील का ?

वरील सर्व प्रश्नाची नेमकी, सविस्तर व सर्वमान्य उत्तरे देणे शक्य नाही. (कारण, खरे तर, अशी उत्तरे उपलब्धही नाहीत.) पण या प्रश्नाच्या सदर्भात ज्या ठळक विचारधारा आहेत त्याचे थोडक्यात स्पष्टीकरण करून नव्या आर्थिक धोरणाचा अभ्यास करण्याची एक चौकट पुरवणे एवढाच मर्यादित हेतू समोर ठेवण्यात आला आहे

पण या प्रश्नाचा विचार करण्यापूर्वी नव्या आर्थिक धोरणाचे 'नावीन्य' कशात आहे याचाही विचार करावा लागेल. 'नव्या आर्थिक धोरणाचे नवीनपण' यासारखा शब्दप्रयोग करण्यात शब्दजजाळाचा भाग मात्र नाही. पतप्रधान राजीव गाधी याच्या सरकारची आर्थिक धोरणे हा या लेखाचा केंद्रबिंदू असला तरी काही बाबतीत आर्थिक धोरणाची दिशा बदलण्याची प्रक्रिया श्री. राजीव गाधी सत्तेवर येण्यापूर्वी कित्येक वर्षे अगोदरपासून सुरू झाली होती याची दखल घेऊनच राजीव गाधी याच्या सरकारच्या आर्थिक धोरणाचे नावीन्य समजावून घेतले पाहिजे. उदा आयातीवरील निर्बंध शिथिल करण्याची प्रक्रिया १९७६-७७ च्या सुमारास सुरू झालेली आढळते. मध्यतरी जनता पक्षाचे सरकार सत्तेवर आले व गेले, पण ही प्रक्रिया अखड चालू राहिली. अर्थात या धोरणाची सुरुवात झाली तेव्हा आतरराष्ट्रीय व्यापार सतुलनाची स्थिती वेगळी, व आयातीवरील निर्बंध शिथिल करण्यास अनुकूल अशी होती आता ही स्थिती विकट असतानाही आयात निर्बंध शिथिल करण्याचे धोरण चालूच आहे याची कारणे आणखीन भिन्न आहेत. परवाना पद्धत शिथिल कर-

ण्याचा प्रश्न विचारात घेतला तरी ही प्रक्रिया देखील सातत्याने चालू असलेली आढळते. परवाना पद्धतीतून सूट मिळणाऱ्या गुतवणुकीची मर्यादा १९६० साली १० लाख रु. होती ती क्रमाने १९७८ सालात ३०० लाखापर्यंत वाढवण्यात आली तर एप्रिल १९८५ मध्ये ती ५०० लाख रु करण्यात आली. मार्च १९८५ मध्ये २५ औद्योगिक क्षेत्रे परवाना मुक्त करण्यात आली. याच पद्धतीने सप्टेंबर १९८५ मध्ये २४ उद्योग-क्षेत्राना परवाना पद्धतीतून वगळण्यात आले होते. अतिरिक्त उत्पादनक्षमता प्रमाणित करण्याची योजना जानेवारी १९८६ प्रमाणेच १९८३, १९८०, १९७५ व १९६० साली जाहीर करण्यात आली करचुकवेगिरीला आळा घालण्यासाठी प्रत्यक्ष कराचे दर कमी करण्याची प्रक्रियासुद्धा १९७५-७६ साला-पासून सुरू झाली व त्यानतरच्या वर्षात ती ढोबळपणे चालू राहिली असे म्हणता येते. यावरून पतप्रधान राजीव गांधींच्या आर्थिक धोरणाचे नवेपण बदललेल्या दिशेत नाही. नवेपण ज्या वेगाने विविध धोरणे बदलली गेली. (उदा. काही वर्षांपूर्वी बड्या कपन्याच्या विस्तारावरील निर्बंध त्यानी अविकसित प्रदेशात उद्योग उभारले व विवक्षित प्रमाणात निर्यात करण्याची हमी दिली तर शिथिल करण्यात आले होते. श्री. राजीव गाधीच्या सरकारने बड्या कपन्यावरील निर्बंध ठरवणारी मालमत्तेची मर्यादा एका फटक्यात २० कोटी रु. पासून १०० कोटी रु. पर्यंत वाढवली.) त्यात व विविध धोरणाच्या एकत्रित व्यूहरचनेत आहे असे म्हणता येते यापूर्वी धोरणातील बदल विशिष्ट परिस्थितीत, सुटे-सुटे करण्यात आहे धोरणाची दिशा बदलवताना पूर्वी ती आपत्धर्म म्हणून बदलली गेली. याउलट सध्याचे धोरणात्मक बदल जाणीवपूर्वक, कालबद्धरीतीने व बदलाची अपरिहार्यताच नव्हे तर इष्टता ही पटल्यामुळे निर्माण झालेल्या अभिनिवेशातून केले जात आहेत.

नवीन आर्थिक धोरणांच्या एकत्रित व्यूह-रचनेचे स्वरूप समजण्यासाठी, नवीन धोरणे आखणाऱ्याचे वर्तमान आर्थिक स्थितीचे विश्लेषण काय आहे हे पाहायला पाहिजे. हे विवेचन थोडक्यात पुढील प्रमाणे माडता येते.

## आर्थिक धोरणाची पार्श्वभूमी

स्वातंत्र्योत्तर काळात शेतीक्षेत्राची वाढ सामान्यत समाधानकारक असली तरी औद्योगिक क्षेत्राची वाढ १९६५-६६ साला-पासून मदावली आयातीला पर्यायी ठरणाऱ्या वस्तूना सरक्षण देण्याच्या धोरणामुळे काही काळ उत्पादनवाढ झाली तरी कालातराने हा वेग मदावला परवाना पद्धतीमुळे उत्पा-दनक्षमता किफायतशीर प्रमाणावर निर्माण न होता ती छोट्या-छोट्या तुकड्यात विभागली गेली. परिणामत: उत्पादनाची किंमत जास्त राहिली आयातीला पर्याय निर्माण करण्याकडे जेवढे लक्ष दिले गेले तेवढे निर्यातीला चालना देण्याकडे दिले गेले नाही. परकीय स्पर्धेपासून सरक्षण मिळाल्याने देशी उद्योग अकार्यक्षमतेने चालत राहिले प्रत्यक्ष कराचे अवाजवी दर व उद्योगावरील विविध नियत्रणे यामुळे खाजगी उपक्रमशीलतेची गळचेपी झाली यातूनच काळ्या पैशाची समस्या निर्माण झाली. नियत्रणे व उत्पादन-क्षमतेवरील निर्बंध याचा परिणाम वस्तूच्या टंचाईत होई. अशा विक्रेत्याच्या बाजारपेठात अकार्यक्षम उद्योगानी निर्मिलेला कमदर्जाचा माल अवाजवी किंमतीना विकणे शक्य होत असे अशा उद्योगाना परदेशी उद्योगाशी स्पर्धा करून निर्यात बाजारपेठ मिळवणे अर्थातच शक्य नव्हते. तसेच चढ्या किंमती-मुळे देशी बाजारपेठेचाही आकार सकुचितच राहात आला अशा सरक्षित वातावरणात आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करणे इ. गोष्टीकडे दुर्लक्ष करता आले.

सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगाचा विचार केला तर त्याची स्थिती जास्तच असमाधान-कारक आहे असे म्हणावे लागते. नफा मिळ-वणे हे सार्वजनिक उद्योगाचे ध्येय नसले तरी ते एका किमान कार्यक्षमतेने -- विशेषत: खाजगी क्षेत्राच्या तुलनेत जास्त कार्यक्षमतेने --चालायला हवेत. प्रत्यक्षात परिस्थिती याच्या उलट दिसते. सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग अकार्यक्षमतेने, उत्पादनक्षमतेचा फार वापर न होता चालल्याने व हे उद्योग वीज, कोळसा, पोलाद व वाहतूक यासारख्या मह-त्त्वाच्या क्षेत्रातील असल्याने या उद्योगाच्या अकार्यक्षमतेचा परिणाम, त्याची अपुरी, अनियमित, कमी दर्जाची व जास्त किंमतीची उत्पादने वापरावी लागल्याने इतर उद्योगा-वरही अटळपणाने होतो सार्वजनिक उद्योग तोट्यात चालले म्हणजे गुतवणकीची सर-कारी साधने या उद्योगाना मदत करण्यासाठी वळवावी लागतात उत्पादनाच्या किंमती वाढवून, काही काळासाठी का होईना सार्व-जनिक उपक्रमाचा तोटा कमी करता येतो. अर्थात यामुळे होणाऱ्या भाववाढीचा फटका इतर उद्योगाना बसतोच, पण सार्वजनिक उपक्रमाच्या तांत्रिक व व्यवस्थापकीय कार्य-क्षमतेत सुधारणा झाल्याखेरीज किंमतवाढ हा परिणामकारक उपाय ठरू शकत नाही. थोडक्यात सार्वजनिक उद्योग अकार्यक्षमतेने व तोट्यात चालत असले म्हणजे त्याच्या अकार्यक्षमतेचे परिणाम उर्वरित उद्योगक्षेत्र व ग्राहक याना तर सहन करावे लागतातच पण असे अक्षम उद्योग सभाळताना सरकारची वित्तिय स्थिती बिकट बनते. सार्वजनिक उद्योगाची ही अवस्था अनेक कारणामुळे निर्माण होते. सार्वजनिक क्षेत्रातील व्यव-स्थापकाना स्वायत्तता नसणे, त्याच्या नेम-णुका योग्य वेळी व पुरेशा कालावधीसाठी न होणे, अवाजवी कामगार भरती इ. कारणे या सदर्भात नमूद करता येतात.

नियोजित अर्थव्यवस्थेचा एक भाग म्हणून उद्योगावर विविध नियत्रणे बसविण्यात आली या निर्बंधाची अमलबजावणी आर्थिक निकषांच्या अनुषंगाने न होता नोकरशाही पद्धतीने झाल्यामुळे या नियत्रणामुळे अपेक्षित उद्दिष्टे साध्य न होता त्यापासून अडचणीच निर्माण झाल्या. या नियत्रणामुळे विशेषत: त्याच्या अंमलबजावणीच्या पद्धतीने दप्तर-दिरंगाईसारख्या गोष्टींनी जशी हानी झाली तशीच राजकारणी / नोकरशहा याना Discriminatory सत्ता मिळाल्याने तिच्या दुरुपयोगानेही नियोजित उद्दिष्टे बाजूला पडली

नवीन आर्थिक धोरणाच्या एकत्रित व्यूह-रचनेत अनुस्यूत असणारे, भारतीय उद्योगाच्या अवरुद्ध अवस्थेचे वरील विश्लेषण मात्र अजिबात नवीन नाही. नोकरशाही नियत्रणे, अवाजवी कर, अकार्यक्षम सार्वजनिक उद्योग यामुळे खाजगी उद्योगाची वाढ होत नाही कर कमी करणे, स्पर्धेला वाव देणे, नियत्रणे रद्द करणे हीच ( खाजगी ) उद्योगांना चालना देण्याची गुरूकिल्ली आहे असे विवेचन वर्षानुवर्षे खाजगी उद्योगाचा प्राति-

निधिक सस्था ( उदा. फिकी ) ( Federation of Indian Chamber of Commerce and Industries ) करत आहेत. सरकारने या भूमिकेचा अघोषित स्वीकार करणे ही गोष्ट मात्र नाविन्यपूर्ण आहे. औद्योगिक क्षेत्राशी सबधित धोरणे आखताना सरकारची जाहिर उद्दिष्टे अर्थ-व्यवस्था स्वावलबी बनवणे, रोजगार निर्मिती, मागास प्रदेशाचा विकास असत. आता या उद्दिष्टाऐवजी औद्योगिक क्षेत्र कार्यक्षम बनवणे, देशी उद्योग परदेशी उद्योगाच्या तोडीचे बनणे यासारख्या गोष्टीना महत्त्व मिळत आहे.

भारतीय उद्योगाच्या आजारी अवस्थेचे वरील निदान मान्य केले म्हणजे नवीन आर्थिक धोरणाची इष्टता स्वयसिद्धच बनते. औद्योगिक क्षेत्राची झपाट्याने वाढ न होण्याची वरील कारणमीमासा एकागी व दिशाभूल करणारी आहे असे मानले तर मग नवीन आर्थिक धोरणाचा विचार दोन तऱ्हेने करता येईल एक तर औद्योगिक अवरुद्धतेची वरील कारणमीमासा वादापुरती मान्य केली तरी नवीन धोरणे या मीमासेत अभिप्रेत अशा योग्य प्रकारची आहेत काय ? याचा विचार आपण करू शकतो. दुसरे, औद्योगिक अवरुद्ध अवस्थेची पर्यायी कारण-मीमासा काय व तिच्या सदर्भात नवीन धोरणे औद्योगिक क्षेत्रात काय बदल घडवू शकतील या दिशेनेही आपण विचार करू.

नियत्रणे, स्पर्धेचा अभाव व अवाजवी कारभार यामुळे भारतीय उद्योग अकार्यक्षम बनले आहेत असे मानले तर नवीन धोरणा-मुळे काय बदल घडू शकतील ? या सदर्भात आपण स्पर्धा, नोकरशाही नियत्रणे व आधुनिक तत्रज्ञान या मुद्द्याचा विचार करू

भारतीय उद्योग आतरराष्ट्रीय उद्योगाच्या तोडीचे बनावेत ही अपेक्षा योग्यच म्हणावी लागेल पण स्पर्धेला चालना प्रथम देशातर्गत स्पर्धेला अधिक वाव देऊन भारतीय उद्योग अधिक बळकट व स्पर्धेत टिकाव धरू शक-तील अशा अवस्थेला पोचले म्हणजे मग त्याना आतरराष्ट्रीय स्पर्धेला तोड द्यावे लागावे अशी स्थिती निर्माण करणे अधिक योग्य ठरेल प्रत्यक्षात आयातविषयक धोरणा-तील वादळामुळे व इतर धोरणामुळे भारतीय उद्योगाना आतरराष्ट्रीय स्पर्धेस तोड द्यावे लागते. भाडवली वस्तूची निर्मिती करणाऱ्या क्षेत्रासमोर त्यामुळे गभीर स्थिती निर्माण झाली आहे. शिवाय देशी उद्योग आतर-राष्ट्रीय स्पर्धेत न टिकण्याचे कारण नेहमीच तात्रिक दर्जा वा किमत या बाबीपुरतेच मर्यादित नसते, वस्तूची खरेदी करण्यासाठी कर्जाची सोय असणे, या कर्जावरील व्याज दर व परतफेडीच्या अटी यासारखे वित्तीय स्वरूपाचे घटकही महत्त्वाचे ठरतात. शिवाय आतरराष्ट्रीय बाजारपेठेत मदीसदृश परि-स्थिती असली म्हणजे परदेशी कपन्या आपला माल बाजारपेठ मिळवण्याच्या दृष्टीने तोटा सहन करूनही विकायला तयार असतात. यापैकी कोणत्याच घटकाचा सबध वस्तूच्या दर्जाशी नाही असा सर्व घटकाचा विचार न करता भारतीय औद्योगिक क्षेत्र प्रथम आतरराष्ट्रीय स्पर्धेला खुले करून स्पर्धात्मक उद्योग निर्माण करण्याचे पाऊल देशी उद्योगाचा पाया खिळखिळा करणारे ठरेल

विविध नियत्रणे शिथिल करण्याची प्रक्रिया सुरू झाली असली तरी जी नियत्रणे राहतील ती पूर्वीप्रमाणेच नोकरशाही थाटात राबवली जाणार नाहीत यादृष्टीने खास प्रयत्न होत असल्याचे आढळत नाही. वर निर्देश केल्याप्रमाणे परवाना पद्धत सुलभ करण्याची प्रक्रिया बऱ्याच काळापासून चालू आहे व त्यातून नोकरशाही पद्धत कमी झाली आहे असे दिसत नाही. सार्वजनिक उपक्रमाची सध्याची दु स्थिती व्यवस्थापनात बाह्य हस्तक्षेपामुळे निर्माण झाली आहे. या हस्तक्षेपामुळे व्यावसायिक निर्णय अव्यावसा-यिक पातळीवर व अव्यावसायिक पद्धतीने घेतले जातात. हे जर सार्वजनिक उपक्रमाची स्थिती वाईट असल्याचे कारण असेल तर हा हस्तक्षेप का थाबत नाही ? हे तर पूर्णत सरकारच्या हाती आहे थोडक्यात, सार्व-जनिक उपक्रमाचे कामकाज सुधारण्याचा प्रश्न जेवढा तत्रशास्त्रीय आहे तेवढाच राजकीयही आहे सार्वजनिक उपक्रमाच्या असमाधानकारक कामगिरीमागे अशी व्यामिश्र कारणे असताना, सार्वजनिक उद्योग तोट्यात चालतात म्हणून ते खाजगी क्षेत्राच्या ताब्यात देणे किंवा सार्वजनिक क्षेत्राचे महत्त्व भविष्यकाळात कमी व्हावे यासारख्या उपाययोजना योग्य म्हणता येत नाहीत.

## कळीचा शब्द–आधुनिकता

आधुनिक तत्रज्ञान हा तर नवीन आर्थिक धोरणातील कळीचा शब्द आहे. आधुनिक तत्रज्ञानामुळे बाजारात नव्या वस्तू उपलब्ध होणे, वस्तूचा दर्जा सुधारणे व किमत कमी होणे इ. फायदे मिळतातच पण यामुळेच देशी व परदेशी बाजारपेठेतील मागणीही वाढू शकते. हे सर्व खरेच आहे, पण आतर-राष्ट्रीय बाजारपेठेतील वस्तू देशी बाजारात उपलब्ध होऊ देणे हा तत्रज्ञान आत्मसात करण्याचा मार्ग असत नाही सर्व गोष्टीचे स्वदेशातच शोध लावावे असा याचा अर्थ नाही परदेशी तत्रज्ञान वेळोवेळी वापरावे लागेल व हे तत्रज्ञान यत्रात अनुस्यूत अशा स्वरूपात असल्याने, त्याची आयातही करावी लागेल, पण दीर्घकालिन दृष्टिकोणातून विशिष्ट क्षेत्रातून परकीय तत्रज्ञान वापरून ते देशी तत्रज्ञानी आत्मसात करून, मर्यादित कालावधीतच त्याचा विकास करण्याचे ध्येय ठेवायला पाहिजे स्वयचलित वाहनाबाबत धोरण पाहिले तर असे आढळते की सुरुवा-तीला मोटारी, स्कूटर्स आदी वाहनाच्या निर्मितीसाठी देशी कपन्याना परदेशी तत्रज्ञान तात्रिक व वित्तीय सहकार्यासाठी मान्यता देऊन, उपलब्ध करून देण्यात आले. आता वाहनाचे सुट भाग बनवण्यासाठी परदेशी सह-कार्य असणे आवश्यक ठरले आहे. या पद्ध-तीने स्वयचलित वाहनाबाबतचे तत्रज्ञान आपण आत्मसात करून त्यात नवीन सुधा-रणा घडवून परकीय उत्पादकाशी स्पर्धा करण्याच्या तोडीचे होण्याची शक्यता जवळ जवळ नाही वाहन निर्मितीच्या सर्व अव-स्थात जर आपण परकीय कपन्याच्या ‘सह-कार्याने’ चालणार असू तर त्याच तत्र-ज्ञानाच्या जोरावर याच परकीय कपन्याशी आपण परकीय बाजारपेठेत स्पर्धा करू का ? एका वाहनक्षेत्रातच अनेक भारतीय कप-न्यानी परकीय कपन्याशी तात्रिक सहकार्याचे करार केले आहेत. या प्रकारात तेच तत्रज्ञान आपण अनेक कपन्याकडून घेतले असल्याची शक्यता आहे यामुळे स्पर्धा कदाचित वाढत असेल पण तत्रज्ञान मिळवण्याचा हा महागडा प्रकार आहे

तात्रिक प्रगतीचा आजचा वेग पाहता तत्रज्ञानाच्या शर्यतीत जे मागे आहेत त्याची स्थिती पुढे असणाऱ्यापेक्षा कमकुवत राहणार

आहे मागे असणाऱ्या देशाना विवक्षित क्षेत्र निवडून व त्या क्षेत्रात धडाक्याने संशोधन–विकास कार्यक्रम राबवून त्या क्षेत्रापुरते इतर राष्ट्राच्या बरोबरीला येण्याचा प्रयत्न करणे योग्य ठरेल. त्यासाठी विवक्षित क्षेत्रात परकीय तंत्रज्ञान वापरून ते ठराविक कालावधीत आत्मसात करून त्या तंत्राचा नव्या अंगाने विकास करायचे प्रयत्न करायला हवे सर्व क्षेत्रात आधुनिक तंत्राचा वापर करण्याचे महत्वाकांक्षी उद्दिष्ट ठेवले तर आपण सदैव परकीय देशातील ५–१० वर्षापूर्वीचे तंत्रज्ञान, आयात करण्याच्या अवस्थेत राहू. या अवस्थेत आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून परदेशी बाजारपेठ काबीज करण्याला फारसा वाव नाही कारण आपण व प्रगत तांत्रिक देश यांच्यातील तंत्रशास्त्रीय अंतर कायम राहील. ते कमी करण्यासाठी ठराविक क्षेत्रात नियोजित प्रयत्नांची आवश्यकता आहे. अशा विशेष प्रयत्नासाठी कोणती क्षेत्रे निवडायची हा निर्णयसुद्धा अतीव महत्त्वाचा आहे. नवीन आर्थिक धोरणात असा काही विचार असल्याचे दिसून येत नाही.

## रोजगाराचा बिकट प्रश्न

आधुनिक तंत्रज्ञानाच्या संदर्भातच रोजगाराचा विचार करणे आवश्यक आहे. औद्योगिक क्षेत्राला आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत महत्त्वाचे स्थान यासाठी की, एका टप्प्यावर औद्योगिक क्षेत्रात शेती व तत्सम क्षेत्रातील लोकांना रोजगार मिळतो. विकासाच्या नंतरच्या टप्प्यात रोजगार निर्मितीचे काम सेवा क्षेत्राकडे जाते. नवे तंत्रज्ञान सामान्यतः भांडवल प्रधान असल्याने आजच्या विकसित राष्ट्रात, ही राष्ट्रे विकासाच्या सुरुवातीच्या टप्प्यात असताना, जी औद्योगिक व रोजंदारी निर्माण झाली असेल त्यापेक्षा सध्या विकासाच्या सुरुवातीच्या टप्प्यावर असणाऱ्या राष्ट्रातील औद्योगिक रोजंदारी कमी असेल, भारतीय उद्योग अवरुद्ध असताना देखील भांडवलप्रधान बनत आहेत. आधुनिक तंत्राच्या वाढत्या वापरामुळे नवीन रोजगार निर्मिती आणखी मंदावेल सेवा क्षेत्रातील रोजगार निर्मितीवरही आधुनिक तंत्रज्ञानाचा परिणाम होणे अटळ आहे. विशेषतः संगणकाच्या वापरामुळे सेवा क्षेत्रातील रोजगाराच्या संधी कमी होतील. संगणकांमुळे इतर क्षेत्रातील जो रोजगार कमी होईल त्यापेक्षा जास्त किंवा निदान तेवढीच रोजगार निर्मिती संगणक उत्पादन, विक्री व सेवा याद्वारे होईल असे नाही. रोजगार निर्मितीचा प्रश्न महत्त्वाचा आहे. अर्थव्यवस्था बाजारपेठेवर आधारलेली असो वा नियोजित असो, रोजगार निर्मितीच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करता येणार नाही. इतरांबरोबर राहणे वा एकविसाव्या शतकाकडे दौड या सारख्या उद्दिष्टांसाठी रोजगार निर्मितीचा प्रश्न डावलणे योग्य नाही.


यावरून असे दिसते की भारतीय उद्योगांच्या अवरुद्ध अवस्थेची विशिष्ट कारणमीमांसा मान्य केली तरी नवीन आर्थिक धोरणाद्वारे ही अवरुद्धावस्था नाहीशी करण्याच्या संदर्भात काही प्रश्न निर्माण होतात. या प्रश्नांची उत्तरे नवीन आर्थिक धोरणाच्या व्यूहरचनेत दुर्दैवाने मिळत नाहीत.

भारतीय उद्योगाच्या अवरुद्धावस्थेचे वरील निदान मान्य नसेल तर नवीन आर्थिक धोरणामुळे खूपच व्यापक प्रश्न उभे राहतात त्याचा थोडक्यात आढावा घेणे आवश्यक आहे.

भारतीय उद्योगाच्या अवरुद्धावस्थेची पर्यायी मीमांसा असे समजते की उत्पादित वस्तूना पुरेशी मागणी नसणे हे औद्योगिक अवरुद्धतेचे एक प्रमुख कारण आहे. वस्तूंना पुरेशा प्रमाणात मागणी नसल्याने उपलब्ध उत्पादनक्षमतेचा पुरेपूर वापर होत नाही. या स्थितीत नवीन गुंतवणुकीचा वेगही मंदावतो. मागणीचा अभाव का असतो याचे कारण बहुसंख्य लोकाकडे पुरेशी क्रयशक्ती नसते हे आहे. एकंदर उत्पन्न कमी असल्याने अन्नधान्यादी गरजावर उत्पन्नाचा मोठा भाग खर्च होतो व इतर वस्तूंना मर्यादित मागणी असते. याचे ठळक उदा. म्हणजे अन्नधान्याचे असणारे साठे. अन्नधान्याची दरडोई उपलब्धता कमी असूनही अन्नधान्याचे साठे वाढतात हे लोकाकडे पुरेशी क्रयशक्ती नसल्याचेच लक्षण मानावे लागेल. संपत्ती व उत्पन्नाचे वाटप विषम असले म्हणजे सख्येने कमी असले तरी उत्पन्नाचा मोठा वाटा त्यांच्याकडेच असलेल्या श्रीमंतांच्या निवडीच्या वस्तूना मागणी असते. उलट बहुसंख्य गरिबाच्या गरजा पूर्ण झाल्या नाहीत तरी त्याची गरज बाजारपेठेत प्रतिबिंबित होत नाही. नियोजित विकासाच्या कार्यक्रमाचा परिणाम म्हणून संपत्ती व उत्पन्न याचे वाटप अधिक समान न बनल्याने मागणीचा अभाव हा घटक प्रभावी राहिला.

सार्वजनिक क्षेत्रातील गुंतवणुकीचा दर हा वस्तूंच्या एकूण मागणीवर परिणाम करणारा महत्त्वाचा घटक आहे. १९६५–६६ नंतरच्या काळात सार्वजनिक क्षेत्रातील गुंतवणुकीचा दर मंदावल्याने वस्तूंच्या मागणीवर परिणाम झाला.

उद्योगक्षेत्रांच्या कार्यक्षमतेवर वीज, कोळसा, टचाई, वाहतूक व्यवस्थेतील गोंधळ यांचा विपरीत परिणाम झाला आहे. शिवाय सरकारची आर्थिक नियंत्रणे नोकरशाही पद्धतीने राबवल्याने झालेले दुष्परिणाम खरेच आहेत व या दोन्ही घटकांचा औद्योगिक क्षेत्राच्या अवरुद्धावस्थेत वाटाही आहे. या दोन आघाड्यांवर सुधारणा घडवल्या तर त्यांचे उर्वरित औद्योगिक क्षेत्रावर चांगले परिणाम होतील याबाबतही वाद नाही. पण औद्योगिक अवरुद्धावस्थेच्या मागणीचा अभाव



उत्पादित वस्तूंना पुरेशी मागणी नाही.

हे एकमेव नसले तरी एक प्रमुख कारण आहे तोवर उत्पादनावरील कथित नियत्रणे शिथिल करून, रद्द करून एकूण औद्योगिक उत्पादन वा गुतवणूक वाढण्याची शक्यता नाही. अशी नियत्रणे हटवल्यामुळे फार तर ज्या वस्तूना मागणी आहे अशा विशेषत: श्रीमत आणि उच्च मध्यमवर्गीयाच्या निवडीच्या वस्तूचे उत्पादन काही काळ वाढेल. पण या पद्धतीने औद्योगिक विकास फार काळ चालू रहाणार नाही कारण थोडयाच काळात ही मागणी पूर्ण होईल, नव्या तत्रज्ञानामुळे रोजगार निर्मिती कमी होणार असल्याने मागणीच्या अभावाची स्थिती बिकटच बनते.

## उत्पादनवाढीच्या मर्यादा

नवीन आर्थिक धोरणाचा परिणाम नेमका याच पद्धतीने होत आहे. श्रीमंत वर्गांकडून मागणी असलेल्या वस्तूच्या उत्पादनाला चालना मिळत आहे. स्वयचलित वाहने, इलेक्ट्रॉनिक उपकरणे इ. चे उत्पन्न मागील काही वर्षांत वाढले. पण श्रीमत वर्गाकडील मागणीही मर्यादित असल्याने या मार्गाने उत्पादनवाढीची शक्यता मर्यादित असेल. दूरदर्शन सच, स्कूटर इ वस्तूच्या मागणीतही वाढीचा वेग कमी होत आहे. या *स्थितीत मागणीचा अभाव हा काही काळा*साठी निष्प्रभ झालेला घटक पुन्हा डोके वर काढू शकेल. तात्विक सुधारणा केल्या तरी मागणीचा प्रश्न विचारात घ्यावाच लागतो. वस्त्रोद्योगासंबधीचे धोरण यशस्वी झाले तर कापड गिरण्याचे आधुनिकीकरण होईल, त्याना कोणत्या धाग्याचे सूत वापरावयाचे याचे स्वातत्र्य असेल व यत्रमागाच्या तुलनेत त्यांची स्थिती सुधारेल. त्यामुळे आधुनिक तत्रज्ञानाने गिरणीक्षेत्रात कृत्रिम धाग्याचे कापड मोठ्या प्रमाणावर निर्माण झाले तरी या उत्पादनप्रक्रियेतील उत्पन्नाची वाटणी थोडयांमध्ये होईल कारण वरील तिन्ही कारणामुळे कापूस उत्पादक, गिरणी कामगार व यंत्रमागावरील मजूर यात वाटले जाणारे उत्पन्न आता कृत्रिम धाग्याचे उत्पादक व थोडे मजूर यात वाटले जाईल. याचा कापडाच्या मागणीवर परिणाम होईल देशातर्गत मागणी मर्यादित असेल तर निर्यात बाजारपेठेचा विचार करता येतो, पण त्यासाठी आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत गुणवत्ता व किंमत या निकषावर देशी वस्तू तुल्य ठरायला हव्यात. या सदर्भात नवीन आर्थिक धोरणातील आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर व आधुनिकीकरण यावर देण्यात येणारा भर लक्षणीय आहे. पण परकीय कंपन्याच्या साहाय्याने मिळालेल्या तत्रज्ञानाच्या सहाय्याने आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत त्याच कपन्याच्या स्पर्धेत आपण यशस्वी होऊ का हा मोठाच प्रश्न आहे

## नवे तंत्रज्ञान–निर्यात ?

या सदर्भात या पद्धतीने आधुनिकीकरण व नव्या तंत्रज्ञानाचा शिरकाव होत आहे त्याचा विचार करायला हवा· ही क्रिया मुख्यत: यत्रे, सुटे भाग याच्या मुक्त आयाती द्वारे होत आहे. याचा परिणाम, निर्यातीत त्याच वेळी वाढ झाल्याशिवाय नव्या आर्थिक धोरणाचा परिणाम म्हणून आतरराष्ट्रीय व्यापार संतुलनाची स्थिती बिकट होण्यात होईल. मुक्त आयातीद्वारे आधुनिकीकरण व नवे तत्रज्ञान वापरण्याचा प्रयत्न केला म्हणजे व्यापार संतुलनाची समस्या बिकट होऊ नये यासाठी तरी निर्यात वाढवणे आवश्यक ठरते निर्यातीमधील वाढ काही कालातराने साध्य होणार असेल तर *व्यापार संतुलनाची समस्या*, परकीय कर्जाच्या द्वारे तात्पुरती सोडवता येते. पण दीर्घकाळासाठी हा मार्ग उपलब्ध नाही. पाच वर्षापूर्वी आतरराष्ट्रीय नाणे निधीचे कर्ज आपण मुख्यत. याचसाठी घेतले होते या कालावधीत निर्यातीत-आयातीच्या तुलनेत-विशेष वाढ नाही. नाणेनिधीच्या कर्जाची भरीव प्रमाणात परतफेड सुरू झाली म्हणजे व्यापार सतुलनाची स्थिती अधिकच बिकट होईल या स्थितीत आयातीला मोकळीक देणारे व्यापार धोरण व आयात केलेली यत्रे व सुट्ट्या मालाचा वापर सुलभ बनवणारी औद्योगिक धोरणे चालू ठेवणे शक्य होईल काय हा ही एक प्रश्नच आहे पण हीच धोरणे नवीन आर्थिक धोरणाचा गाभा असल्याने ही धोरणे बदलणेही फार सोपे असणार नाही.

## डोळस नियोजन

स्वातंत्र्योत्तर काळात नियोजित आर्थिक विकासाची जी पद्धत आपण स्वीकारली *त्यात त्रुटी आहेत*, योजनाची अमलबजावणी करताना देखील काही दोष निर्माण झाले आहेत. हे दोष व या त्रुटी दूर करून नियोजनाची चौकट अधिक परिपूर्ण बनवण्याचे प्रयत्न करायला हवेत. असे न करता नियोजित अर्थव्यवस्थेत दोष आहेत म्हणून नियोजनाचे महत्व कमी करून, बाजारपेठेला अधिकाधिक प्राधान्य देऊन आपल्या समोरील समस्याची आपोआप सोडवणूक होणार नाही. सार्वजनिक क्षेत्राचा असमाधानकारक कारभार व विविध नियंत्रणाची नोकरशाही पद्धतीची अंमलबजावणी याची कारणे राजकीय स्वरूपाची आहेत. त्यावर राजकीय स्वरूपाची उपाययोजना केली नाही तर केवळ आधुनिक तत्रज्ञानाचा वापर व स्पर्धेला वाव देऊन सार्वजनिक उपक्रमाचा कारभार सुधारणार नाही.

उत्पादक रोजगार निर्माण करणे ही वर्तमान काळातील तातडीची समस्या आहे हे मान्य केले तर आधुनिक तत्रज्ञानामुळे रोजगार निर्मिती कमी प्रमाणात होणार असल्याने तंत्रशास्त्राची निवड भारतीय सामाजिक आर्थिक परिस्थितीला साजेशी असण्यासाठी जाणीवपूर्वक नियोजनाची आवश्यकता आहे. नफ्याच्या आधारे ठरणाऱ्या खाजगी क्षेत्राच्या निर्णयांतून ही समस्या सुटू शकेल असे समजणे भाबडा आशावाद ठरेल.

नवे नवे प्रयोग करत राहणे हा सामान्यत: गुण मानण्यात येतो. सार्वजनिक धोरणाच्या संदर्भात मात्र प्रयोगाची निवड आणि आखणी खूप काळजीपूर्वक करावी लागते कारण सभाव्य चुकाचे परिणाम वर्तमानातच नव्हे तर भविष्यकाळातही भोगावे लागतात. आर्थिक धोरणातील अलीकडील बदल पाहता राजीव गाधीच्या नेतृत्वाखालील सरकारने आपली प्रयोगशीलता सिद्ध केलीच आहे. नवीन आर्थिक धोरणाच्या सभाव्य दुष्परिणामाकडे अशाच प्रयोगशीलतेने पाहून आवश्यक सुधारणा केल्या जातील अशी आपण आशा करू.

□

# पक्षांतर्गत निवडणुकांचा पत्ता नाही. असं का व्हावं ?

निळू दामले

अंदमानच्या दौऱ्यावर असतानाची गोष्ट· राजीव गांधी आपल्या एका भाषणात म्हणाले की, अंदमानचे प्रश्न सोडवण्याच्या दृष्टीन त्यानी एक नवीन कॉर्पोरेशन स्थापन केल आहे. कॉर्पोरेशन 'आपण' म्हणजे 'मी' स्थापन केल आहे अस ते म्हणाले. अंदमानचे प्रश्न सुटत नव्हते, कारण कोणी तिथ जातच नव्हतं. मग 'मी' लोकाना आणि अधिकाऱ्याना सांगितल की, त्यानी अंदमानचा दौरा करावा. तर असं त्यांच्या भाषणात 'मी' 'मी' अस वारवार येत होत. कधीतरी हे व्हायचच होत.

नेहरू काय किंवा इंदिरा गांधी काय, दोघानाही हे माहीत होत की, पक्ष आणि सरकार चालवण्यात त्यांचा सर्वात मोठा हात होता; पण तरीही त्यांच्या बोलण्यात 'हम' असा उल्लेख येत असे. 'हम' अस हिंदीत म्हणण्याचा फायदा आहे. त्याचा अर्थ 'आम्ही' असाही होतो आणि बहुमानार्थानं 'मी' असाही होतो. भाषेचा हा फायदा घ्यायचही राजीव् याना मंजूर दिसत नाही. कदाचित अस झाल असेल की, जे त्यांच्या मनात होत आणि जे त्याना बोलायच नव्हतं ते त्यांच्या तोंडून चुकून बाहेर आल.

पक्ष किंवा देश चालवायचा असेल तर काही एका संघटनेची आवश्यकता असते. विचार अमलात आणण्याच साधन संघटना असते. संघटना इतकी आवश्यक आणि महत्त्वाची असते की, विचाराना आणि धोरणानाही दुय्यम महत्त्व येऊ शकतं. आज देशा समोर जो राजकीय पेच उभा आहे त्याच मूळ राजकीय पक्षाना संघटना नाही यात शोधता येण्यासारख आहे एका बिकट अशा अवस्थेत राजीव गांधी यांच्या हातात देशाची सूत्र आली. त्यांच्याकडून फार मोठ्या अपेक्षा देशान बाळगल्या आहेत. असे हे राजीव गांधी काय करू शकतील याचा अंदाज त्यांच्या संघटनेबाबतच्या हालचालीतून घेता येण्यासारखा आहे

आपल्याला हे माहीतच आहे की काँग्रेस पक्षात फार पूर्वीपासून पक्ष संघटना आणि सरकार या दोन घटकात महत्त्व कोणाला असाव या प्रश्नावर मतभेद होते. स्थानिक स्वराज्य संस्था आल्या आणि विभागीय सरकारं आली तेव्हापासूनच काँग्रेसमधल्या लोकाना सत्ता म्हणजेच काय असत याची कल्पना आली होती आणि तेव्हापासूनच सत्ता कोणाच्या हातात असावी किंवा सत्तेवर कोणाचा वचक असावा या मुद्द्यावर पक्षात संघर्ष होत होता स्वातंत्र्य मिळाल्यावर तो संघर्ष चालू राहिला. नेहरू अर्थातच सत्तेच्या बाजूचे होते पण त्यानी संघटनेला वाळीत टाकल नाही पक्ष संघटनेला बरोबर घेत घेत आणि संघर्ष टाळत ते चालले होते.

स्वातंत्र्यपूर्व काळातील परिस्थिती वेगळी होती. संघटनेच्या बाजूला गांधीजी होते आणि सत्ता किंवा सरकार हा प्रकार म्हणावा तेवढा प्रबळ नव्हता. गांधीजी असल्याकारणानच संघटनेला पैसा आणि साधन आणि काम करणारी माणसं नीट आणि आवश्यक तेवढी होती अस म्हणता येईल की संघटना म्हणजेच सरकार होत.

स्वातंत्र्यानंतर परिस्थितीत फरक पडला. एक तर गांधीजी नव्हते. दुसर म्हणजे स्वतंत्र सरकार नावाची संघटना अपेक्षेनुसार अत्यंत बलाढ्य होती. सरकारजवळ असणारा पैसा आणि माणसं याची तुलना संघटनेबरोबरची साधनं आणि माणसं यांच्याशी होऊच शकत नाही. पक्षाला किंवा कोणत्याही संघटनेला परिस्थितीचा अभ्यास करून निर्णय घ्यावे लागतात आणि यासाठी फार मोठ्या प्रमाणावर साधनांची आवश्यकता असते. सरकारजवळच इतकी साधनं असणार हे लक्षात आल्यावर नेहरू यानी पक्षापेक्षा सरकारला महत्व आहे अशी भूमिका घेतली पण तरीही वैचारिक स्तरावर पक्ष या संघटनेला स्थान असणार हे त्याना मान्य होत म्हणूनच पक्षाच्या हाय कमांडपेक्षा मंत्रिमंडळच महत्त्वाच असणार अशी स्पष्ट भूमिका त्यानी घेतली, पण त्या बरोबरच मंत्रीमंडळ किंवा सरकारच्या महत्त्वाच्या भूमिका ठरत असताना त्यानी पक्षातल्या मोठ्या पुढाऱ्याना त्या निर्णयात विविध प्रकारे सहभागी करून घेतल.

नेहरूनी आणखी एक भूमिका मांडली. त्याच म्हणण अस होत की, निवडून येण्यापूर्वी आपण जरी एखाद्या पक्षाचे असलो तरी निवडून आल्यावर आपण घटनेला आणि देशाच्या लोकाना बांधलेले असतो. सरकार स्थापन झाल्यावर किंवा निवडून आल्यावर पक्षाची बांधिलकी गौण ठरत जाते आपल्या भूमिकेचा अतिरेक मात्र नेहरूनी केला नाही. होता होईतो त्यानी संघटनेच वैर न पत्करता संघटनेला बरोबर घेऊन चालण्याच धोरण पत्करलं पक्षाल म्हणून स्वत:ची अशी दुसरी बाजू होती पण ती जबाबदारीन लावून धरण्याच संघटनेच्या माणसाना जमल नाही. पक्षाच्या आणि सरकारच्याही काही मर्यादा असतात. लोकाना काय वाटत आणि लोकासाठी काय केल पाहिजे याची जाण पक्षाला अधिक बरी असण्याची शक्यता असते सरकारच्या धोरणाला एक पाया असावा लागतो. धोरणाला एक विचारधारेच सूत्र असत, एका व्यापक तात्त्विक व्यूहरचनेचं पाठबळ धोरणाला असत, असाव लागत आणि ही जबाबदारी पक्षाची असते अस म्हणता येईल की, दिशा पक्षानं ठरवायची असते आणि त्या दिशेबरहुकूम वाटचाल करण्याची आणि अंमलबजावणी करण्याची जबाबदारी सरकारची असते. तेव्हा पक्षाशिवाय सरकार ही गोष्ट खरी

नाही. ही जाण असणारी माणस स्वातत्र्य मिळाल्यावर पक्षात राहिली नाहीत, एकजात सर्वजण सत्तेकड गेले हे ताण नेहरूना जाणवत असणार पण त्याना विचार करायला वेळ नव्हता जेवढा तोल राखता येईल तेवढा राखत त्यानी सघटना आपल्या सोबत ठेवली. त्याच्याच अध्यक्षपदाच्या काळात ढेबर याच्यासारख्या पुढाऱ्यान सघटनेच्या कामात लक्ष घातल आणि त्याला नेहरूचा पाठिबाही होता. पण उत्तरोत्तर संघटना व सरकार हा साधा सुटत गेला. नेहरू पक्षाध्यक्ष आणि पतप्रधान होते या गोष्टीचा फायदा सरकारवादी लोकानी करून घेतला. म्हणजे काय केल अस विचारल तर इदिरा गाधीच्या कारकीर्दीकड पहा अस म्हटल तरी पुरे होईल

नेहरूना काही प्रमाणात अहमन्यता होती. शेवटी ते राजकारणात होते. तेव्हा राजकारणातला माणूस आपली सत्ता जपण्याचा जेवढा प्रयत्न करेल तेवढा त्यानी केला ते समजण्यासारखं आहे. पण तरीही विचार आणि सत्ता, आपण आणि पक्ष यातला समतोल साधण त्याना जमत होत. इदिरा गाधीकड धोरण, विचार, सघटना इत्यादी सर्वच गोष्टीना गौण स्थान होत आपल्यालाच सर्व समजत अस त्याना वाटत होत. इतराना स्वातत्र्य होत ते केवळ त्याच्याशी सहमत होण्याच इंदिरा गाधीना एक गड होता. सार जग आपल्या विरोधामधे कट करून राहिल आहे आणि आपण थोर आहोत म्हणूनच आपल्याला लोकाचा विरोध आहे अस त्यांना ठामपणान वाटत होत. या गडामुळं त्या विलक्षण सशयी झाल्या होत्या. त्याच्या या गडाचा उल्लेख त्यानी आपल्या भापणात आणि लेखनात अनेक वेळा केला होता त्याच्या गडाच प्रतिबिंब त्याच्या सघटना विषयक वागण्यात पडलेल दिसत कोणावरही विश्वास ठेवला नाही. कोणालाही प्रबळ होऊ दिल नाही आणि निर्णयप्रक्रिया सतत आपल्याच हातात ठेवली त्याच्याच कारकिर्दीत कॉंग्रेस सघटना पार कोसळली. विचार नावाची गोष्ट पक्षात शिल्लक राहिली नाही केवळ होयवा, सत्तेवर डोळा असणारे आणि लवाडच सघटनेत टिकू शकतात अशी स्थिती निर्माण झाली. त्यानीच पक्षातली लोकशाही सपवली आणि मी म्हणेन तीच पूर्व असा पायडा पाडला

इदिरा गाधीच्या पधरा वर्षांच्या या कारकिर्दीनतर आणि त्यानी लावलेल्या सवयीनतर राजीव गाधी यानी पक्ष आणि सरकार यांची सूत्रं आपल्या हातात घेतली.

राजीव गाधी यानी सुरुवात करतानाच आपल्या आईची पद्धत प्रथम मानली अस दिसत पतप्रधान होण हा एक अपघात होता. त्याप्रसगी आणखी एखादा पर्याय होता अस आज तरी दिसत नाही. पण पतप्रधान झाल्यावर पक्षाध्यक्षही होण्याला त्यानी मान्यता देणं ही गोष्ट पाहण्यासारखी आहे कोणतीही खळबळ न करता त्यानी अध्यक्षपद घेतल.

## पक्षांतर्गत निवडणुका ?

आज पक्षात आणि सरकारात सर्वेसर्वा होऊनही त्याना दोन वर्षाचा काळ उलटला आहे पक्षांतर्गत निवडणुका आपण घेणार आहोत अस त्यानी अनेक वेळा जाहीर केल. कॉम्प्यूटर थडथडले पण अजून निवडणुकाचा पत्ता नाही. अस का व्हाव ? एका बाजूला अस दिसत की आज कॉंग्रेस पक्षात ते नसतील तर त्याचा पक्ष उभाच राहणार नाही. जर त्याच स्थान इतकं मजबूत असेल तर त्यानी निवडणुका घ्यायला का घाबराव ? प्रणव मुकर्जी त्रास देतील असं त्याना वाटल असेल किंवा गुडूराव आणि त्रिपाठी कट करून त्याना पक्षात एकट पाडतील अशी एक भीती त्याना वाटली असेल त्याची अशी माणस पक्षात नाहीत काही व्यवस्थापक लोक आणि कॉंप्यूटरवाले एवढ्या बळावर पक्षावर कब्जा कसा करता येईल अशी शका त्याना वाटत असेल. पण आता तीही भीती असायच कारण नाही या लोकाची ताकद काय होती ते आता स्पष्ट झाल आहे इदिरा गांधीना छळायला निघालेले कामराज किंवा पाटील किंवा घोष हे लोक त्या काळातले दादा होते ते हरले ही गोष्ट वेगळी. पण जर ते अधिक हुशारीन वागले तर इंदिराबाईंचे वांधे होऊ शकले असते. तशी स्थिती राजीव याची नाही. आज त्याच्या वर्गातले सर्वच पुढारी चार-दोन जिल्ह्याच्या पलीकड बळ असणारे आहेत, अस असतानाही राजीव पक्षांतर्गत निवडणुका का घेत नाहीत ? शक्यता अशी आहे की, विचार म्हणूनही त्याना आजची निर्णय प्रक्रिया आणि पक्षपद्धती मान्य नसावी. भीतीचा भाग म्हणून नाही तर आपल्या पक्षविषयक विचाराचा भाग म्हणूनही त्याना पक्ष सघटना आणि पक्षांतर्गत लोकशाही इत्यादी गोष्टी मान्य नसाव्यात आणि याचे अनेक पुरावे एव्हाना आपल्याला सापडलेले आहेत.

अगदी ताज्या घटना आधी घेऊन विचार करता येण्यासारखा आहे. कामराज योजना आठवावी अशा प्रकारे त्यानी पक्षातल्या पदाधिकाऱ्याना आणि मत्र्याना आपापल्या पदाचे राजीनामे द्यायला लावले. कशासाठी ? काय साध्य करायच होतं ? आपल्याला माहीत नाही कारण त्याच्या पक्षालाही माहीत नाही. पक्षातल्या कोणालाही अस काही होईल याची कल्पना नव्हती. पक्षात यावर कोणतीही चर्चा झालेली नव्हती. मग राजीव यानी हा निर्णय कोणाशी बोलून घेतला ? आपल्याला माहीत नाही. नव्या पदाधिकाऱ्याची नेमणूक अजूनही झालेली नाही. ज्याना काढल त्यानाही अगदी आदल्या क्षणापर्यंत याची कल्पना नव्हती. काढल्यावर त्याचे एक उपचार म्हणूनही आभार मानण्यात आलेले नाहीत. पूर्वी जमीनदार आपल्या नोकराना काढीत त्या पद्धतीन हा सर्व व्यवहार झाला आहे.

लोकाना किंवा सहकाऱ्याना विचारण्यावरून आठवत. राजीव जेव्हा परदेशी पुढाऱ्याशी बोलणी करायला बसतात तेव्हाही आधीच्या धोरणाबाबत किंवा सबधित बाबीच्या सबधात आपल्या अधिकाऱ्याकडून किंवा कोणा जाणकाराकडून पुरेस ब्रीफिंगही घेत नाहीत. शाळा कॉलेजात जशी आयत्यावेळी बोलण्याची एक स्पर्धा असते तस राजीव अगदी आयत्यावेळी काहीतरी बोलतात. अनेक महत्त्वाच्या घोषणा अशा रीतीन करताना दिसतात. हा मुद्दा अशासाठी येतो की, देशाचे निर्णय घेताना ते किती लोकांना आपल्या विचारात सहभागी करून घेतात ते या निमित्तानं लक्षात यायला हरकत नाही.

बगालचा दौरा अजूनही गाजतो आहे. पं बगाल सरकार कस अकार्यक्षम आ

आणि गुरखाभूमी आदोलनाची जबाबदारी त्या सरकारवर कशी आहे हे सागण्यासाठी राजीव सतत बगालचा दौरा अलीकड करत आहेत. गुरखाभूमीचा प्रश्न राजीव केवळ पक्षीय पातळीवर हाताळीत असून प बगाल सरकारला अडचणीत आणण्यासाठी ते घिसिंग याना फूस लावत आहेत. एक अत्यत घातक असा हा त्याचा डाव आहे. जाणते त्याच्या या वागण्याची तुलना, इदिरा गाधीनी भिद्रानवाले याना कसं उभ केलं, त्याच्याशी करत आहेत राजीव यांचं हे वागणं घातक आहे आणि अत्यत पोरकट या सदरात मोडणार आहे बंगालमधेच नव्हे तर देशभर त्याच्या पक्षाची प्रतिमा आणखीनच बिघडणार आहे. हे त्याना कळत नाही काय? पक्षाच याबाबत काय म्हणणं आहे ? आपल्याला माहीत नाही कारण याबाबत पक्षाच्या बैठका झाल्याच आपण काही ऐकलेल नाही.

बगालबरोबरच पंजाबचा प्रश्नही आहे. यात ते कोणत्या हालचाली करतात ते कोणालाच कळत नाही. कित्येकवेळा बर्नाला यानाही काही गोष्टी दुसऱ्या दिवशी पेपरातूनच समजतात भजनलाल केव्हा गेले हे त्यांचं त्यानाच कळलेलं नाही. पंजाब प्रश्नात सरकार काय करणार आहे ते राजीव आपल्याला सागत नाहीत. लष्करी किंवा पोलिसी कारवाई त्यानी गुप्त ठेवण आपण समजू शकतो. पण अकाली दलाबरोबर त्याच्या काय वाटाघाटी चालल्या आहेत तेही आपल्याला कळत नाही. आपण बापडे पडतो, सामान्य नागरिक. पण पजाबमधे काम करणाऱ्या कॉंग्रेस पक्षाच्या पुढाऱ्यानाही ते कळत नाही. सर्व सूत्र त्याच्या हातात आणि त्याना भेटायचं असेल तर भेट मिळत नाही. खासदार आणि आमदारानाही भेट मिळत नाही तर इतराच तर जाऊ द्या. पंजाबमधल्या पक्षाच्या बैठका होत आहेत आणि त्यांच काय म्हणणं आहे ते पाहून निर्णय होत आहे असं चित्र आपल्याला दिसत नाही. पंजाबचा निर्णय पजाबच्या लोकानीच घ्यायला हवा ना ? की आणखी कोणी घ्यावा ?

पजाबच आणखी एक पहा. अर्जुनसिंग यांना राज्यपाल म्हणून आणून त्यांच्याकडून काही काम राजीव यानी करवून घेतली. राज्यपाल या माणसाचं काम काय असतं ? राजकीय काम त्यान करायची असतात काय ? जर राजकीय काम करायची असतील तर पजाबच्या प्रश्नातला एकादा जबाबदार माणूस राज्यपाल म्हणून आणायला हरकत नव्हती. मध्य प्रदेशातल्या सिगाना का आणायचे ? हे प्रश्न खर म्हणजे पक्षातल्या लोकानी विचारायला हवे होते.

सिंगाच्या बाबतीत झालेल्या गमती फार पहाण्यासारख्या आहेत. ते मध्य प्रदेशात मुख्यमत्री होते आणि पुन्हा व्हायचे होते. त्याची निवड विधिमडळ पक्षान केली आणि अचानक त्याना राज्यपाल म्हणून पाठवण्यात आल. मध्य प्रदेशातल्या पक्षाला याची काहीही कल्पना नव्हती. इतकं आयत्यावेळी का ठरल ? राज्यपाल व्हायच म्हणजे त्यानी पक्षाच्या सभासद असण्याचा राजीनामा द्यायला हवा. तो दिला गेला काय ? त्यानतर एकदम त्याची पजाबमधून उचलबागडी झाली आणि त्याना पक्षात उपाध्यक्ष म्हणून आणण्यात आल आणि केंद्रात मंत्रीपद देण्यात आल. पक्षाच्या विरोधात काम करणाऱ्या सिद्धार्थ शकर रे याना पजाबचं राज्यपालपद देण्यात आल. घिसिंग याना पाठिंबा देणारे अशी रे याची ख्याती होती. बंगालमधल्या पक्षाला या घटनेची माहिती वर्तमानपत्रातूनच मिळाली. वसतदादाना मत्रिपद सोडावं लागलं आणि राजस्थानच्या राज्यपालपदावर त्याना बसवण्यात आल. पक्षाला विचारून हे झालेलं नाही. सरकार या नात्यान राजीव जेव्हा काहीही वेडे चाळे करतात तेव्हा ते जनतेला आणि ससदेला जबाबदार असतात. चौकशी आयोगाचे अहवाल गुप्त ठेवण्याचा निर्णय त्याच्या सरकारनं घेतला. अत्यत लाजिरवाणा असा हा निर्णय होता. पण सर्व पक्षच बैलाचा असल्यानं संसदेत त्याच्या या निर्णयाला कोणी विरोध करील अशी अपेक्षा करता येत नाही तथापि पक्षाबाबतचे निर्णय होतात तेव्हा पक्षातल्या लोकानी किमान एवढ तरी म्हणायला हवं की, काय घडतय ते आम्हाला रीतसर सांगा तरी. तसही कोणी विचारलेल दिसत नाही आणि ते आपण सागू लागतो अस राजीव यांना वाटत नसल्यान, त्यानीही तस काही करण्याची तसदी घेतलेली नाही.

याबाबतच सर्वांत महत्त्वाचं उदाहरण म्हणजे मुस्लिम महिला विधेयक. मुस्लिम महिलेला कायम दास्यात ठेवणारं आणि मुस्लिम समाजाला कायम मुल्लाच्या ताब्यात ठेवणारं हे विधेयक अत्यत वाईट होतं. पक्षाला न विचारता हे विधेयक आणण्यात आल. विरोध करणाऱ्याची गळचेपी करण्यात आली. इतक भयानक फॅसिस्ट वागण त्याच्या पक्षान सहन केल, यावरून त्याच्या पक्षाची सघटना काय प्रतीची आहे ते लक्षात येतं.

## पक्षांतर्गत लोकशाही नाही

पक्षात निवडणुकाचा पत्ता नाही. कमिटचा तयार होतात आणि मोडतात त्या राजीव गाधी याची मर्जी पाहूनच. अर्थातच त्यामुळ पक्षात ज्या काही चर्चा व्हायच्या असतीलत्याही राजीव याच्या मर्जीच्या परिघातच. म्हणजे पक्ष सघटनेच हे मूळ अस काम असत तेच होत नाही सघटना कशासाठी हवी ? लोकाच्यात काम करत असल्यान, सवदनेला, लोकाना काय हवं असतं याची जाणीव असते. लोकाच्या या मागण्या आणि इच्छा सरकारकडून फलद्रूप होतात की नाही याची कल्पनाही सघटनेत तळात काम करणाऱ्याकडूनच येत असते. सरकारन जर काम केल नसेल तर या तळातल्या लोकानाच जनतेला तोड द्यावं लागत असत. जर संघटना असेल आणि त्यातल्या त्यात बरी असेल तर सरकार ताळ्यावर राहण शक्य असत आणि सरकारकडून लोकाच्या हिताची काम होणं शक्य असत. पण जर संघटनाच नसेल तर सरकार आणि लोक याच्यात फारच अतर पडत असत. आज प्रत्येक पक्षात नेमकी हीच समस्या आहे अस दिसतं

मुस्लिम महिला विधेयकाबाबत लोकांमध्ये असतोष आहे. पण त्याची जाणीव पक्षाला व्हावी अशी सोयच शिल्लक राहिलेली नाही. कापड धोरणाच पहा. मानवनिर्मित धागा स्वस्त पडत असेलही. पण आपल्या देशाच्या सदर्भात कापसावर जगणाऱ्या लाखो शेतकऱ्यानी काय करायच असा प्रश्न निर्माण होतो. त्याना काही पर्यायी सोय झटकन करून देण्यासारखी नाही. राजीव याना या गोष्टीची जाणीव नसल्यानं त्यानी एका फतव्यानिशी कापडधोरण बदलण्याचा प्रयत्न केला. त्याच्या सुदैवानं पक्ष संघटना नावाची चीज महाराष्ट्रामध्ये शिल्लक नाही. त्यामुळ महाराष्ट्रातल्या

शेतकऱ्यामधे असणारा असतोष त्याच्यापर्यंत पोचतच नाही

**थोडक्यात असं म्हणता येईल की इंदिरा गांधींनी पक्षसंघटना नावाची गोष्ट दूर सारली होती आणि राजीव ती पूर्णपणानं संपवू पाहात आहेत. मग त्यांना कोणत्या प्रकारची निर्णय प्रक्रिया हवी आहे ?**

राजीव याच्या सभोवताली कोण लोक आहेत ते आता आपल्याला माहीत आहे. कपनी चालवणाऱ्या, जाहिरात व्यवसाय करणाऱ्या माणसापेक्षा यत्रावर विश्वास असणाऱ्या लोकाचा गराडा त्याना पडलेला आहे अशा एक पाच दहा माणसावर विसबून आणि त्याच्या यत्रावर विसबून राजीव आपले निर्णय घेत आहेत. ही एकूणच प्रक्रिया आणि माणस पाहाण्यासारखी आणि तपासण्यासारखी आहेत.

गेल्या निवडणुकाच्या वेळची हालचाल पहा. कोणाला तिकिट द्यायची असा प्रश्न होता. जगात प्रत्येक पक्षासमोर असा प्रश्न प्रत्येक निवडणुकीच्या वेळी येत असतो. शेकडो कार्यकर्ते तळात फिरून आणि चर्चा करून हा प्रश्न सोडवत असतात असा आपला आजवरचा अनुभव आहे. इच्छुक माणसं कशी आहेत, त्याचे विचार कसे आहेत आणि त्याची एकूण लायकी काय आहे ते या प्रक्रियेत पाहिल जात असतं प्रचड प्रमाणावर मनुष्यबळ आणि वेळ या कामी खर्च होत असतो आणि या खटाटोपाच नियोजन करण हेच तर खर कसब असत हे काम फार कष्टाचही असत राजीव यानी काय केल तर कॉम्प्युटरला माहिती भरवली आणि त्या माहितीच्या आधारावर निर्णय घेतले माहिती चुकीची असली तर कॉम्प्युटर काय करणार ? माहिती दिल्यानंतर माणूस बदलला तरी काय करणार ? अस आढळून आल की, ज्याना या खटाटोपाची माहिती होती त्यानी आपल्या बाजूची माहिती तिथ पोचेल याची छान काळजी घेतली. त्याना ते कसेही असले तरीही तिकिट मिळाली आणि अनेक लोकाना हे तत्र माहीत नसल्यान तिकिट गमवावी लागली. शेवटी माणसाच काम ते माणसाच काम. ते यत्रानं कस होणार ?

राजीव असं वागतात याला काही कारण असावीत. त्याना कमीत कमी माणसांमध्ये गाडा हाकायचा आहे. कमीत कमी माणस म्हणजे अर्थातच कमीत कमी वेळ आणि कमी खर्च अस त्याच गणित असणार आधुनिक व्यवस्थापनात तसच सागितल जात. कमीत कमी माणस आणि श्रम यात जास्तीत जास्त पैसा मिळवण्याचा हा उद्योग आहे. देश चालवण्यासाठी आणि पक्ष चालवण्यासाठी ही इतकी लाखो माणसं काय कामाची अस त्याना वाटत असणार आणि त्या दिशेन त्याच व्यवस्थापन चालल आहे. गेल्या निवडणुकीच्या वेळी जिपा, पैसे आणि प्रचार साहित्य उमेदवाराला न मागता दिल्लीकडूनच मिळाल. पूर्वी अस होत नव्हतं. प्रत्येकाला वशिले लावून ते मिळवाव लागत असे. राज्याची राजधानी आणि दिल्ली इथ उमेदवाराच वजन किती आहे ही गोष्ट महत्त्वाची असे. पक्षाकड किंवा इंदिरा गांधीसारख्या नेत्याच्या हातात साधनं असत. आणि ती ठराविक लोकामध्ये वाटण्याचा प्रयत्न असे. पक्षात गट असत आणि हे गट साधन आपल्याकडं जास्त प्रमाणात येतील या दिशेन काम करत असत. राजीव या आधुनिक माणसानं ही भानगड काढून टाकली अनेकाना आपल्या दारात साधन पोचतात हा सुखद धक्काच होता. यात साधनाच आणि वाटपाच केंद्रीकरण झाल. दिल्लीतल्या प्रमुख माणसाच्या हातात देशाची सर्व सूत्र आपोआपच गेली आणि त्या दिल्लीच्या माणसालाही केवळ गुणाकार आणि भागाकार करून साधन, वाटण शक्य झाल हजारो माणसाच चरित्र पाहणं, त्याची कुवत तपासण, त्याच्यात डाव–उजव करून त्याचे अग्रक्रम लावण ही एकूणच जिकिरीची प्रक्रिया यात टाळण्यात आली

यात आणखी एक भाग होता. साधनं जमविण्याची जबाबदारी जिथं सघटना होती तिथे सघटनेच्या विविध पातळ्यावर काम करणाऱ्या पुढाऱ्यावर असे. आता ती जबाबदारी गेली वरच्या पातळीवर आणि हेही व्यवस्थापकाना बरं झालं गावगन्ना पातळीवर पैसे गोळा करत बसायच आणि मग त्या पैशाबरोबर येणाऱ्या हितसबधाना जपत बसायच ही कटकट वाचली आता एक किंवा दोन मोठे उद्योगपती किंवा एखादी बहुराष्ट्रीय कपनी यांच्याकडून मिळणाऱ्या पैशावर सर्व निवडणुका चालवण शक्य झालं होत. इटालियन कपन्यानाच किंवा आणखी कोणत्या तरी उद्योगानाच झुकत माप का मिळत याच उत्तर या खटाटोपात कदाचित सापडू शकेल

## नवे प्रचारतंत्र

म्हणजे कस होत जात पहा निवडणूक ही सर्वांत महत्त्वाची असते, ती जिंकण महत्त्वाचं. त्यासाठी काय लागत ? तर प्रचार व्हावा लागतो प्रसारण माध्यम हाताशी असावी लागतात त्याची केंद्रीय पातळीवर व्यवस्था, जाहिरात करणाऱ्या लोकावर सोपवता येते वाईटात वाईट अशा गोष्टीही हे लोक विकतात, तर लोक कल्याणाच्या कल्पना तर त्याना सहजच विकता येतील यासाठी त्याना भरपूर पैसा द्यावा लागेल एवढच पण तो इतर मार्गांनी खर्च करावा लागतच असतो.

वर्तमानपत्रातल्या जाहिराती, दूरदर्शनवरच्या छुप्या किंवा उघड प्रचारकी जाहिराती असा इतजाम केल्यावर प्रत्यक्ष सभा घेण आणि भाषण करत फिरण आवश्यक होत नाही एक मोठी सभा घ्यायची आणि तिच्या बातम्या आणि दृश्य प्रसारित होतील याची व्यवस्था करायची की, काम झाल. म्हणजे एकूण विचार केला तर मोहीम फारच कमी पैशात आणि खर्चात होते. अमेरिकेत आता आपण पाहातो अशा प्रकारच्या निवडणुका होतच नाहीत. टीव्ही आणि इतर प्रसारण माध्यम याच्या जोरावरच निवडणुका लढवल्या जातात. मोजकी माणस आणि पैसा याच्या जोरावर लोकाची मत तयार करण जमत. त्याच्या मनात भ्रम तयार करण जमतं, हे आधुनिक व्यवस्थापकाना माहीत झाल आहे आणि तेच व्यवस्थापनाच शास्त्र आता राजीव याना वापरायचं आहे.

याचे काय परिणाम होतात ते सागायची आवश्यकता नाही पश्चिमेत ते दिसत आहेत. बहुसख्य लोकांना ज्या गोष्टी करायच्या नसतात किंवा ज्या गोष्टी करण त्याच्या हिताचं नसतं त्याच त्याना कराव्या लागतात. वरपागी ऐश्वर्याच्या वाटणाऱ्या आणि सुखावह वाटणाऱ्या गोष्टींची चटक लोकाना लावणं आणि त्याचा पुरवठा होत राहील याची व्यवस्था केली जाते आणि त्या बदल्यात शस्त्र, प्रदूषण, युद्ध, तणाव, विषमता

आणि अनेक पातळ्यावरच दास्य लोकाना दिल जातं. आपल्या नशिबी हे सर्व आले आहे याची जाणीवही लोकाना धडपणानं होत नाही इतक्या कसबान हे काम व्यावसायिक करत असतात. वाईट औषध आपण प्रचाराला बळी पडून घेतोच ना. भारतात आता हे नव शास्त्र आणि युग आणायचा चग राजीव यानी बाधला आहे.

राजीव याना काही मोजक्याच लोकाना हाताशी धरून करोडो लोकाना हाकायच आहे, हजारो लोकाना बरोबर बाळगणारी सघटना हा प्रकार त्याच्या आधुनिक विचारात बसणारा नाही. निर्णय घेणारे लोक वेगळे आणि त्यानुसार वागणारे वेगळे अशी विभागणी त्याना अभिप्रेत आहे. कायदे करणारे वेगळे आणि ते ज्याना लागू आहेत अशी माणस वेगळी हे त्याना अभिप्रेत आहे. म्हणूनच वेगान गाडी चालवण आपल्याला क्षम्य आहे अशी त्याची समजूत आहे. एक नवा राजाच त्याच्या रूपान उदयाला येत आहे. या राजाची गमत अशी की लोकशाहीचा बुरखाही त्याला नकोसा आहे.

राजीव गाधी याना सघटना नको आहे किंवा विशिष्ट प्रकारची सघटना हवी आहे यात केवळ सघटनेबद्दलच्या त्याच्या सोयीचा किंवा आवडीनिवडीचा प्रश्न आहे अस मानता येणार नाही. त्याच्या एकूण जीवन दृष्टीशीच त्याचा संघटनेचा विचार निगडित आहे. अनेकाना किंवा सर्वांनाच निर्णय प्रक्रियेतून हलके हलके वगळलं जात असत तेव्हा त्या लोकाच्या हिताला आणि आवडनिवडीलाही वगळल जात असत हे आपण विसरू शकत नाही. ज्या घोड्यावर किंवा यंत्रावर आपली पकड उरत नाही तो घोडा किंवा 'यत्र' आपल्या हातातून निसटत असतं हा तर आपला अनुभव आहे. बहुसंख्य माणस पक्ष नावाच्या सघटनेत किंवा निर्णय प्रक्रियेत नसतील तर त्याच्या मताचा प्रभाव सरकारवर, सरकारी निर्णयावर, कायद्यावर पडण्याचा दुसरा मार्ग तरी कोणता आहे? आज तरी असा कोणताही मार्ग दिसत नाही आणि त्यामुळच सामान्य माणसाला आश्चर्य वाटावं असे निर्णय होऊ लागलेले दिसतात.

कोणी राजीव गाधी याना सागितलं की, या देशाची खरी गरज लहान मोटारीची आणि टेलिव्हीजनची आहे. कोणी त्याना सांगितलं की, कॉम्प्युटरनं एक उंच उडी मारून एकदम पुढल्या युगात जायला आपल्या देशातले लोक आसुसलेले आहेत. ज्याना प्यायला पाणी मिळत नाही किंवा खायला दोन वेळा अन्न मिळत नाही त्याना काय वाटतं ते कळायचा मार्ग राजीव याच्यासमोर नाही, म्हणूनच त्याचा घोळ होत आहे त्याच्या सभोवताली सर्व सुखवस्तू लोक आहेत आणि ते सुखवस्तू व मनान परदेशात असणारे लोक म्हणजेच देश अशी राजीव यांची समजूत आहे ही समजूतही जरा तपासण्यासारखी आहे. हे लोक जे आज परदेशात राहतात किंवा फिरतात, ज्यांना आधुनिकतेचा कड आला आहे जे आज व्यावसायिक आहेत आणि उत्तम प्रकारे जगत आहेत त्याना आज या देशातल्या सामान्य माणसाची घृणा आहे हा देश बेकार आहे आणि या देशातले लोक बेकार आहेत अस त्याना वाटत आहे खाजगीत बोलताना त्याचे हे उद्गार आपल्याला ऐकायला मिळतात. हा देश आपल्या गळ्यातलं एक लोढणं आहे असं त्याना वाटतं आणि आता काही करून त्याचा उद्धार आपल्याला करायचा आहे असं त्याच्या मनान घेतलं आहे. आणि जो काही, जो कोणता नवा अर्थव्यवहार येणार आहे त्यात विषमता वाढणार आहे आणि सामान्य माणूस आणि सुखी याच्यातल अंतर आणि त्याची सख्या दोन्हीही वाढणार आहे हे त्याना समजत आहे पण मनातल्या मनात त्याना वाटत आहे की याला इलाज नाही. ही एक ऐतिहासिक अपरिहार्यता आहे अस त्याना वाटत आहे त्रास होणार आहे तो इतरांना हे लोक सुखात आहेत त्यामुळं होणाऱ्या बदलाच स्वागत हा सुखासीन वर्ग करत आहे भारत नावाच्या देशाबद्दल, त्यातल्या सर्व बऱ्यावाईटाबद्दल आतल्या आत राग आणि घृणा असणारे हे लोक सत्तेत आहेत, सत्तेत जाऊ पहात आहेत.

त्याच्या या विचाराचंच प्रतिबिंब त्याच्या सघटनात्मक विचारात सापडतं. म्हणूनच उद्या काय होईल याची चिंता लागून राहते.

□

# करार-कौस्तुभ राजीव गांधी

## विनय सहस्रबुद्धे

१९८४ च्या डिसेंबरात लोकसभेच्या निवडणुका झाल्यानतर राजीव गाधीच्या ऐतिहासिक विजयाच वर्णन करताना अनेक पत्र—पडितानी अनेक प्रकारचे वाक्प्रचार वापरले. 'तो आला, त्याने पाहिले, त्याने जिंकले' अशीच सामान्यत: सर्वांची वर्णनाची पद्धत होती. आज सुमारे दोन वर्षांनंतर बहुसख्य पत्र—पडिताना आणि सामान्यतः विचार करू शकणाऱ्या सर्वसाधारण नागरिकांना राजीव गाधीबद्दल काय वाटते? 'तो आला, त्याने पाहिले, त्याने करार केले पण प्रश्न तसेच ठेवले' अशी सर्वसाधारण प्रतिक्रिया आहे.

राजीव गाधी सरकारच्या दोन वर्षांच्या कारकीर्दीच मूल्यमापन करताना, हे सरकार सत्तेवर येण्यापूर्वी काही वर्षे देशाला भेडसावत असलेल्या ठळक समस्याच्या बाबतीत या सरकारने केलेल्या, करू पाहिलेल्या उपाययोजनेचा मुद्दा महत्त्वाचा आहे. राजकीय क्षितिजावर अलीकडेच उगवलेला आणि एक प्रकारच्या अपघाती अपरिहार्यतेतून सत्ताधीश झालेला हा नवा उमदा तरुण देशातल्या सर्व समस्यावर रामबाण उपाय शोधून काढेल, ह्या आशावादी 'दृष्टीनेच सुरुवातीपासून राजीव गांधीकडे बघितल गेलं. देश खरोखरच घडवायचा वगैरे असेल तर आपल्याला फक्त एकच गोष्ट करायला हवी व ती म्हणजे जादूची काडी' फिरवून समस्या नाहीशा करण्याचं प्रत्यक्षाप्रत्यक्ष मृगजल निर्माण करणाऱ्या एखाद्या राजीव

गांधीला निवडून द्यायच, हीच सामान्य मतदाराची वृत्ती राहिली आणि राजीव गांधीनीच केवळ नव्हे तर त्याच्या पूर्व-सुरीनीसुद्धा ती निरतर जोपासत ठेवली. परिणामतः ज्या करिश्म्याच्या आधारे आपल्या आजोबानी सत्ता राबवली किंवा आईने वापरली त्याच करिश्म्याच्या आधारे चाळिशीच्या घरातला हा आकर्षक व्यक्तिमत्त्वाचा तरुण सत्तेवर आला. जमेल तेवढी सत्ता उपभोगायची, अपरिहार्यच होईल तेव्हा धोरणाचा वगैरे विचार करायचा अन्यथा 'जे जे होईल ते ते पहावे', या एका विलक्षण philosophical वृत्तीने राहायचे असे आणि इतकेच या पतप्रधानाचे धोरण असावे यातूनच जन्माला आले आहे ते त्याचे 'टाईम-पास पॉलिटिक्स'।

पजाब, आसाम आणि मिझोरम करार आणि गुरखाभूमीच्या प्रश्नावरील त्याच्या सरकारची भूमिका ही सारी या 'टाईम-पास पॉलिटिक्स'चीच उदाहरणे आहेत सत्ता कशी राबवायची याचा अनुभव नसला तरी ती कशासाठी राबवायची या प्रश्नाच योग्य उत्तर ज्याना माहिती नाही त्याना योगायोगाने मिळालेली सत्ता हे वेळ घालविण्याच खेळण वाटल्यास नवल नाही. कठोर वास्तवतेच्या खडकावर जवळपास फुटल्यातच जमा असलेली त्यांच्या करार कल्पनाची गलबते बघितली की कोणाही सामान्य माणसाच्या मनात अनेक प्रश्न उद्भवतात हे करार का केले गेले ? हा अर्थातच पहिला प्रश्न

१९८५ च्या सुरुवातीपासून लोकाची ही अपेक्षा होती की आता राजीव गाधी आलेयत् व काही तरी अस नक्कीच घडणार आहे की ज्यातून अनेक वर्षे रेंगाळलेले पजाब व आसामचे प्रश्न मार्गी लागतील करार झाले ते समस्या सोडविण्याच्या कळकळीतून नव्हेत तर जनतेच्या अपेक्षाना लगेचच प्रतिसाद देण्याच्या, निदान तसा आभास निर्माण करण्याच्या आवश्यकतेतून अतिमत काय साध्य करायच आहे व ते करताना पहिल्यापेक्षा दुसऱ्या आणि तिसऱ्या टप्प्याला किती महत्त्व आहे याची जाणीव नसल्यामुळे प्रत्यक्ष करार घडून येण, त्यानतर पजाब व आसामात निवडणुका होण व दोन्ही राज्यात लोकनियुक्त सरकारे सत्तेवर येण या प्राथमिक घडामोडी यशस्वीपणे पार पडल्याच्या समाधानातच आनंद मानला गेला मोठ्या उदार-मनस्क वृत्तीने मिझोरम सरकारची सूत्रे लालडेंगाच्या हातात सोपविताना तर निवडणुकीची वाट पाहाण्याचा उपचारही केला गेला नाही साहजिकच या तिन्ही करारांनी निरगाठी सुटल्याचा आभास निर्माण झाला, अवघ्या आनदवन भुवनाची हवा निर्माण झाली, प्रत्यक्षात मात्र अगदी धूळफेकीचा जरी नाही तरी एकूण प्रकार फक्त डोळे दिपविण्याचाच ठरला

पजाब कराराच तर इतकं भज झालय की तथाकथित पत्र-पडित पजाब प्रश्नाबद्दलच्या चर्चेत आता त्याचा उल्लेखही करीत नाहीत. कायदा व सुव्यवस्था शाबूत राखून पजाबातील हिंदूच्या मनात सुरक्षिततेची भावना निर्माण करण, लष्करातून पळून गेलेले जवान आणि मुख्यत्वे दिल्लीतल्या दगलीत होरपळून निघालेल्या शिखाच पुनर्वसन करण आणि मुख्य म्हणजे आपल्याला न्याय मिळाल्याची भावना त्याच्यात निर्माण करण, आणि देवाणघेवाणीच्या भूमिकेतूनच चदीगडच्या प्रश्नावर तोडगा काढता येईल याची स्पष्ट कल्पना शीख मडळीना देऊन तो मुद्दा निकालात काढणं, ही त्रि-सूत्री हाच खरं म्हणजे पजाब करारामागच्या कल्पनेचा प्राण आहे गेल्या महिन्यात मुबईत पत्रकाराशी बोलताना खासदार ले. जन. जगजितसिंग अरोरा यानी या मुद्द्याचाच उल्लेख केला होता गेले कित्येक महिने जोधपूरच्या कारागृहात बदिवासात असलेल्या शिखाचा प्रश्नही भावनिक महत्त्वाचा बनत असल्याच त्यानी सागितलय व ते खरंच आहे. दुर्दैवाने या सर्वच मुद्द्याच्या बाबतीत पजाब आणि केंद्र शासन सयुक्तरीत्या अपयशी ठरलं आहे

पाकिस्तान शीख अतिरेक्यांना मदत करीत असल्याबद्दलचा कठशोष इदिरा गाधीच्या काळापासून सुरू आहे; पण प्रत्यक्षात पाकिस्तानला सबळ पुरावा आणि जबर समज देण्यासाठी १९८६ चा डिसेंबर उजाडावा लागला पजाबातले खून सत्र बर्नालाना थोपविता आलेले नाही व बर्नाला ते करू शकणार नसतील, तर केंद्र प्रेक्षकाची भूमिका घेणार नाही, हे केंद्राला कृतीच्या भाषेने सागता आलेले नाही पळून गेलेल्या जवानांबाबत लष्कराने सहानुभूतीचा दृष्टिकोन ठेवला आहे, अनेकाचे पुनर्वसनही झाले आहे. पण ही भावनात्मक कृती जनतेपर्यंत पोचली ती गेल्या दिवाळीपूर्वी जन सुदरजी यांनी बर्नालाची भेट घेतली तेव्हा ! दिल्लीतील दंगलग्रस्ताच्या पुनर्वसनाचा प्रश्न हा नुसता नुकसान भरपाईचा प्रश्न नसून त्याना न्याय मिळण्याचा, म्हणजेच अपराध्यांना शासन

## राजीव गांधी यांच्याबद्दल गिरिलाल जैन काय म्हणतात ?

पाश्चात्त्य राष्ट्र प्रमुखाप्रमाणे श्रीमती इदिरा गाधी कितीही महत्त्वाचा विषय असूनही त्यावर लावलचक सविस्तर टिपणे वाचण्यास उत्सुक नसत (त्यामुळे) त्याचे बहुतेक निर्णय अस्थायी स्वरूपाचे असत. श्री. राजीव गाधीना तर सविस्तर टिपणे वाचण्याचा अधिकच कटाळा असल्याचे सागतात.

श्री. राजीव गाधी विदेशी नेत्याची चर्चा करण्यापूर्वी चर्चेचे टिपण तयार करीत नाहीत अस सागतात की सोविएत नेते गोर्बाचेव्ह याच्याशी श्री. राजीव गाधी यानी एकूण सुमारे दहा तास जी चर्चा केली त्याचे भारताकडचे आपले स्वतःचे प्रारुप आज अस्तित्वातच नाही

पंतप्रधान जणू काही आपली स्वतःचीच सपत्ती असल्याप्रमाणे वेगवेगळ्या राज्यात जाऊन मोठमोठ्या रकमा जाहीर करतात व त्यामुळे अभ्यास, चर्चा व चिकित्सेच्या आधारे नियोजन मडळाने केलेले साधन सामग्रीचे वाटप निरर्थक ठरते.

श्री. गाधी, आपल्या मन्त्रिमडळ सहकाऱ्याविषयी त्याच्या मातोश्री जेवढा सन्मान दर्शवीत त्याहीपेक्षा कमी सन्मानाची भावना बाळगतात. राजकारणी मडळीविषयीचा बधुभाव तर सोडाच, त्याच्याबद्दल श्री गाधीच्या मनात एक विचित्र अढी दिसून येते.

टाईम्स ऑफ इंडिया
दि ३१-१२-८६

मिळण्याचाही प्रश्न आहे. शिखांची ही स्वाभाविक मानसिकता ओळखून न्या. रगनाथ मिश्रा आयोगाने दोषी ठरवलेल्यावर कारवाई केली जाईल अशी स्पष्ट भूमिका केंद्राने घ्यायला हवी होती प्रत्यक्षात मात्र मिश्रा आयोगाचा अहवाल प्रसिद्ध करण्याबाबतही केंद्राची टाळाटाळच सुरू आहे. चदिगढच्या प्रश्नावर आयोगामागून आयोग नेमून निर्माण केलेला घोळ आणि आजमितीस योगायोगाच्याच स्वाधीन झालेली ही समस्या हा सारा प्रकार म्हणजे राजकीय नेते, कार्यपत्रिका आणि काही प्रमाणात न्यायपत्रिका याच्या बौद्धिक दिवाळखोरीचच उदाहरण आहे.

## आसाम आणि मिझोरम

जी गोष्ट पजाब कराराची तीच आसामचीही. पंजाबपेक्षा आसामची जनता अधिक दुर्दैवी म्हटली पाहिजे. पजाबातील बहुसख्याना म्हणजे शीख समाजाला पजाब कराराच्या अमलबजावणीच्या सदर्भात केंद्राकडे आग्रह धरण्याबाबत बर्नाला सरकारला आलेले अपयश वगळता बर्नालांविषयी नाराजी असल्याचे अन्य ठळक कारण नाही. आसामच्या गण परिषद सरकारची प्रतिष्ठापना ही असमियाच्या भावविश्वातली महत्त्वाची घटना होती व त्यामुळेच शिखाच्या बर्नालाकडून असतील त्यापेक्षा असमियाच्या महत सरकारकडून असलेल्या अपेक्षा हा अधिक सवेदनशील विषय होता व आहेही. साहजिकच गण परिषद सरकारचे अपयश हा असमियांना, विशेषतः आदोलक युवावर्गाला मोठा धक्का आहे व त्याची परिणतीही अधिक गंभीर आहे. युनायटेड लिबरेशन फ्रट ऑफ आसाम या विघटनवादी सघटनेच्या वाढत्या कारवाया, त्यांना चीनमधून प्रशिक्षण मिळत असल्याच्या अलीकडच्या बातम्याच्या संदर्भात विशेष चिंताजनक आहेत. अपेक्षा आणि भ्रमनिरास याचे समप्रमाण असेच चालू राहिले तर नागभूमी, मणिपूर आणि त्रिपुराशी भौगोलिक सबध असलेल्या ब्रह्मपुत्रेच्या खोऱ्यातील जनतेला त्याच्यात एक भावनिक दुवाही !सापडेल. व्यावहारिकता काहीही असो, फुटून निघण्याच्या प्रश्नावर आसामसह पूर्वांचलाची भावनिक एकवाक्यता ही मग दूरची गोष्ट राहणार नाही.

घूसखोराना हुडकणे व त्याना परत पाठविणे, आणि काहीचे मताधिकार काही काळ गोठविणे हा आसाम कराराचा प्राण आहे. घूसखोरांना हुडकून काढायचे असेल तर सशयित नागरिकत्वाच्या व्यक्तीच्या बाबतीत नागरिकता सिद्ध करण्याची जबाबदारी सशयित व्यक्तीवर टाकण्याची तरतूद नागरिकत्व कायद्यात केली जावी ही आसाम सरकारची मागणी या सदर्भात पूर्णतः समर्थनीय आहे, परंतु केंद्राची त्याला तयारी नाही. तसे केल्यास अनेक प्रशासकीय अडचणी उभ्या राहतील, घूसखोराचे प्राबल्य असलेल्या जिल्ह्यातून प्रसगी कायदा व सुव्यवस्था ढासळेल ही भीतीही निराधार नाही. परतु ही समस्या सोडवायची असेल तर अन्य कोणताही शॉर्टकट नसल्याने तोच एकमेव मार्ग आहे, हे निखळ सत्य मान्य करून सरकारने कायद्यातील बदल घडवून आणायला हवेत. संशयित नागरिकत्वाच्या व्यक्तीची अ–नागरिकता सिद्ध करण्याची जबाबदारी आज सशय घेणाऱ्यावर टाकली जाते अशी जबाबदारी घेण्याचे धैर्य सामान्यत. कोणीही दाखवीत नाही आणि उद्या कोणी ते दाखविलेच तर त्यातून उद्भवणाऱ्या यादवीचा धोका अधिक गभीर आहे.

आसाम कराराच्या अन्य कलमाच्या अमलबजावणीबाबतही आनंदच आहे. बागलादेशच्या सीमाप्रदेशाला लागून कुपणाच पक्कं बाधकाम करण्याच्या बाबतीत सरकारन काहीही पावल उचललेली नाहीत. सीमेला समातर रस्ता बाधण्याच्या विषयातही शून्य प्रगती झाली आहे. आसाम गण परिषदेच्या ससदेतील गटाचे नेते श्री. दिनेश गोस्वामी याच्या म्हणण्यानुसार करारात कबूल केल्याप्रमाणे आसामला आणखी एक तेल शुद्धीकरण केंद्र देण्याची गोष्ट तर दूरच, पण दिग्बोई केंद्राच्या आधुनिकीकरणाची व बोगाईगाव केंद्राच्या विस्ताराची योजनाही रखडली आहे.

आसाम आणि पूर्वांचलातील घूसखोरी व त्यातून उद्भवलेल्या गुतागुतीच्या समस्या समूळ निपटून काढायच्या असतील तर असाधारण निर्धाराने पावले उचलावी लागतील व सध्याच्या केंद्र सरकारकडे ती ताकद नाहीं. या पार्श्वभूमीवर आसाम कराराची अंमलबजावणी अधिकच कठीण आहे निष्क्रिय केंद्र सरकार आणि अ-क्षम राज्य सरकार य.च्या तावडीत सापडलेल्या असमिया जनतेची अवस्था 'आई जेवू घालीना आणि बाप भीक मागू देईना' अशी झाली आहे. आसाम–सयुक्त–मुक्ती आघाडीच्या (युनायटेड लिबरेशन फ्रट ऑफ आसाम . अल्फा) वाढत्या कारवाया ही या घटनाक्रमाची गंभीर परिणती आहे

पजाब आणि आसाम कराराच्या तुलनेत निदान आजमितीस तरी मिझोरम–करार हा एक यशस्वी समझौता ठरणार किंवा काय असा सशय येण्याजोगी परिस्थिती आहे. वस्तुत' या कराराच्या यशाचा आभास पूर्णत. फसवा आहे, सामान्य जनतेची दिशाभूल करणारा आहे मुख्यमंत्री लालडेंगा सत्तेवर आल्यापासून मिझोरममध्ये शातता नादू लागली असली तरी त्याचा अर्थ हा करार यशस्वी झाला असे नाही. या करारात अनेक निसरड्या जागा आहेत. मिझोच्या धार्मिक चालीरीती, सामाजिक प्रथा पद्धती इ. ना ससदेच्या कायदे निर्मितीच्या अधिकाराबाहेर ठेवण्याची तरतूद, कलम ९ अतर्गत चकमाना स्वायत्त जिल्हा देण्याची तरतूद, इ. अनेक बाबतीत लालडेंगाची भूमिका सशयास्पद आहे. येत्या फेब्रुवारीत निवडणुका होण्यापूर्वी लालडेंगा बडाचे निशाण उभारणार नाहीत हे स्पष्टच आहे आज त्याची खुर्ची कॉंग्रेसच्या आधारावर टिकून आहे उद्या विधानसभेच्या निवडणुका झाल्यानंतर एका राज्याचा निर्वाचित मुख्यमत्री म्हणून अधिकारावर येणारा लालडेंगा केंद्राला अधिक समर्थपणे अडचणीत आणू शकतो. या सर्व पार्श्वभूमीवर मिझोरम कराराच्या यशापयशाचा हिशोब आज त्या राज्यातल्या विधानसभेच्या निवडणुकीनतरच माडावा लागेल. सत्तेवर आल्यानतरही बृहन् मिझोरमच्या प्रश्नावर लालडेंगा यानी घेतलेली आग्रही भूमिका, उपमुख्यमंत्री लालथन हावला यांच्याशी आलेले वितुष्ट, यासारख्या काही गोष्टी या कचकडी कराराच्या यशाबद्दल आजही शंका निर्माण करणाऱ्या आहेत.

मिझोरम करारावर स्वाक्षऱ्या झाल्या त्यावेळी या देशाचे नागरिकत्व न मानणाऱ्या व गेली अनेक वर्षे देशद्रोहाची एक सघटित चळवळ उभी करण्यासाठी प्रयत्नशील राहिलेल्या एका गनिमी नेत्याबरोबर करार

केल्याबद्दल केंद्र सरकारवर टीका झाली या टीकाकारांपैकी अनेकाचा आक्षेप आहे तो सरकारच्या दुहेरी न्याय पद्धतीला. देशद्रोहाची चळवळ उभी करणारा लालडेंगा कराराच्या कलमाची शिडी करून मोठ्या सन्मानाने मुख्यमंत्री होऊ शकतो, शीख अतिरेक्याना मदत करणाऱ्या पाकिस्तानशीही वाटाघाटी होऊ शकतात, देशद्रोही ठरविलेले फारूख अब्दुल्ला पुन्हा सत्तेवर आणले जाऊ शकतात तर मग पंजाबात प्रकाशसिंग बादल गटाशी चर्चा करणे केंद्र सरकारला अवघड का वाटावे ? पुलाखालून इतके पाणी वाहून गेल्यानतर आता खुद्द पंतप्रधान मुख्यमंत्री ज्योती बसूसह दार्जिलिंगला जाऊन समस्या जाणून घेणार आहेत. पण हे शहाणपण आधीच का सुचू नये ? गळ्यापर्यंत आल्याशिवाय समस्या सोडवायच्याच नाहीत हे आपल्या मातोश्रीचे धोरणच राजीव गांधी पुढे चालवीत आहेत की काय ?

पंजाब आणि आसाम करार करताना निवडणुकीतला विजय डोळ्यासमोर न ठेवून राजीव गांधींनी पावल उचलली, त्यामुळे निवडणुकीतल्या यशापयशाच्या हिशेबापेक्षा देशहिताच्या विचाराला राजीव गांधी प्राधान्य देतात असा एक वकिली छापाचा मुद्दा राजीव समर्थकाकडून मांडण्यात येतो. अर्थात, गुरखाभूमी, काश्मिर आणि चंदिगडच्या प्रश्नावरचं राजीव गांधींच धोरण या युक्तिवादाच्या विरोधात जाणार आहे. प. बंगाल, काश्मिर आणि हरियानाच्या निवडणुकीतील यशापयशाचे हिशेबच मुख्यत: या प्रश्नाच्या निरगाठी न सुटण्यास कारणीभूत आहेत. तसे नसते तर नेपाळी भाषिक गुरख्यांच्या भाषिक, आर्थिक समस्या व त्यांच्या भारतीय नागरिकत्वाचा प्रश्न. हे सारे, गुरखाभूमी आंदोलन राष्ट्रवादी की राष्ट्रविरोधी, या वादात अडकून पडले नसते

एवंच करार–कौस्तुभ राजीव गांधीचे तिन्ही करार ही निव्वळ वरवरची मलमपट्टी आहे, रोगाचे समूळ उच्चाटन नव्हे किंवा रोग उद्‌भवूच नये यासाठीची प्रतिबंधात्मक उपाययोजना तर नव्हेच नव्हे.

अर्थात राजकारण हा वेळ निभावून नेण्याचा किंवा वेळ घालविण्याचा एक उद्योग अशीच धारणा ठेवून सत्ताधीश झालेल्यानी सर्वच क्षेत्रात हे धोरण अवलंबिल्यास नवल नाही त्यामुळे कुठे नवीन शैक्षणिक धोरणाचा झेंडा फडकव, कुठे अपना उत्सवची आतषबाजी कर, कुठे वर्णभेदाविरुद्ध जागतिक आघाडी उघड असा सगळा प्रकार चालला आहे प्रभावी विरोधाच्या अभावी हा सगळा प्रकार अनिर्बंधपणे सुरूच आहे ! □

**इंडिया टुडे–**

सर्वसाधारण अभिमत असे आहे की श्री. गांधी हे धरसोड वृत्तीचे आहेत. अनेकदा त्यांचे धोरण गुळमुळीत असते व कैकदा ते दबावाला बळी पडतात. त्याना योग्य *जागेसाठी योग्य माणूस शोधता आलेला* नाही यावरून त्यांच्या सल्लागाराची प्रत समजून द्यावी. त्यानी भ्रष्टाचार निपटून काढण्याचे आश्वासन दिले होते, प्रत्यक्षात भ्रष्टाचार जास्त महाग झाला आहे. सत्तेच्या राजकारणातले दलाल त्याना हटवायचे होते पण प्रत्यक्षात त्यांचे आसन मजबूत आहे.

त्यानी एकाच वेळी अनेक आघाड्यांवर लढाई सुरू केली खरी, पण प्रत्यक्षात फारच थोडे 'घडून' आले आहे. काही बदल व्हावा म्हणून लोकांनी त्याना निवडून दिले, आजमितीस मात्र बदल जवळपास शून्यवतच आहे

–१५ जानेवारी ८७

# कॉंग्रेस कल्चर पॉवर कल्चर

## चारुदत्त देशपांडे

कॉंग्रेस (स) च्या औरंगाबाद येथील अधिवेशनासाठी मुंबापुरीहून पत्रकाराना घेऊन निघणारी आरामगाडी पाच डिसेंबरला सकाळी साडेआठला निघाली. ह्या आधी महाराष्ट्रातील सर्व प्रमुख वृत्तपत्रांतून पवारांची मुलाखत छापून आली होती मुंबई ते औरंगाबाद हा जवळजवळ दहा तासांचा प्रवास वाटेत जागोजाग ठळक अक्षरात फलक लिहिलेले शरद पवार झिंदाबाद-चलो औरंगाबाद.

गाडी पनवेलला सकाळी दहाच्या सुमारास पोहोचली. बस स्थानकासमोरील हॉटेल मध्ये पत्रकाराचे स्वागत एक एक गुलाबाचे फूल देऊन करण्यात आले. यशवंतराव चव्हाण आणि शरद पवार ह्यांच्या 'स्वगृही' परतण्याच्या मूलभूत उद्देशात फरक नसला तरी पद्धतीतील वेगळेपण जाणविण्याइतके स्पष्ट होते. पवाराचे *आगमन ही काळाची* गरज आहे ह्यावर पत्रकाराचे एकमत होण्याची शक्यता निर्माण झाली होती !

खुद्द औरंगाबादमध्ये मात्र वातावरण थोडे थंड होते. खडकपुऱ्यांतील अधिवेशनाच्या ठिकाणीही लग्न प्रसंगी चालावी अशी *लगबग नव्हती. देशांतील वेगवेगळ्या भागा*तून ५० ते ६० पत्रकार हा अपूर्व सोहोळा पाहण्यासाठी आले होते–आणण्यात आले होते. त्या त्या वृत्तपत्राच्या किंवा वृत्तसंस्थेच्या दर्जानुसार पत्रकाराची राहण्याची सोय पंचतारांकित ते वितारांकित हॉटेलमधून करण्यात आली होती काही पत्रकार तर अधिवेशनाच्या दोन दोन दिवस आधीच औरंगाबादमध्ये तळ ठोकून होते.

सहा तारखेला सकाळपासूनच AICC (S) च्या वर्किंग कमिटीची बैठक चालू झाली. *सध्याकाळी पाच वाजेपर्यंत विलीनी*करणाचा अंतिम मसुदा पत्रकाराच्या हाती पडेल अशी अपेक्षा होती. परंतु रात्री उशिरापर्यंत बैठक चालल्याने हा मसुदा, सकाळच्या अधिवेशनातच, प्रतिनिधीपुढे मांडताना, पत्रकाराना द्यावा असे ठरले. अधिवेशनाच्या *ठिकाणी अशा प्रकारचे* . वातावरण निर्माण

करण्यात आले होते की आता कॉंग्रेस (स) मधील (स) काढून टाकण्यात येईल आणि त्याचबरोबर कॉंग्रेस (आय) मधील (आय) काढून टाकण्याची घोषणा राजीव गांधी खुल्या अधिवेशनात भाषण करताना करतील पवाराना ह्याबद्दल विचारले की ते मोनालिसाप्रमाणे हास्य करीत त्यामुळे त्याच्या मनात नेमके काय आहे हे कळणे कठीण होत होते

पत्रकार कक्षातील चिकित्सेचा सूर साधारणत असा होता की, ह्या विलीनीकरणानतर महाराष्ट्रातील विरोधी पक्षाचे जवळजवळ खच्चीकरणच होईल. पवार जरी केवळ कार्यकर्ता म्हणून कॉंग्रेस (आय) मध्ये येत असले तरी कार्यकर्ता म्हणून फार काळ कार्य करीत राहणे ही कॉंग्रेस सस्कृतीत बसणारी गोष्ट नव्हे त्यामुळे थोड्याच अवधीत महाराष्ट्राला राजकीय स्थैर्य देण्यासाठी मुख्यमत्री पदावर त्याची नेमणूक केली जाईल ह्याबद्दल कुणाला शका नव्हती. सकाळीच दैनिक लोकमतच्या कार्यालयात झालेल्या पवाराच्या पत्रकार परिषदेत जवाहरलाल दर्डा ह्याच्या चेहेऱ्यावरील भाव पाहता हा काळ सहा-सात महिन्यापेक्षा जास्त असेल असे वाटत नव्हते

शिवसेनेचा वाढता प्रभाव कमी करण्यासाठी पवाराचा कॉंग्रेस (आय) ला उपयोग होईल असा सार्वत्रिक सूर होता. शरद जोशीच्या शेतकरी सघटनेशी मुकाबला करण्यासाठीही पवाराची मदत होईल असे पत्रकाराचे म्हणणे होते. महाराष्ट्रावर दुष्काळाचे सावट पसरले असताना पवारासारख्या खद्या नेतृत्वाची आवश्यकता आहे असाही एक सूर होता.

आठ तारखेला शिवाजी मैदानावर लोटलेली गर्दी ही अभूतपूर्वच म्हणायला हवी. तीन-साडेतीन लाखाचा जनसमुदाय. शरद पवाराच्या शक्ति-प्रदर्शनाचाच हा भाग म्हणायला हवा. मराठवाड्यात आणि पर्यायाने महाराष्ट्रात आपले राजकीय सामर्थ्य काय आहे हे राजीव गाधीना दाखविणे आवश्यक होते. ह्या सभेला गर्दी जमविण्यासाठी जवळजवळ चार हजार ट्रक्सचा वापर केला असे म्हटले जाते. राजकीय सभाना गर्दी जमविण्याचे तत्र आता ठरलेले आहे. त्यामुळे केवळ पवाराना दोष देण्यात अर्थ नाही

राजीव गाधीनी भाषणाच्या सुरुवातीसच कॉंग्रेस (एस) मधील 'बधूचे' कॉंग्रेस (आय) मध्ये स्वागत केले त्यामुळे हे 'एकता अधिवेशन' म्हणजे विलिनीकरण सोहोळाच आहे हे स्पष्ट झाले. राजीव गाधीच्या भाषणाचा सूर पाहता हे अपूर्व भावनोत्कट मीलन आहे असे काही त्याना वाटल्याचे जाणवले नाही. पवार सोडले तर कॉंग्रेस (एस) मधील कोणत्याही नेत्याचा त्यानी उल्लेख केला नाही विलिनीकरणाचा दोनदा केलेला उल्लेख सोडला तर उरलेले भाषण त्यानी अलिप्ततावाद, गोर्बाचेव्ह ह्याची भेट, पर्यावरण आणि शेतकऱ्याचे प्रश्न ह्यावर केले. जनसमुदायाला 'काय पायजेलाय' ह्याचा पवाराना अचूक अदाज असतो. त्यामुळे त्याचे भाषण दमदार झाले फरूख अब्दुल्ला तर पट्टीचे वक्ते आहेत. त्यामानाने राजीव गाधीचे भाषण अगदीच निरुत्साही होते. असो.

पवार ज्याला कॉंग्रेस कल्चर म्हणतात ते खऱ्या अर्थाने पॉवर कल्चरच आहे कॉंग्रेसचे सध्याचे स्वरूप हे, सत्तास्पर्धेत कोणताही विधिनिषेध न बाळगता हिरीरीने भाग घेणाऱ्या छोट्या छोट्या असतुष्ट गटाचा समूह, असे आहे ह्यात आता पवाराचा मोठा गट सामील झाला आहे. ह्या विलिनीकरणाची काळापेक्षाही पवाराना अधिक गरज होती हे लक्षात घेतले पाहिजे. कॉंग्रेस (आय) चे सध्याचे स्वरूप आणि राजीव गाधीची कार्यपद्धती पहाता पुढील दहा वर्षांत तरी विरोधी पक्षासहित अथवा विरहित कॉंग्रेस (स) सत्तेवर येण्याची शक्यता नव्हती पक्षापुढे कोणतीही निश्चित विचारसरणी अथवा ठोस कार्यक्रम नव्हता. अशा परिस्थितीत विरोधी पक्षात बसून नुसते वय वाढत राहू देण्यापेक्षा राष्ट्रीय प्रवाहात विलीन होणे केव्हाही श्रेयस्कर. देश सकटात असला तरी लोकशाहीत विरोधी पक्षाना करता येण्यासारखे विधायक काम असते ह्याची जाणीव अशा कल्चरमध्ये येणे कठीण आहे. राजीव गाधी सत्तेवर आल्यापासून पवाराची महाराष्ट्रातील विरोधीपक्ष नेता म्हणून कामगिरी मोठी भरीव होती अशातला भाग नाही. 'तू मारल्यासारखे कर मी रडल्यासारखे करतो' असाच प्रकार होता.

धार्मिक कारणावरून देशातील वेगवेगळ्या भागात झालेल्या दगलीना तोड देण्यात सत्ताधारी पक्षाला आलेल्या अपयशामुळे शिवसेनेसारख्या प्रादेशिक पक्षाचा जोर वाढतो आहे पजाब आणि काश्मीर येथील घटनामुळे हिंदू एकत्रीकरणाची जी प्रक्रिया देशभर सुरू झाली आहे, त्याचाच शिवसेनेचे वाढते पाठबळ हा एक भाग आहे. ह्यातील योग्यायोग्यतेचा भाग सोडला तरी पवाराच्या कॉंग्रेसप्रवेशाने हा प्रभाव कितपत कमी होईल हा प्रश्नच आहे.

शरद जोशीची शेतकरी सघटना ही चळवळ आहे ज्या वेळेस समाजाच्या मूलभूत प्रश्नाना अनुसरून आदोलन उभारले जाते त्यावेळेला त्याला मिळणारा प्रतिसाद हा उत्स्फूर्त असतो सघटनेच्या सभाना जमणारी गर्दी आणि पवारानी जमविलेली गर्दी ह्याची गल्लत करता कामा नये पक्षाचे माध्यम हे लोकशाहीतील सत्तास्पर्धेचे साधन झाले आहे केवळ सत्ता हेच उद्दिष्ट असणाऱ्या पक्षसघटनेद्वारा अशा चळवळीना पवार कसे तोड देऊ शकतील, हाही महत्त्वाचा प्रश्न आहे

आता विलिनीकरणानतर कॉंग्रेस (एस) मधील पदाधिकाऱ्याचे काय ? शिवाजीराव पाटील गट, वसतदादा पाटील गट, रामराव आदिक गट, बाबासाहेब भोसले, मुरली देवरा याचे चेले वगैरेचे काय ? ह्या सर्व चक्रव्यूहातून मुख्यमत्रिपदापर्यंत जाईस्तोवर पवाराना महाराष्ट्रातील प्रश्नाचे कितपत भान राहील ? पवाराचा कॉंग्रेस प्रवेश हा खरोखरच इतका भव्यदिव्य प्रसग होता का ?

Congress culture is power—Pawar's culture is Congress and hence Pawar needs power. एवढाच त्याचा मतितार्थ.

— बाकी औरगाबादमध्ये पाहण्यासारख्या गोष्टी म्हणजे पाणचक्की, वेरूळ, दौलताबादचा किल्ला आणि बिबीका मकबरा !

□

**इंदर मल्होत्रा...**

देशासमोरच्या एखाद्या प्रश्नाचा सर्वकष विचार करून, त्या गुतागुंतीच्या आणि किचकट समस्येच्या दूरगामी परिणामांची चिकित्सा करून (मगच) एखादा निर्णय केल्याचे उदाहरण क्वचितच दिसून येते. एखाद्या तात्कालिक निर्णयाचे दूरगामी परिणाम फारसे लक्षात घेतले जात नाहीत. अनेक गंभीर प्रश्नाबाबत मिळणारी उत्तरे क्षणिक आणि सहजगत्या केलेल्या विचारातून उद्‌भविल्यासारखी असतात. आगामी काळासाठी दूरगामी विचारातून आकारास आणलेल्या राजनीतीऐवजी विविध विषय हाताळण्याचे धोरण ठरविले जाते ते दैनंदिन, विषयानुरूप किंवा घटनानुरूप प्रतिक्रियांच्या माध्यमातून.

इंदिरा गांधींच्या काळात मिळत होते त्याहीपेक्षा कमी स्वातंत्र्य आजच्या कॅबिनेट मंत्र्यांना मिळते. अधिकार तर सोडाच, अनेक मत्र्यांना आज स्वतःची अशी 'प्रतिमा'ही नाही! केंद्रीय मत्रि-मंडळाची राजकीय व्यवहार समिती ही केवळ एक तांत्रिक व्यवस्था झाली आहे.

अरुणाचलाच्या सुमदोरोंग चू खोऱ्यात चीनने घुसखोरी केल्या-पासून चीनची विधाने आणि कृती यांना भारताचा प्रतिसाद फक्त पत्रकाद्वारे प्रतिक्रियेच्या स्वरुपातच राहिला आहे.

टाइम्स ऑफ इंडिया
दि. १ जानेवारी ८७

**निखिल चक्रवर्ती...**

देशाचा आजचा मूड नेमका काय आहे? (१९८४ च्या निवड-णुकीच्या वेळी व्यापून असलेली, देशाच्या एकात्मतेला गंभीर धोका निर्माण झाल्याची) भीतीची भावना अद्याप सर्वत्र आहेच. एकात्मतेला उत्पन्न झालेल्या धोक्यासह जीवन जगण्याची कल्पना देशाने आणि देशाच्या नेत्यानी स्वीकारलेली दिसते.

अनेक विषयांबाबतची दुरवस्था बघितल्यानंतर आज कोणालाही जो एक प्रश्न विचारण्याचा मोह होतो, तो हा की राजीव गांधी सरकारला खरोखरच काही धोरण वगैरे आहे काय? देशाच्या आर्थिक रचनेत सार्वजनिक क्षेत्राचे नेमके काय स्थान आहे? आपल्या आर्थिक धोरणातील उदारमतवादी प्रवाहाची परिणती नेमकी कशात व्हायचीय याची केंद्राला कल्पना आहे? जातीयवाद आणि निधार्मिकता म्हणजे नेमके काय हे सरकारला ठाऊक आहे?

सत्ता साभाळण्याच्या गेल्या दोन वर्षांच्या अनुभवातून राजीव सरकारने काही शहाणपण शिकण्याची गरज आहे. नवी घोषवाक्ये, नामाभिधाने या क्लृप्त्या आता बस्स झाल्या!

"माझ्या कुटुंबात समन्वय साधायला उपयोगी पडलं आम्रखंड."






"सणासुदीचे दिवस आले की माझ्यापुढे नेहमी एक समस्या उभी रहायची. माझ्या मुलांना हवा 'आमरस' तर आमच्या ह्यांना आवडतं 'श्रीखंड'.

पण मॅफकोच्या '**आम्रखंड**'नं माझी समस्या सोडवलीयं

**आम्रखंड** म्हणजे निवडक हापूस आंब्यांचा रस आणि सकस श्रीखंड यांच मधुर मिश्रण.

आणि ते बारा महिने तेरा काळ केव्हाही मिळतं.

तेव्हा आता गणपती, दसरा, दिवाळी किंवा अन्य कोणताही सणवार असो, तो थाटात साजरा करायला मी केव्हाही सिद्ध आहे."

**आम्रखंड**. १०० ग्रॅम आणि ५०० ग्रॅमच्या सुंदर पॅकमधून सर्व मॅफको विक्री केंद्रांवर उपलब्ध.

Interpub/Mafco/1/87 Mar

मॅफकोचे आम्रखंड
Mafco

आम्रखंड—श्रीखंड आणि आंबा यांचे मधुर मिलन

# टॉफलर विचार दर्शन

आधुनिक जगातील दूरदर्शी आणि विचारवंत लेखकामध्ये अल्विन टॉफलर यांचे स्थान महत्त्वाचे आहे. त्यांचा जन्म १९२८ साली एका मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. १९५० साली न्यूयॉर्क विद्यापीठातून पदवी घेतल्यावर त्यांनी मध्य अमेरिकेतील औद्योगिक विभागाकडे प्रयाण केले. त्याच्यावरोबर त्यांची मैत्रिण हेडी ही होती. तेथे कारखान्यात अनेक अंगमेहनतीची कामे त्यानी केली. त्यात वेल्डिग, पंच प्रेस चालविणे, फोर्क लिफ्ट चालविणे, कन्व्हेयर बेल्टची दुरुस्ती वगैरे अनेक कामाचा अंतर्भाव होता. फौड्रीतील धुराचा, धुळीचा, गरमीचा प्रत्यक्ष अनुभव त्यानी घेतला. अनेक असुरक्षित कार्यपद्धती व व्यवस्थापकाची बेजवाबदारी त्यांनी पाहिली. त्यांची पत्नी हेडी ही अशाच एका कारखान्यात काम करीत होती. पाच वर्षे त्यानी कारखान्यातील कामाचा अनुभव घेतला

पदवीधर असूनही कारखान्यात काम करण्याच्या उद्देशाविषयी एका मुलाखतीत टॉफलर म्हणतात–

" त्याकाळी कारखाने, निरनिराळी यत्रसामुग्री असणाऱ्या फॅक्टरीज आम्हाला देवालयासारख्या होत्या विद्यापीठाच्या रम्य परिसरातून ' खऱ्या जगात ' येण्याचा मोह होता व थोडे स्वप्नरजनही होते. स्टाईनबॅक द्राक्षाच्या मळचात काम करीत होता. जॅक लंडनने बोटीवर काम केले होते. अनेक साहित्यिक ट्रक चालविणे वगैरे कामे करीत होते. आपणही कारखान्यात काम करून कामगारजीवनावर कादंबरी लिहावी असा विचार होता.

या काळात टॉफलर याच्यावर मार्क्सवादाचा प्रभाव होता एका ठिकाणी ते म्हणतात, " त्यावेळच्या सर्व तरुणाप्रमाणे मी मार्क्सवादी होतो व सर्व प्रश्नाची उत्तरे माझ्यापाशी होती. नंतर कळले की उत्तरेच नव्हे तर खरे प्रश्न नीट समजले नव्हते. चुकीच्या वा असबद्ध प्रश्नांची योग्य आणि चपखल उत्तरे शोधण्यापेक्षा, योग्य प्रश्न शोधणे अधिक महत्त्वाचे आहे हे नंतर कळले. " मार्क्सवाद अपुरा, एकांगी आहे असे आता टॉफलर याचे मत असले तरी मार्क्सवादाचा अभ्यास त्याच्या दृष्टीने महत्वाचा आहे. ते लिहितात, " To be ignorant of Marx in today's world is to be semi-literate.

टॉफलर यानी या काळात वेल्डिगवर पुस्तिका लिहिली, तसेच कामगारचळवळीवर अनेक नियतकालिकात लिखाण केले. ख्रिश्चन सायन्स मॉनिटर व वॉशिग्टन स्टार यात त्याचे लेख प्रकाशित होत असत. १९६४ साली त्यानी FORTUNE,या नियतकालिकात सहसपादकाची नोकरी पत्करली. १९६८ साली American Telephone and Telegraph – AT and T या अमेरिकेतील सर्वात मोठ्या कपनीने त्याच्याकडे एक काम सोपविले AT and T च्या कारभाराचा अभ्याम करून भविष्यकाळात काय फेरबदल करावे, याविषयी रिपोर्ट देणे, असे हे काम होते. १९७२ साली हा रिपोर्ट टॉफलर यांनी या कपनीस दिला. १९८५ मध्ये हाच रिपोर्ट Adaptive Corporation या नावाने प्रसिद्ध झाला आहे.

१९७० साली FUTURE SHOCK हे पुस्तक त्यानी प्रकाशित केले व ते प्रसिद्धीच्या झोतात आले. या पुस्तकाने विक्रीचे अनेक उच्चाक प्रस्थापित केले. १९८० साली त्यानी THIRD WAVE हे पुस्तक प्रसिद्ध केले. दोन्हीही पुस्तकांचा विषय एक असला तरी दोन्हीही पुस्तके स्वतत्र व एकमेकाना पूरक आहेत. या दोन्हीही पुस्तकाच्या आधारे त्याच्या समग्र वैचारिक बैठकीचे परिशीलन पुढील लेखांतून केले आहे. मराठीत तरी हा विषय इतक्या विस्ताराने व एकत्रितपणे प्रथमच येत आहे नव्या कालखंडास Super industrialism अशी सज्ञा टॉफलर यानी FUTURE SHOCK या पुस्तकात वापरली आहे, परंतु नवीन कालखंड म्हणजे यत्रयुगाची सुधारून वाढविलेली आवृत्ती असा गैरसमज होण्याचा संभव असल्यामुळे पुढील पुस्तकात Super Indusrtialism ही सज्ञा त्याज्य ठरवून THIRD WAVE ही सज्ञा त्यानी वापरली. १९८३ साली डाव्या विचारसरणीच्या रिपोर्टरने टॉफलर याच्या मुलाखती घेतल्या. त्यावर आधारित Preview and Premises हे पुस्तक टॉफलर यानी प्रसिद्ध केले.

# टॉफलर पुस्तक पुरवणी




# भविष्याचा आघात

नजिकच्या भविष्यकाळात मानवजातीच्या जीवनात केवढी उलथा-पालथ होऊ घातली आहे ! आपली घरे–दारे, शहरे, आपल्या सामाजिक संस्था, उद्योगधंदे आणि आपले भाईबंद कसे असतील इ. मानवाच्या भावी जीवनाचे वैज्ञानिक अंदाजावर आधारलेले चित्रच या धाडसी ग्रंथामध्ये रेखाटलेले आहे. त्यासाठी अनेक तज्ज्ञांनी पुरविलेल्या माहितीचा आधार परिश्रमपूर्वक लेखकाने घेतला आहे. लेखकाच्या मते सामाजिक परिवर्तनाचा वेग आता एवढ्या झपाट्याने वाढत आहे की सतत द्रुतगतीने बदलत जाणाऱ्या जीवन–परिस्थितीशी मिळतेजुळते घेऊन सुखासमाधानाने जगणे मानवाला कितपत शक्य होईल याविषयी चिंता वाटू लागली आहे. मानवाच्या जीवन–समायोजन क्षमतेला हे एक भयंकर आव्हान आहे. त्याचा यथोचित गांभीर्याने विचार करून, या समस्येच्या परिहारासंबंधी वैज्ञानिक विचार आपण आताच करायला हवा– या दृष्टीने विचारवंतांना आवाहन करणे हा या ग्रंथाचा उद्देश आहे. याहीपुढे जाऊन या परिस्थितीतून मार्ग कोणत्या रीतीने काढता येईल याविषयी काही सूचनात्मक विचारही शेवटी ग्रंथकर्त्याने मांडले आहेत. सारांश, विचारी मानवाने केवळ 'भूतकाळाच्या अनुभवाने' शहाणे होण्याऐवजी 'भविष्यकाळाच्या अंदाजाने' शहाणे होणे अधिक शहाणपणाचे ठरेल. कारण

भविष्याचा वज्राघात आता आपल्या मस्तकावर पडण्याच्या बेतात आहे 'भविष्याचा आघात' ही 'सज्ञा अल्पकालावधीत अतिवेगाने होणाऱ्या सर्वंकष स्वरूपाच्या सामाजिक-भौतिक परिवर्तनामुळे मानवी जीवनाची घडी विस्कटून जाणे'— या परिस्थितीस अनुलक्षून ग्रथकर्त्याने वापरली आहे.

मानवी इतिहास सुमारे ५०,००० वर्षांचा आहे; म्हणजे प्रत्येकी ६२ वर्षांच्या सुमारे ८०० पिढ्या त्यात बसतात. पहिल्या ६५० पिढ्यातली माणसे गुहातच राहत. गेल्या फक्त ७० पिढ्यामध्येच चिन्हलिपीद्वारा पिढ्यामधील 'सवाद' (कम्युनिकेशन) शक्य होऊन गेला, ६ पिढ्यातच छापण्याच्या कलेमुळे ज्ञानप्रसार झाला. धन-धान्यादिकाची समृद्धी या पिढीत लाभली आहे ऊ थान्ट याने म्हटल्याप्रमाणे आताच्या अति-औद्योगिक समाजात आता प्रथमच मानवाचे निर्णय त्यांना उपलब्ध होणाऱ्या साधन-सामग्रीवर अवलंबून नसून उलट साधनसामग्रीची उपलब्धीच मानवी निर्णयावर अवलबून आहे मानवी इतिहासातील हे सर्वांत मोठे क्रांतिकारक परिवर्तन होय. जागतिक घटनाचे बदल एवढ्या वेगाने होत आहेत की, त्याची प्रचीती (फील) आता वेगळ्याच स्वरूपात येत आहे. जीवनाच्या कोणत्याही 'उत्कट' अनुभवामध्ये पूर्वी 'शाश्वती' (पर्मनन्स) चा प्रत्यय येई. आता तसा प्रत्यय येत नाही, उलट सर्वच जीवनानुभवात एका 'चिरस्थायी क्षणभंगुरतेचाच' अनुभव येत आहे. याचा परिणाम मानवाच्या व्यक्तित्वावर किती व कसा होत आहे याची दखल अद्यापि मानसशास्त्राने घेतली नाही. जीवनाच्या घोडदौडीमुळे आपले भूतकाळाशी सबध तुटले आहेत आणि भविष्यकालीन समाजाविषयीच्या आपल्या अज्ञानामुळे आपण 'अंधारातच उडी' घेत आहोत. एका बाजूस जीवनवेगाची द्रुतता (अॅक्सलरेशन) आणि दुसऱ्या बाजूस अशाश्वती-भावना (ट्रॅंझिअन्स) याचा प्रभाव मानवी जीवनावर अपरिहार्यपणे पडत चालला आहे.

### वैज्ञानिक विकासाचा वेग

परिवर्तन सापेक्ष असते. प्रत्येक वस्तू ही वस्तुत एक प्रक्रियाच असते. काही प्रक्रिया जलद तर काही सथगतीने होतात. 'कल्चरल लॅग' या सज्ञेने याचाच बोध होतो आणि 'काल' रूपी चलनामध्येच या प्रक्रियामधील कमी-अधिक वेगाचे मापन केले जाते. या विविध प्रक्रियाची गती आता वाढत आहे. १९६७ मध्ये कॅनडातला एक ११ वर्षांचा मुलगा 'वार्धक्या'ने मेला. वार्धक्याची सर्व चिन्हे त्याच्यात होती. डॉ. भाभानी म्हटले आहे की ख्रिस्तानतरच्या साडेअठरा शतकाच्या काळात मानवजातीने दर शतकात '½ Q' एवढी ऊर्जा वापरली असेल तर १८५० मध्ये तिच्या वापराचे प्रमाण दुप्पट झाले आणि आज ते वीसपट झालेले आहे. औद्योगिक उत्पादनातील वाढ १९१०-३९ या काळात ५ टक्के झाली, तर १९४८-६५ या काळात ती २२० टक्के झाली. सामान्यतः प्रगत औद्योगिक देशात ही वाढ दर १५ वर्षांनी दुपटीने होते. म्हणजे आज २० वर्षांचा मुलगा आहे अशी कल्पना करू. त्याच्या जन्माच्या वेळी त्याच्या आई-बापाच्या जीवनात जेवढा एकूण वस्तुसभार होता त्याच्या दुप्पट वस्तुसभार आज त्याच्या जीवनात आहे. तो ३० वर्षांचा होईल तेव्हा तो आणखी एकदा दुपटीने वाढेल आणि त्याच्या एकूण ७५ वर्षांच्या जीवनात अशी दामदुप्पट एकूण ५ वेळा झालेली असेल. औद्योगिक उत्पादन-वाढीचा परिणाम माणसाच्या सवयी, श्रद्धा, आत्मप्रतिमा यावर होणारच. शिवाय एका तत्र-प्रक्रियेमधून इतरही प्रक्रियामधील बदल अवश्य ठरतात. प्रथम एखादी नवी तत्र-कल्पना कुणाला तरी सुचते; नतर तिची व्यावहारिक कार्यवाही होते आणि शेवटी तिचा समाजात व्यापक प्रसार होतो. या तीनही अवस्थामधून तत्रविज्ञान जात असताना त्यामध्ये उत्तरोत्तर अधिकाधिक वेग येत जातो १६ व्या शतकात पॅरॅसेल्सस् याने ईथरचा भूल देण्याचा गुणधर्म शोधून काढला, पण त्याचा प्रत्यक्ष व्यावहारिक उपयोग काही शतकानतरच होऊ शकला. टाइपरायटरचे पहिले पेटट १७१४ मध्ये मिळाले; पण बाजारात टाइपरायटर्स १५० वर्षांनंतरच आले. म्हणजे नवी कल्पना व तिचे उपयोजन व प्रसार यांमध्ये बराच कालावधी जातो. आता मात्र हे उपयोजन लगेच होते. कारण तत्रविज्ञान हे आत्मपोषक (सेल्फ फीडिंग) असते. एका सुधारणेमुळे इतर अनेक अनुषगिक सुधारणा होऊन एकूण तत्रविज्ञानाची 'पातळी'च उचावते. शिवाय त्यामधून इतरही जीवनक्षेत्रामध्ये-सामाजिक, राजकीय व व्यक्तिगत बदल होतात. न्यूटनच्या काळी घड्याळे होती त्यावरूनच त्याला विश्वरचनेविषयीचा विख्यात अभ्युपगम सुचला. तशीच कार्यकारण कल्पना, उद्दीपनाचे मानवी वर्तनावरील परिणाम इ. कल्पनाही सुचल्या. आजही कॉम्प्युटरमुळे अशीच सामाजिक-मानसशास्त्रीय क्रांती होत आहे. प्राचीन काळापासून मानव ज्ञानाची जपणूक व प्रसार करीत आला आहे. १६ व्या शतकाच्या सुरुवातीस सर्व युरोपात दरसाल फार तर १००० पुस्तके छापली जात. १९५० मध्ये दरसाल १,२०,००० आणि १९६५ मध्ये सरासरी दररोज १००० या वेगाने पुस्तके तयार होत आहेत. वैज्ञानिक विचाराचाही वेग वाढत आहे. १५ व्या शतकात फक्त ११ रासायनिक मूलद्रव्ये माहीत होती. १२ वे मूलद्रव्य पुढे २०० वर्षांनी सापडले. त्यानतरच्या ४०० वर्षांत आणखी नव्या ७० मूलद्रव्याचा शोध लागला.

### अस्थिर जीवन / मूषक शर्यत

आपल्या सामाजिक विज्ञानामध्ये 'द्रुत-परिवर्तनाची' कल्पना अगदी नवी आहे व ती अद्यापि आपण पचनी पाडलेली नाही. बाह्य

---

ऑल्विन टॉफलर यांचा 'फ्यूचर शॉक' हा ग्रंथ १९७० मध्ये प्रसिद्ध झाला. पाश्चात्त्य प्रगत देशांतील सद्यःस्थितीचे आणि आगामी काही वर्षांत या देशात सर्व पातळ्यावर घडून येऊ शकणाऱ्या विस्मयजनक आणि धक्के देणाऱ्या प्रक्रियांचे स्वरूप टॉफलरने आपल्या ग्रंथात स्पष्ट केले आहे. अशा या विख्यात ग्रंथाचा हा सविस्तर परिचय.

---

परिस्थितीत बदल झाला की, आतरिक मन.प्रक्रियाच्या वेगातही बदल होऊ लागतो. हे परिवर्तन 'समातर' असते. व्यक्तीचे जीवन हे एक नरसाळे (फनेल) आहे अशी कल्पना केली तर त्यामधून जीवनातील अनेक 'घटना' (सिच्युएशनस) ओतल्या जात असतात. प्रत्येक घटनेला जसे स्थळ, काल, सदर्भ असतो तसेच तिला काही विवक्षित 'सातत्य' (ड्युरेशन) असते. आता हे घटनेचे 'सातत्य' सकोच पावत आहे आणि त्यामुळे घटनाचे मूळ स्वरूपही वेगळयाच रीतीने आपल्या अनुभवास येत आहे. शोकगीताचा वेग वाढविला तर ते आनंदगीत बनते. परिवर्तनाच्या वेगामुळे घटनाची 'रूची' (फ्लेवर) बदलते आहे. 'बाह्य घटनामध्ये बदल झाले की त्याच्या अनुभवामध्येही बदल झालेले आपल्या प्रतीतीस येतात.' असे क्रिस्टोफर राइट याने म्हटले आहे अतर्बाह्य परिवर्तन झपाटयाने होत असताना जीवनाला 'स्थैर्य' कसे आणायचे ? आपल्या जीवनाला स्थैर्य देणाऱ्या सर्वच सामाजिक संस्था–राष्ट्र, धर्म, जमात, कुटुब इ. आता मलिन होत चालल्या आहेत. अस्थायीपणा, अशाश्वतीचा प्रभावी प्रत्यय आता येऊ लागला आहे.

मुलाच्या खेळण्यातले शिपाई, त्याच्या पाठीतील किल्ली दिल्याबरोबर झपाट्याने धावू लागतात. अलीकडच्या अमेरिकन, जपानी अति–औद्योगिक समाजातील माणसेही जणू काही त्याच्या 'पाठीतली किल्ली' कोणी तरी फिरवल्यासारखी वेगाने कुठेतरी दौडत निघाली आहेतसे वाटते. मोठ्या शहरामध्ये हे 'मूषक–शर्यती' (रॅट रेस) चे दृश्य दररोज दिसते. काही माणसाना, विशेषत: वृद्ध माणसाना या जीवनाच्या वेगाचा उबग येतो. वृद्धाच्या जीवनप्रक्रिया मदावतात• त्याना वर्षाचा कालावधी झटकन सपल्यासारखा वाटतो. उत्तरोत्तर 'वर्षे' लहान होत जातात. उलट मुलाच्या जीवन प्रक्रिया जलद चालतात. त्याना कालप्रवाह फार सथ वाटतो. खाऊसाठी तासभर थाबणे त्याना असह्य होते त्याच्या आईला तिच्या सकाळच्या चहाच्या कपासाठी 'सहा तास' थाबायला सागण्याइतकेच हे त्याना असह्य होत असते.

अशा वेगवान परिवर्तनाच्या काळात वृद्धाना सुखासमाधानाने राहणे हे अशक्यच आहे त्यांच्यासाठी 'सथगतीने जीवनप्रवाह चाल• णाऱ्या खास वसाहती' च निर्माण व्हायला हव्यात खरोखर मानवाचे वैज्ञानिक वर्गीकरण करावयाचे झाले तर ते त्याच्या जीवनवेगाच्या निकषावरच करणे इष्ट होईल वृद्ध आणि तरुण, बाप आणि मुले, पती आणि पत्नी याच्यामधील अलीकडे दिसणारा दुरावा किंवा सघर्ष, अशत. तरी, त्याच्या जीवनवेगाला अनुलक्षून प्रतिक्रिया करावयाच्या क्षमतेमधील फरकामुळेच घडून येत असणे शक्य आहेसे वाटते भोवतालच्या भौतिक–सामाजिक घटनामध्ये किती झपाटयाने बदल होत आहे, या विषयीचे सातत्य अपेक्षण (ड्युरेशनल एक्स्पेक्टन्सी) करता येणे हे पोक्ततेचे व परिपक्व मानवतेचे लक्षण आहे. या परिवर्तनाच्या वेगाचे सवेदन हे जरी व्यक्तीच्या वयोमानानुसार, तिच्या जीवनाच्या लयीनुसार होत असले तरी त्याला अनुलक्षून आपल्या जीवन–प्रक्रियाचा यथायोग्य वेग निश्चित करणे हे भोवतालच्या सामाजिक–सांस्कृतिक परिस्थितीचे आकलन करूनच ठरवावे लागते हे आकलन करावयास तरुण पिढीला शिकविणे हे आज शिक्षणाचे महत्त्वाचे कार्य आहे परतु नेमके याच बाबतीत आपले शिक्षण तोकडे पडत आहे. भौतिक घटना, प्रक्रिया आणि सामाजिक सबध व आतरक्रिया याच्या कालसातत्याबद्दलच्या रास्त अपेक्षा मुलाच्या मनामध्ये ठसविल्यावाचून या परिवर्तनशील जगाशी समायोजन साधणे त्याना फार कठीण होईल भौतिक परिस्थितीमध्ये वेगाने घडणाऱ्या परिवर्तनास अनुरूप असाच मानवी प्रतिक्रियाचाही वेग वाढविता आला पाहिजे ते ज्याला व जितपत जमते त्याला व तितपतच जीवन–समायोजन साधणे शक्य होईल.

## आघाताची कल्पना

अशाश्वती, प्रवाहित्व, क्षणिकता हीच मानवी अनुभवविश्वाची मध्यवर्ती प्रेरणा होय, हा विचार आता मनात ठसला पाहिजे मानवी अनुभवाचे सामान्यत ५ प्रकारचे घटक असतात. व्यक्ती, वस्तू, स्थाने, सस्था आणि विचार याशिवाय कालगती हाही मानवी अनुभवाचा आणखी एक महत्त्वाचा आयाम मानला पाहिजे. या सर्व घटकाशी आपले सबध आता उत्तरोत्तर अधिकाधिक क्षीण, नीरस, क्षणिक होत चालले आहेत. व्यापारामध्ये 'उलाढाल' ही महत्त्वाची मध्यवर्ती कल्पना असते. तीच कल्पना व्यक्तिजीवनाला लावून त्यामधील एकूण 'उलाढाल' किती प्रमाणात व कोणत्या रीतीने होत आहे याचा विचार केला म्हणजे जीवनातल्या क्षणिकत्वाचा, प्रवाहित्वाचा उत्तम बोध होऊ शकेल. ही जीवनातील विविध अनुभवरूपी घटनाची एकूण उलाढाल, त्याची जटिलता आणि त्याचे नावीन्य याचा विचार केल्यास मानवी समायोजन–समस्येचे गाभीर्य पटून 'भविष्यकालाच्या आघाताविषयी योग्य कल्पना करणे शक्य होईल.

माणसे आणि त्याचा जीवनावश्यक वस्तुसभार याचा सबध आता कमालीचा तात्पुरता व अनित्य झाला आहे कागदी हातरुमाल, बाटल्या, कप, टूथब्रश–सर्व काही क्षणभरच टिकणारे, एकदा उपयोग करून लगेच फेकून द्यायचे. जुना कपडा धुण्याचा खर्च नव्या कागदी कपडयाच्या किंमतीपेक्षा जास्त, मग वस्तूच्या 'टिकाऊपणा' चे महत्त्व काय ? घराची आयुर्मर्यादा पूर्वी निदान १०० वर्षांची तरी असे, आता फक्त ४० वर्षे. जुनी घरे लवकरच स्मृतिशेष होतात न्यूयॉर्कसारख्या शहरात एका रात्रीतून मोठ्या इमारती नाहीशा होतात. आता आपण न्यूटनच्या भक्कम यात्रिक जगामधून आइन्स्टाइनच्या 'सापेक्षवादी' जगात आलो आहोत, याचा सतत पडताळा मिळतो. 'टिकाऊपणा' चे अर्थशास्त्रीय महत्त्वच नाहीसे झाले. नित्य नवे मॉडेल हवे असते. जुने मॉडेल जेवढे 'टाकाऊ' असेल तेवढे सोयीचे पडते. शाळाच्या इमारतीसुद्धा आता सतत नवे रूप धारण करतात. वर्गाच्या भिंतीची काढघाल करणे सोपे असते. तात्पुरते क्रीडागणही तयार करता येते सर्व काही आता 'मॉड्यूलर' बनले आहे. इमारतीचा संपूर्ण सागाडा तेवढा पक्का, आतले सर्व भाग सहज बदलता येण्याजोगे स्थापत्यातही हा लवचिकपणा आला आहे मिस् लिटलवुड हिने एका थिएटरचे डिझाईन तयार केले आहे. त्यात गरजेप्रमाणे सभा घेण्यासाठी मोठा हॉल, नर्तनासाठी व नाटकासाठी रगमच, बॉक्सिग रिंग–वाटेल ते तयार होऊ शकते. मानव आणि त्याचा जीवनावश्यक साहित्यसभार याचे सबध आता असेच तकलुपी, तात्पुरते बनले आहेत. त्यात आत्मीयता, जिव्हाळा नाही. मानव आणि त्याचा भौतिक परिसर यामध्ये आता 'जेवढयास तेवढेच' सबध शिल्लक उरले आहेत.

## क्षणिकता प्रवृत्ती

अशाश्वतीचा आणखी एक पुरावा म्हणजे 'भाडोत्री' वस्तूंचा व्यापार. आता सर्व काही 'भाड्याने' मिळू शकते. अति-औद्योगीकरणाचाच हा परिणाम होय. वस्तू भाड्याने, तात्पुरत्या गरजेसाठीच घेणे याच्या मुळाशी मनात मुरलेली 'क्षणिकता-प्रवृत्ती'च आहे. कोणत्याही वस्तूमध्ये मन गुंतून पडत नाही. 'ममत्व' वाटत नाही. तिचा तात्पुरता उपभोग घेऊन फेकून देणे–एवढापुरतेच तिचे क्षणिक महत्त्व. काही लोक मोटार दरसाल बदलतात. अनेक लोक मोटार विकत घेतच नाहीत, पार्किंगची सोय करणे कठीण म्हणून. रोज वेगळी मोटार भाड्याने घेतात. काही मोठमोठी दुकाने फक्त भाड्याने देण्याच्या वस्तूंचाच व्यापार करतात. जीवनाचा प्रवास अगदी 'हलका फुलका' करण्याची प्रवृत्ती वाढत आहे.

आपला माल 'जुनाट' होऊन आपले गिऱ्हाईक घटेल अशी भीती कारखानदारांना पूर्वी वाटे. आता थोड्याच काळात आपला पहिला माल 'जुनाट' ठरावा व नव्या डिझाइनचा माल आपल्याला तयार करता यावा यासाठी कारखानदार 'वस्तू त्वरित टाकाऊ व्हावी अशी व्यवस्था' (प्लॅनड् ऑबसोलेसन्स) करू लागले आहेत. टिकाऊ माल म्हणजे जुनाट, टाकाऊ–अशीच लोकांची भावना असते. त्यामुळे उत्पादित मालाचे सरासरी जीवनमान ५–७ वर्षांवरच आले आहे. काही माल तर फक्त काही आठवडेच बाजारात राहणार आहे हे गृहीत धरूनच बनविला जातो. पूर्वीच्या काळी 'टूम' म्हणून वापरात येणारा मालच (फॅड प्रॉडक्टस) एवढा अल्पजीवी असे. आता सर्वच माल अशाच धोरणाने बनविला जात असतो. मानव आणि त्याचा जीवनावश्यक वस्तुसंभार यामधील संबंध आता निर्ममत्वाचे, कोरडे, तात्पुरते झालेले आहेत.

## परत एकदा भटके युग

जीवनातल्या वस्तु–माहात्म्याप्रमाणेच 'स्थान–माहात्म्यही' घटत आहे. अमेरिकन्स 'भटके' बनत आहेत. युरोपीय देशांमध्येही तसेच आहे. फक्त दक्षिण अमेरिका, आफ्रिका यांमधील देश तुलनेने 'स्थिर' आहेत. देशातल्या देशामध्येही 'स्थानांतर' सतत करीत राहण्याची प्रवृत्ती वाढली आहे. इंग्लंडमध्ये दरवर्षी राहते घर बदलणारे लोक ११ टक्के आहेत. लंडनच्या वेगवेगळ्या भागात हे प्रमाण वेगवेगळे आहे. ही नवी 'भटकेगिरी' वाढत्या औद्योगीकरणामुळेच असावी. शेतीप्रधान समाजात उद्योगधंदे वाढले की माणसांचे सामाजिक पर्यटन (सोशल मोबिलिटी) दिसून येते; पण अमेरिकेमध्ये अति-औद्योगीकरणाचाच तो परिणाम मानला पाहिजे. युरोपातील बुद्धिवंत अमेरिकेकडे जात आहेत. अमेरिकेतही उत्तरेकडून दक्षिणेकडे त्यांचे पर्यटन होत आहे. एका गावाहून दुसऱ्या गावी जाताना माणूस आपले घर, चीजवस्तू, भांडी वगैरे जेथल्या तेथे ठेवून जातो आणि मग दुसऱ्या गावी त्याला हा सर्व संभार पुन्हा तात्पुरता जुळवावा लागतो. यात वस्तू, स्नेही– अगदी 'कुटुंबीय' सुद्धा येतात. एक अमेरिकन स्त्री म्हणते – 'मी आता घर सजविण्याच्या भानगडीत मुळीच पडत नाही. फक्त गाडीच सजवते.' या पर्यटनप्रियतेमुळे संस्थांचे सदस्य स्थिर असत नाहीत. अनेक संस्थांना त्यांच्या सदस्यांचे पत्तेही ठाऊक नसतात. या नव्या पर्यटनसंस्कृतीचे प्रतीक




अत्याधुनिक जीवनाचा आणखी एक विशेष–
भाडोत्री मनोवृत्ती, तात्पुरते संबंध

'मोटार' हे आहे. शिवाय ते सामाजिक प्रतिष्ठेचेही प्रतीक आहे. मुलाजवळ गाडी असेल तरच त्याला 'डेटिंग' शक्य असते. नोकरी करणाऱ्या अनेक मुली वर्षातून फक्त ७–८ महिनेच नोकरी करतात. बाकीचे दिवस 'हिच हायकिंग' करीत भटकत असतात. पूर्वीच्या काळी 'माणसाचे घर म्हणजे त्याचा किल्ला' असे मानीत, आता घरच नसते. पूर्वीच्या भटक्या जमाती जाताना आपली बायकामुले, म्हातारे–कोतारे, जनावरे, तंबू घेऊन जात. आताचे भटके 'सडे–फटिंग' असतात. माणसांचे स्थानविशिष्ट संबंध आता आत्मीयतेचे राहिले नाहीत.

लेमिंग पक्ष्यांच्या स्थलांतराप्रमाणे दरसाल वसंतऋतूमध्ये सुमारे १५,००० विद्यार्थी–विद्यार्थिनी आपली बॅग, पोहोण्याचे कपडे वगैरे घेऊन फ्लॉरिडाच्या समुद्रकिनारी जातात. तेथे समाजापासून दूरदूर जाऊन एक आठवडाभर सूर्यप्रकाश आणि लैंगिक स्वैराचार यांचा मनमुराद उपभोग घेऊन पुन्हा आले तसे निघून जातात. तेवढ्यात स्थानिक व्यापारी गबर होतात. या ठिकाणी सामाजिक नीतिबंधनांचा विचारही करायचे कारण नसते; कारण पुन्हा या ठिकाणी दीर्घकालपर्यंत यायचेच नसते. या प्रकारचेच सर्व मानवी सामाजिक संबंध उथळ, तात्पुरते व अनित्य झाले आहेत. त्यात 'जिव्हाळा' नसतोच. शहरातली माणसे एकमेकांना अगदी 'पूर्णांशाने' कधीही भेटत नाहीत. त्यांची भेट अंशात्मक असते. त्यात संपूर्ण व्यक्तिमत्त्वाची गुंतवणूक (सेल्फ इन्व्हॉल्व्हमेंट) कधीही होत नसते. प्रत्येक व्यक्तीचे सामाजिक जीवन हे याप्रमाणे अनेक 'आंशिक' संबंधांची बेरीज असते. ते सर्वंकष, जीवाभावाचे कधीही असत नाही. परंतु यात समाधान वाटत नसल्याने कोणाशी तरी 'संपूर्ण जिवा-

भावाचे सबंध ' जोडता येण्यासाठी माणसे आसुसतात व इतस्तत भटकू लागतात. सर्वंकष सामाजिक संबंध ग्रामीण समाजात असतात. पण त्याबरोबर रूढी, शिष्टाचार इ. सामाजिक बंधने पत्करावी लागतात. आता बंधने नको असतात. त्यामुळे संपूर्ण समाधान देणारे सामाजिक संबंध जोडणे कठीण झाले आहे. एवढेच नव्हे तर सामाजिक संबंधाबाबतचे आमचे सातत्य-अपेक्षण आता मुळातच संकोचित झाले आहे. स्थिर संबंधाचा विचारच करणे आता व्यर्थ होत आहे. आता दीर्घ मुदतीची ' मैत्री ' क्वचितच दिसेल. ' सोमवार ते शनिवार ' मित्र फक्त ऑफिसातच भेटतील. शिवाय माणसे सतत व्यवसाय बदलतात. त्यामुळे ही अनिश्चितता अधिकच वाढली आहे आताच्या कर्मचाऱ्याच्या जीवनात एकच सलग व्यवसाय नसतो. आता त्याच्या ' व्यवसायप्रणाली ' बाबतच बोलावे लागते, व्यवसाय बदलला की नव्या सवयी लावून घ्याव्या लागतात. जीवनाची जुनी घडी विस्कटून जाते. ज्याची ' भौगोलिक पर्यटने ' अधिक त्याचे व्यावसायिक बदलही अधिक म्हणजे खालच्या व वरच्या थरातील कर्मचारी यांचे, स्थापत्य विशारद, तंत्रविशारद अशा वैज्ञानिक विशेषज्ञांचे. वैज्ञानिक क्षेत्रातले ज्ञान इतके झपाट्याने विस्तार पावत आहे की दर दहा वर्षांनी सुमारे ५० टक्के ज्ञान ' बाद ' झालेले असते.

## अधिक अनुभवी म्हणजे अधिक जुनाट

याचा सर्वांत अधिक परिणाम उद्योगधंद्याच्या व्यवस्थापनावर झाला आहे. इतिहासात आता प्रथमच तंत्रवैज्ञानिकाच्या ' दीर्घ अनुभवाचे ' महत्त्व त्याच्या ' ज्ञाना 'च्या पातळीपेक्षा कमी लेखले जात आहे. एखादा तंत्रज्ञ जेवढा ' अधिक अनुभवी ' तेवढा तो ' अधिक जुनाट, बुरसलेला ' मानला जातो. यामुळे अशा ' अनुभवी ' तंत्रज्ञाची व्यावसायिक प्रगती ' उलट्या पावला 'नीच होण्याची शक्यता वाढली आहे. अगदी तरुण वयात उच्च ' ज्ञाना 'च्या जोरावर त्याला श्रेष्ठ व्यावसायिक दर्जा मिळेल, परंतु जसजसा त्याचा अनुभव वाढत जाईल तसतशी त्याची व्यावसायिक घसरगुंडी अपरिहार्यपणे होईल

शिवाय व्यावसायिक बदल वरचेवर होत जाणार हे सर्वत्रच अपेक्षित असल्याने एखाद्याने आपला व्यवसाय ५–६ वेळा बदलला तर तो ' अस्थिर ' आहे असा निष्कर्ष काढला जाणार नाही. उलट त्याच्या ' समायोजन चातुर्या 'बद्दल त्याला बढतीच मिळू शकेल. व्यवसायबदलामागे संपत्तीची प्रेरणा आहे एकाच व्यवसायात स्थिर होऊन तेथेच काळ कठण्यापेक्षा नित्य ' नवी क्षितिजे ' शोधण्याचीच प्रवृत्ती होते व अगदी नवे अनपेक्षित व्यवसायही स्वीकारले जातात. विक्रेता आता ग्रंथपालक बनतो. अमेरिकेत आता ' तात्पुरते रोजगार ' पुरविणाऱ्या संस्था अनेक आहेत आणि सुमारे ७,५०,००० कामगारांना त्या काम पुरवीत आहेत ' कायम ' रोजगारामध्ये ले. ऑफचा धोका आहे तो तात्पुरत्या रोजगारात नाही.

या सर्व ' भाडोत्री 'पणाचा (रेंटॅलिझम) परिणाम आपल्या सामाजिक संबंधावर होत आहे. आता नवे ' स्नेही जोडण्या 'पेक्षा ' जुने स्नेही तोडण्या 'वर अधिक भर दिला जातो. वरिष्ठ कर्मचाऱ्यांना व्यावसायिक मासिकांमधून हाच उपदेश सतत केला जातो. ' Break with old friends and subordinates gradually... Find logical excuses for not joining the group at coffee breaks...' फार काय, आता मुलांच्या जीवनामध्येसुद्धा सामाजीकरणापेक्षा अ–सामाजीकरणच अधिक होत आहे. आताच्या माणसांची कुटुंबभावना नष्ट होत आहे त्यांनी सर्वच दृष्टींनी ' गृहत्याग ' केला आहे. भूतकाळाच्या खुणा पुसून टाकल्या आहेत आणि तात्पुरत्या जुजबी सामाजिक संबंधावरच ते वेळ भागवून नेत आहेत.

## नोकरशाहीचा मृत्यू

नोकरशाही स्वरूपाची व्यवस्थापनयंत्रणा हे औद्योगिक क्रांतीचे अपत्य आहे नोकरशाहीची प्रमुख लक्षणे तीन : (१) प्रत्येकाचे स्थान यंत्रणेच्या नकाशात निश्चित असणे, (२) सत्ताप्रवाहाची दिशा ' वरून खाली ' असणे, (३) प्रत्येकाची भूमिका व इतरांशी संबंध सुनिश्चित असणे, भविष्यकाळात ही नोकरशाही यंत्रणा सध्यापेक्षाही अजस्र होईल पण तिचे स्वरूप असेच राहील असे काहींना वाटते; पण हे चूक आहे. कारण भविष्यकाळी नोकरशाहीची ' पोलादी चौकट 'च मोडून पडेल. यंत्रणा ' प्रवाही ' बनेल. एकाच कायम स्वरूपाच्या पोलादी चौकटीऐवजी जरुरीप्रमाणे उत्पन्न होणाऱ्या व अस्तंगत होणाऱ्या तात्पुरत्या (अॅड–हॉक्रसी) अस्तित्वात येतील.

जुन्या नोकरशाही (टेबल ऑफ ऑर्गनायझेशन) मध्ये प्रत्येकाचे स्थान, सत्ता व भूमिका (रोल) सुनिश्चित असल्यानेच तिला ' पोलादी चौकटी 'चा भक्कमपणा प्राप्त झाला होता, आता या तीनही अंगांनी औद्योगिक यंत्रणांचे टेबल ऑफ ऑर्गनायझेशन इतक्या झपाट्याने बदलत आहे की, प्रत्येक नव्याने अमलात येणारे टेबल ऑफ ऑर्गनायझेशन केवळ तीन महिन्यातच जुनेपुराणे ठरू लागते. प्रत्येकाची अधिकारपदे, कामे, कर्तव्ये, सत्ता सतत बदलत राहतात, कंपन्या एकमेकांत विलीन झाल्या की टेबल ऑफ ऑर्गनायझेशन पूर्णपणे बदलते. प्रत्येकाचे स्थान, भूमिका बदलते. पहिली ' पोलादी चौकट ' वितळून जाते. ' पुनर्व्यवस्थापन ' ही आता कधीतरी होणारी बाब नव्हे; ती आता नित्याचीच बाब झाली आहे. जुन्या नोकरशाहीऐवजी आता नवी अॅड–हॉक्रसी अस्तित्वात आली आहे. प्रत्येक कामासाठी तात्पुरत्या स्वरूपाचे एक टास्क फोर्स नेमण्यात येते. काम पूर्ण झाले की त्यांची पुन्हा पांगापांग होते. टास्क फोर्स ही एक तात्पुरती, प्रवाही संघटना आहे. सरकारी कारभारातही आता याच ' कामचलाऊ ' पद्धतीचा वापर सुरू झाला आहे.

या पद्धतीने कामे चालू लागली की व्यक्तीच्या निष्ठा अस्थिर बनत जातात. अधिकारक्षेत्र अस्पष्ट होते डॉ. झोन म्हणतो – ' We need to create self–destroying organizations... Lots of autonomous semi–attached units which can be spun off, destroyed, sold by and by, when the need for them disappears... ' व्यवस्थापन क्षेत्रातला हा मॉड्युलॅरिझमच नव्हे काय ?

या नव्या प्रवाही संघटनापद्धतीमुळे ' सत्ता–प्रणाली ' अस्पष्ट होते. एवढेच नव्हे तर पूर्वीच्या नोकरशाही – व्यवस्थेमधील महत्त्वाचा भेद – ' निर्णय घेणारे ' आणि ' केवळ अमलबजावणी करणारे ' यांमधील भेद – आता फारच अंधुक झाला आहे. शिवाय आताचे निर्णयही मामुली नसतात. हे महत्त्वाचे निर्णयही 'ताबडतोब'

घ्यावे लागतात. नव्या जमान्यात 'निर्णय सत्ताप्रवाह', 'वरून खाली' न जाता अनेकदा एकाच पातळीवर वाहात असतो. आता 'विशेषज्ञच' जागच्याजागी निर्णय घेतात. कारभारी मंडळाचे महत्त्वच कमी होऊ लागले आहे.

यावरून हे दिसून येते की, सामाजिक परिवर्तनाच्या लाटेमध्ये सापडलेल्या सर्व सघटनाना नित्य नवे नवे प्रश्न सोडविणे भाग पडत असल्याने सशोधन, विकास याना व तो घडवून आणू शकणाऱ्या तज्ज्ञानाच महत्त्व येत आहे आणि जुन्या नोकरशाहीची पोलादी चौकट मोडून, विरघळून जात चालली आहे. व्यक्तीचे महत्त्व त्याच्या अधिकारस्थानावरून ठरत नाही; ते त्याच्या कौशल्यावरून, उपयुक्ततेवरून ठरत आहे. अॅड–हॉक्रसीमध्येही 'निष्ठा' असावी लागते; पण ती सघटनेशी नव्हे तर आपल्या व्यावसायिक क्षमतेशी, कौशल्याशी. ही कौशल्येही आता जटिल स्वरूपाची असणे अवश्य आहे. म्हणून आता नवीन विज्ञानक्षेत्रे अस्तित्वात येत आहेत, उत्कर्ष पावत आहेत. आताचा 'तज्ज्ञ' खऱ्या अर्थाने आपल्या क्षेत्रातल्या ज्ञानाचा उपासक बनणे अवश्य आहे. तज्ज्ञाच्या परस्पर सहकार्यानेच नवी प्रगती घडविली जाणे शक्य आहे. केवळ सघटन–चातुर्य पुरे पडत नाही.

जगाच्या रगमचावर कितीतरी व्यक्ती सतत येतात, जातात त्याच्या प्रतिमा आपल्या मनावर उमटतात. राजकारण, समाजकारण, सगीत, कला...सर्वच क्षेत्रातल्या नेत्याच्या प्रतिमा आपल्या मनावर प्रभाव टाकू लागतात आणि लगेच नाहीशाही होतात. मनातील ही प्रतिमाची भयानक वेगाने होणारी 'उलाढाल' आपल्या मनावर, मज्जासस्थेवर ताण उत्पन्न करते आणि व्यक्तिप्रतिमा हे आपल्या विचाराचे केवळ एक साहित्य होय. याशिवाय आजकालच्या जनता–सपर्क–साधनाच्याद्वारा–म्हणजे रेडिओ, चित्रपट, वर्तमानपत्रे, टेलिव्हिजन इ. मार्फत–आपणावर अनेक व विविध प्रकारच्या मन:-प्रतिमाचा नुसता पाऊस पडत आहे. केवळ 'शब्द' प्रतीक घेतले तरी आपण अक्षरश: शब्दाच्या महासागरातच डुबत आहोत आणि ही शब्द–प्रतीकेही किती अशाश्वत. रँडम हाऊस डिक्शनरीचे एक ज्येष्ठ सपादक, डॉ. फ्लेक्झनर म्हणतात – 'आज इग्लिश भाषेतील शब्दाचा उदयास्त फारच वेगाने होत आहे' शेक्सपियरच्या नतर सुमारे २,००,००० शब्दाची अशी उलाढाल झाली आहे आपल्या भाषेतल्या ९ शब्दापैकी फक्त ५ शब्दच शेक्सपियर समजू शकला असता. शब्दाच्या भाषेप्रमाणेच आपले आविर्भावही बदलत आहेत. आपल्या कलाक्षेत्रामध्येही अशीच भयंकर उलाढाल होत आहे. कोणताही कलासप्रदाय दीर्घकाल मान्यता टिकवू शकला नाही.

मानवी मनावर दडपणे वाढत आहेत. पूर्वनियोजित 'शब्दाकित (कोडेड) सदेश' यात्रिक माध्यमाद्वारा अधिकाधिक प्रभावी रीतीने आपल्या विचारणशक्तीवर प्रभाव टाकीत आहेत. त्या मानाने प्रत्यक्ष घटनातून मिळणारे अ–शब्दाकित सदेश (अन्कोडेड मेसेजेस) कमी व कमी प्रभावीही ठरत आहेत. प्रचार साधनाच्याद्वारा आपल्या मनावर दडपण टाकणारे हे शब्दाकित सदेश एखाद्या महान सागरी लाटेप्रमाणे जबरदस्त शक्तीने मनावर आघात करीत आहेत.

या सर्वामुळे आपली मज्जासस्था व मेंदू अधिकच विकल बनत आहे. येणाऱ्या सदेशाबाबत विचार, विमर्शवादी प्रक्रिया करणे फार कठीण होत आहे आपण हतबुद्ध होऊन येईल त्या सदेशाचा स्वीकार करू लागलो आहोत. आपल्या विमर्शन शक्तीमध्ये फारसे त्राण राहिले नाही आणि शेवटी सर्व क्षणिकम्, क्षणिकम् हीच भावना आपल्या मनामध्ये खोलवर रुजत आहे.

## अॅक्वा कल्चर । क्षणिकता आणि नवीनता

या ग्रथाच्या तिसऱ्या विभागाचा विषय 'नावीन्य' हा आहे. भविष्यकालीन समाज हा केवळ सध्याच्या परिचित समाजाचे विस्तृत रूपातर असणार नाही. तो अगदी अनपेक्षित ऐटीनेच नवा, अपरिचित ठरेल. त्या भविष्यकालीन समाजाचे एक प्रमुख लक्षण 'क्षणिकता' आणि दुसरे 'नवीनता' होय. अद्भुत घटना, विलक्षण शोध, अतर्क्य विग्रह आणि असभाव्य पेचप्रसग यानी भरलेला तो समाज असेल. क्षणिकता आणि नावीन्य याच्या विलक्षण मिश्रणाचे स्फोटक परिणाम सतत त्यात अनुभवास येतील. पहिला मोठा बदल असा की, मानवी जीवन–व्यवहाराचे 'सागर' हेच केंद्र बनेल. पृथ्वीचा पृष्ठभाग २ / ३ भाग समुद्राने व्यापलेला आहे. त्याच्या पाच टक्के भागाचेही पक्के नकाशे अद्यापि तयार झालेले नाहीत समुद्रतळाशी असलेल्या अगणित सपत्तीसाठी राष्ट्राराष्ट्रात युद्धे होतील. जपान वगैरे राष्ट्रानी आताच त्यासाठी जोरदार प्रयत्न सुरू केले आहेत. त्या अनुषगाने नवी यत्रे, नवे धंदे व नवे व्यवसाय अस्तित्वात येतील. 'जल' या शब्दाचा गुणार्थही बदलून जाईल. सामुद्रिक जीवनाचे चित्रण आपल्या वाङ्मयातून, कलातून होऊ लागेल. मानवी सस्कृतीच 'सामुद्रिक' बनून जाईल. 'अॅक्वा कल्चर' यासारखे नवे शब्द भाषेत रूढ होतील. सागरी अन्नाचे सेवन, नव्या सवयी, नव्या व्याधी, नवी औषधे – या सर्वांचा परिणाम मानवी मनोवृत्तीवरही झाल्यावाचून राहाणार नाही. समुद्रातच नवी शहरे बसविली जातील. पाण्याखाली जगण्यासाठी माशाच्या श्वसनेंद्रियासारखी गिलस मानवी शरीरात बसविणे शक्य होण्यासाठी आताच सशोधनास सुरुवात झाली आहे. इ. स. २००० पूर्वीच हे 'सागरावरील आक्रमण' सुरू होणार हे निश्चित.

नव्या समाजाचे आणखी एक वैशिष्टय म्हणजे हवामानावर नियत्रण. १९७०–८० या दशकातच हवामान निरीक्षण, त्याविषयी अंदाज व त्यावर काही प्रमाणात नियंत्रण करणे शक्य होईल. वादळे, शीतवारे, झझावात याविषयी नेमके अंदाज करून त्याना युद्धसाधने म्हणूनही दिमतीस लावले जाईल. प्रत्येक सार्वभौम राज्यामध्ये हवामान खाते हे महत्त्वाचे असेल कुठे दुष्काळ तर कुठे वादळ निर्माण करणे हे त्याचे काम असेल. हव्या त्या ठिकाणी सूर्यप्रकाश उपलब्ध करून देणे वा बद करणेही अशक्य ठरणार नाही. उत्तरेकडील नॉर्वे–स्वीडन प्रदेशात सूर्यप्रकाश मिळू लागला तर तेथील मानवी जीवनातच क्रातिकारक बदल होतील. वायू, हवा, सूर्यप्रकाश इ. वर नियत्रण प्रस्थापित झाले तर त्याचे परिणाम किती दूरगामी होतील याचा अदाज करणे कठीणच होय.

एकदा सागरी जीवनात मानवाने प्रवेश केला की, तेथील जलचर प्राण्याना शिकवून मानवाच्या हितासाठी राबविण्यासाठी एक नवेच सशोधनक्षेत्र निर्माण होईल. शिवाय तेथे अवश्य होणाऱ्या नव्या संवेदनक्षमता अगी असणाऱ्या नव्या प्राणिजातीच्या निर्मितीचा प्रश्नही उत्पन्न होईल. किंवा कदाचित प्राणी शिकवून तयार करण्यापेक्षा




**क्लोनिंग प्रक्रियेमुळे हवा तो वर्ण, हवी ती संतती**

उपयुक्त अशा यंत्रांचीच 'निपज' करण्याचा विचार करावा लागेल.

अनेक प्राणी व वनस्पती आपण घरगुती उपयोगासाठी वापरीत असतो. आता यासाठीच सूक्ष्म-सेंद्रियकांची निपज व वाढ करावी लागेल. इ. स. २००० पर्यंत बहुधा अशा सूक्ष्म सेंद्रियकांचा उपयोग प्रथम प्राण्याचे व नंतर मानवी अन्न म्हणून केला जाईल. जपानने या क्षेत्रात खूपच प्रगती केली आहे. फार काय, अलीकडे यंत्ररचनेमध्येही विविध धातूंबरोबरच काही सूक्ष्म सेंद्रियकांचाही उपयोग होऊ लागला आहे. या संदर्भात विचार केला तर मानवी शरीराविषयीच्या आपल्या कल्पनांचीही फेरजुळणी करायला हवी, असे दिसून येईल.

### परमाण्विक जीवशास्त्र

डॉ. वॉटसन् आणि डॉ. क्रिक यांना १९६२ साली डी. एन. ए. परमाणूबाबत नवे संशोधन केल्याबद्दल नोबेल पारितोषिक मिळाले. त्यांच्या संशोधनामुळे 'परमाण्विक जीवशास्त्रा'च्या प्रगतीला झपाट्याने वेग येत आहे. मानवांच्या जन्यूरचनेमध्येच बदल करून नव्या प्रकारचा मानव बनविणे आता अशक्य नाही. 'क्लोनिंग' प्रक्रियेने एकाच विवक्षित जन्यूरचनांकित अंडपेशीच्या अनेक प्रती काढणे शक्य झाले आहे. छापातून एकाच प्रकारचे अनेक गणपती काढतात, तसे एकाच चेहऱ्या-मोहऱ्याची अनेक माणसे एकाच साच्यातून काढता येतील. 'आपुले जनन पाहिले म्या डोळां' असे म्हणणे शक्य होईल. 'जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी' सर्वत्र आपलीच रूपे आता आपणास पाहता येतील.

पण यातून काही सामाजिक व कायद्याचे प्रश्नही निर्माण होऊ शकतील. आनुवांशिक गुणांचा प्रसारही यातून झपाट्याने होऊ शकेल. यातून काही नवेच सामाजिक-राजकीय प्रश्नही उत्पन्न होतील. 'जीविताचा हक्क' हा 'मूलभूत हक्क' मानावा काय ? या क्षेत्रात संशोधन कोणास करू द्यावे ? त्याचे निर्णय व्यवहारात वापरण्यावर कोणत्या प्रकारची बंधने घालणे इष्ट होईल ? 'जीवशास्त्रीय हिरोशिमा'च्या दिशेनेच मानवजात वाटचाल करू लागली आहे असे वाटते.

नवे जनन-तंत्रविज्ञानही अस्तित्वात येत आहे. येत्या १०-१५ वर्षांमध्येच एखादी स्त्री एखाद्या दुकानातून शीतयंत्रात ठेवलेली गर्भपेशी विकत घेऊन आपल्या शस्त्रवैद्याकडून ती गर्भाशयात बसवून घेऊ शकेल व नऊ महिन्यांनंतर बालकाला जन्म देऊ शकेल. गर्भ विकत घेताना भावी अपत्याचे लिंग, नेत्र, त्वचा यांचे वर्ण, अंदाजी बुद्धिगुणांक इ. माहिती (गॅरंटीसह) ग्राहकाला पुरविली जाईल. इतकेच नव्हे तर गर्भाची वाढ होण्यास स्त्रीच्या गर्भाशयाचीही गरज राहणार नाही. शरीराबाहेरही ते कार्य होऊ शकेल. अर्थात यामधून कामुकता, स्त्री-पुरुष संबंध, मातृत्व इ. बाबतच्या आपल्या विचारात आमूलाग्र बदल करणे अवश्य ठरेल.

अमेरिकेतल्या केंटुकी राज्यातली एक जमात 'नीलवर्णी' आहे. एका विशिष्ट जवरसायनाच्या कमतरतेमुळे त्यांची त्वचा नीलवर्णी बनली आहे. आता जननशास्त्रातील नव्या शोधांमुळे नवमानवाची त्वचा पीत, ताम्र, हरित कोणत्याही वर्णाची बनविता येणे शक्य

झाले आहे. किंवा सर्वच माणसे एका वर्णाची बनवून 'वर्णभेदा'चा प्रश्न कायमचा गाडून टाकणेही शक्य होईल.

यातून जन्यू स्थापत्यविशारदाचा ( जीन आर्किटेक्टस् ) नवा व्यवसायही उदय पावेल. त्यामध्ये विविध मतप्रणाली व पथोपपंथ उत्पन्न होतील. गुलाबाच्या झाडाचे 'डोळे भरतात' त्याप्रमाणे माणसावर विविध गुणवाहक जन्यू 'भरणे' शक्य होईल. कमी गुरुत्वाकर्षण क्षेत्रातही टिकू शकतील अशी मानवजात निर्माण करता येईल. कॅन्सरसारख्या व्याधीवर 'जन्यू-उपचार' ( जीन थेरपी ) करता येईल. मानवी जीवनापेक्षा अमर्याद वाढविताही येतील.

विज्ञानाची घोडदौड चालू आहे. १९६७ साली डॉ. क्लीव्हलंड यानी एका विद्वत्परिषदेमध्ये बोलताना 'येत्या पाच वर्षांत' शरीरातील अवयव काढून त्याऐवजी नवा बसविण्याची शक्यता बोलून दाखविली. परंतु त्याच साली दक्षिण आफ्रिकेमध्ये डॉ. ख्रिश्चन बर्नार्ड यांनी हृदय बदलण्याची पहिली यशस्वी शस्त्रक्रिया केली. या प्रकारच्या शस्त्रक्रिया इतरही अवयवाच्याबाबत सरसहा सुरू होतील. व मग त्यातून नवेच नैतिक व वैधिक प्रश्न उत्पन्न होतील. उदाहरणार्थ, एखाद्याचा 'मृत्यू' नेमका केव्हा होतो ? मृत्यूची व्याख्या काय ? एखाद्या मेलेल्या व्यक्तीचे हृदय वगैरे अवयव दुसऱ्याच्या शरीरात घालण्यासाठी उपयोगी पडावे म्हणून काही काळ त्याला जिवंत ठेवता येते. त्या काळात त्याचे जीवन खरोखर वनस्पतीसारखेच असते, अशा वेळी त्याला मारून त्याचे हृदय वगैरे अवयव काढून घेतले तर तो 'खून' होईल काय ? मग कदाचित अशा अवयवाची खरेदी-विक्री 'काळ्या बाजारात' होऊ लागेल. निदान वेगवेगळ्या अवयवाच्या 'अधिकृत बँका' निघतील. या धंद्याचे अर्थशास्त्र अभ्यासले जाईल व त्यातही 'वंशवाद', 'जातीयता' इत्यादी प्रश्न भेडसावू लागतील. मानवी शरीराचे 'सुटे भाग' उपलब्ध होऊ लागतील. कदाचित अधू झालेल्या अवयवाची कार्यक्षमता विद्युत्-यंत्राच्या साहाय्याने वाढविता येईल. आताच अशा प्रकारची १३००० माणसे अमेरिकेत आहेत- त्यात एक सुप्रीम कोर्टाचा न्यायाधीशही आहे सुमारे १०,००० रुग्णाना कृत्रिम मूत्रपिंड, धमन्या, नेत्रगोल व इतर सुटे भाग बसविलेले आहेत. थोड्याच दिवसात श्वसन, रक्तदाब इ. शारीरप्रक्रियावर सतत नजर ठेवून त्याची कार्यक्षमता योग्य त्या पातळीवर राखण्याचे कार्य विद्युत् उपकरणे करू लागतील. वेदना थांबविण्यासाठी मज्जापृष्ठामध्ये एक छोटेसे उपकरण बसविले जाईल. वेदना होऊ लागताच रुग्णाने फक्त बटन दाबायचे... अशा नव्या जीव-स्थापत्यशास्त्रातर्गत संशोधनामुळे मानवी शरीरही आता मॉड्यूलर असल्याचे दिसून येत आहे यात्प्रमाणे नव्या तत्रविज्ञानामुळे मानवी जीवनात क्राती होईल.

## बुद्धिबळ खेळणारा कॉम्प्युटर

तथापि मानवी शरीर हे अर्ध-नैसर्गिक व अर्ध-यांत्रिक असे समिश्र प्रकारचे बनल्यावर त्याचा मानसिक व्यापारांवर काय परिणाम होईल ? अर्ध-जैविक आणि अर्ध-यांत्रिक असलेला हा नवा मानव आता फार दूरची गोष्ट नाही. इतकेच काय पण मेंदूला अनेक तारा, बटने, पिना लावून 'अशरीरी' जीवही बनविणे अशक्य होणार नाही. 'यांत्रिक कासवे' डॉ. वॉल्टर यांनी बनविलीच आहेत. यात्रिक प्राण्याना सवेदन, शिक्षण, स्मरण, विमर्शनही काही प्रमाणात जमते. 'चुका व शिका' या पद्धतीने त्याचे शिक्षणही होते. प्रो. ब्लॉक म्हणतात, "माणसाला करता येते असे कोणतेही काम- जर त्याची निश्चित व्याख्या करता येत असेल तर- यत्र करू शकेल; परतु त्याचे व्यत्यास विधान मात्र सत्य असेलच असे नाही." ड्रेफस् याचे म्हणणे असे होते की, कोणताही कॉम्प्युटर मानवी मेंदूची बरोबरी करू शकणार नाही उदाहरणार्थ बुद्धिबळाचा डाव खेळू शकणार नाही. हे आव्हान मॅसॅच्युसेटस् इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीच्या ग्रीन ब्लॅट् याने स्वीकारले. त्याने गणकयत्रासाठी बुद्धिबळाचा डाव तयार करून ड्रेफसला खेळाचे आव्हान दिले. या विलक्षण सामन्यात ड्रेफस्‌चा सपशेल पराभव झाला.

डिस्ने-लँडमध्ये असे अनेक यत्र-मानव आहेत. ते हातपाय हलवितात, आनद, भीती व्यक्त करतात- फक्त त्याच्या शरीरातून 'रक्त वाहत नाही' एवढेच... अशा या विलक्षण जगात तुमच्याकडे पाहून तुमचे हृदय विद्ध करणारी एखादी कोमलागी भेटली तरी ती 'मानवी' आहे असे गृहीत धरून चालू नका. ती एखादी कठपुतळीही असण्याची शक्यता आहे. तथापि बहुधा ती अर्ध-मानवी व अर्ध-यात्रिकच असण्याची शक्यता फार !

यत्र व मानवी शरीर आता खरोखरच 'एकजीव' झाले आहे. एखाद्याच्या शरीरातून हात किंवा पाय कापून टाकून तेथे कृत्रिम अवयव बसविले तरीही तुटलेल्या मज्जाततूच्या द्वारा मेंदूकडून येणारे सदेश 'पकडून' त्याप्रमाणे हातापायाची हालचाल अगदी नैसर्गिक रीतीनेच होऊ शकते- निदान तो दिवस आता फार दूर नाही. त्याच्या स्वाभाविक जैविक-प्रक्रिया आणि त्याच्या शरीरात बसविलेल्या यंत्राच्या प्रक्रिया पूर्ण सामजस्याने होऊ लागतील.

क्षणिकता व नावीन्य या दोन प्रभावी सामाजिक शक्तीचा संपूर्ण प्रपच आपल्यास अद्यापि दिसून यावयाचा आहे शिवाय त्याच्या प्रभावाचा आपल्या सामाजिक जीवनावर काय परिणाम होईल याचाही अदाज केला पाहिजे.

## सुखानुभव निर्मिती

आतापर्यंत आपल्या अर्थविचाराचे उद्दिष्ट 'सपत्तीचे उत्पादन' हेच गृहीत धरून साधनाचाच प्रामुख्याने विचार केला जाई. आता नव्या अर्थशास्त्राला हा 'साधन-प्रधान' विचार मागे सारून साध्याचाच अधिक विचार करावा लागेल. जैविक गरजा पुरविण्याची साधने व मार्ग शोधणे हे आता अर्थ-विचाराचे प्रधान उद्दिष्ट राहणार नाही. कारण आता 'जीवनाच्या गरजा' भौतिक स्वरुपाच्या राहिल्या नसून त्या 'मानसशास्त्रीय' स्वरूपाच्या बनत चालल्या आहेत. 'भाडवलशाहीविरुद्ध साम्यवाद' हा झगडा आता जुनापुराणा होईल. उत्पादनाचे उद्दिष्ट आता 'वस्तुनिर्मित' राहिले नसून ते 'सुखानुभव निर्मिती' हे बनले आहे. ग्राहकाना आता नुसती 'वस्तू' नको असते. तिच्याबरोबर काही सुखद अनुभवही हवा असतो. विमान प्रवासात तुमची तैनात करायला हवाई सुदरीच हवी. एखादी 'काकूबाई' चालणार नाही. डॉ. डेम्वी म्हणतो- 'The engineering of psychological factors into manufactured goods will be a hallmark of production in the future- not

only in consumer's goods but in industrial hardware.' प्रवाहरेखांकित (स्ट्रीमलाइन्ड) गाड्या व यंत्रे, पाण्याच्या स्पर्शानेच विरघळून जाणारे सॅनिटरी टॉवेल्स या गोष्टी सूचक आहेत. काही विमान कंपन्या प्रवाशांना विशिष्ट प्रकारचे 'वातावरण' देऊ करतात, उदाहरणार्थ– 'रोमन फ्लाइटस्' मध्ये अन्न, कपडे वगैरे सर्व जुन्या रोमन पद्धतीचे, ओल्ड इंग्लिश फ्लाइटस्‌मध्ये भाषा मध्ययुगीन, हवाई सुंदरीचा उल्लेख 'सर्व्हिंग वेंचेस' असा होतो.

एकदा 'अनुभवाचे उत्पादन' सुरू झाले की त्यातल्या वैविध्याला सीमाच नाही. मेडिटरेनियन क्लब 'ने 'ताहिती 'सारख्या दूरच्या रम्य बेटातील सहली आयोजित केल्या आहेत. काही व्यापारी कंपन्या आपल्या प्रवाशांपैकी अविवाहित पुरुषांना लंडनमध्ये मजेसाठी 'अनोख्या पोरी' मिळवून देण्याचे आश्वासन देतात विविध प्रकारच्या वातावरणाचा आस्वाद घेता येईल, अशी ३४ नमुनेदार खेडीच विविध देशांमध्ये मेडिटरेनियन क्लबने आयोजित केलेली आहेत.

थोडक्यात, साहस, संकट, कामक्रीडा इ. मधील संभाव्य धोके टाळून त्याचा सुखास्वाद ग्राहकास मिळवून देण्यासाठी व्यापारी संघटना आता प्रयत्नशील आहेत. आता तुम्हाला 'प्राचीन रोम 'मध्ये जाऊन काही काळ त्या जुन्या जीवनाचा आस्वाद घेता येईल जपानी 'गैशां 'च्या सुखद सहवासाची लज्जत चाखता येईल त्यासाठी जपानलाच जायला नको.

सुखानुभवाच्या स्थापत्यविशारदाचा नवाच पेशा अस्तित्वात येईल. नव्या नव्या 'मानव–सेवा–संस्था' आणि मानस–तंत्रवैज्ञानिक आताच जन्माला येऊ लागले आहेत जीवनसाथीची निवड करायला आता प्रदीर्घ जीवघेणा विलंब नको–कॉम्प्युटरला विचारा.

अप्रगत देशातील अर्थव्यवस्था 'वस्तुनिर्मिती 'साठी असेल, पण प्रगत देश 'अनुभवनिर्मितीला 'च प्राधान्य देतील.

या नव्या अनुभव–व्यापाराचा फायदा नव्या पिढीला, मुलांनाही अर्थातच मिळू शकेल आणि त्यामुळे त्यांच्या विकासाची दिशा व गती ही वाढविता येतील. क्षणिकता व नावीन्य यांची ही स्वाभाविक फलश्रुतीच म्हटली पाहिजे.

## कुटुंबसंस्थेचा अस्त ?

नावीन्याची लाट आता आपल्या कुटुंब व्यवहारातही शिरली आहे आणि परिणामत कुटुंबसंस्थाच अस्तंगत होण्याच्या मार्गावर आहे. कुटुंब हेच शेवटी व्यक्तीचे आश्रयस्थान असते. परिस्थितीने गांजलेली, होरपळलेली व्यक्ती शेवटी आश्रयासाठी आपल्या कुटुंबातच येते हे खरे; परंतु आता नव्या जमान्यात कुटुंबसंस्थेची ओढाताणच होत राहणार आहे. नव्या जीवशास्त्रीय संशोधनामुळे जनन–तंत्रविज्ञानात एवढी प्रचंड उलाढाल झालेली आहे की, आता आपल्या कुटुंबविषयक कल्पनांचा फेरविचारच करावयास हवा. मुलाची निपज आता प्रयोगशाळेमध्ये करणे शक्य झाल्यावर 'मातृत्वा 'चा अर्थ काय राहिला ? मातृत्वाचा अभिमान स्त्रियांना वाटतो. गरोदर स्त्रीला सामाजिक प्रतिष्ठाही प्राप्त होते, परंतु एखाद्या स्त्रीच्या गर्भाशयामधून फलिताडपेशी काढून ती दुसऱ्या स्त्रीच्या गर्भाशयात ठेवून वाढविणे शक्य झाले, तर त्या बालकाची 'माता' कोणती ? आणि मातृत्वाचे पावित्र्य व मांगल्य कुठे राहिले ?

जन्मदातृत्व–कल्पनेचीही फेरतपासणी करणे आता अवश्य आहे. उंदरावर झालेल्या प्रयोगाचे निष्कर्ष गोंधळात टाकणारे आहेत. दोन उंदरिणींच्या गर्भाशयातून दोन फलिताडे काढून प्रायोगिकरीत्या त्या सर्व जीवपेशींचा एकजीव बनविता येतो. नंतर ते संयुक्त व संमिश्र फलिताड तिसऱ्या उंदरिणीच्या गर्भाशयात घालून वाढविता येते. जन्माला येणाऱ्या उंदराला मल्टिमाउस म्हणतात आता मल्टिमॅनही फार दूर नाही. अशा व्यक्तीचे 'जन्मदाते' कोण ? जन्मदातृत्व ही मग केवळ कायद्याचीच बाब राहील. शिवाय अशा प्रकारचे तयार गर्भ जर विकत घेणे शक्य झाले तर मग ही एक नव्या प्रकारची गुलामगिरीच नव्हे काय ?– आणि या जमान्यात कुटुंबसंस्थेचा अर्थ काय होईल ?

'जन्मदाते' हे केवळ नामधारीच असू शकतील. कारण वांझोट्या व्यक्तींनादेखील जन्मदातृत्व संपादन करता येईल. कदाचित भावी समाजात 'मुले वाढविण्याचे' परवाने फक्त काही प्रशिक्षित व्यक्तींनाच मिळू शकतील. काही जन्मदाते आपला व्यावसायिक कर्तृत्वाचा काल संपल्यानंतरच–सेवानिवृत्तीच्या काळात – 'मुलांच्या संगोपनकार्यास' प्रारंभ करतील; हे अधिक सोयीचेही होईल. 'निवृत्त्युत्तर कुटुंब' ही नवीच सामाजिक संस्था उदयास येईल. शिवाय 'बालसंगोपन' कार्याचे प्रशिक्षण घेतलेले विशेषज्ञच या कामासाठी निवडले जातील. सध्या कोणीही अडाणी माणूस मुले वाढवितो. हे काम खरोखर तज्ज्ञांकडेच सोपविणे चांगले. बायोपेरेंट्सचे काम आता प्रोपेरेंट्स करू लागतील

क्षणिकता आणि नावीन्य यांच्या आघातामुळे एकाकीपणा आणि परात्मभाव (एलिअनेशन) वाढत जाईल. त्यामधून 'सामूहिक विवाह 'ही होऊ लागतील बी. एफ्. स्किनर याने आपल्या 'वॉल्डन२' या ग्रंथात वर्णिल्याप्रमाणे सामायिक कुटुंबे अस्तित्वात येतील. अशा कुटुंबात अनेक पोक्त स्त्री–पुरुष एकत्र येतील; एकच समान कुटुंब–नामधारण करतील आणि सहकार्याने मुलांचे संगोपनकार्य करतील. डेन्मार्कमध्ये अशा सामूहिक विवाहांना मान्यता मिळविण्याचे प्रयत्नही सुरू झाले आहेत. न्यूयॉर्कमध्ये एक्युमेनिकल इन्स्टिट्यूटस् आहेत. 'कुटुंबाच्या धर्तीवर चालणारी मठसंस्था' असे त्यांचे वर्णन करता येईल. ६०,००० माणसांनी त्यांचे अभ्यासक्रम पूर्ण केलेले आहेत. याच धर्तीवर वृद्ध स्त्री–पुरुषांचे सामूहिक विवाह शक्य व संभाव्य आहेत. केवळ पुरुषांनासुद्धा अशी 'स्त्री–पात्रविरहित' कुटुंबे चालविता येतील फार काय, 'समलिंग कामी' व्यक्तींची कुटुंबेही अस्तित्वात येऊ शकतील. अर्थात अशा या जमान्यात 'एकपत्नित्व' हा काही अलौकिक नीतिगुण खासच ठरणार नाही.

## विवाहाचे विविध प्रकार

अशा नव्या जमान्यात 'प्रेम' भावनेचे स्थान काय राहील ? आता प्रेम ही वैवाहिक जीवनाची नांदी असते व प्रेम अनंतकाल टिकेल अशीच प्रेमिकांची भावना असते. परंतु क्षणिकतेच्या नव्या जमान्यात या भोळसट समजुती सोडून दिल्या पाहिजेत. रानटी, मागासलेल्या जातीमध्ये 'बहुपत्नित्व' असते. परंतु तंत्रवैज्ञानिक प्रगत समाजातही ते असते. फक्त बहुपत्नित्व 'प्रणालित' (सेरिएटेड) असते एवढेच प्रो. बर्नार्ड म्हणतो– 'Plural marriage is more extensive in

our society to-day than it is in societies that permit polygamy. We have institutionalized plural marriage serially rather than contemporaneously ' वैवाहिक जीवनाबाबतचे 'सातत्य–अपेक्षण' ( ड्युरेशनल एक्स्पेक्टन्सी ) आता क्षणिकतेच्या नव्या जमान्यात बदलणे अटळ झाले आहे.

विवाहाचे अनेक प्रकार असतील. काही केवळ 'प्रोबेशनरी' स्वरूपाचे त्यानतर 'स्थिर' विवाह. या विवाहात 'जन्मदात्याना' गर्भ विकत घेऊन मुले वाढविता येतील काहीजण मुलाना 'सगोपनासाठी' तज्ज्ञाकडे पाठवू शकतील. काही विवाहात 'जुन्या सनातनी' पद्धतीने मुलाना जन्म देऊन त्याचे सगोपन केले जाईल. विवाहपद्धतीचे पर्याय अशा रीतीने वाढल्यानतर प्रगत राष्ट्राची 'दरडोई विवाहसस्था' खूप वाढल्याचे दिसून येईल.

## पर्याय वैपुल्य

ग्रथाच्या चौथ्या विभागाचा विषय 'विविधता' हा आहे. घनसमाज हे औद्योगीकरणाचे सतान आहे आणि त्यामध्ये वस्तू, शहरे, चालीरीती, सस्कार, संस्था व मूल्ये ही एखाद्या यत्रातून काढल्याप्रमाणे एकसाची बनत जातात, एकविधता हा तत्रवैज्ञानिक प्रगतीचा स्वाभाविकच परिणाम होय– या रूढ समजुतीलाच ग्रथकर्त्याने धक्का दिला आहे. तत्रविज्ञानाच्या मुसडीमुळे जीवनातली एकविधता घटत जाऊन त्यातील विविधता व वैचित्र्य वाढतच जाईल असा विचार येथे माडला आहे. या पर्याय–वैपुल्यामुळे मानवी निर्णय स्वातत्र्याचा सकोच होणार नसून उलट त्याची वाढच होणार आहे. पर्याय–वैपुल्य व निर्णय स्वातत्र्याचा अतिरेक ही भावी काळातील मानवाची प्रमुख समस्या ठरणार आहे. औद्योगीकरणाची स्वाभाविक प्रवृत्ती जरी सामान्यीकरणाकडे, एकविधतेकडे असली तरीही भविष्यकालीन अतिऔद्योगिक समाजाची प्रवृत्ती उलट 'विशेषाकरण प्रधान'च राहणार आहे. ही विरोधविकासी प्रक्रिया आताच सुरू झाली आहे. उदाहरणार्थ, नवी बाजारपेठ आता पूर्वीसारखी एकछती प्रचड नसून 'अनेक लहान वैशिष्टयपूर्ण पेठाचा समूह' असे तिचे स्वरूप बनत आहे. १९५४ मध्ये 'मॉरिस' सिगारेटचा एकच प्रकार उपलब्ध होता, आता सहा वेगळे पर्याय आहेत. हीच गोष्ट इतरही सर्व वस्तूच्याबाबतीत घडत आहे. अगदी पाळीव प्राण्याच्या अन्नपदार्थांमध्येही विविधता आली आहे. सुधारित तत्रविज्ञानामुळे ही विविधता सुलभतेने व स्वस्तात निर्माण करणे शक्य झाले आहे. तत्रविज्ञानामुळे एकविधता बळावते हे खरे, परतु यत्र नियोजनामुळे विविधतेला नवी चालना मिळत आहे. आताच अमेरिकेत विशाल पेठाऐवजी (सुपर मार्केटस्) विशाल भाडारे (सुपर स्टोअर्स) दिसू लागली आहेत. एकाच सर्वसग्राहक बाजारपेठेऐवजी अनेक विविध प्रकारच्या लघुपेठा निघाल्या आहेत. फोर्ड कारखान्यात तयार झालेली 'मस्टाग' गाडी एजिन, बॉडी इ. बाबतीत प्रत्येक ग्राहकाला आपल्या आवडीनुसार वेगवेगळ्या रीतीने मागणीनुसार मिळू शकते. एकाच गाडीच्या एकूण २५,०००,००० प्रकारच्या रचना बनविणे, एका तत्रवैज्ञानिकाच्या मते शक्य झाले आहे एकूण काय, 'पर्याय–वैपुल्य' वाढल्यामुळे निर्णय घेणे अधिक कठीण होत आहे. हे वैपुल्य केवळ आपल्या 'आतरिक' सास्कृतिक जीवनातही तेवढेच प्रभावीपणे दिसून येत आहे. १९५२–६२ या दहा वर्षांत स्वीडन, अमेरिका, कॅनडासारख्या तत्रप्रगत देशात ग्रथनिर्मितीमध्ये ५० टक्के वाढ झाली. इतर देशात कमी झाली भारतासारख्या तत्रदृष्टया विकसनशील देशामध्ये मात्र ग्रथनिर्मितीमध्ये फारसे वैविध्य दिसून येत नाही. कलाक्षेत्रातही हे पथ–वैविध्य दिसून येत आहे. अनेक प्रकारचे 'रसिक' वेगवेगळ्या कलाप्रकाराचे भोक्ते बनले आहेत शिक्षणाच्या प्रमाणीकरणाची प्रवृत्ती आता नकोशी वाटत आहे विद्यार्थ्यांच्या असतोषाचे ते एक कारण आहे. त्याना 'ग्राहकाच्या आवडीनुसार शिक्षण' हवे. अभ्यासक्रमांमध्येही विविधता खूप वाढली आहे. इतर नागरिकानाही 'मागणीनुसार शिक्षण' पुरवणारी 'विद्यापीठे' निघत आहेत. इ. स. २००० पर्यंत बहुधा अभ्यासक्रमाचे 'विशेषीकरण' खूपच प्रमाणात वाढलेले असेल एकूण शिक्षणाचा आशय आणि पद्धती याच्या साधारणीकरणाविरुद्धच विद्यार्थी–आदोलने होत आहेत. शिक्षणातील वैविध्य वाढत आहे.

मासिके, वर्तमानपत्रे, रेडिओ, टी व्ही. इ. जनतासपर्कमाध्यमामुळे माणसाचे विचार–भावना जरी साचेबद होत असले तरीही त्याना अपेक्षित असलेले एकविध 'श्रोतृसमुदाय' शिल्लक राहिलेले नाहीत. सिनेमा–प्रेक्षकाचे वेगवेगळे वर्ग आहेत व त्याच्यासाठी वेगळी खास सिनेमागृहेही आहेत न्यूयॉर्कमध्ये एका थिएटरात केवळ 'समलिंगकामी रसिका'साठीच चित्रपट दाखविले जातात. यामुळे आता मोठमोठी सिनेमागृहे बाधण्याऐवजी एकाच मोठ्या इमारतीत वेगवेगळ्या प्रकारच्या रसिकासाठी तीन–चार लहान थिएटरे बाधली जात आहेत. रेडिओचेही तेच. काही केंद्रावरून फक्त बातम्या, काहीवरून फक्त उच्चभ्रू सगीत ऐकता येते.

मासिकाच्या क्षेत्रातही 'मागणीनुसार पुरवठा' केला जात आहे. कोणतीही दोन वेगळ्या वय–वर्गातील माणसे एकच पुस्तक वा मासिक सहसा वाचताना दिसत नाहीत. नव्या तत्रविज्ञानामुळे छपाईचे वैविध्य वाढले आहे व खर्चही कमी होत आहे. आता शाळकरी मुलेही त्याच्या खाऊच्या पैशातून आपली छापील मासिके काढतात तसेच टेपरेकॉर्डरमुळे प्रत्येकजण आपल्या स्वत च्या विशिष्ट सगीताचे प्रसारण करू शकतो. कॉम्प्युटर तज्ज्ञ नॉर्टन म्हणतो की, आता प्रत्येक व्यक्तीला आपल्या आवडीनुसार उपलब्ध प्रकाशित वाङ्मयातील मजकुरातून निवड करून त्याची छपाई करून घेऊन 'स्वतत्र' मासिक तयार करून घेणे शक्य झाले आहे. एकूण नव्या भावी समाजात निवड स्वातंत्र्याचा सकोच होणार नसून विकासच होणार आहे.

## उपपर्यांचा स्फोट

समाजातील विविधता व पर्याय–वैपुल्य वाढले की अनेक पथोपपथ उत्पन्न होऊ लागतात. अशा 'उपपथाचा स्फोट' आता आपण अनुभवीत आहोत. हिप्पी पथामध्येही आता अनेक उपपथ आहेत. वैद्यकादी अनेक विज्ञानक्षेत्रात, तसेच व्यवसायक्षेत्रात हे चित्र दिसते. समाजाचे हे विशेषीकरण एवढ्या विपुलतेने व वेगाने होत आहे की आता 'घन–समाज' ही सज्ञाच अर्थहीन होत चालली आहे. विशेषज्ञामध्येसुद्धा एकविध विशेषज्ञ आणि बहुविध विशेषज्ञ असे भेद पडले आहेत. क्रीडाक्षेत्रामध्ये तर हे पथबाहुल्य विशेषच असल्याचे दिसून येते. गुन्हेगारामध्येही ते आहेत केवळ मौज व करमणूक

करणाऱ्याचे पंथ तसेच लैंगिक क्रीडाक्षेत्रातही ते आहेत.

समाजाचे उपपंथीकरण आता वय गटानुसार होऊ लागले आहे. पूर्वीच्या 'तरुण' वर्गामध्ये आता टीन एजर्स, सब्टीन्स्, प्री-टीन्स असे भेद पडले आहेत. 'डोन्ट ट्रस्ट एनीवन थर्टी' असे एका गटाचे घोषवाक्य आहे. विवाहाच्या क्षेत्रातले जुने वर्गीकरण आता कालबाह्य होऊन त्याऐवजी 'फॉर्मर्ली मॅरीड' 'अन-रीमॅरीड' असे नवे उपपथ अस्तित्वात आले आहेत. 'हिप्पी 'मध्ये एकेकाळी सुमारे वीस उपपथ होते. 'क्षणिकता' तत्वाचा प्रभाव याही क्षेत्रावर पडला आहे. समाजपुरुषाच्या शरीरातील घडामोड आता फार झपाट्याने होत आहे. अशा जमान्यात सर्वसामान्य व्यक्तीपुढे 'निवड कशी करावी?' हा यक्षप्रश्न पडतो, पर्यायाची विविधता व्यक्तीला गोंधळात टाकते. समाजातील मनोविकृतीच्या वाढीचे ते एक कारण असावे.

एकूण सजीवाच्या उत्क्रांतीमध्ये जीवपेशीची वाढ होऊन अवयवाचे विशेषीकरण होते, तसेच समाजाची विविधता वाढली की व्यक्ती-जीवनातील पर्याय-बाहुल्यही वाढते आणि मग समाज विस्कळीत होत जातो. व्यक्तीला हे पर्याय-बाहुल्य आता असह्य होऊ लागले आहे.

अमेरिकेसारख्या तंत्रप्रगत देशामध्ये जीवनमूल्याबाबतच्या विचारात गोंधळ झालेला दिसतो 'मूल्याची ही उलाढालही मोठ्या प्रमाणावर होत असल्याने जीवनात दिशाहीनता येऊ लागली आहे काही हॉटेलामधील वेट्रेसेस 'अनावृतस्तन' असतात एका शहरात केवळ वैज्ञानिक सशोधनासाठी मानवी सभोग-प्रसंगाचे कॅमेऱ्याने चित्रणही केले जाते. काही कारखान्यामधून बनविलेल्या बाहुल्याना पुरुष जननेंद्रिये असतात. एकूण जीवनमूल्याबाबतची स्थिती फार गोंधळाची दिसते. भूतकालीन नीतिमूल्याचा पूर्ण उच्छेद झालेला दिसतो

समाजाची शकले झाली की 'त्रिकालाबाधित' मानल्या गेलेल्या जीवनमूल्यानाही तडे जातात. आता त्याबाबत सर्व-समतता असत नाही. मूल्यवैविध्याच्या दिशेने आता समाजाची घोडदौड सुरू झाली आहे. 'काहीही चालेल' अशी आता परिस्थिती आहे. 'जीवनरीती' बाबतचे अनेक पर्याय आता व्यक्तीपुढे आहेत आणि निवड करावयाचा प्रश्न कठीण झाला आहे. अनेक 'जीवनरीतीचे' तुकडे एकत्र करून जो तो आता आपली वेगळी जीवनरीती बनवू लागला आहे. आता सामाजिक दर्जा व आर्थिक प्रतिष्ठेनुसार जीवनरीती ठरत नाही. निवडलेल्या जीवनरीतीमुळे मूळ व्यक्तित्वालाच वेगळी दिशा मिळू शकते व प्रत्येकाच्या निष्ठा, अपेक्षाही बदलू लागतात. जीवनरीतीचे स्फुरण कोणा विख्यात मानवश्रेष्ठापासूनच होते असे नाही. कोणत्याही उपपंथाचा छोटा नेता चालतो. समाजातल्या अशा अनेक फुटकळ नेत्यांमुळे समाजाची विविधता स्पष्ट होते खरी, तथापि त्यामुळे राष्ट्राच्या अहतेला तडा जातो हे निश्चित.

आपल्याला पसत पडणाऱ्या जीवनरीतीची 'निर्णायक निवड' नेहमीच अगदी तर्कबुद्धीने व अक्कलहुशारीने होते असे नाही. तिचे विश्लेषण, विवरण व समर्थनही करणे प्रत्येकाला जमेल असे नाही. जीवनमूल्ये ही जीवनरीतीतच समाविष्ट झालेली असतात. यामुळे व्यक्तीच्या सवेदनक्षेत्रातूनच स्वीकृत जीवनरीतीशी विसगत वा विसंवादी घटना वगळल्या जातात. यालाच लिऑ फेस्टिंगर या मानसशास्त्रज्ञाने कॉग्निटिव्ह डिसोनन्स अशी सज्ञा दिली आहे. तशाच प्रकारच्या स्लाइलिस्टिक डिसोनन्सचा अनुभव आता यऊ लागला आहे.

जीवनरीती हा व्यक्तित्वाचाच भाग बनते. ती सहसा बदलणे शक्य होत नाही. जीवनरीतीचा बदल हा जीवनाचा सर्वांत महत्वाचा निर्णायक बदल असतो. तो करणे क्लेशकारक असते. कारण पुन्हा पर्याय-बाहुल्याला तोंड द्यावे लागते.

## मूल्यविषयक बधिरता

भावी अति-औद्योगिक समाजात हे बदल अनेकवेळा करावे लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे मानसिक चिंता, व्यग्रता आपण अनुभवीत आहोत. प्रस्तुत काळी हा क्षणिकता-निर्देशाक वाढला आहे. त्यामुळे एक नव्याच प्रकारची सामाजिक गतिशीलता प्रत्ययाला येत आहे. अनेक पर्यायामधून कोणत्याही प्रकारची निवड करावयाचे स्वातंत्र्य असले तरी नेमक्या याच परिस्थितीमुळे निर्णयक्षमतेवर विलक्षण ताण पडून साधे निर्णय घेणेही अवघड वाटू लागते. यालाच "बाधिलकी' हरविणे ( लॉस ऑफ कमिटमेंट ) म्हणतात. म्हणजे कोणत्याही जीवनरीतीविषयीची निष्ठाच आपण गमावून बसतो. अशा व्यक्तीचे जीवन उथळ, विरलेले व आशिक स्वरूपाचे बनते. यामुळेच आयडेंटिटी क्रायसिस निर्माण होऊ शकतो. एकूण समाजाच्या विविधतेमुळे व्यक्तीचे विघटन होऊ लागण्यास मदत होत असते, अशा व्यक्तीची वृत्ती 'काहीही चालेल' अशी उदासीनतेची बनत जाते. एक प्रकारची भावनिक व मूल्यविषयक बधिरताच अशा व्यक्तीच्या जीवनात येत असते. विख्यात समाजशास्त्रज्ञ कार्ल मॅनहाइम् म्हणतो– The more individualized people are, the more difficult it is to attain identification. ' अमर्याद निर्णयस्वातंत्र्य आणि जीवनमूल्याचे अनेक पर्याय यामधून जर व्यक्तिजीवनास स्थैर्य प्राप्त करून द्यावयाचे असेल तर मानवाने आपल्या सामाजिक जीवनात काही बधने स्वीकारणे अवश्य ठरेल. टॉफलर म्हणतो– A society fast fragmenting at the level of values and life styles challenges all the old integrative mechanisms and cries out for a totally new basis. We have by no means yet found this basis ' ( P. 284 )

**एका दृष्टीने सामाजिक एकात्मतेच्या प्रश्नापेक्षाही व्यक्तिगत एकात्मतेचा प्रश्न अधिक निकडीचा व जिव्हाळ्याचा आहे. पुढे दिसणाऱ्या अनेक विविध 'आत्मप्रतिमां'मधून कशाची व कोणत्या तत्त्वानुसार निवड करावयाची? सामाजिक परिवर्तनाच्या झपाट्यात व्यक्ती आता नावीन्य, वैविध्य आणि क्षणिकता यांच्या विळख्यात सापडली आहे. 'मी कोण' हेच तिला कळेनासे झाले आहे. तिची जीवन-समायोजनक्षमता आता अगदी मेटाकुटीस आली आहे. हाच 'भविष्याचा आघात' होय.**

लाखो वर्षापूर्वीच्या जलचर प्राण्याना प्रथम जमिनीवर जीवन जगण्याची पाळी आली तेव्हा तो भयानक भौतिक स्वरूपाचा बदल त्याना सहन झाला नाही आणि लक्षावधी प्राणी मरून गेले. आताही मानवप्राणी तशाच तीव्रतेच्या भौतिक परिवर्तनामधून जात आहे. आपण हे लक्षात ठेवले पाहिजे की मानवी शरीराची सहनशक्ती खूप असली तरीही ही एक मर्यादित क्षमतेची 'जैव-संघटना' आहे.

तपमान, दाब, अन्न, प्राणवायू इ बाबतीतल्या मर्यादा पाळूनच जिवंत राहणे मानवाला शक्य असते आर्मस्ट्राँग चंद्रावर गेला, परंतु त्याला बरोबर पृथ्वीवरची 'भौतिक परिस्थिती' ही न्यावी लागली. भौतिक परिस्थितीतला बदल फक्त काही मर्यादेपर्यंतच मानव सहन करू शकेल त्यापुढे नाही. भविष्य–आघाताच्या या भौतिक आयामाकडे ( फिजिकल डायमेन्शन ) आपण सतत लक्ष दिले पाहिजे. टॉफलर म्हणतो– " We may define future shock as the distress, both physical and psychological, that arises from an overload of the human organism's physical adaptive systems and its decision making process. Future shock is the human response to over stimulation. ' **या भविष्याघाताची काही लक्षणे आताच मानवी जीवनामध्ये स्पष्टपणे दिसून येऊ लागली आहेत. चिडखोरपणा, चिंताव्यग्रता, हिंसाचार, व्याधी, खिन्नता, बधिरता, औदासिन्य, अंतर्मुखता आणि भावनिक उपेक्षावृत्ती इ.**

परिस्थिती–परिवर्तन आणि मानवी आरोग्य यामधील परस्परसंबंधाबाबतचे विवरण जैव–संदर्भशास्त्र ( इकॉलॉजी ) च्या आधारे डॉ. लॉरेन्स हिंकल यानी केले आहे त्याच्या मते मानवी व्याधी या कोणत्याही एकाच विवक्षित कारणामुळे घडून येतात असे नाही. एकदर जीवन–संदर्भामध्ये मोठी उलथापालथ झाल्यास रोगनिर्मिती होऊ शकते हवेचे दूषितीकरण, शहरातील गर्दी, गोंगाट, सततची धावपळ इत्यादी बाबींचाही आपल्या शारीरिक–मानसिक आरोग्यावर परिणाम होत असतो. या प्रकारच्या भौतिक बदलाचा वेग हाही एक महत्त्वाचा कारणघटक होय या परिवर्तन–वेगाचे मापन करावयाचा पहिला वैज्ञानिक प्रयत्न डॉ. रिचर्ड राही यानी केला आहे. जीवनातील विविध प्रकारच्या बदलामुळे मानवी जीवनस्वास्थ्यावर काय परिणाम होतो हे पाहून त्यानी एक 'परिवर्तन–प्रभावमापक श्रेणी' तयार केली आहे. त्याला लाइफ चेंज युनिट्स स्केल असे नाव दिले आहे. यावरून मानवी जीवनात घडून येणाऱ्या विविध प्रकारच्या बदलाचे प्रमाण आणि त्याचे शारीरिक–मानसिक आरोग्य ह्या दोहोमध्ये व्यस्त–उच्च भावसंबंधन असल्याचे त्याना दिसून आले आहे. 'आमचे निष्कर्ष एवढे स्पष्ट होते की ताबडतोब प्रसिद्ध करावयाचे धाडस आमच्याने करवेना–' असे डॉ. होम्स् म्हणतो. या लाइफ चेंज युनिट्स स्केलमुळे एखाद्या व्यक्तीच्या भावी कालातील आरोग्य–अनारोग्याबाबतचे तर्कशुद्ध अदाज करणेही आता काही प्रमाणात शक्य झाले आहे. डॉ. आर्थर व डॉ. राही यानी या पद्धतीच्या साहाय्याने अमेरिकन आरमाराच्या तीन जहाजावरील खलाशाच्या आरोग्याबाबतचे अचूक अदाज केले आहेत ते म्हणतात– आता प्रथमच हा परिवर्तन–निर्देशांक सापडला आहे. व्यक्तीच्या जीवनात अल्पकाळात जर अनेक बदल झाले तर त्याचा ताण व्यक्तीच्या शरीरावर पडल्यावाचून राहत नाही ... व्यक्तीची समायोजनयत्रणा त्यामुळे खिळखिळी होऊ लागते ... सामाजिक परिवर्तनाचे दडपण सतत वाढत गेले तर त्याचे परिणाम समाजातील व्यक्तीच्या मज्जासंस्था आणि अतःस्रावग्रंथी संस्था याच्या कार्यक्षमतेवर झाल्याशिवाय राहणार नाहीत. मोठ्या प्रमाणावरील सामाजिक परिवर्तनामुळे व्यक्तीच्या जीवनरीतीमध्ये होणारे बदल हे शरीरातील सूक्ष्म पेशीपर्यंत पोहचत असतात. त्या सूक्ष्म-परिवर्तना चीही दखल आपण घेतली पाहिजे असे मत डॉ. हिंकल यांनी व्यक्त केले आहे.

## बदल अटळ : प्रश्न वेगाचा

आपल्या नित्याच्या दैनंदिन जीवनातील दृश्य, श्राव्य इत्यादी उद्दीपके ही आवर्तित स्वरूपात आपल्या अनुभवास येत असतात. परतु काही वेगळ्या प्रकारची उद्दीपने झाली की व्यक्तीची 'दिक्–संदर्भ–प्रतिक्रिया' बदलते. यात सर्व शारीरिक प्रतिक्रिया अंतर्भूत असतात. डोळे विस्फारणे, कान टवकारणे, रक्तदाब, रुधिराभिसरण वेग, मेंदूतील स्पदने, श्वसन इत्यादी प्रतिक्रियाचे वास्तव मापन करावयाचे यंत्र आता रशियन वैज्ञानिकानी शोधून काढले आहे. दैनंदिन जीवनात रोज अनेक वेळा आपली दिक्–संदर्भप्रतिक्रिया बदलत असते. ती सतत तीव्रतेने होत राहिल्यास व्यक्ती चिंताविकल होते. नवा अनुभव पूर्वीच्या अनुभवाशी विसंगत, विरोधी असला की दिक्–संदर्भप्रतिक्रिया तीव्र होते. ही प्रतिक्रिया मज्जासंस्थेवर अधिष्ठित असते परंतु मोठ्या सामाजिक परिवर्तनामुळे आपली 'समायोजक–प्रतिक्रियाही' अधिक तीव्र होते. ती अंतःस्राव ग्रंथीवर आधारित असते. या संदर्भात झालेल्या सर्व शारीर–वैज्ञानिक व मानसशास्त्रीय संशोधनाचा सकलित निष्कर्ष असा की, नव्या समायोजक–प्रतिक्रिया–प्रसगामुळे आपल्या अंतःस्राव ग्रंथीवर खूप ताण पडतो डॉ. सेल्ये याचे सशोधन या सदर्भात विशेष महत्त्वाचे आहे. यावरून शेवटी असाच निष्कर्ष निघतो की, सामाजिक परिवर्तनाचा वेग वाढला किंवा नावीन्य–निर्देशांक वाढला की त्याचे पडसाद व्यक्तीच्या शारीरिक व्यापारामध्ये उमटतात. सामाजिक परिवर्तनाचा वेग हा व्यक्तीच्या आरोग्याशी निगडित आहे यात तिळमात्र शका नाही.

अर्थात बदल टाळता येणे अशक्य आहे हेही खरे; कारण विकास म्हणजे बदलच होय. तथापी मानवी शरीर ही एक मर्यादित शक्तीची जैव–सघटना आहे हे लक्षात ठेवून हे सामाजिक बदल शक्यतो नियंत्रणाखाली ठेवणे हे किती महत्त्वाचे आहे हे यावरून स्पष्ट दिसून येईल.

**मानसशास्त्रदृष्ट्या उद्दीपनाच्या मध्यम पातळीवरच मानवी मनाची कार्यक्षमता सर्वाधिक असल्याचे दिसून येते. ती वाढली किंवा फार कमी झाली की मनोव्यापार विस्कळित होऊ लागतात.** मनावरचे उद्दीपन–तणाव फार वाढले की शामक औषधाचा वाढता उपयोग होऊ लागतो. गूढ–गुंजनात्मक चिंतनाची आवड वाढीस लागते, समाजातील उद्रेकी वर्तनाचे आविष्कार वाढत्या प्रमाणात दिसू लागतात; कुठल्यातरी स्वप्नसृष्टीची ओढ लागते व भावनिक बधिरता प्रत्ययास येऊ लागते. ही सर्व 'भविष्याघाता'-चीच लक्षणे होत. मनाच्या अतिरिक्त उद्दीपनामुळेच समाजविषयक कर्तव्याची जाणीव आता बधिर होत आहे दुसऱ्या महायुद्धातील ब्रह्मदेशाच्या लढाईत गोळ्याचा पाऊस पडत असताही काही शिपाई चक्क झोपी गेले होते. अतिरिक्त उद्दीपनामुळे त्यांची मज्जासंस्था बधिर झालेली होती. शत्रूच्या फळीमागे दूरवर जाऊन हेरगिरी–करणाऱ्यामध्येही अशा प्रकारची बधिरता

दिसते. थकवा, गोंधळ, चिडखोरपणा, चिंताविकलता, तगपणा इत्यादी अवस्थामधून जाऊन शेवटी व्यक्तीची 'जीवेषणा' च नाहीशी होते. मनाला सुन्नता येते. भूकंप, महापूर, वादळे इत्यादी नैसर्गिक संकट-प्रसंगीही असेच अनुभव येतात एका महाभयानक वादळात सापड-लेली स्त्री ते संपल्यावर घराच्या खिडकीतून उडी मारून धावत सुटली–कुठेही ! वादळात बालक गमावलेली दुसरी एक तरुण माता त्याच्या बाहुलीलाच कुरवाळून रडू लागली. संकटग्रस्त व्यक्तीची संवेदनशक्तीच विकल बनते. युद्धासारख्या कारणाने विस्थापित झालेल्या निर्वासितामध्येही हेच पहायला मिळते एकूण, नित्य परि-वर्तन पावणाऱ्या भयानक संकटाच्या प्रसंगामध्ये धावत्या परि-स्थितीची उद्दीपने मनाला शिणवितात, बधिर करतात. संभ्रम, औदासिन्य, दिशाहीनता, एकाकीपणा, वास्तव्याचे विकृत दर्शन अनुभवास येते. शिवाय अशा प्रकारच्या अनुभवाची 'अतिमता' मनाला व्यग्र, व्यथित करते.

याउलट एकांतवास म्हणजे उद्दीपनाचा अत्यंताभाव. अशा वेदना-रहित परिस्थितीत राहिल्यानेही व्यक्ती संभ्रमित होते.

## विज्ञान व्यवस्थापन

मानवाची बौद्धिक व्यवस्थापनक्षमताही बरीच मर्यादित आहे. बाहेरून आत येणारी माहिती मर्यादित, अपेक्षित अशी अस-ल्यास तिचे संस्करण व व्यवस्थापन सुलभ होते. प्रस्थापित कार्यकारण संबंधामुळे घटनाबद्दलची आपली अपेक्षणक्षमताही वाढते व आपली व्यवस्थापनशक्ती अधिक कार्यक्षम बनते. मानवी प्रज्ञा याप्रमाणे त्याच्या सुयोग्य व कार्यक्षम अपेक्षण-क्षमतेवरच अवलंबून असते. परंतु सतत बदलत्या, अनपेक्षित परि-स्थितीमध्ये मानवाच्या विचाराचा 'तोल सुटतो' कारण परिस्थितीतून येणारी विज्ञापन विविध स्वरूपाची, अनपेक्षित व वेगाने येणारी असतात. त्याचे व्यवस्थापन करणे फार कठीण होते प्रत्येक व्यक्तीची 'विज्ञापन-व्यवस्थापनक्षमता' कमी-अधिक कार्यक्षम परंतु साधारण-पणे सुनिश्चित अशी असते. तशीच त्याची 'निर्णयक्षमता' ही असते. विचारविमर्शनाच्या साहाय्याने आपण आपणास मिळालेल्या माहितीचे व्यवस्थापन बऱ्याच प्रमाणात यशस्वीरीत्या करू शकतो. तथापि त्यालाही काही मर्यादा असतेच. अलीकडे मानसशास्त्रज्ञ विज्ञापन–तंत्रविशारद व्यक्तींच्या वितरणक्षमतेचे वैज्ञानिक मापन करावयाच्या कसोट्या बनवू लागले आहेत. प्रत्येक व्यक्ती ही एक प्रकारची 'वळचण' – वितरण मार्ग आहे. व्यक्तीमध्ये बाहेरून आत येणाऱ्या माहितीचे संस्करण केले जाते व मग त्यावर व्यक्तीच्या प्रतिक्रिया आधारल्या जात असतात. अर्थात व्यक्तीची अंतिम प्रतिक्रियाक्षमता तिच्या माहितीचे संस्करण करण्याच्या क्षमतेवरच शेवटी अवलंबून असणार हे उघड आहे. अर्थात जे. जी मिलर म्हणतो त्याप्रमाणे 'Glutting a person with more information than he can process may lead to disturbance.' आजच्या परिवर्तन-शील जमान्यात माहितीचे अतिरिक्त उद्दीपन होत आहे व त्याचा विपरीत परिणाम मन:स्वास्थ्यावर होत आहे हे निश्चित.

शिवाय निर्णय घेण्याच्या गरजेमुळेही मनावरचे ताण वाढत अस-तात. नित्याचे अपेक्षित स्वरूपाचे निर्णय घेताना मनावर फार ताण पडत नाही. पण नवे अनपेक्षित निर्णय घेताना मात्र नव्या माहितीचे विविध प्रकारचे संस्करण करूनच ते घेणे अवश्य असते. यामुळे मनावरचे दडपण वाढत असते नव्या देशात जाऊन स्थायिक होणाऱ्या प्रवेशकाची अशी स्थिती असते. समाजपरिवर्तनाच्या काळात निर्ण-याचा वेग, संख्या व विविधता कमालीची वाढत जाते. शिवाय निर्णय घेणेही कठीण बनत जाते. यालाच टॉफलरने 'डिसिजनल ओव्हरस्टि-म्युलेशन' अशी संज्ञा दिली आहे.

याप्रमाणे संवेदन, माहिती व निर्णय या सर्वच बाबतीत अतिरिक्त व वेगाने होणाऱ्या उद्दीपनामुळे व्यक्तीचे मन:स्वास्थ्य ढळत आहे या अडचणीच्या परिस्थितीमधून टिकविण्यासाठी मनुष्य अनेक प्रकारच्या स्वसंरक्षक यंत्रणा वापरू लागला आहे. वस्तुस्थितीचा इन्कार करणे, विशेषज्ञता म्हणजे एकाच मर्यादित क्षेत्रातील वास्तवाची दखल घेणे व इतर क्षेत्रातील वस्तुस्थितीची पूर्ण उपेक्षा करणे, प्रत्यागमन म्हणजे पूर्वीच्या प्रतिक्रिया–प्रणाली पुन्हा पुन्हा करीत राहणे आणि जटिल, वास्तव परिस्थितीला, तिच्या जटिलतेची दखल न घेता, सुटसुटीत स्वरूप देणे, बहात्तर रोगावर एकच औषध !

वास्तवतेकडे डोळेझाक करावयाचेच हे वेगवेगळे प्रकार होत या सर्व अनर्थाचे मूळ परिवर्तनाच्या वेगाची योग्य ती दखल न घेता, भविष्यात अविचाराने उडी घेण्यात आहे. त्यामुळे अमेरिकन समाजावर हे भविष्याचे आघात होत आहेत. टॉफलर म्हणतो–

" Social rationality pre-supposes individual rationality and this in turn, depends not only on certain biological equipment, but on *continuity, order and regularity* of environment. It is premissed on some corelation between the pace and complexity of change and man's decisional capacities.

• By blindly stepping up the rate of change, the level of novelty and the extent of choice we are thoughtless by tampering with these environmental preconditions of rationality. We are condemning countless millions. to future shock. "

## परिवर्तन सहिष्णुता

ग्रंथाच्या सहाव्या व शेवटच्या विभागामध्ये अति–औद्योगिक समाजाच्या भयानक वेगाने होणाऱ्या परिवर्तनाच्या संकटास मानवाने कोणत्या डावपेचानी तोंड देणे शक्य व इष्ट होईल याविषयी ग्रंथ-कर्त्याने आपले विचार सूचनावजा मांडलेले आहेत 'उद्याचा मुका-बला' हे प्रकरण १७ चे शीर्षक आहे. सुरुवातीलाच मार्गारेट मीड या विख्यात मानववंशशास्त्रज्ञ विदुषीच्या 'न्यू लाईफ फॉर ओल्ड' या ग्रंथाचा दाखवला देऊन न्यू गिनीच्या उत्तरेस एका बेटात राह-णाऱ्या 'मानू' जमातीच्या टोळधानी एका पिढीमध्येच त्याची जुनी अश्मयुगीन संस्कृती बाजूला सारून अगदी वेगळ्या पाश्चात्त्य संस्कृ-तीचा अंगीकार केला, ती अंगवळणी पाडली याचा उल्लेख केला आहे यावरून मार्गारेट मीड हिने असा निष्कर्ष काढला की या प्रकारे संस्कृतिसंक्रमण करावयाचे झाल्यास ते क्रमश , विभागश न करता ते एकदम सर्वंकष किंवा 'धाऊक' रीतीने करणेच इष्ट असते.

या विचाराशी टॉफलर सहमत नाही. कारण 'मानू' ची परि-स्थिती आणि मानवापुढे सध्या असलेली परिस्थिती यात फार फरक

आहे. जगात इतरत्र प्रचलित असलेल्या तंत्रवैज्ञानिक संस्कृतीचे त्यांना फक्त 'अनुकरणच' करावयाचे होते. आपल्या डोळ्यापुढे कोणतीही 'प्रचलित' असलेली भविष्यकालीन संस्कृती नाही. तिचा आकृतिबंध कसा असेल हे आपणास ठाऊक नाही. शिवाय त्या भविष्यकालीन संस्कृतीला स्थैर्य नसून गतिमानता असणार आहे आपल्यापुढील समस्या केवळ अभूतपूर्व आहे 'मानू' जमातीचे उदाहरण येथे लागू पडणार नाही.

तथापी आपण निराश होण्याचे कारण नाही. आपल्या समस्या मानवनिर्मित असल्याने त्यावर उपाय काढणेही अशक्य नाही. शिवाय तंत्रवैज्ञानिक परिवर्तनाच्या गतीस आपणास आता खीळ घालणे शक्यही होणार नाही. आणि ते इष्टही नाही. त्या परिवर्तनास योग्य दिशा देणे एवढेच शक्य आहे सामाजिक परिवर्तनाचा वेग नियंत्रित करणे, त्याला इष्ट वळण देणे, भविष्याघाताला झेलून धरू शकतील अशा नव्या सामाजिक यंत्रणा उभारणे अशाच गोष्टींचा आपण विचार करायला हवा म्हणजेच भविष्याघात झेलून, शोषून घेणाऱ्या सामाजिक परिवर्तन कार्यास आतापासूनच आपण लागले पाहिजे त्यासाठी अवश्य ती नवी साधने, संस्था, प्रक्रिया व तंत्रे आपण शोधली पाहिजेत आणि नियोजनपूर्वक त्याचे उपयोजनही करायला हवे. आपण त्यासाठी सतत प्रयोगशील राहिले पाहिजे आपल्यापुढील समस्येचे स्वरूप नीट समजावून घेऊन त्यातून समस्या–परिहारक विचाराने मार्ग काढणे ही आता आपलीच जबाबदारी आहे

प्रथम सामाजिक परिवर्तनाचा व्यक्तिजीवनावर होणाऱ्या संभाव्य परिणामाचा विचार आपण केला पाहिजे. या संदर्भात डॉ. हान्स सेल्वे याचे मानसिक दडपणविषयक नवे संशोधन आपणास मार्गदर्शक ठरू शकेल सामाजिक परिवर्तनाच्या वेगामुळे आपल्या 'परिवर्तन सहिष्णुते'वर खूपच ताण पडत आहे. संवेदनाची बहुविधता व बाहुल्य, उद्दीपनाची अतिरिक्तता, गर्दी, गोंगाट, हवेचे दूषितीकरण या सर्वांमुळे आपल्या मनःस्वास्थ्यावर विलक्षण ताण पडला आहे अशा वेळी आपण संवेदनाची पातळी कमी केली पाहिजे. अतिरिक्त उद्दीपनापासून आपले संरक्षण केले पाहिजे. फार काय, अनावश्यक विचार, स्मृतीचेही भारूड आपण दूर करायला शिकले पाहिजे. डॉ. सेल्वे म्हणतात– "Trying to remember too many things is certainly one of the major sources of psychological stress' निर्णय प्रसंगाच्या अतिरिक्ततेमुळे मनाला थकवा येतो एकूण संवेदना, कल्पना, विचार, स्मृती व निर्णय यांचे प्रसंग कमी करून आपण आपले मन स्वास्थ्य टिकविण्याचा प्रयत्न करतो नावीन्य, क्षणिकता आणि वैविध्य याना तोंड देण्याचा तो एक मार्ग आहे.

जीवनातील एकूण घटनाची उलाढालच प्रयत्नाने काहीशी कमी करणे हा आणखी एक मार्ग होय. वस्तूची उधळमाधळ कमी करणे, घरे व निवासस्थाने अधिक काळ वापरणे, स्नेही-सोबती टिकविणे, प्रवास कमी करणे इ मार्गांनी जीवनातील एकूण उलाढाल घटविता येईल काही माणसाची परिवर्तन–सहिष्णुता अधिक असते. तरीही त्याच्या जीवनामध्ये काही स्थिर प्रदेश असतात. त्याचे वैवाहिक जीवन, व्यवसाय स्थिर असतात.

तथापि केवळ एवढयानेच भागणार नाही. तुफानी परिवर्तन काळामध्ये आपण याहून अधिक प्रभावी व विधायक साधने वापरली पाहिजेत. प्रत्येक व्यक्तीला आपापल्या जीवनातील अपेक्षित परिवर्तनाचा अंदाज घेता आला पाहिजे. प्रत्येकाने वार्षिक, पचवार्षिक, दशवार्षिक... परिवर्तनाचे अंदाजपत्रक विचारपूर्वक तयार केले पाहिजे आपले वृद्ध आईबाप, आपली मुले, आर्थिक जबाबदाऱ्या कमाई व खर्च इ. बाबतचे अंदाज केले पाहिजेत काही कालखंडामध्ये आपल्या जीवनाला वेग येत असतो. अशा कालखंडासाठी आपण नियोजनपूर्वक 'स्थिर प्रदेशाची' निर्मिती केली पाहिजे. सारांश, समाजाच्या परिवर्तनवेगाशी आपल्या वैयक्तिक जीवन परिवर्तनाचा वेग मिळता–जुळता करून घेतला पाहिजे.

## सामाजिक नियोजन

तथापी कोणतेही अंदाजपत्रक करताना परिस्थितीचे कमी–अधिक स्थैर्य गृहीतच धरले जाते म्हणून या वैयक्तिक अंदाजपत्रकावर फार अवलबून चालणार नाही. गाडी बदलायची नाही असे आपण ठरविले तरी परिस्थितीच्या रेट्यामुळे कदाचित दुरुस्तीचा खर्चच डोईजड होऊ शकेल व गाडी बदलणेच अधिक शहाणपणाचे ठरू शकेल.

म्हणून सामाजिक नियोजन हवेच. भविष्याचा आघात झेलणाऱ्या सामाजिक संस्था हव्यात. उदाहरणार्थ–'घटस्फोट घेणारे, घरे बदलणारे, नोकरी शोधणारे' अशा समान व्यसनी लोकांच्या संस्था निघाल्या पाहिजेत. डॉ. गुरजॉय हा मानसशास्त्रज्ञ म्हणतो– "Situational groups should be established for families caught in the upheaval of relocation for man and women about to be divorced, for people about to lose parent or support, for those about to again a child...' परिवर्तनाच्या भोवऱ्यात सापडलेला माणूस काहीसा निराश होतो, हतबल होतो. जीवन प्रसगात परस्पराची सल्लामसलत व साहाय्य सर्वांना मिळून जीवनसमस्या सुकर व्हाव्यात यासाठी 'आणीबाणीच्या काळी मार्गदर्शन' मिळावे हे सल्लागार काही एखाद्या शास्त्रातले विशेषज्ञ असण्याची गरज नाही. नशेच्या प्रसगातून जे निभावून गेले आहेत अशाचे मार्गदर्शन हे बहुमोल ठरेल इतकेच नव्हे तर कोणत्या प्रकारच्या जीवनसमस्यामध्ये कोणत्या प्रकारचे साहाय्य उपलब्ध होऊ शकेल याविषयीही, मार्गदर्शनाची जरुरी भासेल अशा प्रकारच्या 'सल्लागार व मार्गदर्शक' संस्था भावी काळात अवश्य ठरतील

समाजातील गुन्हेगार, मनोविकृतासाठी 'अर्ध्या वाटेवरची विश्रामगृहे' (हाफ वे हाऊसेस) निघणे अवश्य आहे. तुरुंगातून, मनोरुग्णालयातून निघाल्यावर पुन्हा समाजात मिसळणे त्याना एकदम जमत नाही. त्या मोठ्या परिवर्तनास त्याना तोंड देता येत नाही.

समाजात अशी काही खास 'वेगहीन' खेडी तयार करण्यात यावीत की तेथील जीवन संथ असावे. भूतकालीन समाजाच्या जीवनाचा प्रत्यक्ष अनुभव तेथे मिळावा. याला शैक्षणिकदृष्टयाही फार महत्त्व आहे त्याचप्रमाणे 'भविष्यकालीन वेगवान परिवर्तनशील' समाजजीवनाची जेथे अनुभूती घेता येईल अशाही खास वसाहती असाव्यात.

बदलत्या समाजात व्यक्तिजीवनाला स्थैर्य प्रतीती देणारे असे काही नित्य स्वरूपाचे समारंभ–प्रसंग मुद्दाम आयोजित केले जावेत.

उदा. स्वातंत्र्यदिन, थोर व्यक्तीच्या पुण्यतिथ्या इ. याप्रमाणे जीवनातील स्थैर्य व सातत्य शक्य त्या मार्गांनी टिकवून धरणे व भविष्याचा आघात शोषून घेऊ शकणाऱ्या नव्या सामाजिक संस्था निर्माण करणे या नव्या जीवनसंदर्भात फार महत्त्वाचे ठरू शकेल.

भविष्यकालाकडे आपण वेगाने क्षेपावत आहोत तेथे 'अलगद उतरणे' ( सॉफ्ट लँडिंग ) आपणास शक्य होईल काय? भविष्यकाल अधुक दिसत आहे. अलगद उतरण्याची तयारी आपण केली पाहिजे. परंतु नेमकी याच वेळी आपली 'शिक्षण-यंत्रणा' बिघडली असल्याचे आपल्या नजरेस आले आहे. अगदी नामांकित विद्यापीठेही कालबाह्य झाली आहेत. ती भूतकाळाकडे तोंड करून उभी आहेत आणि औद्योगिक मानव तयार करण्याच्या कामी गुतली आहेत.

जेव्हा समाजजीवन स्थितिशील असते तेव्हा भूतकाल मुंगीच्या वेगाने सरकत सरकत वर्तमानकाळात आणि नंतर तसाच भविष्यकाळात प्रवेश करतो. अशा समाजात आजोबा, बाप, नातू, पणतू या सर्वांना साधारणपणे समान जीवनकौशल्याची गरज लागते.

## भविष्याचा डोळस विचार

औद्योगिक समाजातही भूतकाल-सन्मुख व्यवस्था कोसळते. नव्या काळाचे संवेदन वा जाणीव बाळगणारा नवा माणूस त्या समाजाला हवा असतो. घड्याळ हेच त्या काळाचे प्रतीकचिन्ह होय. औद्योगिक समाजाच्या गरजा भागविणारी माणसे निर्माण करणे हेंच विद्यालयांचे मुख्य काम ठरले आणि शाळा ही एखाद्या कारखान्यासारखीच चालविली जाऊ लागली. तेच ते आवर्तक स्वरूपाचे काम, तीच कठोर शिस्त, आवाज, यंत्रे, गर्दी, घंटा हे सर्व संकेत शाळेतही दिसू लागले. मुले हा कच्चा माल आणि शिक्षक हे त्या कच्च्या मालावर प्रक्रिया करणारे कर्मचारी, आणि शाळा हा कारखाना- हा नमुना तयार व रूढ झाला. वर्ग, अभ्यासक्रम, वेळापत्रक, शिस्त, इयत्ता, तुकड्या, गुणसंख्या इ. व्यवस्थापकीय साधने व प्रक्रिया ठरल्या शिक्षक हा जणू 'फोरमन'. शाळेतून बाहेर पडल्यानंतर मुले कामाच्या कारखान्यातच लागत. ते जग त्यांना परिचितच होते. थोडक्यात शाळा आता भूतकाळसन्मुख न राहता वर्तमानकालसन्मुख म्हणजेच वास्तववादी बनली. ड्यूईसारख्या सुधारणावाद्यांना यासाठी मोठा लढा द्यावा लागला. तथापि रॉबर्ट हचिन्ससारखे पुराणमतवादी त्यांना 'कल्ट ऑफ इमिडिअसी' 'प्रेझेंटिझम' अशी शेलकी विशेषणे लावून दोष देतच आहेत.

आता खरोखर प्रेझेंटिझम सोडून फ्युचरिझमचा स्वीकार आपण करायला हवा. शाळा आता 'भविष्यसन्मुख' होणे आवश्यक आहे. उद्याच्या तंत्रप्रगत जमान्यात जलद, प्रवाही व आत्मनियामक यंत्रे सर्व बौद्धिक प्रक्रियांचे व्यवस्थापन करतील आणि माणसे-शिक्षक सर्व भौतिक प्रतिक्रियांची यंत्रे सर्वत्र असतील. व्यवस्थापकीय काम आता कारखान्याबाहेर केले जाईल. औद्योगिक जगातील नोकरप्रणाली जाऊन तेथे अॅडहॉक्रसी येईल. क्षणिकता हाच आपल्या विचाराचा लक्ष्यबिंदू बनेल. औद्योगिक जमान्यात पूर्वी इष्ट ठरलेले गुण आता अनिष्ट मानले जातील. पूर्वीच्या औद्योगिक जमान्यात काही माणसे अर्धशिक्षित असलेली चालत. आता मात्र उच्च निर्णयक्षमता अंगी असलेली माणसेच हवी असतील. अर्थात या नव्या जमान्यात विद्यार्थ्यांमध्ये भविष्यघटना कशा रीतीने साकार होत आहेत याचा अंदाज करावयाची पात्रता यायला हवी. त्याची 'कोप-अॅबिलिटी' वाढणार नाही. सिरॅक्युज विद्यापीठात आणि स्टॅनफर्ड रिसर्च इन्स्टिट्यूटमध्ये अशा प्रकारचे भविष्यकाळाबाबतचे वैज्ञानिक अंदाज करावयाचे कार्य केले जात आहे. भविष्याबाबतची विविध अंदाज-चित्रे आखून त्याची चर्चा करणे हे त्याचे मुख्य कार्य आहे. हे काम रूढार्थाने तज्ज्ञ समजल्या जाणाऱ्या व्यक्तींचे नाही. विद्यार्थ्यांना त्यात भाग घेता आला पाहिजे. आताचे बंडखोर विद्यार्थी नुसत्याच मार्क्सच्या घोषणा देतात. त्यामुळे ते भूतकाळाशी अधिकच जखडले जातात. The Creation of future oriented, future shaping task forces in education could revolutionize the revolution of the young

## नवे शिक्षण-घरोघरी

या कौन्सिल चळवळीची उद्दिष्टे : (१) शिक्षणसंस्थांची रचना व व्यवस्थापन पद्धती बदलणे (२) अभ्यासक्रमात आमूलाग्र बदल करणे आणि (३) शिक्षणाला भविष्यसन्मुख बनविणे ही असतील. यापुढील काळात शिक्षण अधिकाधिक प्रमाणात शाळेच्या बाहेरच दिले जाईल. काही पालक स्वतःच शिक्षकापेक्षा अधिक श्रेष्ठ दर्जाचे तज्ज्ञ असतील. शाळेत विद्यार्थ्यांची हजेरी अवश्य राहणार नाही. आणि राहिलीच तर अगदी मर्यादित प्रमाणात, फक्त काही विषय व खेळ यापुरतीच. 'घरोघरी शिक्षण' दिले जाईल. मॅक्डोनाल्ड याने आताच 'मोबाईल एज्युकेशन'ची चळवळ सुरू केली आहे. न्यूयॉर्कमध्ये एका संस्थेमध्ये शाळा व समाज एकमेकात पूर्ण मिसळून गेले आहेत. समाजातील काही उपयुक्त संस्था प्रत्यक्ष शाळेच्या आवारातच काम करीत आहेत आणि तज्ज्ञ नागरिकही शाळेतील मुलांना शिकवीत आहेत. शिक्षणपद्धतीमध्येही क्रांती होईल आणि विशेष म्हणजे शिक्षणाच्या व्यवस्थापनातील नोकरशाही जाऊन तेथे अॅडहॉक्रसी अस्तित्वात येईल. भविष्य जीवनासाठी निरुपयोगी असलेले विषय अभ्यासक्रमातून काढून टाकले जातील. अभ्यासक्रमाची विषयवारच रचना का? आयुष्यातील विविध विकास अवस्थानुसार का नको? यासाठी 'अभ्यासक्रम तपासणी समित्या' नेमल्या जातील शिक्षणाच्या नव्या व्यवस्थापनात मुलांना निवड करण्याचे खूप स्वातंत्र्य असावे. अनेक वा विविध छोटे छोटे अभ्यासक्रम असावे. मानसशास्त्रज्ञ हर्बर्ट गुरजॉय म्हणतो- The new education must teach the individual to classify and reclassify information to evaluate its variety to change categories when necessary, to look at problems from new direction. Tomorrow's illiterate will not be the man who can not read, he will be man who has not learned how to learn.

शिक्षणाचे दुसरे कार्य सामाजिक संबंध वाढीस लावणे हेच होय. सध्या व्यक्तीव्यक्तीमध्ये 'विज्ञापन प्रक्रिया' होतच नाही आणि तिसरे कार्य विद्यार्थ्यांना 'पर्याय-बाहुल्य' परिस्थितीचा मुकाबला करायला शिकविणे हे होय. यासाठी त्यांना विविध मूल्यांपैकी इष्ट मूल्याची निवड करता आली पाहिजे. सध्याची शिक्षणपद्धती या मूल्य प्रश्नाबाबत पूर्ण उदासीन बनली आहे. 'शील-संवर्धना'बाबत

बरेचसे बोलले जाते, परतु त्या संबधात निश्चित असे काहीच केले जात नाही. Educators delude themselves in to believing that they were not in the value business at all. तथापि कारखान्याच्या धर्तीवर शाळा चालविल्या तर कारखानदारी मूल्ये मुलाच्या मनावर ठसतातच उद्याच्या शिक्षणात जीवनाचे तत्रविज्ञानही शिकविले जाणे अवश्य आहे.

थोडक्यात, तरुण पिढीला भविष्य-सन्मुख बनविले पाहिजे. भविष्य घटनाचे 'अपेक्षण' करायला शिकविले पाहिजे. व्यक्ती किती दूरदृष्टीचा विचार करू शकते हे तिच्या पोक्ततेचे गमक आहे. सामाजिक परिवर्तनाचा वेग वाढला की अपेक्षणविचाराचा पल्ला अधिक दूरवर गेला पाहिजे किंबहुना भविष्यकालासबंधी स्वैर अनिर्बंध कल्पना चालवायलाही मुलाना उत्तेजन देणे इष्ट होईल या दृष्टीने वैज्ञानिक कल्पनाशक्तीला ताण देणाऱ्या कादवऱ्या फार उपयुक्त ठरू शकतील मुलाना त्या वाचायला उत्तेजन दिले पाहिजे. 'To create an education that will create this curiosity about the future is the central mission of the super-industrial revolution in schools Education must shift into the future tense

## तंत्रविज्ञान

आपण शिक्षणामध्ये काहीही सुधारणा केल्या तरीसुद्धा तंत्र-विज्ञानाची मुसडी थोपवून धरल्यावाचून त्या व्यर्थच ठरतील. कारण लोकसख्येच्या वाढीसाठी किंवा शहरीकरणासारखी इतरही अनेक कारणें आहेतच. आतापर्यंत तत्रविज्ञानाचा उपयोग आपण फक्त निकट स्वरूपाच्या आर्थिक फायद्यासाठीच केला आहे. परतु तत्र-वैज्ञानिक प्रगतीच्या इतर सामाजिक, मानसशास्त्रीय दूषितीकरणा-सारख्या परिणामाची दखलच घेतली नाही हे मानसशास्त्रीय दूषिती-करण आणि औद्योगिक दुष्परिणाम-धूर, ध्वनी यासारखे- यानी आपले जीवन अतर्बाह्य विषारी बनविले आहे जंतुनाशके, कचरा, अडगळ यांचे ढीग कुठे टाकायचे ? ते लवकर नाशही पावत नाहीत. त्याच्यामुळे समुद्राचेही आता दूषितीकरण होऊ लागले आहे व त्यामुळे लक्षावधी टन सागरी अन्नसंपत्तीचा नाश होत आहे प्राण-वायूची निर्मितीच कमी होऊ लागली तर शहराची वाळवटे बनतील. 'Through such distruptions of the natural ecology we may be destroying this planet as a suitable place for human habitation.'

जनमतही आता तत्रविज्ञानाच्या अतिरेकी उपयोगाविरुद्ध सघटित होऊ लागले आहे. पृथ्वीगोलाच्या अतर्भागात अणुस्फोट करावयास मनाई करावी असे अर्ज न्यायालयात करण्यात येत आहेत. काही विद्यापीठातील वैज्ञानिक संशोधक 'आता काही काल सशोधनकार्यच स्थगित करावे.' असे मत व्यक्त करू लागले आहेत अमेरिकेचे राष्ट्राध्यक्षही आता इकॉलॉजिकल धोक्यावद्दल बोलू लागले आहेत. 'डेथ टू टेक्नॉक्रॅट्स' असे भित्तिफलक पॅरिसमधील भिंतीवर दिसू लागले आहेत.

तथापि तंत्रवैज्ञानिक सशोधन पूर्ण थाबविणे अशक्य व अनिष्टही आहे. ते आता 'अधिक पोक्त व जवाबदार' बनविले पाहिजे त्याची यापुढील दिशा सुनिश्चित, सुनियोजित व सुनियत्रित केली पाहिजे. अमेरिकन ऑर्गनायझेशन फॉर इकनॉमिक को-ऑपरेशन अँड डेव्ह-लपमेंट आपल्या अहवालात म्हणते - 'We came to the conclusion that we were looking for something...which was not there A science policy' तत्रविज्ञान भरकटत कुठेतरी वाट फुटेल तिकडे चालले आहे त्याला काबूत आणले पाहिजे लगाम घातला पाहिजे.

तत्रवैज्ञानिक पर्यायबाहुल्य हा प्रश्न मानवापुढे प्रथम उत्पन्न झाला आहे आता यत्रे, प्रक्रिया, तत्रे व प्रणाली एकगटानेच निवडावी लागतात. भविष्यावावतचे अतिमहत्त्वाचे निर्णय घ्यावे लागतात. एखाद्या तत्रपद्धतीचा स्वीकार केल्यास जीवनाच्या इतर क्षेत्रात इतर कोणत्या बाबीचा स्वीकार करणे भाग पडेल याचा अगोदरच विचार करावा लागतो.

एकूण तंत्रविज्ञानामुळे उत्पन्न झालेल्या समस्या सोडविण्यासाठी आता केवळ तत्रवैज्ञानिकच पुरे पडणार नाहीत. समाजातील सर्वच विचारवतानी त्यासाठी सहकार्याने प्रयत्न करायला हवेत कारण तत्र-विज्ञानाचे परिणाम सर्व समाजालाच भोगावे लागतात तत्रविज्ञानाचे 'राजकीय- सामाजिक धोरण' ठरविणे आता निकडीचे झाले आहे. तत्रविज्ञानामुळे जीवनाचा सदर्भ समतोल (इकॉलॉजिकल बॅलन्स) बिघडणार नाही याची दक्षता घेतली पाहिजे. शिवाय त्याचे सामाजिक-सास्कृतिक परिणाम काय होऊ शकतील याचाही अंदाज घ्यावा लागेल डेल्फी ॲनालिसिस पद्धतीने ते आता शक्य झाले आहे.

विशेषत: तत्रविज्ञानामुळे आपल्या जीवनमूल्यावर काय परिणाम होणे शक्य आहे याचा गभीर विचार व्हायला हवा. इन्स्टिट्यूट फॉर दि स्टडी ऑफ सायन्स ॲण्ड ह्यूमन अफेअर्स, कोलबिया येथे अशा प्रकारचा अभ्यास केला जातो शिवाय प्रत्येक तत्रवैज्ञानिक शोधाचा सामाजिक परिवर्तनाच्या गतीवरही कसा परिणाम होऊ शकेल याचाही विचार केला गेला पाहिजे

## वैज्ञानिक प्रगतीची मार्गदर्शक तत्त्वे

हे कार्य राजकीय-सामाजिक स्वरूपाचे आहे. काही वैज्ञानिक तत्रे उत्तेजन देण्यासारखी असतात तर, इतर काही मात्र दडपून टाकणेच इष्ट असते. प्रत्येकाची स्वतत्र छाननी त्याच्या इष्टानिष्टतेच्या निकषावर झाली पाहिजे. यामुळे सशोधन-स्वातत्र्याला बाध येणार नाही, फक्त प्रसारावर नियत्रण येऊ शकेल. तत्रविज्ञानाचेही नियोजन हवेच. यासाठी नियोजनाची निकषतत्त्वे ठरविली पाहिजेत आणि समाजामध्ये कार्यासाठी technological ombudsmen नेमणेही इष्ट होईल. त्यानी डोळ्यात तेल घालून नव्या तत्र-प्रक्रियेची छाननी करायला हवी. हे कार्य प्रत्येक औद्योगिक सघटनेने आपापल्या क्षेत्रापुरतेही स्वतत्र रीतीने करता येण्याजोगे आहे त्याना त्यासाठी एक स्वतत्र *'कॉन्सिक्वेन्स ॲनलिसिस स्टाफ'* नेमता येईल अशा तऱ्हेची मागणीही आता अमेरिकन जनतेकडून केली जात आहे.

शिवाय तंत्रवैज्ञानिक प्रगतीची काही स्थूल 'मार्गदर्शक तत्त्वेही' घालून देणे इष्ट होईल. दुष्परिणाम टाळण्यासाठी टेक्नॉलॉजिकल इन्शुरन्स पूल निर्माण करणेही इष्ट होईल. नव्या सशोधनतत्राची अगोदर तपासणी करूनच परवानगी देण्यात यावी या तपासणीच्या

कामी समाजशास्त्रज्ञ, मानसशास्त्रज्ञ, राज्यशास्त्रज्ञ इ तज्ज्ञानी सहकार्य करावे उधळलेल्या तंत्रविज्ञानाला आता वेसण घातलीच पाहिजे.

केवळ तंत्रविज्ञानच नव्हे, तर इतर अनेक सामाजिक प्रक्रिया आता मोकाट सुटल्या आहेत. शहरीकरण, वशविग्रह, गुन्हेगारी इ. कोणत्याही सामाजिक सुधारणेचे अनुषगिक परिणाम आपल्याला अंदाजता येईनासे झाले आहेत. ' कल्याणकारी ' राज्यामुळे जनता अधिकच परावलवी व पगू बनत आहे प्रस्तुतचे शतक हे ' ॲक्सिडेंटन सेन्चुरी ' आहे असे एम. हॅरिंग्टन म्हणतो. आता आपण औद्योगिक सस्कृतीची अखेर पाहात आहोतसे वाटते. तंत्रविज्ञानाच्या या नियोजनाचा सर्वच राष्ट्रात त्याचे राजकीय तत्त्वज्ञान काहीही असो– बोजवारा उडत चालला आहे कारण नियोजनाचे उद्दिष्टच मुळी मर्यादित व अपर्याप्त आहे केवळ आर्थिक सुबत्तेसाठीच आपण आजवर नियोजन केले आहे (टेक्नॉलॉजिकल प्लॅनिंग इज इकॉनॉमेंट्रिक) शिवाय ते केवळ ' वर्तमान 'काळसापेक्षच आहे त्याचा पल्ला फारच लहान आहे आणि शिवाय त्यामध्ये कर्मचारीयत्रणेचे व्यवस्थापन वरिष्ठ–कनिष्ठ पातळयावरच झालेले होते आता अनेक महत्त्वाचे निर्णय जागचेजागी घेतात. ' निर्णय घेणारे ' अधिकारी वेगळे असणार नाहीत जुन्या तंत्रवैज्ञानिक यत्रणा कदाचित मागासलेल्या देशामध्ये काही काळ तग धरू शकतील; पण तंत्रप्रगत देशामध्ये त्या आताच कोलमडून पडत आहेत आणि त्यांच्या पराभवाचे राजकीय, सामाजिक व मानसशास्त्रीय परिणाम भयानक ठरू लागले आहेत.

## परिणामांचे स्वरूप

पहिला परिणाम हा की, आता बुद्धिवादावरील विश्वासच ढळू लागला आहे. नियोजनाचे वैय्यर्थ्य गृहीत धरले जाऊ लागले. आता निर्नियोजनवाद वाढीस लागला आहे ' चालू घडी 'चाच जो तो विचार करू लागला आहे.

याचे मूळ कारण हे की, आपण आजवर केवळ ' आर्थिक ' दृष्टिकोणालाच प्राधान्य दिले ' टेक्नॉक्रॅट्स सफर फ्रॉम इकॉनॉ – थिंक.' मानवजातीच्या सर्व समस्यावर ' आर्थिक सुबत्ता ' हाच एकमेव उपाय आहे, असेच आपण गृहीत धरून चाललो आहोत मार्क्स व किन्स यांच्यावर आपण अंधश्रद्धा ठेवून चाललो मानवाच्या जीवन– साफल्याचे इतर अनेक आयाम आपण साफ विसरलो शिवाय आता आपली अर्थव्यवस्थाही सामाजिक–मानसशास्त्रीय दडपणाच्या प्रभावाखाली येत चालली आहे, याचेही भान आपण राखले नाही आता काही विश्वस्तनिधी ' मद्ये ' निर्माण करणाऱ्या कारखान्यात रक्कम गुतवीत नाहीत. अनेक कपन्या आता बेकाराना आवर्जून रोजगार देत आहेत, यापासून आपण बोध घेतला नाही. ' Gross national product is our Holy Grail ' हा एक प्रकारचा इकॉनॉमिक फिलिस्टिनिझम होय.

आपण काय केले पाहिजे ? प्रत्येक समाजामध्ये परिवर्तन किती वेगाने होत आहे याचा निर्देशाक आपण काढला पाहिजे आणि त्या आधारे त्या त्या समाजाची नव्या वस्तू, घटना, प्रक्रिया इ चे स्वीकरण करण्याची क्षमता–' नवसहिष्णुता–' नॉव्हेल्टी टॉलरन्स– किती आहे याचाही अदाज घेतला पाहिजे. त्याचबरोबर व्यक्तीची कमाल निवडस्वातंत्र्याची क्षमता किती आहे याचाही आपण अंदाज घेतला पाहिजे

यावरून शेवटी हाच निष्कर्ष निघतो की, नव्या आगामी परिस्थितीमध्ये आपल्या राज्यसस्थेचे हेतू व उद्दिष्टे काय असावीत याचा पुन्हा एकदा गभीर विचार झाला पाहिजे तशी वेळ आली आहे. टॉफलर एका महत्त्वाच्या परिच्छेदात म्हणतो – ' A sensitive system of indicators geared to measuring the achivement of social and cultural goods and integrated with economic indicators, part of the technical equipment that any society needs before it can successfully reach the next stage of technological development. It is an absolute precondition for post technocratic planning and change. We must institutionalize a concern for the ' quality of life. ' The humanization of the planner is the essential first step of the strategy of social futurism. '

## भविष्य–सन्मुखता

आपली काल–क्षितिजे (Time horizons) आता विस्तृत झाली आहेत पूर्वीच्या जमान्यातील ' एक महिना ' हा आताच्या ' एक वर्षाहून अधिक ' होता. यामुळे आता आपली नियोजने यापुढील काही पिढ्याचा विचार करूनच केली पाहिजेत आणि समाजाचे सर्वच घटक नियोजन–कार्यात सहभागी केले पाहिजेत. आपल्या विचाराची दिशा आता अधिकाधिक भविष्य–सन्मुख होत आहे. आता अशा प्रकारच्या भविष्य–सन्मुख नव्या सघटनाचा उदय होत आहे हे सुचिन्हच होय

टॉफलरच्या मते भविष्यकालाचा विचार करताना प्रत्येक समाजाने (१) सभाव्य भविष्य (२) शक्य भविष्य आणि (३) स्वीकार्य भविष्य अशा सर्व रीतीनी विचार करायला हवा. पहिला विचार शास्त्रज्ञानी करावा; दुसरा विचार कलावताच्या कक्षेत येईल आणि तिसरा विचार राजकारणतज्ज्ञाचा आहे. सभाव्य भविष्याचा विचार करावयाची अनेक तंत्रे सुचविण्यात आलेली आहेत. डेल्फी हे असेच एक तंत्र डॉ. गेल्फ हेल्मर याने सुचविले आहे. अनेक विशेष जाणकाराच्या ' अतःस्फूर्त ' अदाजाच्या साहाय्याने सभाव्य भविष्याचे यथातथ्य चित्रण करावयाची ही पद्धती आहे

' शक्य भविष्या ' चे चित्रण करावयाचे कार्य ' अत स्फूर्तिवादी ' भविष्यज्ञाचे; ते वैज्ञानिक नवलकथा लेखक आणि द्रष्टे यानाच करता येईल. काही अमेरिकन व युरोपीय कपन्या या प्रकारचे कार्य करीतच आहेत. अशा प्रकारेच ' इमॅजिनेटिव्ह सेंटर्स ' सर्वत्र निघावेत. अनेकाच्या स्वैर कल्पना एकत्र करून नव्या कल्पना बनविता येतील. ' We need sanctuaries of social imagination. ' स्किनरचे ' वॉल्डन–२ ', हक्स्लेचे ' ब्रेव्ह न्यू वर्ल्ड ' ही अशा प्रकारची उदाहरणे होत. फार काय, अशा प्रकारच्या युरोपियन फॅक्टरीज आता निघायला हव्यात. भावी समाजाची मूलभूत जीवनमूल्ये निश्चित करून त्यावर आधारलेले भावी समाजाचे चित्रण केले जावे.

काहीनी विरुद्ध दिशेने कल्पना चालवून कौंटर–युटोपिया चित्रण

करावे. कोणी जडवादावर आधारलेले, कोणी समाजवादावर आधारलेले, अशी अनेक 'कल्पना–प्रात्यक्षिके' ही 'विशेष प्रकारच्या वसाहती' प्रत्यक्ष निर्माण करून पाहता येतील. थोडक्यात, आता युरोपियन–विचारवाद्यांची कुचेष्टा न करता आपण त्यांच्या प्रभावी कल्पनाशक्तीचा उपयोग करून घेतला पाहिजे. आपल्या भविष्य-नियोजनासाठी त्याचा चांगला उपयोग होईल.

प्रत्येक राज्य, संस्था, विद्यापीठामध्ये एक 'भविष्य–खाते' हवेच. खातेनिहाय अशा विविध प्रकारचे भविष्य–चित्रण होणे अवश्य आहे. यातून एखादी आंतरराष्ट्रीय संघटनाही निर्माण करणे शक्य होईल. सारांश, 'If humanization of the planner is the first stage in the strategy of social futurism, the forword extension of our time-horizons is the second. To transcend technocracy, we need not only reach beyond our economic philitinism but to open our minds to more distant futures, both portable and possible.'

याहूनही आता अधिक पुढे गेले पाहिजे. आपली सामाजिक उद्दिष्टे पारंपरिक पद्धतीहून वेगळ्या रीतीनेच आपण ठरविली पाहिजेत. आपले लष्कर, धर्मसंस्था व इतर सामाजिक संस्था यांची रूढ उद्दिष्टे आता नावीन्य–परिवर्तनांमुळे कालबाह्य झाली आहेत. विविधतेमुळे आपल्या उद्दिष्टांची बहुलताही वाढते. आपण एका आणीबाणीच्या काळातून दुसऱ्या आणीबाणीच्या काळाकडे फेकले जात आहोत. आपल्या शहरी जीवनात कधी संप, तर कधी वीजतुटवडा, तर कधी विद्यार्थी–आंदोलने होत राहतात. आपण नियोजने करीत असतो पण त्यामागे ध्येयनिश्चिती नाही.

### लोकशाहीची गरज

१९६० मध्ये प्रेसिडेंट आयसेन हॉवर यांनी राष्ट्रीय नियोजनाची उद्दिष्टे व धोरणे ठरविण्यासाठी एक समिती नेमली. प्रे. जॉन्सन यांनी राष्ट्रीय प्लॅनिंग प्रोग्रॅमिंग बजेटिंग (PPBS) सुरू केले. प्रे. निक्सन यांनी नॅशनल गोल्स रिसर्च स्टाफ नेमला. हे सर्व अगदी 'वरिष्ठ पातळीवर' होत राहते. हेच चूक होय. अति–औद्योगिक समाजात लोकशाही केवळ ध्येय–घोषणा नसून ती एक दैनंदिन गरजेची बाब आहे. तिने सतत सामाजिक आत्मपोषक (फीड बॅक) व्हायला हवे. तंत्रविज्ञानाला लगाम जनतेनेच घातला पाहिजे. (We need a more advanced democratic feedback mechanism) सामाजिक जीवनाचे प्रवाह वर्तुळाकार हवेत, सरळरेषाकार नकोत. सामाजिक चैतन्य सर्व समाजपुरुषाच्या नसानसांतून खेळत राहिले पाहिजे. राष्ट्रीय जीवनाची सर्व अंगे सर्व जनतेलाच खुली असली पाहिजेत. To master change we need both a classification of the long range social goals and a democratisation of the way in which we arrive at them. We must literally 'go to the people.' ठिकठिकाणी 'सामाजिक भविष्य परिषदा' भरविल्या जाव्यात. व्यवसाय, उदीम, शेतकरी–कामगार, बुद्धिजीवी या सर्वांचा त्यात समावेश असावा. या 'स्थायी' स्वरूपाच्या संघटना नसून अॅड–हॉक असतील. त्यांना वेगवेगळ्या तज्ज्ञांचा सल्ला मिळावा. या परिषदांकडून विधिमंडळांना सूचना मिळाव्यात.

सामाजिक भविष्यवादाचा अंतिम उद्देश केवळ तंत्रविज्ञानाला काबूत ठेवणे एवढाच नाही, मानवी जीवनाच्या भविष्याचे नियोजन अधिक दूरदृष्टीने, मानवतेच्या भूमिकेवरून, मानवी महकार्य भावनेने व्हावे आणि या पद्धतीने मानवाच्या विकासाचेच मार्गदर्शन करावे हा अंतिम उद्देश आहे.

परिवर्तन म्हणजेच जीवन होय. परिवर्तन हवेच परंतु स्वैर बेताल परिवर्तन जीवनाला मारक होऊ शकेल. सामाजिक परिवर्तनास इष्ट स्वरूपाचे वळण देण्यासाठी आपण आपल्या बुद्धिसामर्थ्याने परिवर्तनाचाच साधन म्हणून उपयोग करायला पाहिजे. तसे केले तर आपण आपला विकास आपल्या इच्छेनुसार घडवून आणू शकू यात काहीही शंका नाही.

टॉफलरचा ग्रंथ खरोखर विलक्षणच म्हटला पाहिजे. मानवजातीच्या सामाजिक जीवनात होणाऱ्या वेगवान परिवर्तनाचे बोलके चित्र त्याने येथे उभे केले आहे. तंत्रवैज्ञानिक प्रगतीमुळे औद्योगिक समाजव्यवस्थेचे अति–औद्योगिक व तंत्रवैज्ञानिक समाजव्यवस्थेमध्ये झपाट्याने रूपांतर होत आहे. क्षणिकता, नावीन्य, वैविध्य ही या समाजपरिवर्तनाची प्रमुख अंगे होत. या परिवर्तनामधून मानवजातीपुढे जीवनसमायोजनाचे कोणते प्रश्न उत्पन्न होऊ शकतील याचे मार्मिक विवरण त्याने पुराव्यासह दिले आहे. क्वचित त्याने काढलेले तार्किक निष्कर्ष काहीसे अतिरिक्त व भडक वाटले तरीही प्रत्येक सूज्ञ व्यक्तीला हा ग्रंथ मूलग्राही विचार करावयास व प्रस्तुत जीवन परिस्थितीचा अधिक साक्षेपी अभ्यास करावयास प्रेरणा देईल यात शंका नाही. □

–ल. ब. हरोलीकर

**समाज प्रबोधन पत्रिका**
**सप्टेंबर–ऑक्टोबर (१९७३) अंकावरून**
**साभार पुनर्मुद्रित**



लेखनाखेरीज व्याख्यानसत्रांसाठी, सभांसाठी टॉफलर अनेक देशात प्रवास करतात. १९७१ साली दिल्लीत विज्ञानभवनात त्यांची व्याख्याने झाली होती. त्यावेळेस त्यावेळच्या पंतप्रधान इंदिरा गांधींनी त्यांना आमंत्रण देऊन पूर्व पाकिस्तानच्या परिस्थितीविषयी चर्चा केली. अनेक देशातील विद्यापीठांमध्ये त्यांची व्याख्याने झाली आहेत, त्याचप्रमाणे TV वर कार्यक्रम झाले आहेत. त्यांच्या व्याख्यानसत्रात तसेच लेखनातही त्यांच्या पत्नी हेडी यांचा मोठा सहभाग असतो. My partner, my editor, my colleague, companion and critic असे आपल्या पत्नीचे वर्णन टॉफलर करतात.

# दोन कायापालट

## जनार्दन वाटवे

१० मे १९८६ माणूस अंकामध्ये या विषयावरील श्री. वाटवे याचा एक लेख प्रसिद्ध झाला होता. या लेखाने अनेकाचे लक्ष वेधून घेतले. टॉफलर याच्या विचाराचा अधिक व एकत्रित परिचय व्हावा अशी सूचनाही अनेकांकडून झाली. त्यामुळे १० मे अकातील लेखात काही दुरुस्त्या, काही वाढ करून 'दोन कायापालट' हा सुधारित लेख व 'तिसरा कायापालट' हा नवीन लेख येथे दिला आहे.

'फ्युचर शॉक' ( भविष्याचा आघात ) या टॉफलर याच्या पहिल्या पुस्तकाचा परिचय याआधी आलेला आहेच.

दोन्ही पुस्तकातील टॉफलर याच्या विचारांचे सूत्र एकच असल्याने निरीक्षणांची, मताची क्वचित कुठे पुनरुक्ती होणे साहजिकच आहे.

---

२०वे शतक आणखी १४ वर्षांत सपून २१ वे शतक सुरू होईल या शतकात भारत एका नव्या कालखडात प्रवेश करील. या नवीन कालखडाचे स्वरूप पूर्वीच्या कालखडापेक्षा फार निराळे राहील. या अपेक्षित युगास कॉम्प्युटर युग, इलेक्ट्रॉनिक युग, इनफॉर्मेशन युग अशी अनेक नावे दिली जातात सर्व राजकीय पक्षही, स्वत:च्या नेतृत्वाखाली, २१ व्या शतकात भारताला नवीन युगात नेण्यास उत्सुक आहेत. ज्या नव्या युगाचा सर्वत्र एवढा डांगोरा पिटला जात आहे ते नवे युग कसे असेल हे जाणण्याची उत्सुकता अनेक जणाना वाटणे स्वाभाविक आहे. अर्थात हे अनेक जणही एकदर समाजात अल्पसख्यच असतात. तात्कालिक वासनापूर्तीच्या भोवऱ्यात गुतल्यामुळे किंवा दारिद्र्यरेषेखाली असल्यास जीवनकलहाच्या तीव्रतेमुळे बहुताश लोकाना भविष्याविषयी विचार करण्यात स्वारस्य नसते. जे विचार करतात त्यातही ढोबळमानाने दोन गट असतात. एका गटाच्या विचाराप्रमाणे अतिम प्रलयकाळास आता काही वर्षेच बाकी आहेत. लवकरच सर्व मानवजात पर्यावरणातील प्रदूषणामुळे गुदमरून मरणार आहे (चेंबूरच्या रस्त्यावर सध्याकाळी उभे राहिले तर कधी कधी हे खरेही वाटते) किंवा आण्विक युद्धातील किरणोत्सर्गामुळे भाजून नाश पावणार आहे असा त्याचा होरा असतो. दुसऱ्या गटाच्या विचाराप्रमाणे आहे ही स्थिती अशीच कायम राहणार आहे व त्यात काहीच बदल घडणे शक्य नाही. दोन्हीही गटाची एकवाक्यता एकाच बाबतीत असते ती म्हणजे भविष्यकाळास आकार देण्यासाठी मानवास काहीही करण्याची गरज नाही वा ताकत नाही. हे दोन्हीही गट सोडून भविष्याविषयी शास्त्रीय दृष्टीने विचार करणारे जे लोक आहेत त्यात अल्विन टॉफलर याचे स्थान महत्त्वाचे आहे २१ व्या शतकाचे व नव्या युगाचे स्वरूप जाणण्यासाठी पुढे जे विवेचन केले आहे ते प्रामुख्याने अल्विन टॉफ्लर याच्या विचारसरणीच्या आधाराने केले आहे.

पुढे येणाऱ्या कालखंडाच्या सम्यक् ज्ञानासाठी होऊन गेलेल्या कालखडाचे स्वरूप नीट तपासणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे आतापर्यंतचा इतिहास नजरेखाली घातला तर टॉफ्लर याच्या मताप्रमाणे तीन महत्त्वाचे कालखड आपल्याला दिसतात

(१) भटक्या जमातीचा कालखंड
(२) शेतीप्रधान समाजाचा कालखंड
(३) औद्योगिक क्रातीनंतरचा कालखड

## (१) भटक्या जमातींचा कालखंड

या कालखडामध्ये मानव छोट्या टोळ्याच्या स्वरूपात राहात होता. या टोळ्या निरनिराळ्या प्रदेशात राहात असत. पुरुष जगलात प्राण्यांची शिकार करीत, कदमुळे गोळा करीत व त्यावर टोळीची उपजीविका होत असे. लहान मुलाचे पालनपोषण व राधणे स्त्रियाकडे असे. एक टोळी एका मोठ्या कुटुंबासारखी असे. रोजच्या उपजीविकेची गरज जेमतेम भागत असल्यामुळे शिल्लक काहीच नसे. त्यामुळे वैयक्तिक मालकी वा बाजारपेठ हा प्रकार अस्तित्वात नव्हता जगलातील काही भागावर टोळीची सामुदायिक मालकी असे, परंतु गरजेप्रमाणे सर्वच टोळ्या एका प्रदेशातून दुसऱ्या प्रदेशात जात असत व कुठल्याच प्रदेशाशी टोळीचे दृढ नाते नसे.

## (२) शेतीप्रधान समाजाचा कालखंड

भटक्या टोळ्यांच्या लक्षात आले की जंगलात भटकून शिकार करण्यापेक्षा किंवा फळे व कदमुळे गोळा करण्यापेक्षा एका जागी राहून गवताची कुरणे लावणे, फळझाडे लावणे व गायी आणि मेंढ्या पाळून उपजीविका करणे सोपे आहे. लवकरच गवताऐवजी धान्य पिकविणे जास्त फायदेशीर असल्याची जाणीव झाली. भटक्या टोळ्या एका जागी स्थिर झाल्या व शेतीप्रधान समाजाचा उदय झाला. हा बदल सर्व जगभर पसरला. समुद्रकिनाऱ्यावर उभे राहून लाटाकडे

नजर टाकली तर लक्षात येते की लाट प्रथम पाण्याच्या छोटया उंचवटयाचे रूप धारण करते. पाहता पाहता हा उचवटा अधिक पाणी सामावून घेतो, त्याचा आकार वाढतो, त्याचा वेग वाढतो, त्याला वरची कड फुटते. लाट वेगाने किनाऱ्याकडे सरकते व किनाऱ्यावर पसरते. भटक्या टोळयाच्या शेतीप्रधान समाजातील परिवर्तनास टॉफ्लर लाटेची उपमा देतात. या परिवर्तनास टॉफ्लर पहिली लाट अशी संज्ञा देतात व शेतीप्रधान समाजाच्या औद्योगिक समाजातील परिवर्तनास दुसरी लाट असे नाव देतात.

तथापि कालखडातील बदल सर्वंकष व मूलगामी असल्याने काया-पालट ही सज्ञा अधिक अर्थवाही आहे च्यवनऋषीचे शरीर उतार-वयामुळे सुकले होते व बेढब झाले होते. त्याची पत्नी सुकन्या हिच्या विनतीवरून अश्विनीकुमारानी कायापालटाचा सल्ला व मत्र दिला. त्याप्रमाणे एका सरोवरात स्नान केल्यावर च्यवनऋषीचे शरीर पायाच्या नखापासून ते डोक्याच्या शिखापर्यन्त बदलले व सुदर झाले. अशा नखशिखान्त बदलास कायापालट वा कायाकल्प असे सबोधतात. या कालखंडातील स्थित्यतरे अशीच 'नखशिखान्त' असल्यामुळे कायापालट हा शब्द वापरला आहे. तथापि हा बदल काही क्षणात घडून आला नाही. त्यादृष्टीने लाटेची उपमा जवळची आहे पुढील सर्व विवेचनात शेतीप्रधान कालखड, पहिली लाट. पहिला कायापालट हे शब्द समानार्थी वापरले आहेत, तसेच औद्योगिक कालखड यत्र-युग, दुसरी लाट, दुसरा कायापालट हे शब्दही असेच समानार्थी वापरले आहेत

## शेतीप्रधान समाजाचे रंगरूप—महत्त्वाची लक्षणे

शेतीप्रधान समाजाचा कालखंड हा ढोबळ मानाने ख्रिस्तपूर्व ८००० वर्षे ते ख्रिस्तानंतर १७०० वर्षे असा ९००० ते १०,००० वर्षांचा आहे. इतिहासातील हा फार मोठा कालखड आहे कोण-त्याही समाजाचा विचार करताना अनेक स्तरावरील वैशिष्टये नजरेसमोर येतात. प्रत्येक समाजात इधनाचा वा ऊर्जेचा वापर महत्त्वाचा असतो, ऊर्जाआधार, उत्पादन व वितरण पद्धती व अनुरूप अर्थव्यवस्था यांना उद्योग व्यापार विभाग किंवा तत्रविभाग म्हणता येईल. प्रत्येक समाजात सामाजिक सस्थाचा एक विशिष्ट ढाचा असतो. यात कुटुंबपद्धती, शिक्षणसस्था, राजकीय पक्षप्रणाली यांचा समावेश होतो. प्रत्येक समाजात लोकाच्या विचारसरणीत एक समान धागा असतो. त्याच्या श्रद्धा व जीवनमूल्यात एक समानता असते

समाजाच्या सुस्थितीसाठी अनेक प्रकारच्या माहितीची वा सदेशाची समाजाच्या विविध स्तरांत देवाणघेवाण आवश्यक असते. प्रगत समाजात हे सदेशाचे चयन मोठ्या प्रमाणात होत असते. याला संदेशसचार विभाग म्हणता येईल विविध कालखडाचा विचार करताना अशा अनेक स्तरावरील वैशिष्टये खाली पाहिली आहेत. पहिल्या कायापालटातील लक्षणाचे विवेचन ढोवळ मानाने वरील अनुक्रमाने केले आहे.

### तंत्रविभाग

**१) ऊर्जा आधार :** शेतीच्या कामासाठी बैल वा युरोपात घोडे वापरले जात संचारासाठी घोडागाडी वा बैलगाडी असे. इंधनासाठी जंगलातील झाडे तोडली जात स्वतःची वा प्राण्यांची स्नायुशक्ती हाच मोठा ऊर्जा आधार असे. तोडलेली झाडे परत वाढतात व खर्चिलेली स्नायुशक्तीही परत येते. ऊर्जेचा मित व्यय व तिचा न आटणारा झरा (Renewable source) हे शेतीप्रधान कालखंडा-तील ऊर्जाआधाराचे महत्वाचे अंग होते.

**२) उत्पादक व उपभोक्ता यांच्यातील अद्वैत :** कुटुबातील व्यक्ती शेतात राबून जे धान्य पिकवीत ते प्राय कुटुबाच्या उपयोगासाठी असे. स्वतःच्या उपयोगाचा व बलुतेदाराचा हिस्सा काढल्यावर थोडाच भाग शिल्लक उरे, तो स्थानिक बाजारात विक्रीसाठी जाई. कुटुबातील व्यक्ती टकळीवर वा चरख्यावर सूत कातीत व स्वत -पुरते कापड बनवीत व्यक्तीने स्वतःसाठी बनविलेल्या वस्तू वा स्वत.साठी केलेल्या सेवा याना कार्यविभाग 'अ' म्हटले व विक्री-साठी बनविलेल्या वस्तू व दुसऱ्यास दिलेल्या सेवा यास कार्यविभाग 'ब' म्हटले तर कार्यविभाग 'अ' हा कार्यविभाग 'ब' च्या तुलनेत, फार मोठा होता. बऱ्याच बाबतीत उत्पादक व उपभोक्ता एकच असत व केवळ बाजारपेठेसाठी उत्पादन ही अवस्था आलेली नव्हती अल्विन टॉफ्लर अशा व्यक्तीसाठी Producer व Consumer या दोन्ही शब्दाच्या जुळणीने केलेली *Prosumer* ही सज्ञा वापरतात

### सामाजिक विभाग स्तर

**१) स्वावलंबी खेडयांत विखुरलेला स्थिर समाज :—** शेतीप्रधान कालखडात काही मोठी शहरे व बाजारपेठा अस्तित्वात होत्या. तथापि ९० टक्क्याहून जास्त समाज अगणित लहान खेडयात विखुरला होता प्रत्येक खेडे धान्य, वस्त्र, दूधदुभते या बाबतीत आत्म-निर्भर असे शेतीची औजारे, तेलाचे घाणे व इतर काही गरजा त्याच खेडयात वा खेडयाच्या संकुलात भागविल्या जात असत एकदर उत्पादन मर्यादित असल्याने व जीवनावश्यक बाबतीत कुटुबे स्वाव-लबी असल्याने बाजारपेठाची फारशी गरज नसे. आठवडयात वा महिन्यात एका दिवशी बाजार भरे व मोठा बाजार जत्रेच्या वेळी म्हणजे वर्षातून दोनतीन वेळा भरे. रोजच्या आयुष्यात रोख पैशाचा वा नाण्याचा फारसा सबध येत नसे. अनेक सेवासाठी पैसे न मोजता सुगीच्या वेळी धान्य दिले जाई अशा सेवा देणाऱ्याना बलुतेदार म्हणत. सामान्य व्यक्ती फारसा प्रवासही करत नसे. इतिहासकार जे. आर. हेल यानी एका ठिकाणी व्यक्त केलेल्या अदाजाप्रमाणे सामान्य व्यक्तीच्या बाबतीत १५ मैल हा आयुष्यातील सर्वात मोठा प्रवास असे अर्थात या अदाजास अपवाद असले तरी सामान्यत समाजातील घटक आपापल्या खेडयांत खिळून असत

**२) समाईक वा एकत्र कुटुंबपद्धती :—** या कालखडात एकत्र कुटुंबपद्धती प्रचलित होती आई, वडील, मुले याखेरीज आजोबा, पणजोबा, काका व त्याच्या स्त्रिया अशा अनेक पिढया एकत्र राहात असत. सर्व पुरुष एका रक्ताच्या नात्याचे असत व स्त्रिया इतर कुटुबातून आलेल्या असत विवाहानतर मुली दुसऱ्या कुटुबात जात. मातृप्रधान कुटुंबपद्धतीही काही प्रदेशात प्रचलित होती. तथापि तो अपवाद होता व पितृप्रधान एकत्र कुटुंबपद्धती हा कालखडाचा नियम होता. पुरुष शेतावर एकत्र राबत व शेताची मालकी सर्व कुटुबाची असे. स्वैपाक, राधणे व मुलाचे सगोपन

स्त्रियांच्याकडे असे कुटुंबाकडे इतरही जबाबदाऱ्या असत. मूल जन्मतः असंस्कृत असते. त्याच्यावर योग्य संस्कार करून त्यास सुसंस्कृत बनविणे हे मोठे काम असे. या संस्कारात कुटुंबाविषयी अभिमान निर्माण करणे, त्या काळास अनुरूप अशा जीवनश्रद्धा देणे याचा अंतर्भाव असे. आजारीपणात शुश्रूषा करणे, अपंग, अंध व वृद्ध अशा परावलंबी घटकाची देखभाल करणे याही कुटुंबाच्या जबाबदाऱ्या होत्या हे काहीसे मोठे कुटुंब स्थिर होते कारण त्याचे सर्व घटक एकाच जमिनीच्या तुकड्यावर काम करीत. जे एकत्र राबतात तेच सामान्यतः एकत्र राहतात. अशी काही कुटुंबे एकत्र येऊन लहान खेडी व खेड्याची संकुले अस्तित्वात आली. या कालखंडास अनुरूप अशी ही कुटुंबव्यवस्था होती.

(३) **वर्णपद्धती :** सर्व शेतीप्रधान समाजात वर्णपद्धती प्रचलित होती ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र अशा वर्णात समाज विभागला होता. युरोपात Nobles, Priest, Traders असे वर्ण अस्तित्वात होते. १८ व्या शतकातील फ्रान्समधील राज्यक्रांती हा मूलतः राजेरजवाडे (Nobles) आणि व्यापारी वर्ग (Traders) यांच्यातील संघर्ष होता. प्रत्येकाचा वर्ण हा त्याच्या जन्माने सिद्ध होत असे.

(४) **जमिनीशी अतूट नाते .** शेतीप्रधान कालखंडांत जमिनीवर कुटुंबाची वैयक्तिक मालकी प्रस्थापित झाली. त्या कालातील समाजधुरिणानी, राजेरजवाड्यानी मालकी हक्क दाखल करण्याच्या पद्धती ऐतिहासिक गरज म्हणून अमलात आणल्या. यात सनदा, ताम्रपत्रे, शिलालेख वगैरेंचा समावेश असे. व्यक्तीची समाजातील प्रतिष्ठा जमिनीच्या मालकीवर अवलंबून असे. व्यापारात मिळविलेला पैसा वापरून त्या काळातील व्यापारी जमीनमालक होण्याचा प्रयत्न प्रतिष्ठेसाठी करीत. आपल्याकडे बरीच आडनावे ज्या गावात व्यक्तीची जमीन असते त्या गावावरून असतात. हा प्रकारही जमिनीशी असणारे दृढ नाते दाखवितो. जमिनीशी नाते तुटले की हा कालखंड संपला असे समजण्यास हरकत नाही.

पहिल्या कायापालटाची अनेक लक्षणे सांगता येतील, पण वर उल्लेखिलेली चार लक्षणे महत्त्वाची आहेत व पुढील विवेचनाशी संबद्ध आहेत.

## (३) औद्योगिक क्रांती : दुसरा कायापालट

१८ व्या शतकाच्या अखेरीस ब्रिटनमधील जंगले संपुष्टात आली व इंधनाची कमतरता भासू लागली त्यामुळे खाणीतील कोळसा हे मुख्य इंधन झाले. कोळशाच्या खाणी खोल गेल्या आणि त्यातील पाणी घोड्याने चालविलेल्या पंपाने वर खेचणे कठीण झाले याच सुमारास न्यूकोमेन याने वाफेवर चालणारे इंजिन तयार केले. या इंजिनाचा उपयोग प्रथम खाणीतील पाणी वर खेचण्यासाठी करण्यात आला. नंतर बोटी व रेलगाडी चालविण्यासाठीही वाफेच्या इंजनाचा उपयोग होऊ लागला. याच सुमारास युरोपात अनेक चात्या असलेले सूतकताई मशीन व कापड विणण्यासाठी यंत्र–माग अस्तित्वात आले. थोड्याच दिवसात कोळशाला पर्यायी असे खनिजतेल वापरात आले. या सर्व बदलामुळे व इतरही काही कारणामुळे औद्योगिक क्रांतीची लाट निर्माण झाली, व पुढील ३०० वर्षांच्या कालावधीत सर्व युरोपात व उत्तर अमेरिकेत पसरली. या लाटेने सर्व समाजव्यवस्था ढवळून निघाली. औद्योगिक क्रांतीची एक अशी कारणमीमांसा नाही. शास्त्रज्ञानी प्रस्थापित केलेले भौतिक शास्त्रातील नवे सिद्धांत, त्यावर आधारित यंत्ररचना अमेरिका व आफ्रिका खंडातील नव्या वसाहती, वसाहतीतून मिळणारा स्वस्त कच्चा माल व हुकमी बाजारपेठ वगैरे अनेक गोष्टी औद्योगिक क्रांतीस कारणीभूत झाल्या. तरीही औद्योगिक क्रांती हे अनेक तज्ज्ञाच्या दृष्टीने अजूनही कोडे आहे.

तथापि कारणाच्या चर्चेपेक्षा, घडून आलेल्या बदलाच्या स्वरूपाकडे लक्ष देणे विवेचनाशी अधिक संबंधित आहे. त्याचबरोबर हेही लक्षात ठेवले पाहिजे की हा बदल संघर्षाशिवाय घडून आलेला नाही. शेतीप्रधान समाजव्यवस्था व औद्योगीकरणाची प्रक्रिया यात संघर्ष होणे अटळ होते १८ व्या शतकात अमेरिकन संघराज्यातील उत्तरेकडची राज्ये व दक्षिणेकडची राज्ये याच्यात यादवीयुद्ध झाले. दक्षिणेकडील गुलामगिरीची पद्धत हे यादवीयुद्धाचे कारण होते असे मानले जाते. तथापि तज्ज्ञाच्या मते उत्तरेकडील राज्यातील औद्योगीकरण व दक्षिणेकडील राज्यातील शेतीप्रधान समाजव्यवस्था याच्यातील मूलभूत संघर्ष या यादवीयुद्धास कारणीभूत होता. १९१७ सालच्या रशियन राज्यक्रांतीचे स्वरूपही काहीसे असेच आहे राज्यक्रांतीनंतर बोल्शेव्हिक पक्ष अधिकारावर आला व त्याने रशियाचे वेगाने औद्योगिकरण करण्यास सुरुवात केली. टॉफ्लर याचे मताप्रमाणे लेनिन प्रथम " Industrializer " होता व मग कम्युनिस्ट.

### औद्योगिक राष्ट्रे व भारतातील परिस्थिती

अमेरिकन संघराज्य, कॅनडा, युरोपातील बहुतेक सर्व राष्ट्रे, जपान, तैवान, हाँगकाँग, ऑस्ट्रेलिया व न्यूझीलंड याचा औद्योगिक राष्ट्रात समावेश होतो. जगाच्या एकंदर ४०० कोटी लोकसंख्येपैकी एक-चतुर्थांश लोकसंख्या या राष्ट्रात म्हणजे औद्योगिक समाजात राहाते.

भारताचा विचार केला तर २०–२५ मोठी शहरे व औद्योगिक केंद्रे सोडली तर भारतात शेतीप्रधान कालखंड व त्याला संवादी समाजव्यवस्था अस्तित्वात आहे. १९०१ साली भारतातील ८९ टक्के लोकसंख्या खेड्यात राहात असे व ११ टक्के शहरात. १९८१ सालच्या शिरगणतीप्रमाणे खेड्यातील लोकसंख्येचे प्रमाण ७८ टक्क्यावर आले व शहरवासीयाचे प्रमाण २२ टक्क्यावर आले. औद्योगीकरणाचा व नागरीकरणाचा वेग झपाट्याने वाढत आहे, गेल्या दहा वर्षांतील औद्योगीकरण व त्याआधीच्या ४० वर्षातील औद्योगीकरण एकाच मापाने मोजता येईल. त्यामुळे औद्योगिक व शेतीप्रधान प्रणालीतील संघर्ष अनेक वेळा दिसतो. शेतकऱ्यानी वाटेल तेवढा कापूस वा कांदा पिकवावा व सरकारने तूट सोसून तो सर्व वाढीव दराने विकत घ्यावा हा शेतकरी नेत्याचा आग्रह व त्याला होणारा विरोध याच मूलभूत संघर्षाची साक्ष देतात. शेतकरी नेते याला भारत व इंडिया याच्यातील संघर्ष असे उपहासाने म्हणतात

या आधीच्या विवेचनात शेतीप्रधान समाजाचे जे वर्णन केले आहे ते भारतातील खेड्यातील समाजास लागू होईल यापुढे दुसऱ्या कायापालटातील समाजाचे वर्णन वा समस्या याचे विवेचन आहे ते भारतातील मोठ्या शहरातील व्यवस्थेस लागू पडते. खेड्यामध्ये शेतीप्रधान

समाजव्यवस्था अद्यापही असली तरी मोठ्या शहरातून औद्योगिक समाज अस्तित्वात आला आहे

## यंत्रयुगाचे रंगरूप – महत्त्वाची लक्षणे

भौतिक शास्त्रातील नव्याने समजलेल्या सिद्धांतांच्या आधारे नवे यंत्रशास्त्र विकसित झाले. कोळसा व खनिजतेल यासारख्या शक्तिशाली इंधनावर चालणारी हजारो अश्वशक्तीची ताकद असणारी यंत्रे बनविली गेली. तथापी शक्तिशाली यंत्रे व इंधने हेच केवळ उत्पादनवाढीचे कारण नव्हते. उत्पादनाच्या नवीन प्रक्रिया व नवीन तंत्रेही उत्पादनवाढीस कारणीभूत झाली. उत्पादनप्रक्रियातील काही नवीन तंत्राचा पुढे विचार केला आहे

### उत्पादनसूत्रे

**(१) परिमाणांचे प्रमाणीकरण** – STANDARDIZATION : पहिल्या कायापालटात एका प्रदेशातील उत्पादन दुसऱ्या प्रदेशात अपवादानेच जात असे. त्यामुळे प्रत्येक भागात लावी, रुंदी व वजनाची निरनिराळी परिमाणे अस्तित्वात होती, व ती ढोबळ स्वरूपाची होती, एका भागातील शेर दुसऱ्या प्रदेशातील पावशेराएवढा असे विहीर ३०–४० हात खोल आहे असे सांगितले जाई, व राहण्याची जागा खणात मोजली जाई. दुसरे घर हाकेच्या अंतरावर असे औद्योगिक कालखंडात हा ढोबळपणा चालणे शक्य नव्हते. औद्योगिक क्रांतीची लाट जशी निरनिराळ्या देशात पसरू लागली, तशी त्या देशात परिमाणाची निश्चिती करण्यात आली बहुतेक देशात निरनिराळ्या भागात निरनिराळी नाणी प्रचलित असत ती नाणी त्या भागातील राजेरजवाड्यानी वा व्यापारी पेढ्यानी प्रसृत केली होती भारतात एकाच वेळी मोगली रुपया, सुरती शिक्का, सोन्याचा होन अशी अनेक नाणी प्रचारात होती युरोपातही असाच प्रकार होता. औद्योगिक कालखडात हे सर्व बद होऊन मध्यवर्ती बँकेतर्फे निश्चित नोटा व नाणी प्रसृत करण्यात आली. १७८९ साली फ्रान्समध्ये राज्यक्रांती होऊन नवे क्रांतिकारी सरकार अधिकारावर आले पहिल्याच वर्षी त्या सरकारने मोजमापाच्या प्रमाणीकरणाचा कायदा केला. कारण औद्योगीकरणासाठी हा महत्त्वाचा विषय होता प्रमाणीकरणाची ही प्रक्रिया मोजमापे वा नाणी एवढ्यापुरती मर्यादित नव्हती निश्चित मापाचे तयार कपडे, पादत्राणे व इतर वस्तू बाजारात आल्या बाजारभावही निश्चित झाले. परिभाषाच्या प्रमाणीकरणाबरोबर बुद्धिमत्तेच्या कसोट्याचेही प्रमाणीकरण झाले. टेलर याच्या मताप्रमाणे कोणत्याही कामाच्या एका पायरीसाठी एकच निश्चित पद्धत असते एकच निश्चित औजार असते व कामासाठी एकच निश्चित कालावधी असतो टेलर हे यंत्रयुगातील एक व्यवस्थापनतज्ज्ञ होते

**(२) तज्ज्ञप्रवृत्ती** – SPECIALIZATION . औद्योगिक कालखडाच्या सुरुवातीच्या काळात अॅडम स्मिथ नावाचे एक अर्थशास्त्रज्ञ ब्रिटनमध्ये होते. त्यानी आपल्या एका ग्रंथात एका छोट्या कारखान्यास दिलेल्या भेटीचे वर्णन आहे त्याकाळी एक कामगार दिवसाकाठी ५०–६० पिना बनवीत असे. पिनेस टोक करणे, पॉलिश करणे, पॅकिंग करणे ही सर्व कामे तो स्वत.च करीत असे. स्मिथने वर्णन केलेल्या लहान फॅक्टरीमध्ये पिन बनविणाऱ्या दहा पायऱ्या होत्या. तारेतून ठराविक लांबीचे तुकडे कापणे, एका बाजूस टोक करणे, पॉलिश करणे वगैरे. कामाच्या या प्रत्येक पायरीसाठी तज्ज्ञ कामगार असे व तो कामगार दिवसभर तेवढेच काम करीत असे. अशा तऱ्हेने १० कामगार दरदिवशी ४८००० पिना किंवा दरमाणशी ४८०० पिना तयार करीत. पहिल्या प्रकारापेक्षा हे उत्पादन कितीतरी अधिक होते. फोर्ड कंपनीच्या मोटारीच्या कारखान्यात एक कामगार अनेक वर्षे एकच काम करीत होता ते म्हणजे फिरत्या बेल्टवरून समोर आलेल्या मोटारीच्या सांगाड्यावर चाक बसविणे. चाकाचे नट पिळण्याचे काम दुसरा कामगार करी.

पिनाची ही वरील गोष्ट पुढील ३००० वर्षांत निरनिराळ्या तऱ्हेच्या अनेक कारखान्यात थोड्या फार फरकाने परत परत दिसून आली.

**(३) साखळीपद्धत** – SYNCHRONIZATION · एका कामाच्या अनेक पायऱ्या करून प्रत्येक पायरीसाठी तज्ज्ञ कामगार नेमल्याने उत्पादन वाढते हे खरे, पण या पद्धतीने प्रत्येकाचे काम परस्परावलबी झाले ( INTERDEPENDANT ) साखळीतील एक दुवा तुटल्यास साखळी निरुपयोगी होते. तसेच एक कामगार उशिरा आल्यास वा गैरहजर राहिल्यास साखळीतील इतर कामगाराची कामे अडतात. पहिल्या कायापालटातील उत्पादनप्रक्रियामध्ये परस्परावलंबित्व एवढ्या मोठ्या प्रमाणावर नव्हते. यामुळे दुसऱ्या कायापालटात वक्तशीरपणाला एक आगळेच महत्त्व आले जे पूर्वी कधीही नव्हते. औद्योगिक क्रांतीच्या सुरुवातीच्या काळात खेड्यातून कारखान्यात कामासाठी आलेला कामगार अनियमित असे, कारण त्याला कामाच्या परस्परावलंबित्वाचे व वक्तशीरपणाचे महत्त्वच समजत नसे. हे शिक्षण लहानपणापासून देणे आवश्यक आहे हे लक्षात आल्यावर, शाळांतील अभ्यासक्रमात एक महत्त्वाचा फरक करण्यात आला इतर विषयावरोबर वक्तशीरपणा, आज्ञाधारकपणा व कंटाळवाणे साचेबंद काम ( ROTE WORK ) करण्याची सवय याचा अभ्यासक्रमात अंतर्भाव करण्यात आला.

**(४) निर्मितीचे मोठे प्रमाण** – MAXIMIZATION : कोणत्याही कारखान्यातील उत्पादनात दोन प्रकारचा खर्च अंतर्भूत असतो उत्पादनासाठी लागणाऱ्या कच्च्या मालाचा खर्च एक प्रकारचा व ऑफिसमधील पत्रव्यवहाराचा खर्च, कारखान्याच्या जागेचा प्रश्न, यंत्रसामग्रीचा खर्च दुसऱ्या प्रकारचा. पहिल्या प्रकारचा खर्च उत्पादित नगाच्या संख्येप्रमाणे कमी वा अधिक होतो, तर दुसरा खर्च उत्पादित नगाच्या संख्येवर अवलंबून नसतो विक्रीची किंमत ठरविताना दुसऱ्या प्रकारचा खर्च हा उत्पदित नगाच्या संख्येत वाटला जातो. त्यामुळे उत्पादित नगाची संख्या जेवढी जास्त, त्याप्रमाणात प्रत्येक नगाच्या किंमतीत घट होते थोडक्यात वस्तू मोठ्या प्रमाणावर बनविणे फायदेशीर असते.

निर्मितीच्या या सर्व तंत्राचा वापर करून हेन्री फोर्डने एकाच तऱ्हेची, एकाच रंगाची T–MODEL फोर्ड गाडी मोठ्या संख्येने बनविली व स्वस्त विकण्यास सुरुवात केली एका डीलरने रंगाविषयी चौकशी केली असता त्याने उत्तर दिले– " Yes it is possible to have any Colour Ford as long as at is black " हाच कित्ता अनेक उत्पादकानी आपल्या बहुविध उत्पादनाच्या बाबतीत


So many attractive ways to say
“I care!”
camlin
camlin
PEN & BALL PEN GIFT SET
SHREE-C-5-86

परतपरत गिरविला. पण या तंत्राचा अधिक विचार करण्याआधी यत्रयुगाच्या महत्त्वाच्या लक्षणाकडे लक्ष पुरविणे अधिक महत्त्वाचे आहे

### यंत्रयुग–महत्त्वाची लक्षणे

भारताच्या मोठ्या भागात शेतीप्रधान समाजव्यवस्था –(पहिला कायापालट)– अस्तित्वात असली तरी मोठी शहरे व औद्योगिक केंद्रे यात यत्रयुग ( दुसरा कायापालट ) अवतरले आहे. एकदर ६५ कोटी लोकसख्येपैकी १०–१२ कोटी लोकसख्या यंत्रयुगाच्या वातावरणात राहते. पुढे दिलेली लक्षणे शहरातील या समाजास लागू पडतात.

### उद्योग–व्यापार विभाग

**(१) ऊर्जा आधार :** पहिल्या कायापालटात ऊर्जेचा वापर मित व परत भर पडणाऱ्या स्त्रोतातून होता हे आधी पाहिले आहे. औद्योगिक कालखंडात कोळसा व खनिज तेल ही शक्तिशाली इधने *अल्पमोलात मिळाली. औद्योगिक समाजास मिळालेली ही अत्यत* महत्त्वाची गुप्त मदत (Hidden Subsidy) होय असे तज्ज्ञ सागतात. पहिल्या कायापालटातील ऊर्जेचा वापर म्हणजे बँकेतील ठेवीवरील व्याजात ससार चालविण्यासारखे होते. दुसऱ्या कायापालटातील ऊर्जेचा वापर म्हणजे मुद्दलच खाऊन टाकण्याचा प्रकार होता. केवळ ऊर्जाच नव्हे तर सर्वच नैसर्गिक साधनसपत्तीची बेसुमार उधळपट्टी हा या कालखडाचा विशेष होय.

**(२) उत्पादक व उपभोक्ता यांच्यातील दरी व बाजारपेठेचा उदय :** पहिल्या कायापालटातील बरेचसे उत्पादन वा सेवा स्वत च्या वा कुटुबाच्या उपयोगासाठी असत. दुसऱ्या शब्दात कार्यक्षेत्र विभाग 'अ' हा विभाग 'ब' च्या तुलनेत फार मोठा होता. नवीन इधनामुळे, शक्तिशाली यंत्रामुळे व नवीन तत्रामुळे उत्पादन वेग अनेकपटीने वाढला. साहजिकच हे उत्पादन कुटुबाच्या उपयोगासाठी नसे तर प्राय: विक्रीसाठी असे. प्रोझ्यूमर प्रणालीचा लोप झाला व उत्पादक उपभोक्ता अशी विभागणी झाली. उत्पादक व उपभोक्ता याच्यातील दरीने अनेक परिणाम घडून आले. त्यात बाजारपेठेचा जन्म हा महत्त्वाचा परिणाम होय.

उत्पादक व उपभोक्ता याच्यात अतर निर्माण झाल्यावर त्याना परत एकत्र आणणे भाग होते विक्रेते व गिऱ्हाइके यांना एकत्र आणणारी सस्था या सामान्य अर्थाने बाजारपेठेचा उदय झाला. भांडवलशाही देशातील फायद्यावर आधारित बाजारपेठ हे बाजारपेठेचे एक विशिष्ट मॉडेल आहे. समाजवादी देशातही बाजारपेठ आहे, तशीच भाडवलशाही समाजव्यवस्थेतही. जोपर्यंत उत्पादक व उपभोक्ता याच्यातील दरी अस्तित्वात आहे तोपर्यंत बाजारपेठही अस्तित्वात राहणार प्रोझ्यूमर्स या वर्गाच्या विस्तारानेच फक्त बाजारपेठेचा सकोच होईल असे टॉफ्लर याचे मत आहे.

एकदा बाजारपेठ निर्माण झाल्यावर तिने उत्पादक व उपभोक्ता याच्यातील अतर आणखी वाढविले व त्याचा परिणाम म्हणून बाजारपेठेचा आणखी विकास झाला. एक प्रकारचे दुष्ट वर्तुळ निर्माण झाले.

बाजारपेठाचा विस्तार ज्या प्रमाणात होत गेला त्या प्रमाणात बाजारपेठाच्या परिघाबाहेर राहणारा खेड्यातील स्वावलबी समाज हळूहळू बाजारपेठेच्या भोवऱ्यात ओढला गेला. शेतकऱ्याच्या शेतातील पिकाच्या किमती हजारो मैलाच्या अतरावर झालेल्या घटनाच्या सदर्भात ठरू लागल्या. शेतमालाच्या किमती दूरवरच्या देशात दुष्काळ आहे का अमाप पीक आले आहे या प्रमाणात खालीवर होऊ लागल्या. कापसाच्या किंमती कापूस पिकविण्याच्या खर्चाच्या संदर्भातच नव्हे तर कृत्रिम धाग्याच्या निर्मितीच्या खर्चाप्रमाणे बदलू लागल्या. १९ व्या शतकात युरोपात पामच्या तेलावर प्रक्रिया करून मार्गारिन वा कृत्रिम लोणी बनविले गेले व ते खूप लोकप्रिय झाले. पामच्या तेलाला प्रचंड मागणी निर्माण झाली आणि त्यामुळे पामची झाडे असलेल्या आफ्रिकेतील काही भागातील समाजजीवन उद्ध्वस्त झाले असे इतिहासकार सागतात. अमेरिकन सघराज्यात मोटारगाड्याचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर सुरू झाले व गाड्याच्या टायरसाठी रबराला अचानक मोठी मागणी निर्माण झाली. दक्षिण अमेरिकेत रबराची नवी लागवड करण्यासाठी सक्तीने गुलामाना पाठविण्यात आले ४००० टन रबरासाठी ३०,००० गुलाम मृत्युमुखी पडले. चपारणमधील निळीच्या लागवडीची पीछेहाट व शेतकऱ्याच्या यातनाना जर्मनीमधील रासायनिक शोध कारणीभूत झाला ही गोष्ट भारतीयाना जवळची आहे. थोडक्यात गावाच्या वेशीबाहेर असणारी बाजारपेठ सर्व अर्थाने गावाच्या मध्यभागी आली. वैयक्तिक जीवनातही हाच बदल घडून आला.

पहिल्या कायापालटातील महत्त्वाकाक्षी, उत्साही व्यक्ती सर्वाधिक कला सपादन करण्याची, हरहुन्नरी बनण्याची आकाक्षा बाळगीत असे आपण हाताने काय बनवू शकतो, निर्माण करू शकतो याचा अभिमान बाळगीत असे. बाजारपेठेच्या *उदयामुळे व विकासामुळे* याच आकाक्षेचे रूपातर आपण उपभोगाच्या किती वस्तू विकत घेऊ शकतो वा आपल्या मालकीच्या किती सुविधा आहेत या भाषेत झाले. यत्रयुगातील मानवात दिसणारा उपभोगाच्या वस्तूचा अमर्याद सोस वा हव्यास हा बाजारपेठेच्या विस्ताराचा परिणाम आहे तथापि हा विषय निराळा. उत्पादक व उपभोक्ता याच्यातील द्वैत व बाजारपेठेचा उदय ही यत्रयुगाची महत्त्वाची लक्षणे आहेत हे नमूद करणे एवढेच येथे सबद्ध आहे.

**(३) नवे तत्रज्ञान व कारखानदारी :** भौतिक शास्त्रातील नव्या सिद्धातामुळे शक्तिशाली यत्रे बनविण्यात आली. यत्र हे मूलत: स्नायुबल अनेक पटीने वाढविते. त्यामुळे यत्र म्हटले की अश्वशक्ती हा शब्द डोळ्यांसमोर येतो. शेकडो अश्वशक्तीच्या परिमाणात मोजता येईल अशी या यत्राची ताकद असे. सूतकताईसाठी वा कापड विणण्यासाठी अशा एका यत्राचा वापर केला म्हणजे हजारो चात्यां वा शेकडो माग एका छपराखाली आणणे आवश्यक होते. एक यत्र दुसऱ्या यत्रावर अवलबून असल्याने यत्राचे एकत्रीकरण आवश्यक होते. अशा रीतीने कारखान्याचा व कारखान्याच्या शहराचा उदय झाला. कारखान्यात काम करण्यासाठी लोकाचे लोढे खेड्यातून शहराकडे येऊ लागले.

पहिल्या लाटेखालील समाजातही यत्रे होती चरखा, माग ही यत्रे घरोघरी असत. कुभाराचे चाक वा तेलाचा घाणा प्रत्येक खेड्यात



यंत्रयुगातील मानवात दिसणारा उपभोग्य वस्तूंचा अमर्याद सोस

असे. ही यंत्रे व ती चालविणारे स्नायुबल विखुरलेले होते, तसेच या यंत्रांची ताकत नवीन यंत्रांच्या तुलनेत नगण्य होती.

**(४) मोठ्या कॉर्पोरेशन्सचा उदय :** पहिल्या कायापालटातील उद्योगाची मालकी एका व्यक्तीकडे वा एका कुटुंबाकडे असे, परंतु मोठ्या प्रमाणावर निर्मिती केल्याने वस्तू स्वस्त व चढाओढीने विकता येतात हे दिसल्यावर, कारखान्याचा आकार वाढविणे आवश्यक झाले. यासाठी सुरुवातीची भांडवल गुंतवणूकही मोठ्या रकमेची झाली. एका कुटुंबाकडून किंवा चारसहा भागीदारांकडूनही सर्व भांडवल येणे शक्य नसे. यावेळी बहुतेक औद्योगिक देशात मर्यादित जबाबदारीचा कायदा करण्यात आला. एका उद्योगाचे दिवाळे निघाले तर भागीदाराने घातलेले भांडवल तेवढेच वाया जाईल पण त्याच्या इतर इस्टेटीवर टाच येणार नाही अशी या कायद्याने सोय केली. त्याआधी कंपनीचे दिवाळे निघाल्यास भागीदारांच्या घरादारासही धोका संभवत होता. हा कायदा झाल्यावर समाजाच्या सर्व थरातील व्यक्तींना उद्योगधंद्यात भांडवल गुंतविणे सुलभ झाले. डॉक्टर, वकील, आर्किटेक्ट, नर्सेस, टायपिस्ट, कारकून, शिक्षक वगैरे अनेक व्यवसायांतील लोकही खाणकाम, पोलाद, सिमेंट, रेल्वेमार्ग वगैरे अगदी निराळ्या व्यवसायांतील कंपन्यांत पैसे गुंतवू लागले. १९०१ साली १०० कोटी डॉलर भांडवल असणारी जगातील पहिली कार्पोरेशन अमेरिकन संघराज्यात स्थापन झाली—ती होती United States Steel. लवकरच अशा अनेक कॉर्पोरेशन्स स्थापन झाल्या ज्यांचे भागभांडवल आशिया—आफ्रिकेतील कित्येक देशांच्या वार्षिक उलाढालीपेक्षाही जास्त होते. यंत्रयुगातील उद्योगांच्या विकासात या कार्पोरेशन्सनी महत्त्वाची कामगिरी केली.

तंत्रविभागात हे जसे बदल घडून आले तसेच सामाजिक स्तरांवरही बदल घडून आले. त्या बदलांची चर्चा पुढे केली आहे.

## सामाजिक स्तर

**(१) श्रमजीवी कामगार वर्गाचा ( PROLETARIAT ) चा उदय :** यंत्रयुगाच्या सुरुवातीच्या काळात बरेच शेतमजूर ८–९ महिने कारखान्यात काम करीत, व सुगीच्या २–३ महिन्यांत शेतावरील कामासाठी परत जात. पण लवकरच हा प्रकार थांबला व पूर्णवेळ कामगारवर्ग अस्तित्वात आला आणि जमिनीशी त्याचे नाते तुटले. वेल्डर, फिटर, रिव्हटर, पंच ऑपरेटर, विणकर असे कामगारांचे अनेक प्रकार असत. पण प्रामुख्याने शारीरिक श्रम या सर्व प्रकारात महत्त्वाचे असत. धूर ओकणारी कारखान्याची चिमणी हे यंत्रयुगाचे प्रतीक म्हटले तर हातोडा वा घण हे या कामगारवर्गाचे प्रतीक होते. धूळ, वंगण, तेल यांच्या सान्निध्यात सतत काम असल्यामुळे हे कामगार निळा एप्रन धारण करीत असत. अशा प्रकारचा कामगारांना ब्लू कलर वर्कर असे संबोधिले जाते. मार्क्सिस्ट परिभाषेत या कामगारवर्गास Proletariat अशी संज्ञा दिली जाते. कामगारवर्ग असा शब्दप्रयोग केला जातो कारण या कामगारांचे काही स्वतंत्र गुणविशेष निर्माण झाले. शेतकऱ्याच्या तुलनेत हा वर्ग कमी रूढिप्रिय, अधिक प्रगतिशील व अधिक संघटित होता. शरीराखेरीज स्वतःच्या मालकीचे काहीच नसल्याने आहे ती परिस्थिती कायम ठेवण्यात शेतकऱ्याप्रमाणे त्याचे हितसंबंध गुंतलेले नसत. प्रोलेटेरियट सर्व समाजवादी राजकीय पक्षांचा कणा झाला असे म्हणता येईल. प्रोलेटेरियटचा यंत्रयुगातील राजकारणावर इतका प्रभाव पडला की सर्व राजकीय पक्षांचे वा प्रणालींचे डाव्या व उजव्या गटात वर्गीकरण झाले.

**(२) विभक्त कुटुंबपद्धती : NUCLEAR FAMILY :** यंत्रयुगाच्या आरंभानंतर कारखान्यांत काम करण्यासाठी लोकांचे लोंढे खेड्यातून शहरांकडे आले. जमिनीवर राबणारे काही घटक व दूरच्या शहरात कारखान्यांत काम करणारे काही घटक यांचे एकत्र वा समा-

ईक कुटुंब शक्य नव्हते व औद्योगिक कालखंडास अनुरूपही नव्हते. आई, वडील व मुले यांनी सीमित असलेल्या कुटुबाचे जमिनीशी नाते नव्हते व त्यामुळे ते अधिक सचारी (Mobile) होते या कालानुरूप कुटुबपद्धतीचा प्रसार औद्योगीकरणाबरोबर वेगाने झाला, व ही एकच नैसर्गिक कुटुंबपद्धती आहे असा भ्रम निर्माण झाला. समाईक कुटुबातील इतर कर्तव्ये साहजिकच इतरत्र वाटली गेली. मुलाच्या शिक्षणाचे व त्याना सुसस्कृत करण्याचे काम फॅक्टरीसदृश शाळाच्याकडे गेले. आजारी व अपगासाठी सार्वजनिक इस्पितळे आली. कुटुबातील वृद्धाची रवानगी वृद्धाश्रमात झाली. या सर्व सस्थाना शासनाने मदत केली कारण यत्रयुगास अनुरूप अशी विभक्त कुटुबपद्धती (Nuclear family) रूढ करणे शासनाचे कर्तव्य होते.

समाईक कुटुब बदलत्या परिस्थितीच्या दाबामुळे मोडले, घटकांच्या वैयक्तिक नीतीमत्तेत काही त्रुटी होत्या असा प्रकार नव्हता. तथापी परिस्थितीचे आकलन न झाल्याने विभक्त होणाऱ्या अनेक कुटुंबघटकात अपराधीपणाची भावना असे

**(३) प्रसिद्धीमाध्यमांचा विस्तार व समूहमनाची निर्मिती :** माणसाला जे ज्ञान मिळते ते त्याच्या पचेंद्रियापासून मिळते त्यातही दृष्टी व श्रवणशक्ती ही महत्त्वाची साधने आहेत. डोळे व कान यावर पडत असलेल्या संदेशामुळे माणसाच्या मनात काही प्रतिमा वा चित्रे निर्माण होतात, व तथाकथित वास्तवाची माणसाला जाणीव होते. जाणीवेतील वास्तव व सत्य वा असली वास्तव यात अतर किती हा प्रश्न अलाहिदा

पहिल्या कायापालटात प्रातिनिधिक व्यक्तिच्या मनावर वा संज्ञापटलावर थोडेच सदेश येत असत व निर्माण होणाऱ्या प्रतिमाची सख्या मर्यादित असे. उगवणारा सूर्य, फळे, फुले, वाऱ्यानी डुलणारी शेते अशी निसर्गचित्रे व इतर माणसानी सागितलेल्या कथा एवढेच मर्यादित सदेश व्यक्तीच्या मनावर होत असत एकंदर प्रवास कमी असल्याने एका व्यक्तीचा थोडयाच इतर व्यक्तीशी सबध येत असे व संबंध येणाऱ्या व्यक्तीचे अनुभवविश्वही छोटे असल्याने संज्ञापटलावर येणाऱ्या सदेशांची सख्या तसेच विविधता मर्यादित असे.

दुसऱ्या कायापालटांत प्रसिद्धिमाध्यमाचा फार मोठया प्रमाणावर विस्तार झाला. वर्तमानपत्रे, नियतकालिके, रेडिओ, टेलेव्हीजन, रस्त्यावर लावलेली प्रचड पोस्टर्स, निऑन साईन्स, सिनेमा ही एकदिशा माध्यमे प्रथमच अस्तित्वात आली याच्या विस्ताराबरोबर माणसाचे अनुभवविश्वही मोठया प्रमाणावर विस्तारले अतराळातून वा विमानातून पृथ्वीची घेतलेली छायाचित्रे, समुद्राच्या तळावरील छायाचित्रे वगैरे पूर्वी कधीही न पाहिलेली चित्रे प्रथमच दिसू लागली. १९७३ साली अमेरिकन संघराज्यात दैनिक वर्तमानपत्राच्या एकंदर ६.३ कोटी प्रती खपत असत. एकंदर लोकसख्येपैकी ६९ टक्के लोक नेमाने रोजचे वर्तमानपत्र वाचत असत. इतर औद्योगिक देशातही अशीच परिस्थिती होती एकदिशा प्रसिद्धीमाध्यमाच्या विस्तारामुळे एक विचार वा एक संदेश शब्दश. कोटयावधी लोकापर्यंत पोचत होता. काही चित्रे सततच्या पुनरुक्तीमुळे लोकाच्या मनात शिल्पाप्रमाणे कोरली जात. दोन बोटानी V for Victory हे चिन्ह दाखविणारे चर्चिलचे छायाचित्र, नाझी पद्धतीचा सल्यूट देणारे हिटलरचे छायाचित्र ही दोन यत्रयुगातील उदाहरणे देता येतील. साहजिकच लाखो लोकाच्या विचारसरणीत एक प्रकारचा सारखेपणा निर्माण झाला. याला Man Mind किंवा समूहमन म्हणता येईल. राष्ट्रीय अस्मितेच्या निर्मितीत या समूहमनाचा मोठा वाटा होता. एक विचार एक आचार व एक नेता हे राष्ट्रीय जीवनाचे सूत्र दुसऱ्या कायापालटात झाले होते. तसेच शिक्षणसंस्था, घरातील वडीलधारे, राजकीय पक्ष, सामाजिक सस्था याच्या विचारसरणीत एकवाक्यता होती. 'खरे सत्य बोला यथातथ्य चाला' असे सदेश शाळेत तसेच घरीदारीही सतत कानावर पडत.

एक छाप अगणित नगाची निर्मिती हे जसे यंत्रयुगाचे औद्योगिक स्तरावरील वैशिष्ठ्य होते, तसेच साचेबद समूहमनाची निर्मिती हे यत्रयुगाचे सामाजिक स्तरावरील वैशिष्ठ्य होते.

**(४) राष्ट्रभावनेचा उदय :** दुसऱ्या कायापालटाच्या सुरुवातीच्या काळात बाजारपेठ कारखान्याच्या शहरी अस्तित्वात आली; पण उत्पादनाचे प्रमाण वाढले तसा बाजारपेठेचा विस्तार करणे आवश्यक झाले. याला एक अडथळा म्हणजे दळणवळणाची अपुरी साधने हा होता; पण त्यापेक्षा मोठा अडथळा म्हणजे विस्कळीत राजकीय सत्ता हा होता औद्योगिक क्रातीच्या सुरुवातीच्या काळात युरोपात अनेक राज्ये, जहागिऱ्या होत्या. एकटया जर्मन भाषेच्या प्रदेशात ३०० हून अधिक राज्ये व जहागिऱ्या अस्तित्वात होत्या. या राज्यांचे कायदे, करविषयक तरतुदी भिन्न असत व्हाल्टेयरने एका ठिकाणी लिहिले आहे की, युरोपात प्रवास करताना जितक्या वेळा घोडे बदलावे लागत त्यापेक्षा जास्त वेळा कायदे बदलावे लागत. प्रचंड वाढलेल्या उत्पादनाच्या विक्रीसाठी अनेक दूरच्या बाजारपेठांशी सपर्क साधावा लागत असे. अनेक छोटया राज्याची ही राजकीय अवस्था वाढलेल्या उत्पादनाच्या विक्रीसाठी अनुरुप नव्हती. जेथे एक कायदा–विशेषत: एक व्यापारी कायदा एक मध्यवर्ती चलन, व दळणवळणाची सुलभ साधने अस्तित्वात आहेत असा एकसंध प्रदेश निर्माण करणे ही नव्या औद्योगिक समाजाची गरज होती जर्मन भाषेच्या प्रदेशातील ३०० हून अधिक लहान राज्याचे एकत्रीकरण करून बिस्मार्कने एक राष्ट्र Das Vaterland बनविले. इटाली, स्पेन व युरोपातील इतर प्रदेशांत ही अशीच नवी राष्ट्रे उदयास आली. राष्ट्रीय अस्मिता निर्माण करण्यासाठी जुन्या इतिहासातले नायक शोधून त्याना नवा रंग देण्यात आला बऱ्याच वेळा सत्याचा अपलाप करूनही राष्ट्रीय अस्मितेचे पोवाडे सर्वच राष्ट्रातील कवीनी रचिले असले तरी, आज अस्तित्वात असलेली राष्ट्रीय अस्मिता अगदी अलीकडील म्हणजे गेल्या ३०० वर्षांतील निर्मिती आहे.

औद्योगिक कालखडात विकसित झालेल्या राष्ट्रभावनेला इतरही कारणे आहेत, पण संघटित व्यापारी स्वार्थ हे महत्त्वाचे कारण होते त्यामुळे ही राष्ट्रभावना एका अर्थाने सकुचित वा होती होती. 'Britain has no permanent friends or permanent enemies, she has permanent interests only असे सागणारा ब्रिटनचा पतप्रधान केवळ ब्रिटनची परदेशनीति सांगत नव्हता तर सर्वच औद्योगिक राष्ट्राचे धर्मशास्त्र सांगत होता दोन महायुद्धामधला काळ हा यत्रयुगाचा बहराचा काळ या काळात इटालीने ॲबिसिनियावर हल्ला केला तेव्हा राजे हेले सलासी याच्या तक्रारीप्रमाणे हा विषय लीग ऑफ नेशन्ससमोर चर्चेस आला. एकाही

औद्योगिक राष्ट्राने या हल्ल्याविरुद्ध पावले उचलली नाहीत. प्रत्येक राष्ट्र आपले व्यापारी हितसबंध राखीत होते. या काळातील नाझी पक्षाचा व हिटलरचा उदय व सलग्न देशाचे वर्तन हाच साक्ष देतात.

उत्पादनवेग जसा वाढला तशी राष्ट्रीय बाजारपेठही अपुरी पडू लागली. आतरराष्ट्रीय बाजारपेठेची, करविषयक तरतुदीची व मध्यवर्ती चलनाची गरज भासू लागली. अमेरिकेच्या पुढाकाराने ही गरज I. M F, WORLD BANK या सस्थानी व GATT या कराराने भरून काढली. तथापि हा विषय निराळा. यत्रयुगातील उत्पादन व विक्री व्यवस्थेला अनुरूप अशी राजकीय व सामाजिक चौकट या अर्थाने राष्ट्रभावना विकसित झाली हे नमूद करणे एवढेच येथे संबद्ध आहे

## व्यक्तिविचार : वैचारिक अधिष्ठान

दुसऱ्या कायापालटात उद्योगधदे व समाजबाधणी यातच बदल झाला असे नाही तर मानवाच्या विचारसरणीतही बराच बदल झाला. मानवाची निसर्गाकडे पाहण्याची दृष्टी, वास्तवाविषयीच्या त्याच्या कल्पना, सृष्टीच्या पसाऱ्यातील मानवाच्या स्थानाविषयीची त्याची मते, ईश्वराच्या अस्तित्वाविषयी भूमिका या सर्व बाबीना व इतर सलग्न विचाराना मानवाची वैचारिक बैठक वा तात्विक अधिष्ठान असे म्हणता येईल. पहिल्या व दुसऱ्या कायापालटातील मानवाच्या वैचारिक बैठकीत अतर होते. दुसऱ्या कायापालटातील मानवाच्या वैचारिक बैठकीला चपखल छोटी सज्ञा नाही. INDUSTRIAL कालखडातील मानवाची वास्तवाविषयी (REALITY) भूमिका या व्यापक अर्थाने अल्विन टॉफलर यानी 'इडस्ट–रिॲलिटी' INDUST REALITY असा नवा शब्द तयार केला आहे

यत्रयुगातील भाडवलदार व समाजवादी, डावे व उजवे याच्यात अनेक विरोध असले तरी त्याचे वैचारिक अधिष्ठान एकच होते असे टॉफलर याचे मत आहे

INDUST–REALITY च्या काही पैलूचा पुढे विचार केला आहे.

**(१) निसर्गाशी संघर्ष :** पहिल्या कायापालटातील मानवाचा निसर्गाशी सतत संघर्ष चालला होता अशी दुसऱ्या कायापालटात विचारधारणा होती. हाच सघर्ष पुढे चालवून निसर्गावर विजय मिळविणे हे ध्येय समजले जाई. नैसर्गिक साधनसपत्ती व निसर्गातील इतर प्राणी हे मानवाच्या उपभोगासाठी आहेत व मानवाच्या सुखसोयीसाठी हात जोडून उभे आहेत ही भावना सर्वमान्य होती. साधनाची उधळपट्टी योग्यच समजली जाई लाखो टन कोळसा वा खनिज तेल जाळल्याने व जगलातील अनिर्बंध वृक्षतोडीमुळे निसर्गातील सतुलनावर व पृथ्वीवरील इतर प्राण्यांवर विपरीत परिणाम होतो याची दखल घेण्याचे कारण नसे.

**(२) डार्विन व मानवजातीचे श्रेष्ठत्व :** डार्विनने उत्क्रातीचा सिद्धात अनेक शास्त्रीय उदाहरणे देऊन माडला. धकाधकीच्या जीवनास समर्थ असणाऱ्या प्राण्यांच्या जातीच उत्क्रातीमध्ये शिल्लक राहतात व अक्षम जाती लोप पावतात हे सूत्र सर्वमान्य झाले. मानवजात सर्व प्राण्यात सक्षम आहे, उत्क्रातीच्या उच्च स्तरावर आहे व इतर जाती जगण्यास असमर्थ असतील तर त्या लोप पावणे नैसर्गिक व इष्टही आहे हा विचार रूढ झाला मानवजातीतील काळ्या, पिवळ्या रगाच्या वशानाही हा नियम लावण्याचा मोह युरोपियन विचारवताना झाला. टास्मानियातील आदिवासीच्या कत्तलीविषयी स्वत. डार्विनने लिहिले आहे– At some future date the civilised races of man will almost certainly exterminate and replace the savage races throughout the world. जीवन जगण्याचा हक्क व लायकी कोणाला आहे याविषयी त्याच्या मनात काहीच शका नव्हती.

**(३) प्रगतीचे तत्त्व :** उत्क्रातीवादाचाच दुसरा उपनियम म्हणजे प्रगतीचे तत्त्व. प्रत्येक नवी रचना वा बदल हा उत्क्रातीतील एक टप्पा आहे व निसर्गात प्रगती अनुस्यूत वा अनिवार्य आहे हा सर्वमान्य विचार होता. आपण कसेही वागलो तरी प्रत्येक नवी स्थिती वा बदल ही प्रगतीच्या दिशेने वाटचाल आहे व पूर्वीची परिस्थिती मागासपणाची द्योतक असते. यात पूर्वीची उत्पादनप्रक्रिया, कुटुबव्यवस्था, समाजरचना अतर्भूत असे. डाव्या व उजव्या या दोनीही मतप्रणालीत प्रगतीचे तत्त्व गृहीत कृत्य असे.

**(४) व्यक्तिवादाचा व विच्छेदनविचारपद्धतीचा प्रसार :** मानव इतर प्राण्याच्या मानाने शारीरिक दृष्टया कमजोर असल्यामुळे त्याने टोळी बनवून शिकार करण्यास व राहण्यास सुरुवात केली. किंबहुना टोळी बनविण्याची अतःप्रेरणा असणारा गटच उत्क्रांतीमध्ये यशस्वी झाला. मानवाची स्वतःची अस्मिता एक व्यक्ती म्हणून नव्हे तर एका टोळीचा वा एका गटाचा घटक म्हणून निर्माण झाली. शेतीप्रधान कालखडातही माणसाने स्वत.ची ओळख विविक्षित घराण्याचा वा जातीचा घटक म्हणून करून घेतली व त्या लोकसमूहात आधार शोधले.

दुसऱ्या कायापालटात या विचारधारणेत फरक पडला. भौतिकशास्त्रातील शोधाप्रमाणे सर्व पदार्थ असंख्य लहान कणांचे बनल्याचे मान्य झाले. प्रत्येक कण वा अणू स्वतत्र व स्वयभू असतो. त्याचप्रमाणे समाजात प्रत्येक व्यक्तीला एक व्यक्ती म्हणून स्वतत्र अधिकार आहे हे मान्य झाले. या अधिकारात धार्मिक अधिकार व स्वतंत्र मत बाळगण्याचा व माडण्याचा अधिकार होता. व्यापार करण्याचा व मालमत्ता बाळगण्याचा अधिकारही मूलभूत मानला जात असे ही ध्यानात ठेवण्याची बाब आहे. यत्रयुगात एका नवीन प्रकारच्या व्यक्तिवादास चालना मिळाली.

**(५) ईश्वरेच्छेस रजा :** झाडावरून तुटलेले फळ खाली पडताना न्यूटनला दिसले आणि त्याने गुरुत्वाकर्षणाचे तत्त्व शोधून काढले. तसेच चल व अचल पदार्थांच्या स्थितीविषयी नियम शोधून काढले. सृष्टीतील सर्व स्थिर व अस्थिर वस्तूची स्थित्यतरे न्यूटनच्या नियमाप्रमाणे होतात हे दिसून आल्यावर भौतिक घटनांचा उलगडा करताना ईश्वराची गरज भासेनासी झाली. बिलियर्डच्या टेबलावरील चेंडूला हातातील काठीने खेळाडू धक्का देतो व त्यानतर प्रत्येक चेंडू दुसऱ्या चेंडूवर आपटून त्याला गतिमान करतो. त्याचप्रमाणे हातातील काठीने पहिला धक्का देऊन ईश्वर खेळातून निवृत्त झाला असे गृहीत धरले तरी पुढील सर्व घटनाचे स्पष्टीकरण भौतिकशास्त्रातील नियमाप्रमाणे करता येऊ लागले. अनेक सहजगत्या न समजणाऱ्या घटनांचे स्पष्टीकरण Proababilty व chance या तत्त्वाप्रमाणे गणिताच्या भाषेत करता येऊ लागले.



भौतिक घटनांचा उलगडा करताना
ईश्वराची गरज भासेनाशी झाली.

ईश्वराचे अस्तित्व मानणारे आस्तिक शास्त्रज्ञही ईश्वराचे कार्य (Role) पहिल्या धक्क्यापुरते मर्यादित ठेवू लागले.

या सर्व विचारसरणीस यंत्रयुगाची वैचारिक वा तात्त्विक बैठक असे म्हणता येईल किंवा टॉफ्लर यांचे शब्दात INDUST–REALITY असे म्हणता येईल.

याशिवाय व्यावहारिक पातळीवरही मानवी व्यक्तिमत्त्वात, आचारात व विचारात अनेक लहानसहान बदल घडून आले. सर्वांची जंत्री येथे अप्रस्तुत ठरेल. तथापी काही बदलांचे दिग्दर्शन पुढे केले आहे.

## व्यावहारिक स्तरावरील बदल

(१) **'रोमँटिक लव्ह :** शेतीप्रधान कालखंडात नियोजित वधू हातापायाने धट्टीकट्टी आहे किंवा नाही, आजारपणात तिला शुश्रुषा कितपत करता येते हे पाहिले जात असे. कपडे शिवण्यासाठी चांगली दृष्टी असणे, १५–२० जणांचा स्वैपाक करता येणे हे महत्त्वाचे असे. औद्योगिक कालखंडातील विभक्त कुटुंबात यातली अनेक कर्तव्ये बाहेर गेल्यावर हे नियोजित वधूचे गुणविशेष असंबद्ध झाले. प्रेम, भावनांचे सुसंवादित्व, मैत्रीपूर्ण बौद्धिक साहचर्य असे नवीन गुणविशेष प्रथमच विवाहात जाणवू लागले. विवाहसंबंधात बौद्धिक भूक भागविण्याची क्षमता हा गुणविशेष आधीच्या कालखंडातील व्यक्तीला अनाकलनीय होता. Romantic Love या भावनेचा उदय या काळात झाला.

(२) **NEW BEDROOM BEHAVIOUR :** विभक्त कुटुंबपद्धती आल्यावर मोठे वाडे कालबाह्य झाले व लहान खोल्यांचे फ्लॅट्स रूढ झाले. प्रत्येकाला झोपण्याची स्वतंत्र खोली हा नवा प्रकार अस्तित्वात आला. त्याचबरोबर झोपण्याच्या वेळचे निराळे कपडे प्रचलित झाले. टॉफ्लर यांच्या मताप्रमाणे एक नवीन Bedroom behaviour निर्माण झाली.

(३) **नग्नतेविषयी असीम लज्जा :** पहिल्या कायापालटात माणसे निसर्गाच्या अधिक जवळ असत. खेड्यापाड्यातून अर्धनग्न व्यक्ती अनेक वेळा नजरेस पडत, कारण शरीराविषयी फारशी लज्जा नसे. दुसऱ्या कायापालटातील शहरी संस्कृतीत नग्नतेविषयी असीम लज्जा प्रथमच दिसू लागली.

या किरकोळ बदलांची जंत्री न करता, यंत्रयुगात मानवी व्यक्तिमत्त्वावर जो महत्त्वाचा परिणाम झाला तो पाहाणे अधिक महत्त्वाचे आहे.

## व्यक्तिमत्त्वावरील विपरीत परिणाम

यंत्रयुगातील प्रातिनिधिक मानव विभक्त कुटुंबात जन्मला. त्याचे आई–वडिल कारखान्यात किंवा तत्सम ऑफिसात काम करीत होते.

FDA

● औषधातील भेसळ.
● वनावट किंवा नकली औषधे,
● अप्रमाणित दर्जाची अपायकारक औषधे,
● भेसळयुक्त व नकली सौंदर्यप्रसाधने,
● भेसळ अन्नपदार्थ,
● औषधावरच्या किंमतीपेक्षा जास्त किंमत आकारणे.
● औषधांच्या उपायाबाबत दिशाभूल करणाऱ्या जाहिराती,
● गुंगीकारक औषधांची बिनदिक्कत विक्री,

**यापासून संरक्षण देण्यासाठी आम्ही अहोरात्र झटत असतो.**

*आपणास अन्नपदार्थ, औषधे किंवा सौंदर्यप्रसाधनांच्या दर्जाविषयी जरासुद्धा शंका आल्यास आमच्या नजीकच्या कार्यालयाशी त्वरीत संपर्क साधा.*

*महाराष्ट्राच्या प्रत्येक जिल्ह्यात आमचे कार्यालय आहे.*

*आपले नाव गुप्त ठेवण्याची हमी आमची.*

**अन्न व औषध प्रशासन**
**महाराष्ट्र राज्य**

गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१
दूरध्वनी :- ६४२३६१-६६ ■ ६४२१३३

त्याचे शिक्षण व संस्कार फॅक्टरीसदृश शाळेत झाले. आधीच्या कालखंडातील मानवाच्या तुलनेत त्याचा निसर्गाशी कमी संबंध आला व जो आला तो निसर्गावर विजय मिळविण्याच्या वा बळजबरी करण्याच्या संदर्भात आला. त्याच्या संज्ञाविश्वात पक्षांचा किलबिलाट, कोंबड्यांचे आरवणे, निसर्गाची अनेक रूपे क्वचितच आली. त्याला जाग आली ती रस्त्यावरच्या वाहतुकीच्या खडखडाने किंवा फॅक्टरीच्या भोंग्याने. लहानपणापासून आईवडील वा इतर वृद्धांचा सहवास त्याला फारसा लाभला नाही. या कालखंडात प्रथमच अस्तित्वात आलेल्या अनेक सुखसोयींची प्रतिमा लहानपणापासून त्याच्या मनावर उमटली. एयर कंडीशनर्स, रेफ्रिजरेटर्स, शक्तिशाली मोटारगाड्या, दळणवळणाच्या सुविधा व पंचतारांकित सुखसोयी यांचे अस्तित्व व त्यांची पैशावर अवलंबून असणारी उपलब्धता यांनी त्याच्या मनांत घर केले. आधीच्या कालखंडात अशा सुखसोयी अस्तित्वात नसल्यामुळे पैशाची उपयुक्तता काहिशी तात्विक होती, आता ती व्यावहारिक झाली. जीवनातील सुखसोयीच नव्हे, तर आरोग्य, शुद्ध हवा, पाणी यासारख्या एकेकाळच्या निसर्गाच्या देणग्यांसाठीही आता रोकड दाम मोजावे लागतात हे त्याच्या लक्षात आले. पैसे असतील तर हृदयावरील नाजुक शस्त्रक्रिया शक्य होतात, नाहीतर मृत्युशिवाय पर्याय नसतो. त्याला उमजले की बाजारात विकत घेता येत नाही, असे आता काहीच राहिलेले नाही व बाजारात ज्याला मागणी नाही ते कवडीमोल आहे. चोखंदळ तज्ज्ञांच्या मान्यतेपेक्षा बाजारातील यशस्वी विक्री हा महत्त्वाचा निकष आहे. बाजारातील यशस्वी विक्री म्हणजे सामान्यतः ढोबळ अभिरुचीच्या (प्रसंगी हीन अभिरुचीच्या) लोकांनी बहुमताने दिलेली दाद.

अशा परिस्थितीत वाढलेल्या प्रातिनिधिक व्यक्तिमध्ये पैसा व उपभोगाच्या वस्तू यांचा अमर्याद हव्यास निर्माण न झाला तरच नवल. १८४८ साली मार्क्सने निवाडा दिला की, संबंध इतिहासात पैशासाठी एवढी हपापलेली, बाजारू वृत्तीची, आपमतलवी व सांस्कृतिक दृष्ट्या दिवाळखोर अशी मानवाची अवस्था यापूर्वी कधीही आली नव्हती. उघडा नागडा स्वार्थ, रोकड दाम यांनी व्यक्तीमात्रांतील संबंध दूषित झाले. बाजारू वृत्तीने अभिरुचीचे अवमूल्यन झाले. तथापि मार्क्सच्या मताप्रमाणे या दुरावस्थेचे कारण भांडवलशाही होते व उत्पादनसाधनांची वैयक्तिक मालकी नष्ट करून सामाजिक मालकी प्रस्थापित करणे हा यावर उपाय होता. आल्विन टॉफ्लर यांच्या मताप्रमाणे या दुरावस्थेचे कारण भांडवलशाही नव्हते. समाजवादी राष्ट्रांतही हाच बदल दिसतो. या दुरावस्थेचे कारण उत्पादक व उपभोक्ता यांच्यातील दरी व त्यामुळे निर्माण झालेली बाजारपेठ हे आहे असे टॉफलर यांचे मत आहे.

### दुसऱ्या कायापालटाचे मूल्यमापन

यंत्रयुगाच्या सुरवातीला उपभोगाच्या वस्तूंची निर्मिती प्रचंड प्रमाणावर होऊ लागली. खतांच्या कीटकनाशकांच्या व यंत्रांच्या उपयोगामुळे अन्नधान्याची रेलचेल झाली. इतकी की धान्याचे भाव राखण्यासाठी धान्य समुद्रात टाकावे लागले. 'निसर्गाविरुद्धच्या लढाईतील' यश दृष्टिपथात आले. राजेरजवाड्यांची जुलमी व अनियंत्रित सत्ता नष्ट झाली व लोकशाही, भ्रातृभाव, समानता,

व्यक्तिस्वातंत्र्य याचे वारे वाहू लागले. यंत्रयुगाखाली असलेल्या युरोपातून भूक हा शब्द नाहीसा झाला एका नवीन उल्हासाने व चैतन्याने समाजातील विचारवंत व द्रष्टेही भारावून गेले. यंत्रयुगाचे गोडवे गाणाऱ्या बेलामी, प्रूधाँ वगैरे अनेक साहित्यिकाचे उदाहरणे देता येतील. काही संशयात्म्याच्या मनात पाल चुकचुकत होती पण ती अपवाद होता. सार्वत्रिक आशावाद हा नियम होता.

पण यंत्रयुगाच्या पहिल्या शंभर वर्षातच हा आशावाद करपू लागला खेड्यातून शहराकडे येणाऱ्या लोंढ्यामुळे खेड्यातील कुटुंबजीवन उध्वस्त झाले. खेड्यातील स्वावलंबी अर्थव्यवस्था राष्ट्रीय अर्थव्यवस्थेच्या भोवऱ्यात ओढली गेली बाजारपेठेच्या विकासामुळे व्यक्तिमत्त्वात निर्माण झालेल्या विकृतीचा उल्लेख आधी केला आहे.

चेंगिजखान व तैमूरलंग याचे क्रौर्य अंगावर शहारे आणणारे होते, पण त्यालाही नैसर्गिक मर्यादा होत्या सिमेंट काँक्रीटचे गॅस चेंबर बांधून हजारो व्यक्तींना यमसदनास पाठविण्याचे यांत्रिकी कसब त्याकाळी नव्हते. व्यवस्थापनसूत्रांचा व नवीन यंत्रशास्त्राचा उपयोग करून कमीतकमी वेळात व कमीतकमी खर्चात जास्तीत जास्त व्यक्तींची हत्या करण्याचे कौशल्य यंत्रयुगात वापरले गेले

माणूस आज चंद्रावर पोचला आहे व उद्या इतर ग्रहावरही पोचेल जीवशास्त्रातील व रसायनशास्त्रातील प्रगतीचे प्रमाण त्याहूनही अधिक आहे. त्याचवेळेस जगातील सर्व प्राणिमात्राचा नाश क्षणार्धात करता येईल एवढी अण्वस्त्रे कोठारात जमा आहेत फक्त बटण दाबण्याचा अवकाश अतिहव्यासामळे वातावरणाचे व समुद्राचे अनेक भाग दूषित होत आहेत व वातावरणात तीव्र बदल अपेक्षित आहेत श्रीमंत देश व गरीब देश याच्यातील दरी आणखी खोल होत आहे. भारतातील मोठ्या शहराचे वा औद्योगिक केंद्राचे– भारतातील यंत्रयुगाचे निरीक्षण केले तर असे दिसते की श्रीमंत वर्ग व गरीब वर्ग याच्यातील अंतर वाढत आहे उत्तुंग हवेल्याशेजारी नरकासमान झोपडपट्ट्या आहेत. त्यात अठराविश्वे दारिद्र्य आहे, भळभळणारी वेदना आहे, व्यसनाधीनता आहे, गुन्हेगारी आहे शेजारी मांडीला मांडी लावून अमाप समृद्धी आहे सोन्याचांदीच्या दुकानावर गर्दी करणाऱ्या उथळ निलाजरेपणाशेजारी एक बाटली केरोसीनसाठी चार तास रांग लावणारा सोशिकपणा आहे लक्ष्मी-पूजन सर्वच कालखडात असे पण एवढे कळाहीन विवस्त्र लक्ष्मीपूजन आधी कधीही दिसले नव्हते. किंबहुना लक्ष्मीपूजन हा शब्दही अयोग्य वाटतो लंपट पुरुषाने छचोर व छिनाल लक्ष्मीचा केलेला पाठलाग पूजा या सदरात थोडाच बसतो ?

व्यक्तिमात्रातील संबंधाना आलेले बाजारू स्वरूप, यशापयश मोजण्याचे सर्वमान्य ठोकळेबाज निकष, पैशाला आलेली अमर्याद पण वास्तव शक्ती, कायम बोथट झालेली सामाजिक सहसवेदना, वसाहतवाद व तद्देशीय लोकाच्या संपत्तीची लूट, त्याच्या संस्कृती-विषयीचा तुच्छ भाव व सांस्कृतिक मुजोरपणा असे अनेक विशेष डोळ्यासमोर येतात व मन भावावून जाते. समाजाच्या काही वर्गात दुःख आहे, दारिद्र्य आहे म्हणून सर्वांनी, सर्वकाळ सुतकी चेहरे करून बसावे असे नाही पण एवढी भीषण विषमता असताना डोळ्यावर कातडे ओढून आधळी कोशिंबीर खेळणारा समाज प्रगतीच्या व स्थैर्याच्या कोणत्या पायरीवर आहे असे समजावयाचे ? बोटीच्या तळाला भोक पडून पाणी वेगाने आत शिरत असताना डेकवरील आरामखुर्च्यासाठी धक्काबुक्की करणाऱ्या प्रवाशांचे वर्गीकरण कसे करावयाचे ?

तथापि सुधारलेले आरोग्यमान, वाढलेली आयुर्मर्यादा, अंधश्रद्धाचे निराकरण ही वैशिष्ट्ये ही डोळ्यासमोर येतात. सामाजिक आणि धार्मिक सहिष्णुता, कायद्यासमोर सर्वांची समानता, साहित्य संगीत आणि इतर कलाचा दर्जा आणि जिवंतपणा हेही मूल्यमापनाचे निकष नाहीत काय ? या सर्व निकषावर तपासले तर औद्योगिक कालखड निश्चितच प्रगतीशील ठरतो शिवाय आधीचा शेतीप्रधान कालखंड म्हणजे रामराज्य होते असे समजणेही स्वप्नरंजनाचा प्रकार होईल. त्या कालखडातही भयानक अत्याचार व जीवघेणी विषमता होती. अंधश्रद्धा, अपसमज व धार्मिक असहिष्णुतेने कमाल पातळी गाठली होती युरोपात कॅथालिक पथाच्या असहिष्णुतेमुळे हजारो लोक मृत्युमुखी पडले. इस्लाम धर्माचा प्रसारही तेवढाच क्रौर्यमय आहे प्लेग, देवी, कॉलरा याच्या साथीने हजारो लोक मृत्यू पावत जन्माला आलेल्या प्रत्येक हजार बालकामधील १५० ते २०० बालके पहिल्या वर्षातच मृत्यू पावत.

कदाचित कोणत्याही एका कालखडाचे एक असे मूल्यमापन करण्याचा प्रयत्न चुकीचा आहे औद्योगिक क्रांतीची एक अशी कारण मीमांसा नाही, तसेच या क्रातीचे एक असे मूल्यमापन नाही.

दुसऱ्या कायापालटाचे मूल्यमापन कसेही केले तरी एक गोष्ट निर्विवाद आहे. औद्योगिक समाजव्यवस्थेचा खेळ आता संपत आला आहे व एका नवीन क्रांतीची नांदी पडद्याआडून पण स्पष्टपणे ऐकू येत आहे किंबहुना तिसऱ्या कायापालटाची सुरुवात अमेरिकन संघराज्य, जपान व इतर काही देशात स्पष्टपणे दिसत आहे. २१ व्या शतकात भारतातही हा कायापालट अपेक्षित आहे त्याच्या सम्यक दर्शनासाठी इतर संलग्न परिस्थितीचे व घटनाचे परिशीलन केले पुढील भागात तिसऱ्या कायापालटाच्या रंगरूपाचे विवेचन केले आहे


*With Best Compliments*

*From*

**Shree Advertising & Marketing**

207, C. Laxmi Sadan
Dr Ambedkar Marg
Matunga Bombay 400 019

# तिसरा कायापालट, तिसरी लाट

गेले २५०–३०० वर्षे सुरळीतपणाने चालणारी यंत्रयुगाची गाडी एकाएकी खडखडू लागली आहे व परतपरत रूळावरून खाली उतरत आहे. गाडीचे अनेक भाग एकाचवेळी नादुरुस्त व्हावेत त्याप्रमाणे औद्योगिक समाजाच्या अनेक स्तरावर पडझड किंवा आणीबाणीची परिस्थिती निर्माण होत आहे. महत्त्वाच्या धद्यातील अनाकलनीय मदी, चलनवृद्धी कुटुबव्यवस्थेवर आघात, आतरराष्ट्रीय दहशतवाद, वातावरणातील प्रदूषण असे अनेक प्रश्न एकाएकी भेडसावत आहेत टॉफलर याच्या मताप्रमाणे यत्रयुगाची समाप्ती होत आहे व नव्या नियमावर आधारित नवी समाजरचना अस्तित्वात येत आहे. या नवनिर्मितीच्या वेणा आहेत.

औद्योगिक क्रातीची एक अशी कारणमीमांसा नाही, एक असे मूल्यमापन नाही त्याप्रमाणे यत्रयुगाची तब्येत अचानक ढासळण्याचे एक असे कारण नाही. काही तज्ज्ञाच्या मते आटत आलेला ऊर्जा आधार व निसर्गातील संतुलन राखण्यात येणारे अपयश ही महत्त्वाची कारणे आहेत. इतर तज्ज्ञाच्या मते जगाची वाढती लोकसख्या, वसाहतवादाचा शेवट, आशिया–आफ्रिका देशातील गौरेतर जमातीची वाढती बंडखोरी वगैरे इतरही कारणे आहेत महत्त्वाच्या दोन कारणाचे पुढे विवेचन केले आहे.

### (१) आटत आलेला ऊर्जाआधार

स्वस्त कोळसा व खनिज तेल या शक्तिशाली इंधनाची गुप्त मदत ( hider subsidy ) दुसऱ्या कायापालटास आधारभूत झाली हे आधी पाहिले आहे. पण खनिजतेलाचे साठे परिमित आहेत. सध्याच्या अदाजाप्रमाणे हे साठे ३४ वर्षात खलास होतील. नवे साठे सापडले तरी ते आताच्याइतके स्वस्त राहणार नाहीत. याला अर्थशास्त्रीय कारणे आहेत. त्यामानाने कोळशाचे साठे मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहेत. तरीही कोळशाच्या वापरास नैसर्गिक मर्यादा आहेत. अणुशक्तीच्या वापरातील धोकेही हळूहळू स्पष्ट होत आहे. चेर्नोबिलसारखे अपघात सोडले तरी किरणोत्सर्गी waste ची काय सोय करावयाची हा प्रश्न सुटलेला नाही. थोडक्यात स्वस्त खनिज तेलाचा आधार नष्ट झाल्यावर, ऊर्जेची उधळपट्टी करणारे तंत्रज्ञान फार दिवस टिकणार नाही.

### (२) निसर्गातील संतुलनाच्या मर्यादा :

कोळसा व खनिज तेल जाळल्यामुळे कार्बनडायऑक्साईड ($CO_2$) हा वायू मोठ्या प्रमाणावर वातावरणात सोडला जातो. हिरव्या वनस्पती व झाडे वातावरणातील कार्बनडायऑक्साईड व पाणी शोषून घेतात व सूर्यप्रकाशाच्या साहाय्याने कार्बोहायड्रेटस तयार करतात. या प्रक्रियेस फोटोसिन्थेसिस असे म्हणतात. अशा रीतीने वातावरणातील कार्बनडायऑक्साईडचे अस्तित्व योग्य प्रमाणात राखले जाते तथापी या प्रक्रियेस काही मर्यादा आहेत. इंधनाच्या अनिर्बंध ज्वलनामुळे $CO_2$ प्रचड प्रमाणात तयार झाला व त्याच वेळेस जगलतोडीमुळे हिरव्या वनस्पतीचे प्रमाण कमी झाले तर सर्व कार्बनडायआक्साईडचे रुपातर कार्बोहैड्रेटसमध्ये होणार नाही. वातावरणातील कार्बनडायऑक्साईडचे प्रमाण १९०० साली ०.०२९% होते १९८० साली ते ०.०३२% इतके वाढले, २००० सालापर्यंत ते ०.३८% होईल असा अदाज आहे या वायूचे प्रमाण जरी अगदी थोडे वाढले तरी वातावरणात तीव्र फरक होऊ शकतात. कार्बनडायऑक्साईड हा उष्णतेसाठी एक प्रकारचा सापळा आहे. दिवसा सूर्याची किरणे पृथ्वीवर पडतात त्यास $CO_2$ चा अडथळा होत नाही. पण रात्री पृथ्वी जेव्हा इन्फ्रारेड किरणे सोडते तेव्हा या किरणाचा काही भाग कार्बनडायऑक्साईड वायू शोषून ठेवतो पाण्याची वाफ हाही असाच सापळा आहे. याला Green houses effect असे म्हणतात. यामुळे वातावरणाचे तपमान वाढते व या वाढणाऱ्या तपमानामुळे दोनी ध्रुवावरील बर्फ वितळतो. समुद्राची पातळी वाढून समुद्राकाठची अनेक शहरे पाण्याखाली जातील असा तज्ज्ञाचा इशारा आहे. निसर्गातील समतोल अत्यत नाजूक असतो व त्यावर अनेक आघात होत आहेत हे दाखविण्यासाठी हे एक उदाहरण घेतले. असाच प्रकार सल्फर डायऑक्साईड, अमोनिया आणि इतर वायू व पदार्थांच्या बाबतीत आहे

ज्या देशात तिसरा कायापालट घडून येत आहे त्यात अमेरिकन सघराज्य, जर्मनी, फ्रान्स, ब्रिटन, स्वीडन, जपान आदि राष्ट्रांचा समावेश होतो. अमेरिकन सघराज्यात हा बदल साधारणपणे १९५६ सालापासून सुरू झाला असे अल्विन टॉफलर याचे मत आहे.

या कायापालटाचे अधिक विवेचन करण्याआधी थोडा खुलासा आवश्यक आहे

बदलणाऱ्या घटकावरून येणाऱ्या परिस्थितीचे अदाज वर्तविताना इतर सर्व घटक आहे तसेच राहतील असे गृहीत धरले जाते. परंतु या घटकांत काही असामान्य, अनपेक्षित बदल घडून आले तर वर्तविलेले अदाज चुकतात. आर्थिक वा सामाजिक फेरबदलाचा प्रवाह एका निश्चित दिशेने वाहात असतो व त्याला अनुरूप व्यक्ती प्रवाहातील लाटांवर आरूढ होतात व प्रवाहाचे काही थोड्या अंशी नियंत्रण करतात. तरीही असामान्य कर्तृत्वाच्या व्यक्ती किंवा असामान्य घटना प्रवाहाची दिशा पूर्णपणे बदलू शकतात इतिहासाच्या प्रवाहात अनिवार्य–Historical Imperative असे काहीच नसते तेव्हा सर्व अंदाज या मर्यादेत घ्यावे लागतात. यामुळे भविष्यकथनाचा मोह टाळून ज्या देशात तिसरा कायापालट घडत आहे तेथल्या परिस्थितीचे वर्णन देण्यावर भर दिला आहे. बोट कोणत्या बदरास लागणार आहे ते न सागता, वारे कोणत्या दिशेने वाहात आहेत तेवढेच दाखविले आहे.

### रंगरूप, महत्वाची लक्षणे, तंत्रज्ञान, उद्योग


**(१) नवे तंत्रज्ञान व उत्पादन प्रक्रिया** – तिसऱ्या कायापालटातील तत्रज्ञान इलेक्ट्रॉनिक्स व सॉलीड स्टेट फिजिक्समधील नव्या शोधावर आधारित आहे. नवीन यंत्रे मानवाचे बुद्धिबळ वाढवितात.

त्यामुळे त्यांची ताकद अश्वशक्तीत न मोजता, त्यांच्या functions मध्ये मोजली जाणे स्वभाविक आहे. ऊर्जावापराच्या बाबतीत ही यंत्रे अत्यंत काटकसरी आहेत.

दुसऱ्या कायापालटात निर्मितीचे प्रमाण मोठे करून ( Mass Production ) प्रत्येक एकछाप नगाची किंमत कमी केली जात असे; पण आता नव्या तंत्रज्ञानामुळे व्यक्तिगत गरजांप्रमाणे लहान प्रमाणावर बनविलेल्या वस्तूही स्वस्त करता येतात. तयार कपड्यांचे उदाहरण घेता येईल. पहिल्या कायापालटात प्रत्येकाच्या वैयक्तिक मोजमापांप्रमाणे शिंपी कपडे शिवीत असे. दुसऱ्या कायापालटात Standard मापाचे कपडे लाखोंच्या संख्येत बनवून स्वस्त विकले जाऊ लागले. तयार शर्टस्, सूट्स शिलाईच्या दरात विकत मिळू लागले व लोकप्रिय झाले; पण तिसऱ्या कायापालटात एकछाप नगांची प्रचंड निर्मिती मागे पडून परत वैयक्तिक मापाचे कपडे लोकप्रिय होत आहेत. स्वतःचे माप कॉंप्युटरमध्ये दिले की लेसर गनने कापड कापले जाईल व कॉंप्युटरच्या आदेशाप्रमाणे चालणाऱ्या यंत्राद्वारे कपडे शिवले जातील. लेसर गन एकावेळी कापडाचा एकच तुकडा कापते पण हे काम अत्यंत वेगाने व स्वस्तात केले जाते.

इतर बाबतीतही व्यक्तिगत गरजांप्रमाणे बेतलेले लहान प्रमाणावरही निर्मिती करणारे तंत्रज्ञान काटकसरीचे व महत्त्वाचे ठरत आहे आणि Mass Production कालबाह्य होत आहे. CUSTOMIZE OR PERISH हे तिसऱ्या कायापालटातील उत्पादनप्रक्रियेचे ब्रीदवाक्य बनते आहे. यंत्रयुगातील इतर उत्पादनसूत्रेही अशीच कालबाह्य होत आहेत. साखळीपद्धतीचे (SYNCHRONIZATION) उदाहरण घेता येईल. तिसऱ्या कायापालटातील कारखान्यामध्ये बरीचशी यंत्रे कॉंप्यूटरने नियंत्रित असल्याने कामगारांचे परस्परावलंबित्व बऱ्याच प्रमाणात कमी झाले आहे. वक्तशीरपणाला पहिल्याइतके महत्त्व राहिले नाही. नवाचा भोंगा वाजला की सर्व कामगारांनी कारखान्याच्या गेटात घुसावयाचे व पाचच्या ठोक्याला बाहेर पडावयाचे ही दुसऱ्या कायापालटातील कामाची पद्धत तिसऱ्या कायापालटात मागे पडत आहे. बहुतेक महत्त्वाच्या उद्योगांत FLEX–TIME चे तत्व अंगीकारले जाते. या पद्धतीत काही महत्त्वाचे ३–४ तास सोडले तर सर्व कामगारांनी वा नोकरांनी एकाच वेळी कामावर हजर राहण्याची गरज नसते. एक कामगार ९ ते ५ या वेळात हजर राहील तर दुसरा १० ते ६ या वेळात काम करील. पश्चिम जर्मनीतील एकंदर कामगारवर्गापैकी २५ टक्के कामगार FLEX–TIME वर आहेत. जर्मनीत याला GLEITZEIT असे म्हणतात. फ्रान्स, ब्रिटन, स्वीडन या देशांतही अनेक उद्योगांत ही पद्धत अमलात आहे. अमेरिकन संघराज्यात जवळजवळ १७ टक्के कामगार FLEX–TIME प्रमाणे काम करतात.

(२) **नवा ऊर्जाआधार व विखुरणारे उत्पादनक्षेत्र** :– तिसऱ्या कायापालटांतील तंत्रज्ञान ऊर्जेच्या वापराच्या बाबतीत काटकसरी असल्याने सौरशक्ती, पवनशक्ती, समुद्राच्या लाटांची शक्ती हे ऊर्जास्रोत महत्त्वाचे ठरतील. दुसऱ्या कायापालटातील शक्तिशाली ऊर्जास्रोत कोळसा, खनिजतेल, अणुशक्ती अधिक महाग होतील, संपुष्टात येतील किंवा धोक्याचे ठरतील. तिसऱ्या कायापालटातील उपनगरातील ऊर्जास्रोत विखुरले असल्याने उत्पादनक्षेत्रही परत कारखान्यांतून



**अमेरिकेत जवळजवळ १७ टक्के कामगार फ्लेक्स टाईमप्रमाणे काम करतात.**

लहान लहान घरांत विखुरले जाईल. या बदलास आणखीही एक कारण आहे. घर ते कारखाना व परत या प्रवासासाठी लागणारा खर्च व त्रास प्रतिदिन वाढत आहे. त्याचवेळी घरातील कॉंप्युटर कारखान्यातील कॉंप्युटरला जोडून कारखान्यातील प्रक्रियांशी यशस्वी संबंध जोडणे स्वस्त होत आहे.

(३) **आघाडीचे उद्योगसमूह** COMMANDING HEIGHTS यंत्रयुगामध्ये रेल्वेमार्ग, जलवाहतूक, खाणकाम, मोटारगाड्या बनविणे, पोलाद बनविणे हे महत्त्वाचे उद्योग होते. त्यांना COMMANDING HEIGHTS किंवा विनीचे वा आघाडीचे उद्योग समजले जाई. पण बदलत्या परिस्थितीत दिसून आले की ऊर्जेची उधळपट्टी करणारे हे उद्योग प्रथमदर्शनी वाटतात तेवढे नैपुण्यपूर्ण (efficient) नाहीत. स्वस्त कच्चा माल, स्वस्त ऊर्जा, कमी मजुरी व प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष सरकारी मदत यामुळे हे उद्योग नैपुण्यपूर्ण वाटत होते. अप्रत्यक्ष सरकारी मदतीमध्ये कारखान्यातील सांडपाण्याची व्यवस्था, त्याचे शुद्धीकरण, हजारो कामगार एकत्र आल्याने त्यांची निवासस्थाने, दळणवळणाची साधने, रस्ते यासाठी सरकारी तिजोरीतून होणाऱ्या खर्चाचा अंतर्भाव होतो. शास्त्रीय परिभाषेत याला EXTERNALISING THE PROJECT COST असे म्हणतात. याचा हिशेब केला तर हे उद्योग आंतबट्ट्याचे, कमी दर्जाच्या तंत्रज्ञानावर आधारलेले दिसून येते अर्थात हे उद्योग आवश्यक आहेत पण ते आघाडीचे न राहता तोट्यात चालणारे, 'आजारी' आणि PUBLIC UTILITIES म्हणून सरकारी मदतीवर अवलंबून राहतील. दुसऱ्या महायुद्धानंतर ब्रिटनमध्ये अॅटली यांच्या नेतृत्वाखाली

मजूरपक्ष निवडून आला. अधिकारावर आल्यावर झटक्यात त्याने रेल्वे, पोलाद व कोळसा या उद्योगाचे राष्ट्रीयीकरण केले. पण या-वेळेपर्यंत हे उद्योग आजारीपणाकडे झुकलेले होते व हे राष्ट्रीयीकरणच मजूरपक्षाच्या अपयशास कारण झाले असे तज्ज्ञ सागतात.

अमेरिकन सघराज्यात रेल्वे, कोळसा, कापडगिरण्या या उद्योगातील भाडवल गुतवणुकीचे प्रमाण व रोजगारीचे प्रमाण १९६० नतर कमी होत आहे. रोल्सराइस (ब्रिटन) जनरल मोटर्स आणि अमेरिकेतील लोहमार्ग याचा इतिहास या दृष्टीने तपासण्यासारखा आहे.

तिसऱ्या कायापालटातील देशात काही नवीन उद्योग आघाडीवर आले आहेत. त्याची ढोवळमानाने चार विभागात वाटणी करता येते.

(१) इलेक्टॉनिक्सवर आधारित उद्योग
(२) समुद्रतळावरील खनिजे काढण्याचा उद्योग
(३) अतराळात करता येतील असे उद्योग.
(४) सूक्ष्मजीवशास्त्रावर आधारित उद्योग.

या सर्वांची तपशीलवार चर्चा येथे अप्रस्तुत ठरेल म्हणून दोन कालखडातील तत्रज्ञान व उद्योगप्रक्रिया याच्यातील फरक दाखविण्यासाठी केवळ दोन उद्योगाची चर्चा केली आहे.

**(अ) इलेक्ट्रॉनिक्सवर आधारित उद्योग :** या उद्योगात कॉम्प्युटरचे–सगणकाचे स्थान महत्त्वाचे आहे. Vacuum Tube किंवा व्हाल्वपासून इलेक्ट्रॉनिक्सची सुरुवात झाली. व्हाल्वची जागा एका लहान ट्रॅन्झिस्टरने घेतली शेकडो ट्रॅन्झिस्टर्सचे काम एक पातळ सिलिकॉन चिप करते व काही चिप्स जोडून इटिग्रेटेड सर्किट बनविले जाते. या वस्तूचे आकारमानच नाही तर त्याचा उत्पादनखर्चही अनेक पटीने कमी झाला उत्पादनखर्चातील काटकसर व दर्जा याच्यातील प्रगती मोटारगाड्याच्या उद्योगाने दाखविली असती तर आज रोल्स राईससारखी गाडी २५ रुपयात मिळाली असती व एक लिटर पेट्रोलमध्ये ४४४४४ किलोमीटर धावली असती असे सागितले जाते. अर्थात प्रगतीचे प्रमाण दाखविण्याचा हा अदाज आहे, वाच्यार्थाने घेण्यासाठी नाही.

सगणक अनेक प्रकारची माहिती साठवून ठेवू शकतो व पाहिजे तेव्हा आपण ती माहिती बाहेर काढू शकतो. आधी शिकविलेल्या विचारपद्धतीचा अवलब करून सगणक अनुमाने काढू शकतो. ५ किंवा ६ पेक्षा जास्त Variables चा विचार करताना मानव गोंधळतो, पण सगणक याबाबतीत मानवाच्या पुढे आहे. मानवी बुद्धी करू शकते त्यापेक्षा निराळे असे सगणक काही करीत नाही. तथापि माहिती हाताळण्याचा व अनुमाने काढण्याचा सगणकाचा वेग मानवी बुद्धीपेक्षा कितीतरी अधिक आहे लहान संगणक (Microprocessor) अनेक मोठ्या यत्रामध्ये नियुक्त करून अनेक कटाळवाण्या उद्योगप्रक्रियेतून ( Rote work ) माणसाची सुटका प्रगत देशात करीत आहे लहान संगणकाच्या उपयोगाचे क्षेत्र प्रत्यही वाढत आहे. इलेक्ट्रॉनिक्सवर आधारित नव्या तत्रज्ञानाची अनेक उदाहरणे देता येतील. विशेषत communications व अंतराळशास्त्रातील. दोन कायापालटातील तंत्रज्ञानातील फरक दाखविण्यासाठी एक उदाहरण दिले.

**(ब) सूक्ष्मजीवाकडून उत्पादन :** मधुमेहाच्या अनेक रोग्याना इन्सुलीन नावाचे औषध आवश्यक असते. इन्सुलीन स्वादुर्पिडातील (Pancreas) काही पेशीचा स्त्राव असतो खाटिकखान्यात मारलेल्या गायी व डुकरे याच्या स्वादुर्पिडातून सध्या इन्सुलीन काढले जाते. पण इन्सुलीनचे उत्पादन मागणीपेक्षा कमी पडते व त्याच्या उपयोगात इतरही काही त्रुटी आहेत शास्त्रज्ञानी यावर एक अभिनव उपाय काढला आहे.

माणसाच्या शरीराच्या पेशीमध्ये रगसूत्रे ( chromosomes ) असतात रगसूत्रावर अनेक 'जीन्स' असतात व हे जीन्स आनुवंशिक गुणाचे भौतिक आधार असतात. एका रंगसूत्रावर इन्सुलीन तयार करण्याच्या क्रियेचा जीन असतो शास्त्रज्ञानी हा जीन काढून E coli नावाच्या बॅक्टेरियामध्ये स्थापन केला. त्यानंतर E coli हा बॅक्टेरिया 'मानवी' इन्सुलीनची निर्मिती करू लागला हे बॅक्टेरियाने तयार केलेले 'मानवी' इन्सुलीन मधुमेहाच्या रोग्यासाठी बाजारात विकत मिळते. एका प्राण्याच्या पेशीतला जीन बॅक्टेरियाच्या पेशीत स्थापन करण्याच्या क्रियेला Recombitant DNA technology असे म्हणतात. अशा प्रकारे इतरही काही हार्मोन्स तयार करता येतात. एवढेच नव्हे तर आपल्या इच्छेप्रमाणे गुणधर्म असणारे प्राणीही निर्माण करता येतील. काही शास्त्रज्ञाच्या मताप्रमाणे या तत्रज्ञानाने गायीबैलाप्रमाणे पचनसस्था असणारे आणि गवत व सेल्युलोजयुक्त पदार्थ पचविणारे मानवी देहही तयार करता येतील हा प्रकार अर्थातच धोकादायक आहे. तथापि तिसऱ्या कायापालटातील तत्रज्ञानाचा आवाका दाखविण्यासाठी ही दोन उदाहरणे दिली आहेत.

**(४) प्रोझूमर्सचा विस्तार :** स्वत च्या वापरासाठी केलेले उत्पादन किंवा सेवा किंवा कोणतेही कार्य यास कार्यक्षेत्र विभाग 'अ' म्हटले व केवळ विक्रीसाठी केलेले उत्पादन किंवा सेवा किंवा कोणतेही कार्य यास कार्यक्षेत्र विभाग 'ब' म्हटले तर पहिल्या कायापालटात विभाग 'अ' हा विभाग 'ब' च्या मानाने फार मोठा होता. दुसऱ्या कायापालटात विभाग 'अ' चा सकोच झाला व विभाग 'ब' चा फार मोठा विस्तार झाला दुसऱ्या कायापालटातही घरातील देखरेख, मुलाचे संगोपन व त्याचेवरील सस्कार ही विभाग 'अ' मधील कामे महत्त्वाची होती. त्याचा कारखान्यामधील उत्पादनावर म्हणजे 'ब विभागा'तील कामावर निश्चित परिणाम होत असे. तथापि यत्रयुगातील अर्थशास्त्रज्ञानी 'ब' विभागातील व्यवहारावर सर्व लक्ष केंद्रित केले व 'अ विभागा'तील कामाची योग्य दखल घेतली नाही असे अल्विन टॉफ्लर याचे मत आहे. 'अ विभागा' तील कामाचे एक प्रकारे अवमूलन झाले, तसेच घरी राहून हे काम करणाऱ्या स्त्रियाचेही.

## सेल्फ सर्व्हिस–स्वयंसेवा


तिसऱ्या कायापालटात प्रोझूमर्सचा–अ विभागातील कार्याचा परत विस्तार होत असल्याची चिन्हे आहेत. त्यातील एक चिन्ह म्हणजे 'Do It Yourself Revolution.' इलेक्ट्रिक ड्रील, करवत सुतारकामाची औजारे याच्या अमेरिकन संघराज्यातील विक्रीचे उदाहरण अभ्यासण्यासारखे आहे. १९७० साली अशा औजाराच्या विक्रीचा ७० टक्के वाटा धदेवाइकाना केलेल्या विक्रीचा होता, तर ३० टक्के वाटा इतर (हौशी) व्यक्तीनी केलेल्या विक्रीचा होता.

१९८० साली हे प्रमाण उलटे झाले – ७० टक्के वाटा सामान्य (हौशी) व्यक्तींचा होता तर ३० टक्के वाटा धंदेवाइकांचा होता. अमेरिकन संघराज्यात व युरोपातील प्रगत देशांत टीव्ही, व्हीसीआर-पासून मोटारगाडीस जोडण्याच्या ट्रेलरपर्यंत अनेक गोष्टी 'Knock Down Condition' मध्ये किंवा KIT च्या स्वरूपात मिळतात व अनेक लोक KIT घेऊन या गोष्टी बनवितात. बाथरूमच्या टाईल्स बसवावयाच्या असतील तर लोक धंदेवाइक प्लंबरला न बोलाविता दोन दिवस ऑफिसातून सुट्टी घेऊन हे काम स्वतः करतात. घरास रंग लावणे, मोटारगाडीचे सर्विसिंग व किरकोळ दुरुस्ती, नळाचे वॉशर बसविणे, किरकोळ सुतारकाम अशा कामासाठी धंदेवाइकांची शक्यतो मदत घेतली जात नाही. स्वतःच्या हाताने ही कामे करण्याची पद्धत एवढी वाढली आहे की तिला DIY क्रांती (Do It Yourself Revolution) असे संबोधिले जाते. एका अर्थाने हा Prosuming चा प्रकार आहे. पैसे टाकून सेवा घेताना सेवा देणारा (Producer) व सेवा घेणारा (Consumer) अशा दोन व्यक्ती असतात. वरील प्रकारात सेवा देणारा व सेवा घेणारा एकच असतो. Self Service Petrol Pumps, रेस्टोरंटस् किंवा स्टोअर्स हीही वरील प्रकारची उदाहरणे आहेत.

व्यक्तीने स्वतःसाठी केलेले काम मानसशास्त्रीय दृष्ट्या जास्त समाधानकारक असते; तरीही या बदलाचे मुख्य कारण म्हणजे सर्व प्रकारच्या सेवांची वाढलेली व वाढणारी किंमत. प्रगत तंत्रज्ञानाच्या साह्याने मोठ्या प्रमाणावर वस्तूंची निर्मिती करून प्रत्येक नगाची किंमत आपण कमी करतो तेव्हा जुनाट तंत्रज्ञानाच्या आधाराने/हाताने बनविलेल्या वस्तू किंवा सेवा तुलनात्मक दृष्ट्या महाग होतात. ६० रु. यास इलेक्ट्रॉनिक घड्याळ मिळते, तसेच झाडूपोचा, भांडी घासणे या घरकामासाठी मोलकरीण ६० रु. घेते. अशी वस्तुस्थिती असताना घड्याळाची किंमत २० रु. झाली तर मोलकरणीची सेवा एका घड्याळाच्या किंमतीवरून तीन घड्याळांच्या किंमतीएवढी किंवा तिपटीने महाग झाली असे म्हणता येईल. यामध्ये चलनवृद्धीचा काहीही संबंध नाही. याला Law of Relative Inefficiency असे म्हणता येईल.

कारणे काहीही असली तरी प्रोझूमर्सच्या विस्ताराचा किंवा 'अ विभागा' तील कार्याच्या विस्ताराचा अनेक स्तरांवर मूलगामी परिणाम होणार आहे.

उत्पादक व उपभोक्ता यांच्यातील दुराव्यामुळे बाजारपेठेची निर्मिती व विकास झाला. बाजारपेठेच्या विकासामुळे मानवी व्यक्तिमत्त्वावर जो विपरीत परिणाम झाला त्याचे विवेचन मागील लेखात केले होते. 'अ विभागा' तील कामाचा जेवढा विस्तार होईल तेवढा मानव बाजारपेठेच्या परिघाबाहेर राहील व बाजारपेठेचा संकोच होईल. याचा मानवाच्या व्यक्तिमत्त्वावर निश्चितच परिणाम होईल. प्रोझूमर्सच्या विस्ताराने इतरही अनेक प्रश्न डोळ्यांसमोर येतात. 'अ विभागा' तील कार्याकडे पूर्ण दुर्लक्ष करून व केवळ 'ब विभागा' तील व्यवहार पाहून निश्चित केलेले मूल्यांक कितपत अर्थपूर्ण राहतात? व्यक्तीचा बराच वेळ जेव्हा स्वतःच्या उपयोगाच्या वस्तू बनविण्यात जातो तेव्हा मासिक उत्पन्न, दारिद्र्यरेषा, GNP वगैरे अनेक मूल्यांक निरर्थक होतात. कारखान्यात १० ते ५ वाजेपर्यंत



गाई-बैलांप्रमाणे पचनसंस्था असणारे मानवही नवीन तंत्रज्ञानाप्रमाणे निर्माण करणे शक्य होईल.

□

काम व महिन्याशेवटी पगार ही रोजगाराची कल्पना यंत्रयुगात प्रसृत झाली. यंत्रयुगाच्या सुरुवातीला खेड्यातून कारखान्यात आलेले बरेचजण ८–९ महिने कारखान्यात काम करीत व ३–४ महिने स्वतःच्या शेतावर काम करीत. तिसऱ्या कायापालटात बरेच लोक काही वेळ कारखान्यात काम करतील व बराच वेळ स्वतःच्या उपयोगाच्या वस्तू बनविण्यात घालवतील असा टॉफ्लर यांचा अंदाज आहे. सर्व धडधाकट व्यक्तींना पूर्ण वेळ (१० ते ५) नोकरी देणे कुठल्याच देशास शक्य होणार नाही व तशी गरजही नाही असा टॉफ्लर यांचा अंदाज आहे.

सामाजिक व राजकीय स्तरावर होणाऱ्या बदलांविषयी टॉफ्लर लिहितात–

## (१) कुटुंबसंस्थेची विविधता

पहिल्या कायापालटात पितृप्रधान एकत्र कुटुंबपद्धती प्रचलित होती. आई, वडील, मुले यांखेरीज आजोबा, पणजोबा, काका व त्यांच्या स्त्रिया अशा अनेक पिढ्या राहात व अर्थोत्पादन करत. औद्योगिक कालखंडात आई, वडील व मुले यांनी सीमित अशी विभक्त कुटुंबपद्धती–Nuclear family अस्तित्वात आली व प्रमाण झाली. कुटुंबाचा ढांचा (form) अनेक गोष्टींवर अवलंबून असला तरी प्रचलित उत्पादनतंत्र व अर्थव्यवस्था यांच्याशी त्याचे निकटचे नाते असते.

तिसऱ्या कायापालटातील कुटुंबे कशी असतील त्याचा अंदाज घेण्यासाठी प्रगत राष्ट्राकडे परत दृष्टी टाकली पाहिजे. घराबाहेर नोकरी किंवा व्यवसाय करून पैसे मिळवणारा पुरुष हा कुटुंबप्रमुख घराची देखरेख व मुलांचे संगोपन करणारी पत्नी व दोन किंवा अधिक मुले यांनी सीमित असणारे कुटुंब अशी विभक्त कुटुंबाची (NUCLEAR FAMILY) व्याख्या केली तर अमेरिकन संघराज्यात असे दिसते की जेमतेम ७ टक्के लोकसंख्या अशा कुटुंबांत राहाते. आई व वडील हे दोघेही घराबाहेर कामास जातात अशी कुटुंबेही विभक्त कुटुंबाच्या व्याख्येत आणली तरी जेमतेम २५ ते

३० टक्के लोकसख्या विभक्त कुटुबात राहते व ७० ते ७५ टक्के लोकसख्या विभक्त कुटुबावाहेर राहते.

घटस्फोटाचे प्रमाण इतके वाढले की १४ टक्के मुले आई किंवा वडील अशा एका पालकाकडून वाढविली जातात. केवळ मोठ्या शहराचा विचार केला तर हे प्रमाण २५ टक्क्यावर जाते. अर्थात मोठ्या शहरात ही सख्या कुमारी माताच्यामुळे वाढली आहे घटस्फोटाबरोबरच पुनर्विवाहाचे प्रमाण वाढले आहे पत्नीच्या पहिल्या विवाहसबधातून आलेली मुले, पतीच्या पहिल्या विवाहसबधातून आलेली मुले व नवीन होणारी मुले अशी तीन तऱ्हेची मुले व आई व वडील असे घटक असणाऱ्या मोठ्या कुटुबाचे प्रमाण अमेरिकन सघराज्यात वाढत आहे अल्विन टॉफ्लर यास AGGRAGATE FAMILY असे म्हणतात. दुसऱ्या टोकास एकटे राहणाऱ्या स्त्रियाचे व पुरुषाचे प्रमाणही मोठे आहे. यात विवाह न झालेले, दोन विवाहामधील वेळ काढणारे व विधुर याचा समावेश होतो अमेरिकन सघराज्यातील २० टक्के घरकुले–घरे व फ्लॅटस्– अशा 'एकाकी' किंवा 'एकघटकी' 'कुटुबानी' व्यापली आहेत त्याचबरोबर कोणताही धार्मिक वा कायदेशीर विधी न करता एकत्र राहणाऱ्या तरुणतरुणीचे प्रमाणही वाढत आहे हे प्रमाण मोठे असल्याने, निमसरकारी गृहसस्थानी अशा जोडप्यानाही घरे देण्यास नुकतीच सुरुवात केली आहे अशा 'जोडप्याच्या' विभक्तीकरणानतर निर्माण होणारी घरे व मालमत्तेच्या मालकीसबधाचे प्रश्न वकिलाना भेडसावत आहेत. अमेरिकन सघराज्यात अनेक अर्जांत 'अविवाहित, विवाहित व केवळ एकत्र राहणारे' असे तीन रकाने असतात. दोन समलिंगी (HOMOSEXUAL) व्यक्तीच्या कुटुबाना अमेरिकन सघराज्यात कायदेशीर मान्यता आहे. GAY RIGHTS. न्यूझीलडमधील पार्लमेंटने नुकतेच समलिंगी व्यक्तीच्या सबधाना मान्यता देणारे बिल बहुमताने पास केले.

अमेरिकन प्रेसिडेंट जिमी कार्टरनी अधिकारावर आल्याबरोबर घोषणा केली की कुटुबसस्थेस बसणारे हादरे ही त्याच्या सरकारसमोरील सर्वांत महत्त्वाची समस्या आहे. अर्थात कुटुबपद्धती म्हणजे विभक्त कुटुबपद्धती असेच त्याना अभिप्रेत होते ब्रिटन, स्वीडन, फ्रान्स, जर्मनी वगैरे इतर प्रगत देशांतही विभक्त कुटुबपद्धतीची पडझड याच प्रमाणात होत आहे. तथापि विभक्त कुटुबपद्धतीस बसणारे हादरे ही काही एकाकी घटना नाही. दुसऱ्या कायापालटात आकारास आलेल्या किंवा मान्यता पावलेल्या सर्वच सामाजिक सस्थामध्ये एक प्रकारची आणीबाणीची स्थिती आली आहे. यात सार्वत्रिक मतदानावर आधारित लोकशाही, भौगोलिक चौकटीतील राष्ट्रवाद, आतरराष्ट्रीय व्यापार व मुद्रास्थिती याचा समावेश आहे.

विभक्त कुटुबपद्धती या कायापालटात नाहीशी होणार आहे असा याचा अर्थ नव्हे. जेसी बरनार्ड याचे मते कुटुबाचे अनेक प्रकार राजमान्य व लोकमान्य होतील व विभक्त कुटुब (NUCLEAR FAMILY) हा त्यातील एक प्रकार राहील, पण एक गोष्ट निश्चित आहे जी विभक्त कुटुबे अस्तित्वात राहतील ती जिवत धगधगणाऱ्या प्रेमावर आधारित राहतील. विझलेले किंवा राख झालेले प्रेमसबध विभक्त कुटुब एकत्र ठेवू शकणार नाही.

## (२) कॉग्निटॅरियट (COGNITARIAT) चा उदय

तिसऱ्या कायापालटातील यत्रे माणसाचे बुद्धिबल वाढवितात. अशा यत्रावर काम करणारा कामगार आपली बुद्धी यत्रात IN PUT म्हणून वापरतो स्वच्छ धूळविरहित व प्रसगी वातानुकूलित जागेत काम करीत असल्याने तो पाढरे शुभ्र कपडे वा पाढरा एप्रन वापरू शकतो. या कामगाराचे व्यक्तिमत्त्व श्रमजीवी कामगारापेक्षा (PROLETARIAT) निराळे आहे. एका अर्थाने याला WHITE COLLAR WORKER म्हणता येईल. बुद्धी किंवा ज्ञान हे या कामगाराचे मुख्य औजार असल्याने अल्विन टॉफ्लर या कामगार वर्गास COGNITARIAT असे नाव देतात. COGNITION म्हणजे ज्ञान किंवा जाणीव GNOCOS या लॅटिन शब्दावरून किंवा 'ज्ञा' या संस्कृत धातूवरून हा शब्द आला यास बुद्धिजीवी कामगार वर्ग असेही म्हणता येईल.

१९५६ साली अमेरिकन सघराज्यात COGNITARIAT ची सख्या PROLETARIAT पेक्षा जास्त झाली. त्यामुळे या वर्षास अमेरिकेतील तिसऱ्या कायापालटाच्या आरंभाचे वर्ष असे टॉफ्लर मानतात अमेरिकन संघराज्यात अदाजे ४ टक्के लोकसंख्या शेतावर काम करते (व सबध देशास पुरून उरेल एवढे धान्य पिकविते.) PROLETARIAT चे प्रमाण जवळजवळ तेवढेच आहे. उरलेल्या लोकसख्येतील काम करणारा वर्ग हा डॉक्टर, वकील, आर्किटेक्ट, इजिनियर्स वगैरे व्यावसायिक व प्रगत यत्रावर काम करणाऱ्या COGNITARIAT नी बनतो.

'प्रोलॅटॅरियटचे प्रमाण कमी झाल्याने त्याच्या पाठिब्यावर आधारित असणाऱ्या समाजवादी पक्षाचा कणाच मोडला आहे तसेच यत्रयुगात सर्व राजकीय पक्षाचे डावे व उजवे असे वर्गीकरण झाले होते तेही कालबाह्य होत आहे. तिसऱ्या कायापालटात सर्व राजकीय पक्षाच्या चिरफळ्या उडत आहेत व ज्याला Single Issue Group म्हणता येईल अशा गटाचे सामर्थ्य वाढत आहे. अणुशस्त्राच्या वाचण्यास विरोध करणारा गट, तारकायुक्त ( star war ) कार्यक्रमास विरोध करणारा गट, पर्यावरणाच्या प्रदूषणास विरोध करणारा गट असे अनेक लहानमोठ्या मुद्द्यावर निर्माण झालेले गट उदाहरणादाखल सागता येतील. यातील कोणत्याही एका गटात आत्यतिक व्यक्तिवादी, खाजगी उद्योगधद्याचा पुरस्कार करणारे, मालमत्तेचा हक्क पवित्र मानणाऱ्या उजव्या विचारसरणीच्या व्यक्ती आहेत तसेच डाव्या विचारसरणीचे अट्टल कम्युनिस्टही आहेत. भारतातील परिस्थिती निराळी असली तरी मुद्दा स्पष्ट करण्यासाठी मुस्लिम व्यक्तिगत कायद्याचे उदाहरण घेता येईल. शरियत कायद्यात सुधारणा पाहिजे असे म्हणणाऱ्या गटात प्रगतिशील विज्ञानवादी मुस्लिम पुढारी आहेत, कडवे हिंदुत्ववादी आहेत तसेच अनेक राजकीय छटा असणाऱ्या स्त्रीसघटना आहेत थोडक्यात तिसऱ्या कायापालटात मूलगामी तात्त्विक विचारसरणीवर आधारिक राजकीय पक्ष दुर्बल होऊन एकेका मुद्द्यावर सघटित झालेले पक्ष प्रबळ होत आहेत असे टॉफ्लर याचे निरीक्षण आहे

## (३) स्त्रीमुक्तीची पहाट

पहिल्या कायापालटात स्त्रियाचे स्थान कमी दर्जाचे होते. नैसर्गिक

शारीरिक कमजोरीमुळे व प्रसूतीमुळे येणाऱ्या शारीरिक मर्यादामुळे स्त्रियाना पुरुषाप्रमाणे अगमेहनतीची कामे शक्य नसत. प्रत्येक स्त्रीस ५–६ मुले हा नियम असल्यामुळे आयुष्याची निम्मी वर्षे प्रसूती व बालसंगोपन यात जात. त्या काळातील प्रचलित वारसाहक्क पाहिले तर स्त्रियाच्या गौण स्थानाची खात्री पटते. 'न स्त्री स्वातत्र्यमर्हती' असे सागणारे स्मृतिकार फक्त भारतातच होते असे नाही. या काल-खडात सर्वच देशात पितृप्रधान कुटुबपद्धती व स्त्रियाचे दुय्यम स्थान गृहीत असे. तथापी मुलाच्या आईबद्दलच्या जिव्हाळयामुळे घराच्या परिसरात स्त्रियाना एक विशेष मानाचे स्थान काही देशात असे.

दुसऱ्या कायापालटात स्त्रियाची स्थिती आणखी कठीण झाली. विभक्त कुटुबात मुलाचे शिक्षण, सस्कार व आजारपणातील शुश्रुषा ही कामे शाळा व हॉस्पिटले याच्याकडे गेली. स्त्री नोकरी करत असल्यास मुलाची रवानगी ३–४ वर्षापासून शाळेत किंवा पाळणाघरात होई. *आईचा मुलावरील अधिकार यामुळे थोडा कमी झाला.* घरातील इतर कामाचे बाजारपेठेच्या अर्थव्यवस्थेत अवमूलन झाले हे आधी पाहिले आहेच.

निसर्गाने घातलेल्या शारीरिक मर्यादापेक्षा अनेक पटीने अधिक अशा मानसिक व सास्कृतिक मर्यादा दोन्ही कायापालटात स्त्रियावर घातल्या गेल्या. स्त्रियावरील सस्कार व त्याच्यापुढे ठेवलेल्या आद-र्शाच्या प्रतिमा स्त्रियाना अन्यायकारक होत्या. त्यामुळे एक प्रकारचा मनाचा पागळेपणा स्त्रियात येणे स्वाभाविक होते रामाने अन्यायाने त्याग केल्यावरही 'ममैव जन्मातरपातकाना विपाकविस्फूर्जथुर प्रसह्य' असे म्हणणाऱ्या कविकुलगुरूच्या सीतेपासून ते 'असे पति देवचि ललनाना, तयासी अन्य भावना ना' असे म्हणणाऱ्या गडक-ऱ्यांच्या सिंधूपर्यंत अनेक साहित्यिकांनी वर्णिलेले स्त्रियाचे आदर्श तपासण्यासारखे आहेत, (ते वरील विधानाची साक्ष देतात) बडखोर स्त्रिया साहित्यात रगविल्या आहेत, पण त्या क्वचित् व आदर्श प्रतिमाना उठाव देण्यासाठी. आदर्श स्त्री ही पुरुषाच्या सहस्र अप-राधाना क्षमा करणारी, सहनशील, कुटुंबासाठी सर्वस्वाचा त्याग करणारी, सर्वकाल तडजोडीस तयार असणारी, व चूल व मूल यात आयुष्याची इतिकर्तव्यता मानणारी असते. स्त्रियाच्या गुणविशेषात कोमलता, हळुवारपणा, बुद्धीची कमजोरी, चचलता, तर्कदुष्टता याचा समावेश असे. यातले बरेच गुणविशेष विशिष्ट सस्कारानी निर्माण केलेले असत लैंगिक बाबतीत शीलरक्षणाला काहीसे अवास्तव महत्त्व दिले जाई. सर्वच देशात हा प्रकार होता. नाझी पक्ष अधिकारावर असताना जर्मनीमध्ये स्त्रीचे कार्यक्षेत्र Kinder, Kurche, Krische असे गृहीत धरले होते. सर्वात जास्त मुलाना जन्म देणाऱ्या स्त्रियाना पारितोषिक देण्यात येई प्रजोत्पादनाचे यत्र असे विकृत स्वरूप स्त्रियाना हिटलरच्या राजवटीत आले होते.

तिसऱ्या कायापालटात परिस्थिती बरीच बदलत आहे १९५६ साली अमेरिकन सघराज्यात तिसरा कायापालट सुरू झाला त्यानतर १० वर्षांनी– १९६६ साली बेटी फ्रीडमनने फेमिनाइन मिस्टिक् हे पुस्तक प्रसिद्ध केले व स्त्रीमुक्ती चळवळीचे निशाण उभारले. या चळवळीचा अधिक परामर्श येथे अप्रस्तुत ठरेल, पण या क्रातिकारी विचाराचे वानगीदाखल एक उदाहरण घेता येईल बलात्काराच्या *प्रयत्नास किती मर्यादेपर्यंत विरोध करावयाचा याचे उत्तर पहिल्या* दोन कायापालटात नि सदिग्ध असे. प्राणाची बाजी लावूनही शील-रक्षण केले पाहिजे अशी (पुरुषाची) अपेक्षा असे. अमेरिकन स्त्री-मुक्तिचळवळीच्या नेत्यानी एकदा असे विधान केले की बलात्कारास विरोध करताना हातपाय व प्राण गमावण्याची पाळी आली तर विरोध थाबवावा व बलात्कार सहन करावा– 'If you cannot oppose you may as well enjoy it' या विधानामुळे वादळ उठणे साहजिक होते. येथेही प्रथितयश साहित्यिकानी एक जळजळीत लेख लिहिला. चळवळीच्या बडखोर नेत्याचा सल्ला म्हणजे बळ-जबरीने तोडात विष्ठा घातली असता मिटक्या मारीत खा असे साग-ण्याचा प्रकार आहे असे त्या लेखकाचे मत होते. वस्तुत बलात्कार व बळजबरीने तोडात विष्ठा घालणे यातील बळजबरीचा भाग सोडला तर उरलेल्या क्रियात काहीच साम्य नाही. यापेक्षा अधिक तर्कदुष्ट दाखला शोधून मिळणार नाही; पण बडखोर स्त्रीनेत्याचे विधान *दुसऱ्या कायापालटातील सस्कृतीला मोठा धक्का देणारे असल्याने* प्रतिक्रिया तर्कदुष्ट व जळजळीत असणे समजण्यासारखे आहे.

दुसऱ्या कायापालटातही अनेक बडखोर स्त्रिया झाल्या, पण स्त्रीमुक्तीची चळवळ तिसऱ्या कायापालटात जोर धरीत आहे. अल्विन टॉफ्लर याच्या मते याची तीन महत्त्वाची कारणे आहेत. एक म्हणजे cognitariat किंवा बुद्धिजीवी कामगारवर्गाचा उदय. या फरकामुळे स्त्रियाची शारीरिक कमजोरी किंवा मर्यादा पहिल्या-एवढी महत्त्वाची राहिली नाही. डॉक्टर, वकील, आर्किटेक्ट, शास्त्रज्ञ वगैरे इतर व्यावसायिक वर्गाचाही फार मोठ्या प्रमाणावर विस्तार झाला या व्यवसायातही अगमेहनतीला फार महत्त्व नसल्याने या क्षेत्रात स्त्रिया यशस्वी स्पर्धा करू लागल्या. परिस्थिती स्त्रियाना अनुकूल होण्याचे दुसरे कारण म्हणजे गर्भनिरोधक गोळयाचा शोध. अनेक गर्भनिरोधक साधने अस्तित्वात असली तरी त्यातली बरीच दोघाच्या समतीवर अवलबून असत गर्भनिरोधक गोळया पुरुषाच्या समतीशिवाय वा ज्ञानाशिवाय घेता येणे शक्य असल्याने प्रजोत्पादनाच्या बाबतीत स्त्रियाना प्रथमच स्वातत्र्य प्राप्त झाले. तिसरे कारण म्हणजे घराचे परत वाढणारे महत्त्व दुसऱ्या कायापालटात कार-खान्यात केंद्रित झालेले उत्पादन क्षेत्र तिसऱ्या कायापालटात परत घरोघर विखुरले जाईल. यामुळे घरबसल्या स्त्रियाना बाजारपेठे-साठी उत्पादन शक्य होईल व आर्थिक मोबदला मिळेल कारखान्यात वा ऑफिसात जाऊन काम करणारा व पगार घरी आणणारा पुरुष व घरी राहून अपत्यसगोपन करणारी स्त्री अशी कामाची विभागणी दुसऱ्या कायापालटात झाल्याने पुरुषाचा अपत्यसगोपनातील हातभार नगण्य असे. एका अर्थाने अपत्यसगोपनाचा आनद पुरुषाना कमी मिळत असे. तिसऱ्या कायापालटात उत्पादनक्षेत्र घरोघर विखुरल्या-वर आई, वडील व लहान मुलेही आळीपाळीने कामात हातभार लावतील या सर्व कारणामुळे तिसरा कायापालट स्त्रीमुक्तीची पहाट ठरेल.

## (४) प्रसिद्धिमाध्यमांचा संकोच व समूहमनाचा भंग

यत्रयुगामध्ये प्रसिद्धिमाध्यमाचा विस्तार झाला व समूहमनाची निर्मिती झाली. तिसऱ्या कायापालटात प्रसिद्धिमाध्यमाचा एक तऱ्हेने *सकोच होत आहे १९७३ ते १९७८ या पाच वर्षांच्या अवधीत*

लोकसंख्या वाढत असूनही सर्व दैनिक वर्तमानपत्राच्या एकदर प्रतीचा खप १० लाख प्रतीनी कमी झाला. रोज नेमाने वर्तमानपत्र वाचणाऱ्याचे प्रमाण ६९ टक्क्यावरून ६२ टक्क्यावर आले लाइफ, लुक, सॅटरडे इव्हिनिंग पोस्ट ही दर्जेदार व एकेकाळी फार मोठा वाचकवर्ग असणारी नियतकालिके बंद पडली. टेलेव्हीजन पाहणाऱ्याची सख्या कमी होत आहे त्याचवेळी प्रादेशिक पत्राचा व खास विषयाला वाहिलेल्या नियतकालिकाचा प्रसार होत आहे. शेअरबाजार, सिनेमा, फूटबॉल, ब्रिज या विषयाला वाहिलेल्या मासिकाचा खप वाढत आहे. वैमानिकाना स्वारस्य असणारी अनेक मासिके अस्तित्वात आहेत. ही सर्व मासिके एका गटातच खपतात व त्यामुळे प्रती मर्यादित असतात पण छपाईतील नवीन तत्रामुळे छपाई स्वस्त होत आहे काही मासिके तर झेरॉक्स पद्धतीने छापली जातात. रेडिओवर अनेक स्टेशन्स व टीव्हीवर अनेक चॅनल्स झाल्याने अमेरिकन सघराज्यातील व्यक्ती आपल्या आवडीचे कार्यक्रम निरनिराळ्या चॅनल्समधून निवडून पाहाते नियतकालिके, रेडियो, टीव्ही या माध्यमाच्या बाबतीत लोकाना एक प्रकारचा over choice मिळत आहे. किंवा पसंतीसाठी अनेक पर्याय उपलब्ध होत आहेत. तिसऱ्या कायापालटातील इतर राष्ट्रातही अशीच परिस्थिती आहे.

या बदलामुळे एक प्रतिमा लाखो लोकाच्या मनावर एकाच वेळी चित्रित होत नाही. V for victory हे चिन्ह बोटानी दाखविणारे चर्चिलचे छायाचित्र लाखो लोकाच्या मनावर शिल्पासारखे कोरले गेले होते. अशा तऱ्हेची शिल्पे तिसऱ्या कायापालटात दिसत नाहीत. यामुळेच कोणत्याही विषयावर राष्ट्रीय स्तरावर वैचारिक देवाण–घेवाण होत नाही व CONSENSUS कठीण होत आहे. जनतेची नाडी ओळखणे हा यत्रयुगातील शब्दप्रयोग अर्थहीन होत आहे एकात्म, सुसवादी समूहमन अनेक स्तरावर विभक्त होत आहे वा विरून जात आहे.

अल्विन टॉफ्लर या बदलास Demassitying of Media व Demassitying of Mind अशा सज्ञा वापरतात.

## (५) प्रतिमांचा क्षणभंगुरपणा

दुसऱ्या कायापालटात प्रसिद्धिमाध्यमाचा अनेक पटीने विस्तार झाला व प्रतिमामध्ये विविधता आली. पूर्वी कधीही न पाहिलेली अनेक चित्रे डोळ्यासमोर आली व एकदर प्रतिमाची सख्या अनेक पटीनी वाढली याचा एक परिणाम म्हणजे सज्ञापटलावर उठणारी प्रतिमा क्षणजीवी झाली यामुळे मनातील प्रतिमाची वही सारखी बदलावी किंवा दुरुस्त करावी लागे. तरीही दुसऱ्या कायापालटातील सर्व सदेश व प्रतिमा एका सूत्रात ओवलेल्या मण्याच्या माळेसारख्या सुसगत, व सूत्रबद्धतेमुळे अर्थपूर्ण असत. त्यातून एक सपूर्ण चित्र डोळ्यांसमोर येई

तिसऱ्या कायापालटात सज्ञापटलावर येणाऱ्या सदेशाचे प्रमाण आणखी अनेक पटीने वाढले. त्यामुळे प्रत्येक सदेशाचा वा उठणाऱ्या प्रतिमाचा काल आणखी कमी झाला. मनातील प्रतिमाची वही सतत बदलावी लागते. तिसऱ्या कायापालटातील सदेश क्षण-दोन क्षण लका-


With Best Compliments
From

**The All India Federation of Co-Operative Spinning Mills Ltd.**

14, Murzban Road, 2ND Floor,
BOMBAY 400 001

**Shri V. G. Puranik**
Managing Director

**Shri K. H. Patil**
President

कून डोळे दिपवून जाण्याऱ्या विजेसारखे आहेत. सतत येणाऱ्या क्षणभंगुर व प्रभावी सदेशाना टॉफ्लर BLIP–CULTURE असे म्हणतात. मुद्दा स्पष्ट करण्यासाठी दूरदर्शनचे उदाहरण घेता येईल. दूरदर्शनवर ३० ते ४० सेकद चालणाऱ्या सर्व जाहिराती ओळीने टेप केल्या व सतत दोन तास पाहून त्यातून सुसंगत अर्थ काढण्याचा प्रयत्न केला तर जशी भोवळ येईल तसाच प्रकार वास्तव जीवनात होत आहे 'बेस्टो खदीदिये' म्हणून डोळे वटारून दरडावणारी नटी दुसऱ्या चित्रात साड्याची भलावण करीते, तर तिसरे चित्र पायावरील नायट्यासाठी इलाज सागते. अशाच प्रकारच्या तुटक व क्षणभंगुर पण आर्जवी व शक्तिशाली प्रतिमा व्यावहारिक आयुष्यात सतत येत असल्याने अनेक व्यक्ती सभ्रमित होत आहेत– विशेषत जुन्या पठडीत वाढलेल्या व्यक्ती. या संभ्रमाला इतरही अनेक कारणे आहेत, पण शक्तिशाली प्रतिमाचा क्षणभंगुरपणा हेही एक महत्त्वाचे कारण आहे

## (६) राष्ट्रीय अस्मितेचा दुबळेपणा

तिसऱ्या कायापालटातील देशात राष्ट्राभिमानाच्या सदर्भात एक विस्मयजनक बदल दिसत आहे. यत्रयुगातील ज्वलत राष्ट्रभावना विझून जात आहे आणि प्रादेशिक भावना जोर धरीत आहेत याची निश्चित कारणमीमासा स्पष्ट नाही तरी राष्ट्रभावनेवर तीन बाजूनी चढाई होत आहे. ती तीन कारणे अशी आहेत–

(१) प्रादेशिक निष्ठाची चढाई (२) आतरराष्ट्रीय परिस्थिती (३) बहुराष्ट्रीय कपन्याचा उदय.

**(अ) प्रादेशिक निष्ठांची चढाई** :– अमेरिकन सघराज्यात कॅलिफोर्निया, टेक्साझ, लुझियाना ही नैर्ऋत्येकडील राष्ट्रे SUN–BELT STATES म्हणून ओळखली जातात त्याच्यात व ईशान्येकडील न्यूयॉर्क आदी राज्यात एक दुफळी पडताना दिसते. आपल्या तेलसपत्तीची इतर राज्ये चोरी करीत आहेत अशी भावना टेक्सासमध्ये वाढत आहे व टेक्सासमधल्या जनतेला मेक्सिकोबद्दल जवळीक वाटू लागली आहे. ईशान्येकडील राज्यात कडक थडीमुळे घरे गरम ठेवण्यासाठी फर्नेस तेलाचा मोठ्या प्रमाणावर वापर होतो टेक्सासवगैरे नैर्ऋत्येकडील राज्यात खनिजतेलाचा मुख्य उपयोग मोटारीसाठी होतो. १९७५ सालच्या तेलाच्या तुटवड्याच्या काळात टेक्सास, लुझिआना वगैरे राज्यात मोटारीवर मोठी स्टिकर्स लावलेली असत त्याचा मजकूर LET THE BASTARDS FREEZE IN DARK असा असे. ईशान्येकडील राज्यातील जनतेला उद्देशून हा मजकूर असे. दुराग्र्याची आणि त्याच्या तीव्र अभिव्यक्तीची अनेक उदाहरणे देता येतील. कॅनडामध्ये इग्रजी भाषिक व फ्रेंचभाषिक याच्यात दुरावा आहे एके काळचे कॅनडाचे पंतप्रधान पीयर ट्रुडे यानी राष्ट्राचे द्विभाजन होण्याचा भयाविषयी जनतेला इशारा दिला. फ्रान्समध्ये कॉर्सिकन बेट फुटून निघण्याची भाषा करते, व ब्रिटनी, अल्सेस व लॉरेन हे भाग अधिक स्वायत्ततेची मागणी करतात. रशियातील जॉर्जिया राज्यातील जनतेते भाषाप्रेम व प्रादेशिक अभिमान राष्ट्राभिमानाइतकाच प्रबळ आहे. प्रादेशिक भावना राष्ट्रवादावर कुरघोडी करीत असल्याची प्रगत देशातील अनेक उदाहरणे देता येतील.

एका बाजूने प्रादेशिक निष्ठा राष्ट्रवादाला शह देत आहेत तर दुसऱ्या बाजूने आतरराष्ट्रीय परिस्थिती व बहुराष्ट्रीय कपन्या राष्ट्रीय सार्वभौमत्वावर आक्रमण करीत आहेत.

**(ब) आंतरराष्ट्रीय परिस्थिती** :– आज कोणते राष्ट्र सर्व प्रश्न राष्ट्रीय चौकटीत सोडवू शकत नाही. युरोपातील सर्व राष्ट्रे एकत्र आली तरी रशियन अणुबॉबपासून रक्षण करण्यासाठी त्याना अमेरिकन छत्राची आवश्यकता भासते अमेरिकेचे सातवे आरमार हिंदी महासागरात आल्यावर येथील राष्ट्राना रशियाशी सधी करणे क्रमप्राप्त होते. वातावरणातील व समुद्रातील प्रदूषणावर राष्ट्रीय चौकटीत उपाय सापडत नाही. ब्रिटन व जर्मनीमधील कारखान्यात जाळलेल्या कोळशामधील व खनिजतेलामधील गंधकामुळे वातावरणात सल्फर डाय ऑक्साइडचे प्रमाण वाढते. त्यामुळे स्वीडनमध्ये आम्लयुक्त पाऊस (ACID RAIN—$SO_2+H_2—H_2SO4$) पडतो व तेथील जगलसंपत्तीवर विपरीत परिणाम होतो. अमेरिकन सघराज्याच्या उत्तर भागात मोठी THERMAL POWER STATIONS आहेत. त्यात जाळलेल्या कोळशामुळे कॅनडातही आम्लयुक्त पाऊस पडतो. डॅन्यूब नदीतील प्रदूषणावर राष्ट्रीय चौकटीत उपाय सापडत नाही, इतर राष्ट्राचे सहकार्य आवश्यक होते.

खनिजतेलाच्या किंमती, साखरेची किंमत, कॉफी व इतर अनेक शेतीमालाच्या आतरराष्ट्रीय किमती ठरविणाऱ्या जागतिक सघटना आहेत वर्ल्ड बॅंक, इटरनॅशनल मोनेटरी फंड, व तत्सम सघटना अनेक राष्ट्राच्या सार्वभौमत्वाला बधने घालू शकतात. राष्ट्राराष्ट्रातील


'खऱ्या सुधारकाला कोऱ्या पाटीवर लिहायचे नसते, अपूर्ण वाक्य पूर्ण करण्याचे काम तो करीत असतो. भूतकाळ तोडून टाकायचा म्हणता तोडून टाकता येत नाही आणि आला, तरी तसे करता कामा नये.

– रा. गो. भांडारकर

शुभेच्छांसह !

**मे. अजंता प्रिंट आर्टस्**

५२, नाथ माधव पथ

मुंबई ४०० ००४

सुभाष रोड, विले पारले (पूर्व) मुंबई ४०० ०५७

अर्थसंबंध इतके परस्परावलंबी झाले आहेत की कोणत्याही राष्ट्रास बेरोजगारी वा चलनवृद्धी हे प्रश्न स्वतंत्रपणे सोडविता येत नाहीत.


**(क) बहुराष्ट्रीय कंपन्यांचा उदय :–** तिसऱ्या कायापालटात अनेक बहुराष्ट्रीय कंपन्या उदयास आल्या आहेत. ज्यांचे कारखाने वा ज्यांच्या संलग्न कंपन्या सहापेक्षा अधिक राष्ट्रांत आहेत. अशा २००० पेक्षा थोड्या अधिक बहुराष्ट्रीय कंपन्या आज अस्तित्वात आहेत. यांचे भागभांडवलही अनेक देशांतून आलेले असते व सोयीप्रमाणे एका देशातून दुसरीकडे पैशाची देवाणघेवाणही मोठ्या प्रमाणावर यांना करता येते. यातील अनेक कंपन्यांची वार्षिक उलाढाल कित्येक देशांच्या संपत्तीपेक्षा जास्त असते. EXON, HITACHI, MITSUBISHI, UNILEVER, SHELL, GENERAL MOTORS अशा काही महत्त्वाच्या कंपन्या या सदरात मोडतात. या कंपन्यांची धोरणे अनेक वेळा राष्ट्रीय धोरणाशी विसंगत असतात १९७५ सालच्या खनिज तेलाच्या तुटवड्याच्यावेळी अमेरिकन संघराज्यांत पेट्रोलचे रेशनिंग करण्याची पाळी आली. EXON चे त्यावेळचे धोरण अमेरिकन राष्ट्रीय धोरणाशी विसंगत होते.

या तीनही कारणांमुळे प्रगत देशांत राष्ट्रभावना अशक्त होत आहे याचा अर्थ या राष्ट्रांत फुटीरतेचे मोठे भय आहे असे नव्हे. पण राष्ट्रीय सार्वभौमत्वाविषयी जी जाज्वल्य निष्ठा दुसऱ्या कायापालटात दिसत असे, तिला आता दुवळेपणा येत आहे. राष्ट्रीय अस्मितेविषयी अपशब्द बोलणे म्हणजे वैयक्तिक अधःपतनाची नीच पातळी गाठणे या श्रद्धेपासून उलट दिशेने बराच प्रवास झाला आहे.

तिसण्या कायापालटाच्या रंगरूपाचे अनेक पैलू सांगता येतील. तिसऱ्या कायापालटाची अद्यापही जडणघडण चालू असल्याने त्याचे निश्चित रुप अद्याप अस्पष्ट आहे. सामान्य लक्षणे कोणती व व्यवच्छेदक लक्षणे कोणती हाही संदेह आहे. तथापि लेखाचे उद्दिष्ट सुरुवातीला सांगितल्याप्रमाणे नव्या कालखंडाचे सामान्यरूप दाखविणे एवढेच असल्याने हे कायापालटाचे वर्णन येथेच आवरते घेतले आहे.

भारतात हा बदल केव्हा घडून येईल ? प्रगतीची सर्व सूत्रे सर्व ठिकाणी उपयोगी पडत नाहीत. शहाच्या कारकीर्दीत इराणमध्ये औद्योगिक क्रांतीचा युरोप–अमेरिकेतील कित्ता घाईने गिरविण्याचा प्रयत्न झाला व तो फसला. तोच प्रयत्न दक्षिण कोरिया, तैवानमध्ये यशस्वी झाला. पश्चिमेतील औद्योगिक देशांनी जे टप्पे घेऊन वाटचाल केली तेच टप्पे इतर देशांनी घेतले पाहिजेत असे नाही. पहिल्या आणि तिसऱ्या कायापालटाच्या बांधणीत अनेक साम्यस्थळे आहेत तेव्हा सर्वांगिक सामाजिक जाण व प्रगल्भ नेतृत्व यांच्या आधारे भारत २१ व्या शतकाच्या सुरुवातीला एका नव्या प्रगतिशील आशादायी कालखंडात प्रवेश करील यात शंका नाही.

**स मा प्त**







पेठे बिल्डिंग, जगन्नाथ शंकरशेट मार्ग, मुंबई-४. फोन : ३५३५२१/२२
पेठे बिल्डिंग, रानडे रोड, मुंबई-२८ फोन : ४३०८५१५, ४३०७५१६



# सत्कार

**भीमसेन देठे**

सुधीर मोरे हा भिमा महाराचा पोरगा. शिकून तो कुठल्या कुठे अमेरिकेत गेला. कॅम्प्युटरच्या एका नव्या यंत्राचा त्याने शोधही लावला. अनेक वर्षांनी तो आपल्या गावाकडे आला....

हवेमध्ये बराच गारवा होता त्याने त्याच्या फ्लॅटच्या सगळ्या खिडक्या लावून घेतल्या होत्या, तरी वाजणारी थंडी काही कमी झाली नव्हती. अंगावरचे ब्लँकेट त्याने संपूर्ण अंगावर ओढून घेतले तेव्हा कुठे त्याला थोडे बरे वाटले. उठायला हवं होतं. सकाळीच निघायला पाहिजे. कमीत कमी दोन वाजेपर्यंत तरी गावाला पोहचले पाहिजे. वीस वर्षानंतर आपण आपल्या गावाला जातोय, कालच गावच्या सरपंचाचं तिसरं पत्र आलंय. मुख्यमंत्र्याच्या अध्यक्षतेखाली आपला भव्य सत्कार सोहळा आयोजित केलाय. त्याने अंगावरचे ब्लँकेट बाजूला ठेवले. मधला दरवाजा उघडून तो बाल्कनीत आला. दाटलेल्या धुक्यात सभोवतालची झाडं, पानं, फुलं हरवून गेली होती. अंधुकसा-धूसर पुसटपुसट दिसणारा समोरचा समुद्र. किनाऱ्यावर आदळणारा त्याचा पाणलोट तो पहात होता.

त्याच्या बगल्याच्या समोर उभ्या असलेल्या त्याच्या फियाटची साफसफाई करण्यात काशीनाथ गुग झाला होता. त्याने वरूनच आवाज दिला– 'अरे काशीनाथ ! आलास काय ?'

'व्हय सायब !'

'बरं झालं तुझीच वाट पहात होतो. मी एक तासात तयार होतो, तोपर्यंत तू गाडीत पुरेसे पेट्रोल भरून घे.'

'बरं साहेब'

त्याच्या पाठीला स्पर्श झाला म्हणून त्याने मागे वळून पाहिले. तर शोभना हसत उभी होती.

'आज उगवणारी सकाळ एवढी सुदर कशी ?'

'ती तुझ्या इडियातील आहे म्हणून !'

'वा ! मार्व्हलस ! क्या बात है। तुम्हारे जबाबका भी जबाब नही।' तो तिचे हात हातात घेत म्हणाला.

'सुधीर आज तू गेलास नाही तर चालणार नाही का ?'

'अग वेडे मी माझ्या गावाला तब्बल वीस वर्षानतर जातोय. माझी ती जन्मभूमी, माझी माणस मला किती वर्षानतर भेटणार आहेत. त्याना भेटण्यासाठी मी केवढा उत्सुक आहे अन् तू खुशाल म्हणतेस गेला नाहीस तर चालणार नाही का ?'

'अरे, इथे आल्यापासून तुझ्या रोज काही तरी भानगडी असतात. सत्कार, मिटीगा, पार्टर्या तू माझा काहीच विचार करीत नाहीस.'

'अग आयुष्यभर आता तुझाच विचार करणार आहे'

'कसला माझा विचार ! अमेरिकेमध्ये तासन् तास त्या कप्युटर बरोबर खेळणं ? कप्युटरमध्ये कृत्रिम बुद्धीमत्ता निर्माण करण्याच्या विचारात स्वत.ची बुद्धी रात्रन्दिवस गहाण ठेवण ? तू एका नव्या कप्युटरचा शोध लावलास त्याचा मलाही अभिमान आहे, परतु एक कृत्रिम यत्र बनवताना तू तुझ्या सोबत वावरणाऱ्या जित्या जागत्या माणसाला मात्र विसरून जातोस.

अरेरे ! तो ओठातल्या ओठात हसत रहातो. सुधीर ! ती डोळे मोठे करून त्याच्याकडे बघते. 'हे बग तुला यायचे असेल तर चल माझ्याबरोबर मी नाही म्हटले काय ? अनायासे तुझे तुला गाव तरी बघायला मिळेल.'

आले असते रे ! पण माझी तब्येत बरोबर नाही. त्यात मला सभा, मिटीगा म्हटल्या म्हणजे जाम बोअर व्हायला होतं. सुधीर !

'काय ?

आपण अमेरिकेला केव्हा परत जायाचे ?

'माझा तर इथेच स्थायिक होण्याचा विचार आहे.

'नो बाबा ! नो ! अस काही करू नकोस. कृपा कर माझ्यावर. लवकर निघू. मला इडियात रहाण आवडत नाही 'का गं ? ही आपली मातृभूमी आहे, हे इतक्या लवकर विसरलीस ? या आपल्या देशाचा तुला थोडाही अभिमान नाही ?

'नुसता अभिमान घेवून जगता येत नाही माणसाला !'

'म्हणजे ! तुला म्हणायचे काय ?'

'इथले जीवन अस्थिर आहे अमेरिकेत जे प्लेझर आहे त्याचा लवलेशही इथे सापडणार नाही जी गोष्ट अमेरिकेत सहजीसहज मिळते तिच मिळविण्यासाठी इथ बरंच झगडाव लागत. या देशातील लोक नुसते बोलण्यात पटाईत आहेत कृतीच्या दृष्टीने शून्य !'

अस म्हणून चालत नाही शेवटी हा आपला देश आहे त्याच्यासाठी जर आपला काही उपयोग होत असेल तर नको का करायला ?

तू करत बस तो उद्योग ! मला परवडणार नाही काल मी व्हीटी स्टेशनवर भिकाऱ्याची गर्दी पाहिली– ते हातपाय झडलेले महारोगी ! त्याचा तो केविलवाणा आक्रोश ! साऱ्या शरीरभर सर्कन काटा उभा राहिला–

'नशीब तू भारतातीलच आहेस म्हणून ! नाही तर काय केले असते काय माहिती !'

'असू दे ! असू दे ! आता तू आवरायचे काय घेणार ?

बोलण्याच्या नादात आपल्याला बराच उशीर होतोय याचं भान झाल्याबरोबर तो बाथरुमकडे धावतच जातो. त्याची उडालेली धांदल पाहून शोभनाला गमत वाटते. आपण सुधीरला उगाचच तोडून बोललो याची तिला रुखरुख लागून राहाते.

ती समोर पसरलेल्या त्या अथांग समुद्राकडे पहात रहाते. धुके वितळून गेलेले असतात. पाण्यात उठलेले तरग. एवढ्या थडीत सकाळी सकाळी वाळूत पाय रोवून एकमेकाच्या मिठीत विसावलेले तरुण जोडपे पाहून तिला लग्नाच्या अगोदर सुधीरबरोबर केलेला रोमान्स आठवतो आपण काम करीत असलेल्या एका इजिनिअरीग कंपनीत भारतातून आलेला एक तरतरीत देखणा इजिनीअर थोड्याच दिवसात धमाल उडवून देतो. अमेरिकेतल्या रथी–महारथी उद्योगपतीचे लक्ष तो वेधून घेतो त्याने तयार केलेल्या कॅम्प्यूटरला जगाच्या बाजारपेठेत कमालीची मागणी वाढते. त्याला आपल्या कपनीत खेचण्यासाठी मोठ – मोठ्या पगाराच्या आलेल्या ऑफर, आपणही त्याच काळात त्याच्या प्रेमात पडलो. त्याच्या स्वभावातला मोकळेपणा आपल्याला मनापासून आवडला होता. सुरुवातीलाच तो म्हणाला होता–हे बग शोभना ! मी आपल्या भारतातून इथे नशीब अजमावण्यास आलेला एक गरीब माणूस ! तुला स्पष्टच सागायचं तर मी महार समाजातला तुझ्या आई वडिलासारखे माझे आई-वडील गर्भश्रीमंत नव्हते. दु ख दैन्यासी दोन हात करता–करता ते या जगातून केव्हाच निघून गेलेत मी होस्टेलमध्ये राहिलो. दुसऱ्याच्या आश्रयावर शिकलो जगलो या सर्व गोष्टी ध्यानात घेऊनच माझी लाईफ पार्टनर होण्याचा विचार कर.'

त्याचे सर्व ऐकून ती पोटभर हसली होती. एकूण तू भारतीय शोभतोस खरा ! अरे वेडोबा ! माझे आई वडील काय भारतातल्या पोथ्या पुराणात वावरत नाहीत ! ते अमेरिकेच्या सस्कृतीशी केव्हाच एकरूप होऊन बसलेत.

लग्नानतर कसे दिवस गेले ते कळले नाही. सुधीरने तयार केलेल्या कॅम्प्यूटरने त्याला नाव, पैसा, वैभव सार काही दिल बरेच दिवस त्याच भारतात येण्याबद्दल चालले होते. एकदाचे भारतात आलो, तर काय रोज त्याच कौतुक चाललेल. राष्ट्रपती, पतप्रधानाकडून आलेल बोलावण. झालेले सत्कार, या सर्व गोष्टीने सुधीर भारावून गेला आहे. त्याला वाटत आपण आपल्या देशात राहून कॅम्प्यूटर रेव्होल्यूशन करावं.

आपल्या गरीब देशाला प्रगती पथावर न्यावं, श्रीमत कराव, परतु हे एकटचा दुकटचाचे काम आहे का ? सुधीरला हे शक्य आहे का ? ती विचारात गढून गेली होती.

'बाईसाहेब ! पोटाला काय मिळेल का? आम्ही निघालो' सुधीरच्या या वाक्याने ती शुद्धीवर आली. तो कपडे करून निघायच्या तयारीत होता.

'अरे वा! इतक्या लवकर तयार झालास !'

'गावाला जायचय ना ?' तो तोडाने शीळ वाजवत रहातो

'भलताच खूष दिसतोस !'

स्वतःच्या जन्मगावाला तब्बल वीस वर्षानतर जातोय बाईसाहेब !

बर बर चल ब्रेकफास्ट करून घेऊ.

त्याने घाई गर्दीत ब्रेकफास्ट आटोपला. परत केव्हा येणार आहेस ?

शक्य झाल्यास उद्या दुपारपर्यंत किंवा—जास्तीत जास्त उद्याच्या रात्रीपर्यंत—काशीनाथने गाडी सुरू केली होती

ती गॅलरीत उभी होती. तो हात हालवीत गाडीत बसला.

'काशिनाथ आपल्याला प्रथम पुण्याला जायचय, नतर पुणे—नाशिक रोडवर नारायण गाव नावाचे एक गाव आहे, तिथ आपल्याला जायचंय.'

'मला माहित आहे ते ! माझी ती सासुरवाडीच !

'काय म्हणतोस काय ?

'व्हय साहेब आपण नारायणगावला कशाला जातोय ?

'अरे ते माझं गाव आहे माझा सत्कार घेतलाय तिथे. मुख्यमंत्री येणार आहेत.'

'वा वा बरं झाल. माझी बायको पोर सासुरवाडीतच आहेत त्याची भेट बी होईल.

काशिनाथ तू एवढयात त्या गावाला गेला होतास काय ?

'व्हय साहेब. गेल्याच वर्षी गेलो होतो.'

'फार सुधारणा झाली असेल तिथे आता नाही ?

'काय विचारू नका. आता मुबई—पुण्यासारखं ते शहरच झाल हायेकी.

त्याच्या डोळ्यासमोर त्याचं ते गाव उभ राहिलं. कष्ट उपसणारे त्याचे आईबाप, शाळेच्या पुस्तकासाठी कानातील फुले गहाण ठेवणारी आई. पोराने शाळा पुरी करावी म्हणून डोक्यावरून दगड वहाणारा बाप. त्याचा महारवाडा. महारवाड्यातील त्याचे सवगडी पाठीवर दप्तर घेऊन चालणारा तो, शाळेचा तो युनिफार्म, शाळेच्या चड्डीला लावलेल भल मोठं ढिगाळ. चालतानाही लाज वाटायची. एस. एस. सी च्या परीक्षेत तो बोर्डात दुसरा आला, त्याचा पेपरात फोटो आला होता. त्याचा बाप तो पेपर घेऊन गावभर नाचला होता. एस एस सी. नतर कॉलेजला पुण्याला जावे लागले. तो होस्टेलमध्ये रहात होता. महिन्यातून एकदा बाप पुण्याला यायचा. फाटलेल्या धोतराच्या गाठीतले पैसे सोडीत म्हणायचा, पोरा लय शिक, जगात नाव कमव बाबासाहेबासारखं, पैश्याची काय बी काळजी करू नगस. आमी तुझ्या शिक्षणापाय मरपोत कष्ट उपसू पर तू शिक मायदाळ शिक आपल्या शिक्षणासाठी कष्ट उपसत—उपसत आई बाप दोघे बी एकाच वर्षात गेली. आपण अगदी एकटेच राहिलो आज आई—बाप असते तर त्याना किती आनद झाला असता. आईबापाच्या आठवणीने तो बेचैन होतो. काशिनाथ समोरच्या आरश्यात पहात विचारतो, 'साहेब आता गावी कोण आहे तुमचे ?

'कोणीच नाही तसे. लावचे एक चुलते आहेत तेही ओळखतात की नाही कुणास ठाऊक ?'

बोलता बोलता खडाळ्याचा घाट आला. खडाळ्याच्या घाटात डवरलेली ती वनश्री, लहान मोठ्या शिखराच्या रागा, आकाशात उडत चाललेला पक्षाचा थवा बराच वेळ तो त्या निसर्गाच्या दृष्यात बुडून गेला होता खडाळ्याचा घाट संपला तसा तो पुन्हा आपल्या भूतकाळात डोकवू लागला 'काशिनाथ! आमच्या गावाला ही झाड झुडपं बरीच असायची आमच्या गावाला तसं निसर्गाच वरदानच लाभलेल गावाला वळसा घालून जाणारी घोडनदी, तिच्या किनाऱ्याला एक छोटीशी टेकडी. त्या टेकडीवर एक टुमदार मदिर. सध्याकाळी सूर्य बुडताना तो देखावा किती सुदर म्हणून दिसायचा !

'सायेब आता टेकडी नाही, झाडझुडपं नाहीत अन् मदिरबी नाही '

'काय झालं त्याच ?'

'आता काय झाल हे तुम्हीच विचारता व्हय ! या यत्रयुगात माणूस नुसता यत्राच्या माग लागलाय. त्याला झाडं, निसर्ग काय बी नग आता तुमचच बगाना. केवढं मोठं मोठं शोध लावलत म्हणं तुम्ही

काशीनाथने त्याचच उदाहरण देऊन त्याला चागलाच टोला मारला होता. तरी तो पुटपुटला निसर्ग असा उद्ध्वस्त होयाला नको आहे रे !

गाव जसजसे जवळ येवू लागले तसतसा तो भारावून जाऊ लागला. काशिनाथ म्हणाला तसेच झाले होते. वहाणारी नदी कोरडी ठणठणीत पडली होती. टेकडी सपाट झाली होती टेकडीवरील मंदिर नाहीसे झाले होते. गावाजवळची सारी वनश्री कापून टाकली होती. जिकडे तिकडे विजेच्या खावाचे जाळे पसरले होते बटाटयाचे शीतगृह, हिराडयाचा कारखाना, प्लॅस्टिक कारखाना, बीअर बार, परमीट रूम, क्लॉथ स्टोर्स, सलून मोठ मोठी प्रोव्हिजन स्टोअर्स, रस्त्याच्या कडेला उभ्या राहिलेल्या मोठ-मोठया इमारती, त्या गावाचे सपूर्ण शहरीकरण झाले होते त्याला आपल्याच गावात चुकल्यासारखे वाटत होते. तो काशीनाथला म्हणाला, 'अरे, गाडी अगोदर बौद्धवाड्यात घे '

'बौद्धवाड्यात कशाला ?'

'माझ घर आहे तिथ '

'तुमच ?'

'होय.'

काशिनाथ त्याच्याकडं आश्चर्याने पाहात होता मोटार स्टॅंडवर लोकाचा घोळका जमा झाला होता. मोटार स्टॅंडवर त्याची गाडी उभी रहाताच लोकानी गाडीभोवती गराडा घातला. सरपंच पुढे होत म्हणाले, 'आपण सुधीर मोरेच ना ?'

'होय.'

'मी या गावचा सरपच' असे म्हणून त्यानी त्याच्या हाताला हात मिळविले. सभोवती जमा झालेले लोक ओरडले.

'सुधीर मोरे'

'झिंदावाद'

'सुधीर मोरेचा'

'विजय असो'

त्या घोषणानी तो कावरा बावरा झाला. तो हळू आवाजात म्हणाला, 'सरपंच आपल्या

कार्यक्रमाला किती वेळ आहे अजून ?'

आता एक वाजला तीन वाजता आम्ही तुमची गावातून मिरवणूक काढणार आहोत.

'मिरवणूक कशाला उगाच ?'

'आमचा कार्यक्रम ठरलेला आहे.'

'तोपर्यंत मी माझ्या वस्तीतून जाऊन येऊ का ?'

'अवश्य '

काशिनाथने बुद्ध मदिराच्या समोर फियाट उभी केली.

बुद्ध मदिराच्या समोर उभी राहिलेली फियाट पाहून बौद्धवाड्यातील सारी वस्ती क्षणार्धात जमा झाली तो बुद्ध मदिराच्या आत आला. बुद्धाच्या मूर्तीसमोर त्याने हात जोडले. डॉ. बाबासाहेबांच्या तैलचित्राला त्याने वदन केले. बुद्ध मदिरात तोपर्यंत बरेचसे लोक जमा झाले होते. प्रत्येकाच्या-कडे तो निरखून पाहात होता. बरेचसे चेहरे अनोळखी दिसत होते. त्याच्या लहानपणी पाहिलेले तरुण आता म्हातारे झाले होते. त्याचे बालपणीचे स्नेही आता बरेच प्रौढ दिसत होते. तर दिसणारी सारीच तरुण पोरं अनोळखी दिसत होती. बुद्ध मंदिरात जमा झालेल्या लोकाची तो आस्थेवाईकपणे चौकशी करत होता. सतत दोन वर्ष पाऊस पडला नसल्यामुळे दुष्काळाच्या चटक्यानी सारी वस्ती होरपळून गेलेली. बसलेले सारेच चेहरे काळजीने काळवडून गेलेले. बसलेल्या लोका-पैकी काहीच्या कपड्याच्या चिंध्या झालेल्या तर काहीची कापडे अनेक दिवस न धुतल्या-मुळे विटून गेली होती. वस्तीतील एक तरुण त्याच्याकडे पाहात म्हणाला, तुम्ही या वस्तीत आलात आम्हाला बाबासाहेबच आल्या-सारखे वाटले. आमच्यासाठी काहीतरी करा. त्याच्या आवाजापाठोपाठ अनेक समिश्र आवाज त्याच्या कानावर आदळत होते.

'आम्हाला पोटापाण्याचा धदा नाही.'

'आम्ही उपासी मरतोय.'

'दुष्काळ पडलाय, पियाला पाणी नाही.'

'आमच्या जमिनी बाटल्या '

'आमची घरे जाळली.'

'आमच्यावर अत्याचार झाले '

ते सारे आवाज त्याच्या कानात लाव्हा-रस ओतल्यासारखे भरून राहिले. तो जम-लेल्या लोकाचे सारे काही ऐकून कळवळून जात होता. त्याच्या दूरच्या नात्यातला चुलता त्याच्याजवळ आला. त्याच्या पाठीवर हात फिरवीत म्हणाला, बाबा ! तुला बघून जीव आभाळा एवढा झाला. आपल्या देशाच नाव तू मोठ केलस तो त्याला घराकडे घेऊन जातो. त्याच पडलेल घर पाहून त्याच्या लहानपणीच्या स्मृती जाग्या होतात त्याच्या डोळ्यासमोर त्याचे आईवडील उभे रहातात. तो सर्वांच्याबरोबर साऱ्या वस्तीत फिरत होता. सगळीकडेच पडझड झालेली. सारा उद्ध्वस्तपणा. चालताना एकजण म्हणाला, 'साहेब आम्ही धर्म बदलला. डॉ बाबा-साहेबांनी आम्हाला नवा जन्म दिला. आम्ही बौद्ध झालो, पण लोक आम्हाला आजही महारच समजत्यात.' त्याच्याबरोबर लोकाचा जथा चालला होता त्यातील एक काळा कुळ-कुळीत रगाचा विटलेल्या कपड्याचा माणूस त्याच्यासमोर हात जोडीत उभा राहिला—

'साहेब ' मी रेवजी माग '

'काय म्हणतोस काय ? तू रेवजी ! तो अत्यानदाने पुढे आला त्याचा हात तो हातात घेणार तोच रेवजी दूर उभा राहिला. तो मनातून खिन्न झाला. जीवाभावाचा बाल-पणीचा मित्र रेवजी, आज किती परक्या-सारखा वागत होता. त्याला वाटले या रेवजीबरोबर खूप बोलाव, बेंबीच्या देठा-पासून खूप हसावं. बालपणीच्या चिमण्या आठवणीत झोकून द्यावं. परतु रेवजी पैल-तीरावर उभा असल्यासारखा दूर उभा राहिला. त्याला तो म्हणजे कुणी वाण्या-बामणासारखा वाटत होता त्याला वाटले या रेवजीला कस समजावून सागावं की मी तोच आहे. तुझ्या चखोड भाकरीचा अर्धा तुकडा गटागट गिळणारा सुध्या...रेवजी सातवीपर्यंत त्याच्याच वर्गात त्याच्याबरोबर होता उपास—तापासाला कटाळून त्याने शाळा सोडून दिली त्याच्यापेक्षा बराच हुशार असणारा रेवजी आज चिंध्यात वावरत होता. रेवजीमध्ये आणि त्याच्यात का एवढ अतर पडावं ? रेवजी शिकला असता तर आज कुठे असता ?

गावातून चार पाच तरुण येतात 'साहेब तुम्हाला सरपचानी तावडतोब बोलवलय, मुख्यमत्री आले आहेत. मिरवणुकीची तयारी झाली आहे चला चला लवकर '

तो आपली, उध्वस्त नगरी, ते भकास, चेहरे डोळ्यात साठवीत गावाकडे चालू लागतो. त्याच्यामागे वस्तीतील लोकाचा जथा येत असतो.

गावात लोकाची प्रचड गर्दी झालेली. शृगारलेल्या एका भव्य रथातून त्याची मिर-वणूक सुरू झाली. मुख्यमत्री त्याच्या शेजारी बसलेले असतात. बँड सुरू होतो. लेजीमवाले नाचू लागतात. गुलाल उधळला जातो, त्याचा लाल धुराळा त्याच्या नाका तोडात शिरतो घोषणाचा गदारोळ चालू असतो

मुख्यमत्र्याचा
विजय असो
सुधीर मोरे
झिदाबाद

रथाच्या शेजारी चाललेल्या लोकाचा आवाज त्याच्या कानावर आदळतो—

'कोन रे हा ?'

'अरे भीमा महाराचा पोरगा '

'लय शिकलय म्हण !'

'अमेरिकेत होता.'

यत्र शोधून काढलय त्यान.

च्या आयला म्हार कुठल्या कुठ गेली नाहीतर आपण घुगर झोडे...

मिरवणूक रगात आली होती सारा गाव त्याच्याकडे पहात होता त्याच्याकडे बोट दाखवून लोक कुजबुजत होते. काय सागत असावे हे जरी तो ऐकू शकला नसला तरी तो ओळखू शकत होता 'भीमा महाराचा पोरगा ! हे त्याच एवढंच ओळखपत्र गावाच्या हिशेबी होतं. त्याला वाटले आपण या सत्काराला यायला नको होत शोभनाचे ऐकले असते तर बरे झाले असते त्याच्या मनातील उध्वस्तपणा वाढत होता. तो चेह-ऱ्यावर येणारा घाम रूमालाने पुन्हा पुन्हा पुसत होता आता सारी मिरवणूक गुलालाने भरून गेली होती. मिरवणुकी-मधील समिश्र आवाजाने त्याच्या कानठळ्या बसल्यासारख्या झाल्या होत्या. मिरवणूक मोटार स्टँडजवळ येत होती तोच दुसऱ्या बाजूने शभर—दीडशे लोकाचा मोर्चा मिरव-णुकीच्या दिशेने येत होता त्याच्या घोषणानी मिरवणुकीचा आवाज बद झाला होता कम-रेला फक्त फडके गुडाळलेला उघडा बोडका एक माणूस आपल्या खोल गेलेल्या पोटावर हात मारीत ओरडत होता.

' प्रश्न आहे पोटाचा.'
' प्रश्न आहे भाकरीचा '
' मुख्यमत्री काम द्या
बेकाराना काम द्या '

येणाऱ्या मोर्चाभोवती पोलिसानी कडे केले. पोलीस मोर्चाला पुढे येऊ देत नव्हते मोर्चावाले ऐकत नव्हते झोबाझोबी सुरू झाली. पोलिसाच्या लाठ्या–काठ्या आदळू लागल्या लोकाची डोके फुटली पाठी पोटावर काठीचे बसलेले वळ घेऊन भेदारलेले मोर्च्यांतील लोक सैरवैर पळू लागले. पोलीस विजयी मुद्रेने पळणाऱ्या लोकाकडे पहात होते. मिरवणूक पुन्हा सुरू झाली पण साऱ्या रगाचा बेरग झाला होता त्याच्या डोळ्यात साचलेल पाणी त्याने हळूच रूमालाने टिपले. मुख्यमत्री त्याच्या पाठीवर हात ठेवीत म्हणाले ' इकडे सतत दोन वर्ष दुष्काळ पडलाय. पाऊसच नाही काही झाले तरी निसर्गाच्या पुढे माणूस जाऊ शकत नाही

त्याच्याकडे उत्तर नव्हते तो प्रश्नातच गुरफटलेला... मिरवणुकीचे सभेत रुपातर झाले होते त्याचा सत्कार सोहळा सुरू झाला होता.

सरपच त्याची ओळख करून देत म्हणाले, श्री सुधीर मोरे हे आपल्या गावच्या भीमा महाराचे चिरजीव. कुठल्या कुठे गेलेत. अमेरिकेत यत्राचा शोध लावून आपल्या गावचाच नाही तर आपल्या देशाचा झेंडा त्यानी अमेरिकेत फडकावला......

मुख्यमत्री बोलण्यास उभे राहिले. आम्ही हजारो वर्षानुवर्ष ज्याना गावकुसाबाहेर ठेवले, ज्याना पशुपेक्षा आम्ही हीन–दिन वागणूक दिली. ज्याच्यावर अमानुषतेचे जीवन लादले त्या दलित समाजातील माणूस डॉ बाबासाहेबांच्या पुण्याईने आज कुठल्या कुठ जाऊ शकतो याच उदाहरण म्हणजे तुमच्या गावचे सुधीर मोरे ! अहो या गृहस्थाने अशा काही कॅम्प्युटरचा शोध लावलाय की, जादूटोणा केल्यासारख ते यत्र माणसापेक्षाही सरस काम करत, माणसाला माणसा सारख वागता येत नाही परतु एका निर्जीव यत्राला माणसापेक्षा चागल वागण्यास, चागल काम करण्यास श्री सुधीर मोरे यानी शिकवल आहे हे यत्र माणसाची कामं बिनबोभाट करू शकत आज आपण एकवीसाव्या शतकाकडे विज्ञानयुगात वावरत आहोत. सुधीर मोरेसारखे तत्रज्ञ या देशात जन्म घेऊ शकतात असले तत्रज्ञ अमेरिकेला न जाता या देशातच राहिले तर या देशाची भरभराट होण्यास कितीसा वेळ लागणार आहे? मुख्यमत्र्याचे भाषण सपल्यानतर प्रचड टाळ्याचा कडकडाट होत रहातो

सुधीर मोरेला ढग भरून याव अस भरून आल्यासारख झाल होत तो भाषण करण्यास उठला तेव्हा त्याच्या शरीराचा थरकाप झाला होता मनातल प्रचड वादळ बाहेर कस फेकाव ! गारठलेल्या शब्दाना फोडाव कसं ?

त्याच्या तोडातून शब्द बाहेर पडू लागतात...

माझा आपण सत्कार केलात. माझा आता जो गौरव केला त्याबद्दल मी आपला आभारी आहे मी मोठ्या आनदाने या गावात आलो होतो मला माझ्याबद्दल फार मोठा अभिमान वाटत होता. मी एक मोठा तत्रज्ञ म्हणून मिरवत होतो... पण आज माझा अभिमान माझ्यातून गळून पडला आहे माझ्यातला तत्रज्ञ एकाएकी नाहीसा झाला आहे इथ माणस भुकेने तडफडतात. हजारो माणसे बेकार आहेत. त्याना कामे मिळत नाहीत. मधाचा मोर्चा अजून डोळ्यासमोर आहे कामे मागणारी माणस काळजाला घट्ट चिकटून बसलीत. मी शोध लावला कॉम्प्युटरचा ! एका निर्जीव यंत्राला कार्यक्रम दिला म्हणजे ते कार्यरत होतं माणसाच्या इच्छेनुसार तो त्याची कामे करत रहातो थोडक्यात माणसाचे श्रम वाचले जातात, परतु इथे जिवत माणसाला कामे मिळत नाहीत. ते कामासाठी दारोदार भटकतात हे दृश्य लक्षात आल्यावर मी आतून हादरून गेलो आहे मला वाटू लागलय माझा कॅम्प्युटर या देशात तयार झाला तर हजारोंची रोजा रोटी तर हिसकावून घेणार नाही ना? बोलता बोलता त्याच्या गळ्यात दाटलेला हुंदका बाहेर पडला त्याच्या डोळ्यातले अश्रू गालावर ठबकले... ती प्रचड सभा त्याच्याकडे अवाक होऊन पहात होती...

तो गावात मुक्काम करण्याच्या तयारीनेच आला होता. परतु त्याने बेत बदलला रात्रीचे दहा वाजले होते. सारे गावकरी त्याला रहाण्यासाठी आग्रह करीत होते; परतु तो ऐकण्यास तयार नव्हता. त्याची सारी वस्ती मोटार स्टँडवर जमा झाली होती. ते काळजीने ग्रासलेले चेहरे पुन्हा पुन्हा त्याच्या मनात रुतून बसू लागले. काय कराव याच्यासाठी ? जाती–धर्माच्या विषमतेच्या दबावाखाली दबलेल्या या गरीब देशासाठी असा कोणता कॅम्प्युटर शोधून काढावा जो लाखोना काम देऊ शकेल. त्याच्या–पोटापाण्याची सोय करू शकेल

काशिनाथने गाडी सुरू केली होती. तो गाडीत येऊन बसला. सगळ्याचा निरोप घेताना– त्याच मन गलबलून गेल होत. गाडी डांबरी रस्त्याला लागली चादणी रात्र होती. पाढरा फटफटीत प्रकाश पडला होता सडकेवरचे सफेद नबर भराभर मागे पडत होते. काशिनाथने गाडीचा वेग वाढवला होता तो काहीच बोलत नव्हता. आकाशातला चद्र वरवर सरकत होता.

लहान मोठ्या टेकड्या, झाडाचे जगल तो निरखीत होता झाडाच्या ठिकाणी एकाएकी त्याच्या डोळ्यासमोर प्रचड माणसाचा लोढा दिसू लागला. भूकेने कासावीस झालेली माणस...तडफडणारी माणस... रक्ताळलेली माणसे तो पहात होता मोर्चात घोषणा देणारा, उघड्या पोटावर सपासप मारणारा तो उघडा बोडका माणूस आताही सर्वांच्या पुढे घोषणा देत चाललेला. मध्येच तो स्टेजवर उभा राहिल्यासारखा उच दगडावर उभा राहिला अन् त्याचे शब्द कोसळू लागले...

गजबजलेल्या या मुक्या बहिऱ्याच्या प्रदेशात सारेच रस्ते ठार केलेले

इथल्या झाडाच्या पानाची सळसळ बद झालीय.

इथला वाराही मूग गिळून बसलाय

अरे ! हा एवढा मोठा खवळणारा समुद्र त्यालाही खुडल्यासारख झालय

भुकेची गाठोडी सावरत गाफील ताडे तर केव्हाच सैरभैर झालेत

आता आपण मरणाचा पडघम वाजवताना स्वातत्र्याची गाणी गाऊ या... स्वातत्र्याची...

एखादा चित्रपट पाहिल्यासारखे ते दृश्य, तो विचार मनात सलत राहतो. तो स्वत ला सावरत जागा होतो

' काशिनाथ खडाळ्याचा घाट गेला कारे ! '

' कधीच गेला साहेब ! आता मुंबई जवळ आली आहे.

अस ! अस ! !

साहेब आज तुम्ही काहीच बोलत नाही? गप्प...गप्प...

जिवाला बरं नाही का ?

नाही रे...तस काहीच नाही... तो रडल्यासारखा हसत म्हणाला □



# स्मिता
# मोकळं, स्वतंत्र जगण्यातलं सौंदर्य

**मेधा राजहंस**

**मी** तेव्हा कॉलेजमध्ये होते. विजयनगर कॉलनीत आमचं घर. संध्याकाळी कॉलेजमधनं घरी आले तर मोठा भाऊ घरी आला. म्हणाला, अगं कोपऱ्यावर स्मिता पाटील उभी आहे. 'मग त्यात काय ?' म्हणण्याइतकी 'मॅच्युअर्ड' मी तेव्हाही नव्हते. अजूनही नाही. फिल्म इन्स्टिटयूट-पाशी किरकोळ शुटिंग चालू असलं तरी गर्दीत घुसून टाचा उंचावून बघणाऱ्यातली मी तेव्हा पायात चप्पला सरकवून पळत पळत कोपऱ्यावर गेले होते. त्या कोपऱ्यावर म्हणजे सुभाष अवचटच्या स्टुडिओसमोर हे तेव्हा मला माहीत नव्हतं. कोपऱ्यापर्यंत पळत जाऊन मग सहजच चाललेय असं शिताफीनं दाखवत मी तिच्यासमोरून गेले आणि बघत बघत परत आले. भडक लाल रंगाची मिडी आणि तसलंच जाकीट तिनं घातलं होतं. केस मोकळे सोडलेले. पायात उंच टाचेच्या चपला. एका गाडीपाशी उभी होती. तिचीच होती बहुधा. घरी आल्यावर म्हटलं, 'स्मार्ट आहे नं एकदम.' तेव्हा तिचे 'छिन्न'चे प्रयोग पुण्यात चालले होते. त्याच वेळेला मग एकदा बालगंधर्वमध्ये दिसली. बहुतेक वेळा तिचा असायचा तसा अलिप्त चेहरा ठेऊन ती वावरत होती. मी तिला पाहिलं असं चारचौघात वर्णन करून सांगण्याइतकी तेव्हा ती ग्रेट नव्हती. निदान माझ्यापुरती तरी.

नंतर मग एकदा खूप कंटाळा आला म्हणून सिनेमा पहायला गेले. जवळचं थिएटर निलायम, सिनेमा मंथन. नासीर, गिरीश कर्नाड आणि ती. तिकिटं मिळालीच. थेटरात जेमतेम १००–२०० माणसं. वाटलं चूक केली. अमिताभचा पाहिला असता तर बरं झालं असतं. सिनेमा सुरू झाला. ती आली. काठेवाडी साडी, गावरान वेष आणि भाषा. ती स्मिता नव्हतीच. ती बिंदू होती. व्यसनी नवऱ्याला सोसत सोसत जगणारी. शिरा ताणून बोलणारी. 'तुमने चोरी की है' असं म्हणत तावातावानं गिरीश कर्नाडचा पाठलाग करणारी. 'अगर तुम कहो तो बोल दूंगी' असं कळत नकळत लाजून बोलणारी. 'मैं देखू तेरी राह' गाण्याच्या आर्त सुरांवर जीपच्या आवाजाचा वेध घेत न राहवून धावत रस्त्यावर येणारी, उदास होऊन घरात जाणारी. ती अंतर्बाह्य काठेवाडी बिंदू होती. अभिनयातली तिची उत्कटता थेट इथं माझ्यापर्यंत पोचत होती. आणि म्हणूनच त्या सिनेमात ती खूप छान दिसली. मंथन एक सुंदर सिनेमा आहे. पण तो अधिक सुंदर झाला स्मिताच्या बिंदूनं. १००–२०० माणसात पाहिलेले प्रायोगिक किंवा कलात्मक सिनेमेसुद्धा चांगले असतात हे तेव्हा जराजरा कळायला लागलं होतं.

आपल्याला कळायला लागलंय हे सिद्ध करण्यासाठी मग 'जैत रे जैत' बघायला हट्टानं घरातल्यांना बाहेर काढलं. अगदी पहिल्याच दिवशी. प्रभातमध्ये. गर्दी मराठी सिनेमांना आधी बेताचीच. त्यात याचं नाव 'जैत रे जैत'. कोण येणार ? आमच्यासारखेच शहाणे, सिनेमा संपल्यावर घरी आल्यावर सगळ्यांची बोलणी खायला लागली. मलाही आवडला नव्हता. पण जोरात पटवून देत होते कसा चांगलाय ते, पण एक नक्की की ती लक्षात होती. ती आदिवासी दिसत होती. चिंधीच्या वेषात तिचं

सगळं शरीर बोलत होत. तिचं बोलणं, चालण बघण. आता खर मला ती आवडायला लागली होती. स्मिता पाटील आवडते असं म्हणणारी तेव्हा वेगळी जमात तयार झाली नव्हती. पण माझ्यासारख्या कोपऱ्यातल्या किती तरी एकेकट्याना ती आवडायला लागली होती.

पण मी तिच्या प्रेमात पडले ' उंबरठा ' बघून. खूप वर्षांनी मराठीत एक जिवत नटी बघायला मिळाली. एखाद्याला स्वत चाच ' रोल ' कर अस सांगितल तर तो कसा करेल तस वाटल सुलभाला बघून. अभिनयाच्या झळाळीन ती त्यात फुलून आली होती. ओठाची बारीकशी मुरड, कपाळावरची दोन भुवयातली आठी, गुळगुळीत घरातल तिच सथ चालण आणि आश्रमातली ठाम, झटपट चाल—आश्रमात भेटायला आलेल्या नवऱ्याला पाहून आनदान धावत धावत सामोरी येणारी, एकटेपणाच्या भावनेन असहाय्य होऊन रडणारी, अटळ आहे म्हणून नवऱ्याला खूष करण्यासाठी आंबाड्यावर गजरा माळणारी सुलभा किती तऱ्हांनी, किती नकळत व्यक्त होत राहिली वाटल हा तिचा ' अभिनय ' नाही, ही खरी तीच आहे. ' उंबरठा 'मध्ये मला ती जितकी आकर्षक दिसली तेवढी दुसऱ्या कुठल्याच चित्रपटात दिसली नाही. अगदी अमिताभबरोबर पावसात भिजूनसुद्धा.

मधल्या काळात कमर्शिअल सिनेमावाले तिच्या मागे लागले. म्हणजे श्रीमत बापाची लाडावलेली मुलगी, प्रेमळ वहिनी किंवा नाच—गाणी करणारी तवायफ असल्या रोलमध्ये तिला बघवायच नाही' अशी गुळगुळीत कामं करताना तिच्यातली सुलभा तिला त्रास देत असावी बहुधा न शोभणारी बेगरुळ झूल पाघरून जेव्हा ती ' स्टार ' होऊ पहात होती, तेव्हा मात्र तिच्याशी भाडण झाल. म्हणजे तिचे सिनेमे बघण सोडलच. वाटायचं गुळगुळीत कपडे, ढीगभर दागिने घालून गोडगोड बोलणाऱ्या नट्याची काही कमी आहे का, म्हणून हिची भर ? पैशासाठी तडजोडी करणाऱ्यातली ती वाटायची नाही म्हणून जास्त राग यायचा. अर्थात सर्वसामान्य रसिकाची किती कदर करायची असते हे तिला माहित होतं. घुगरु सारखे हिंदी सिनेमे ती घेतच राहिली खूप नटली की ती नर्गिससारखी वाईट दिसायची. फक्त वाईट दिसायची एवढच नाही, तिच्या अभिनयाच्या मर्यादा जाणवत रहायच्या तिचा चेहरा मनस्वी होता पण भावुक वगैरे नव्हता. ती शार्प दिसायची पण पब्लिकला वेड करण्यातली ती नव्हती. नायकाशी तिखट सवाद बोलताना ती चागली दिसायची पण हिरोभोवती गोडगोड पिंगा घालणारी नटखट नायिका ती कधीच नव्हती. तिला याची जाणीव होती. पत्रकारानी याबद्दल टोकल की ती म्हणायची मी आनदासाठी प्रायोगिक, कलात्मक सिनेमे करते आणि पैशासाठी व्यावसायिक. तस बघायला गेल तर काय चुकीच आहे ? पण वाटायच या ' मंथन 'मधल्या सम्राज्ञीन घुगरुसारख्या सिनेमात दासीसारखं येऊ नये. तिथली सम्राज्ञी रेखा, श्रीदेवी, जयाप्रदा नाही तर आणखी कुणी आहे. यशस्वी अभिनेत्री म्हणजे सगळ्या प्रकारच्या भूमिका करू शकणं ही एकच व्याख्या धरून जेव्हा मित्रमैत्रिणी तिच्याबद्दल बोलत तेव्हा मात्र मी नेहमी तिचीच बाजू घेतली कारण तिचे प्रयत्न, अनुभव प्रामाणिक असायचे, पण तो तिचा ' टाईप ' नव्हता. तसं पाहिलं तर चित्रपटात जायचा तरी तिचा टाईप कुठं होता? पुण्याच्या रेणुकास्वरूप शाळेतली सर्वसामान्य मुलगी मध्यम उची, काळा वर्ण, निमुळता चेहरा आणि बोलके डोळे हे काय नटी व्हायचं भांडवल असत? जाता जाता पाहिल तरी दिसायला तिच्यापेक्षा बऱ्या मुली दिसतात सेवादलातले सस्कार, तिथ उत्साहानं लहानपणी केलेली नाटकं, म्हटलेली गाणी हे एखादी सर्वसामान्य मुलगी शाळा-कॉलेजच्या वयात करते तसच. टिव्हीवर बातम्या द्यायला म्हणून आलेल्या आणि नतर छोट्या छोट्या फिल्मस्मधे चमकलेल्या मुलीही काही कमी नाहीत. पण अभिनयाची शिखर खिशात टाकत, आपल्या उत्कट अभिनयान भूमिकेच सचेतन रूप उधळून लावत ' स्टार ' झालेली स्मिता पाटील एखादीच शाळेत असताना स्मिताला स्पर्धेच्या नाटकात भाग घ्यावासा वाटे पण तिचं रूप आड येई. शाळामधल्या नाट्य स्पर्धेत नाही तर स्नेहसमेलनात सुंदर दिसणाऱ्या राजकन्या लागतात हे तिला माहीत नव्हतं. तिला नाटकात भाग मिळत नसे दडपून ठेवलेली ही अभिनयाची उर्मी जेव्हा बाहेर आली तेव्हा तिन त्यात झोकून दिल अभिनयविरुद्ध मध्यमवर्गीय मराठीपण, मध्यमवर्गीय सस्कार यात तिचा अभिनय कायम वरचढ असे. मग ' आक्रोश ' मधला ओमपुरीबरोबरचा उत्कट प्रेमप्रसग असो की ' चक्र 'मधली आघोळ असो. हे सगळं लिहायच कारण म्हणजे देहप्रदर्शन करणाऱ्या नट्या आणि भूमिकेला न्याय देण्यासाठी स्मितान दाखवलेला बेदरकारपणा यात मूलभूत फरक होता भूमिका जिवत साकार करण यासाठी ती होती. आणि मग त्यापुढे ती रेणुकास्वरूप मधली विद्यार्थिनी नव्हती, आई-वडलाची मुलगी नव्हती की जवळच्या परिचिताची स्मिता नव्हती. श्रेष्ठ कलाकार होण्यासाठी जी किंमत द्यावी लागते ती तिनं धाडसान दिली आणि अनेक अभिनय-विक्रम सहज मिळवले.

स्मिता गेल्यानतर खूप वाईट वाटलं. त्यापूर्वी ती राजबब्बरशी लग्न केल्यामुळे गाजत होती. कारण राजबब्बरचं दुसर लग्न. स्त्रीमुक्तीवादी पत्रकार तिला झोडपत होते आणि ती मात्र नटून थटून, भागात सिंदूर घालून राजच्या हातात हात घालून समारभाना जात होती. आपल्या वागण्याच समर्थन करणाऱ्या मुलाखतीही कधी तिनं दिल्या नाहीत आवडत्या माणसाबरोबर लग्न करायचा हक्क तिला होताच. ' अर्थपूर्ण जगण्यासाठी घटस्फोट आवश्यक असेल तर घ्यावा ' हा खर स्त्रीमुक्ती विचाराचा स्टॅंड. राजन त्यासाठीच दुसर लग्न केल असेल. स्मिताचा निर्णय इतका वैयक्तिक होता की त्या विषयावर बोलण्यात मी कधी भाग घेतला नाही. तिला आवडणाऱ्या माणसाबरोबर जगाची फिकीर न करता तिनं प्रेम केलं, लग्न केल हे खर तिला शोभणारच. जेव्हा तिला मूल होणार आहे हे तिला कळल तेव्हा ती भयकर खूष होती आणि हे तिन कधी दडवून ठेवल नाही. हव्या त्या वेळी हव ते मिळाल्यावर जी तृप्तीची भावना असते ती तिच्यात होती. आनदाच्या टोकावर असताना वाटत, इथेच सगळ संपल तरी चालेल आणि तसच झाल. लोकाना चटका लावून ती गेली.

स्मिता कशी होती ते ती गेल्यावर जास्त कळलं. मागेपुढे न बघता तिन जोडलेले अनेक मित्र, थोड्या मैत्रिणी, असख्य व्याव-

सायिक, थोडे राजकारणी, काही पत्रकार यांनी तिच्याबद्दल जे जे सांगितलं त्यातून न कळलेलं तिचं चित्र स्पष्ट होत गेलं. न बोलता खूप काही सांगितलं ते ती गेल्यावर जमलेल्या गर्दीनं. श्रद्धांजलीच्या कार्यक्रमात नंतर राज म्हणाला, 'मला माहीत नव्हतं तिनं इतकी माणसं जोडली होती ते.' अमरीश पुरीला ती मुलीसारखी वाटायची, शबानाची ती स्पर्धक होती पण तिला स्मिता गेल्याचं दुःख सहन होत नव्हतं. सेटवर ती घरून आणलेला डबा इतर तंत्रज्ञांना देत असे. सुनील दत्तने एक सिनेमा कॅन्सरच्या रोग्यांसाठी करायचं ठरवलं तर तिनं एक पैसाही नको म्हणून सांगितलं. सेवादलातले संस्कार होते म्हणून मी घडले असं ती नेहमी आवर्जून सांगत असे. आमच्या शाळेच्या-रेणुका-स्वरूपच्या संमेलनाला ती आठवणीनं आली. आशा भोसलेच्या पुण्याच्या कार्यक्रमाच्या वेळी तिचं नाव घोषित केलं होतं. आयत्यावेळी ती दिल्लीच्या विमानतळावर अडकून पडली आणि येऊ शकली नाही. आपल्याबद्दल, आपल्या 'स्टार' पणामुळे गैरसमज होतील म्हणून तिला खूप हळहळ वाटत होती. विटकी जीन आणि कुडता हा तिचा आवडता ड्रेस होता. एखादी चांगली भूमिका मिळाली नाही तर तिला खूप वाईट वाटायचं आणि दिग्दर्शकाशी तिचं भांडण ( मैत्रीतलं ) व्हायचं. प्रत्येकाची स्वतःची म्हणून एक 'इमेज' असते. फिल्मी मंडळींना तर असतेच असते. स्मिता कायम जवळच्या मित्र-मैत्रिणींना म्हणायची, मी एक साधी बाई-माणूस आहे. माझ्याकडे नटी म्हणून बघू नका. स्मिताभोवतीच्या मित्रमैत्रिणींचं रहस्य त्याच्यात होतं. नट-नटयांबद्दलच्या रूढ कल्पना, गैरसमज आणि हे समज पसरवणारं नटनटयांचं बथ्थर वागण हा जणू तिला कलंक वाटत असावा. तिला ते बदलायचं होतं. आणि तिच्यापुरतं ते तिला जमलं होतं. तिची मुलाखत घ्यायचं माझ्या अनेकवेळा मनात आलं होतं, पण नाही जमलं. माझी खात्री आहे की ती वेळ आली असती, तर तिची 'मुलाखत' झाली नसती, गप्पा झाल्या असत्या. माझे प्रश्न तिला कळले असते आणि तिनं खूप मन लावून, उत्सुकतेनं त्याची उत्तरं दिली असती. मी पुण्याची, तिच्याच शाळेची, काहीतरी करायची इच्छा असलेली, तिचं आणि माझं नक्कीच जमलं असतं. एखादी आपल्या ग्रुपमधली मैत्रिण, साधी-सरळ वाटणारी, आणि तिनं एवढ्या छोट्या अवधीत सहजपणे असामान्य टोक गाठावं याबद्दल जे मनात कौतुक असतं तसं मला तिच्याबद्दल होतं. मराठीपण लपवणाऱ्यांच्या गर्दीत तिचं मराठीपण मिरवणं मला आवडायचं. आपल्या आजूबाजूचं मध्यमवर्गीयपण झटकून टाकून झेप घेणारं तिचं मन पाहिलं की वाटायचं, हे तिला जमलं, मग मलाही जमेल. थोडं धाडस हवं आहे. आवडणाऱ्या माणसांबरोबर धाडधाड मैत्र्या करून प्रेमात पडून लग्न करणारी ती मला स्त्रीमुक्तीवादी बायकांच्या छापातून बाहेर पडल्यासारखी वाटे. मुक्तीचा अर्थ तिला कळला होता. आणि सरळ, मोकळं, स्वतंत्र जगण्यातलं सौंदर्य तिच्या स्त्रीत्त्वावर पसरलं होतं. स्मिता छान दिसायची ती त्यामुळं. तरुण मुलामुलींना तर ती आवडायचीच पण मागच्या पिढीतल्यांनासुद्धा आवडायची. जितके तिचे चांगले फोटो आहेत तितकेच वाईट दिसणारे सुद्धा आहेत. पण त्याची फिकीर तिला नसावी. कारण ऐन मध्यरात्री सुद्धा रंगवलेल्या चेहऱ्यांनी कॅमेऱ्यासमोर येणाऱ्यांच्यातली गुळगुळीत नटी ती नव्हतीच. स्मिता आवडण्याची कारणं अशी हळूहळू मनात आकार घेतात. अंतर्बाह्य खऱ्याखुऱ्या माणसाबद्दल, स्वतःच्या हिंमतीवर आयुष्य, कर्तुत्व उभं करणाऱ्या व्यक्तीबद्दल जे आकर्षण, प्रेम असतं तसं मला तिच्याबद्दल होतं.

स्मिता असती तर ती चांगली बायको आणि आई नक्कीच झाली असती. कारण अलिप्त दिसणाऱ्या तिच्या निमुळत्या चेहऱ्यावर दोन भावूक डोळे होते. जवळच्या मैत्रिणींनी तिच्यावर केलेल्या कविता तिला आवडायच्या. ती अशा कविता जपून ठेवायची. 'कधी पत्र लिहिलंच तर मध्य रात्री पडणाऱ्या रपरप पावसात झोप येत नसताना तुला पत्र लिहिन' अशी हळवी वाक्यं ती पत्रातून लिहायची. ही स्मिता मला नंतर कळली. एखाद्या जवळच्या माणसाचा विचार करावा, त्याचं वागणं समजून घ्यावं तसं मी तिचं वागणं, त्यातले अर्थ नकळत शोधत बसले.

मी तिच्यात एवढी गुंतले होते हे मला ती गेल्यावर लक्षात आलं. दुःखानं डोळ्यात पाणी नाही आलं. एक सुन्न, बधीरपणा आला. खरं तर ३०-३१ हे काही मरायचं वय नाही. इतक्या लवकर कुणीच जाऊ नये. आणि स्मितासारख्यांनी तर नाहीच नाही. तिला अजून खूप काय काय करायचं असेल. खूप जणांना भेटायचं असेल, सुंदर भूमिका तिच्या मनात असतील. येणाऱ्या प्रत्येक क्षणावर, आनंदावर झडप घालून तो क्षण आपला करणारी स्मिता. जाताना तिला किती वाईट वाटलं असेल, हे खरं 'माझं' दुःख आहे.

तसं कधी ना कधी जायच असतंच !



# १५ ऑगस्ट ते २६ जानेवारी

**माणूस नवजागर विशेषांक (२) १६–२३ ऑगस्टला (८६) प्रसिद्ध झाला. त्यानंतर चालू २६ जानेवारी प्रजासत्ताक दिन विशेषांक प्रसिद्ध होत आहे. दरम्यानच्या काळात घडलेल्या महत्त्वाच्या घटनांची ही वेधक नोंद ....**

**निरंजन आगाशे**

**२२ ऑगस्ट** : जनता पक्षाने इदिरा काँग्रेसशी हातमिळवणी केल्यामुळे पुणे जिल्हा परिषद अध्यक्ष-उपाध्यक्षाविरुद्धचा अविश्वास ठराव मजूर होऊन जि. प. मधील पुलोदची 'सत्ता सपुष्टात आली. परंतु थोड्याच दिवसात इकाँचे काहीजण सकाँमध्ये गेल्याने ही सत्ता सकॉकडे गेली. दरम्यान या दोन्ही पक्षाचे विलिनीकरण झाले, व त्यामुळे साहजिकच इदिरा काँग्रेसचाच झेडा पुन्हा जिल्हा परिषदेवर लागला.

पुणे जिल्हा परिषदेतील या राजकीय कसरती १९७९ पासून सुरू आहेत. २० जून १९७९ ला सकाँ (त्यावेळची शरद पवाराची काँग्रेस) व जनता पक्ष याची पुलोद आघाडी सत्तेवर होती. परतु दोनच वर्षात जनता पक्षाने इकाँशी युती केली व पुलोद आघाडी फोडली त्यानतर दहाच महिन्यात जनता पक्षाने सकाँशी युती केली· व या दिवशी (२२ ऑगस्ट ८६) जनताने पुन्हा इकाँच्या गोटात प्रवेश केला. या स्थित्यतरामधून दोन राजकीय सस्कृतीचे दर्शन होते. काही पक्षाचे किंवा काही राजकीय सस्कृतीचे लोक असे असतात की, सत्तेवर असल्याशिवाय त्याना करमतच नाही जरा थोडा काळ विरोधी पक्षात असले की त्याना अस्वस्थ वाटू लागते व वाटेल त्या खटपटी करून ते सत्तारूढ होतात काँग्रेस सस्कृती हे त्याचे उदाहरण आहे पण जनता पक्षवाल्याची मनोवृत्ती एकदमच वेगळी आहे. सत्तेसाठी ते धडपडतात, नाही असे नाही. पण एकदा का त्याना ती मिळाली की, त्याना कसेसेच वाटू लागते आणि अनेकविध मार्गांनी ते ती सपविण्याच्या मागे लागतात फोडा–झोडा आणि राज्य करा हे त्याच्या दृष्टीने फारच प्राचीन व पारपारिक तत्त्व झाले फोडा–झोडा आणि राज्य बुडवा ही त्याची आवडती घोषणा आहे.

स्थानिक स्वराज्य सस्थाच्या पातळीवर जे राजकारण चालते तेच राष्ट्रीय पातळीवर चालणार हे उघड आहे आघाड्याचे राजकारण व धरसोड वृत्ती यामुळेच विरोधी पक्ष आपल्या देशात भक्कम पायावर उभे राहू शकत नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. जिल्हा परिषदामधील राजकारणातूनही त्याची प्रचिती येऊ शकते.

**२६ ऑगस्ट** : 'अहमदावाद येथे जन्माष्टमीच्या दिवशी कोणतीही धार्मिक मिरवणूक काढण्यास परवानगी न देण्यावावत सरकार ठाम आहे' अशी भूमिका गुजरातच्या मुख्यमत्र्यानी जाहीर केली लोकानी जन्माष्टमी आपल्या घरात साजरी करावी असे त्यानी सागितले तरीही हिंदू सुरक्षा समितीने दि. २७ ला जन्माष्टमीदिनी मिरवणूक काढण्याचा प्रयत्न केल्यानतर २ हजार जणाना अटक करण्यात आली, अश्रुधूर व लाठीमारही करण्यात आला त्या नि`धार्थ भाजपने २९ ऑगस्टला पुकारलेल्या 'बद' ला हिंसक वळण मिळाले.

आपल्या राज्यात कुठे दगली होऊ नयेत म्हणून गुजरातच्या मुख्यमत्र्याच्या डोक्यात असलेला उपाय मोठा नामीच म्हटला पाहिजे. शातता कायम रहावी म्हणून हिंदूनी जन्माष्टमी आपल्या घरातच, सगळी दारे-खिडक्या बद करून घेऊन, मनातल्या मनात प्रार्थना म्हणून साजरी करावी असेही सागण्यास मुख्यमत्री महाशय कमी करणार नाहीत महाराष्ट्रात १९४६–४७ सालच्या सुमारास हिंदू–मुस्लिम दंगे उसळले होते. त्यावेळी सुऱ्याने भोसकून खून करण्याचे प्रकार वारवार घडत होते तेव्हा काँग्रेसचे नेते व मुख्यमत्री बाळासाहेब खेर यानी अशी मौलिक सूचना केली होती की, सुरा पोटात खुपसल्याने मृत्यू ओढवतो म्हणून लोकानी विशिष्ट पद्धतीने आपले हात पोटासमोर घेऊन वार झेलावा म्हणजे मृत्यू ओढवणार नाही.'

एका घटकावर अन्याय करून प्रस्थापित केलेली शातता दीर्घकाळ कधीच टिकत नाही हे काँग्रेस नेत्याना माहिती नाही असे नाही; परतु तसे केल्याशिवाय आपले राज्य टिकणार नाही अशी एक प्रकारे न्यूनगडाची भावना त्याच्यामध्ये आहे

**१ सप्टेंबर** : हरारे येथे अलिप्त राष्ट्राच्या शिखर परिषदेत वर्णद्वेषी प्रवृत्तीवर निर्णायक हल्ला चढविण्याचे आवाहन करण्यात आले. नामिबियाला सार्वभौम राष्ट्राचा दर्जा व द आफ्रिकेतील लोकाना स्वातत्र्य मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता भारताच्या पतप्रधानानी प्रतिपादन केली. अफगाण–कापुचियातून परकीय फौजा मागे घेण्याची तसेच द. आफ्रिकेविरुद्ध आर्थिक निर्बंध लादण्याची मागणी या परिषदेत अलिप्त राष्ट्रानी केली

जागतिक राजकारणात काही स्थान मिळवायचे तर अलिप्त राष्ट्रासारखी चळवळ भारताच्या दृष्टीने उपयुक्त आहे. नेहरू घराण्याने तर स्व–प्रतिमा उचावण्यासाठी त्याचा फारच चागला उपयोग

करून घेतला. पण कोणत्या आतरराष्ट्रीय प्रश्नापासून अलिप्त रहायचे आणि कोणत्या गोष्टीत पुढाकार घ्यायचा हे प्रत्येकजण आपापल्या सोईप्रमाणे आणि राष्ट्रीय हितसबंधाप्रमाणे ठरवित असल्यामुळे अलिप्त राष्ट्राना कोणी विचारीत नाही.

लिबियाचा राष्ट्रप्रमुख गडाफी याने हरारे परिषदेच्या व्यासपीठावरूनच या चळवळीवर प्रखर हल्ला चढविला आणि ही एक 'आंतरराष्ट्रीय विनोदी चळवळ' असल्याचा शेरा मानला. स्वत: गडाफी किंवा इराणचा खोमिनी हे अलिप्त चळवळीचे सदस्य होऊ शकतात आणि त्याच्या उपस्थितीत परिषदेत शाततेची आवाहने केली जातात हा एक मोठाच विनोद आहे हे खरेच आहे.

नामिबिया, द आफ्रिका, सोव्हिएट युनियनच्या अफगाणमधील फौजा व व्हिएटनामच्या कापुचियातील फौजा या प्रश्नावर हरारे परिषदेत प्रामुख्याने भर दिला गेला, कारण ते प्रश्न इतर राष्ट्राच्या हितसबधाशी निगडित आहेत. पण इराण–इराक सघर्षाच्या प्रश्नावर मात्र दोन्ही राष्ट्रप्रतिनिधींच्या भाडणाशिवाय काहीच साध्य झाले नाही.

## प्रक्षुब्ध मालेगाव

**१६ सप्टेंबर :** मालेगावचे आमदार निहाल अहमद यानी एका गणेश मडळाने केलेली आरास लाथेने मोडली. यामुळे या शहरात प्रक्षोभ उसळला व गणेश विसर्जन स्थगित करण्यात आले मोहरमचा ताजिया खाद्यावर घेऊन जात असताना आ अहमद यानी हे कृत्य केले व त्यानतर त्याच्या इतर सहकाऱ्यानी त्या आरासीची पूर्ण मोडतोड केली. मुख्यमत्र्यानी मालेगावात येऊन परिस्थितीची पाहणी केल्याशिवाय गणेश विसर्जन होणार नाही अशी भूमिका गणेशोत्सव समितीने घेतली. अखेर राज्याचे २ मत्री मालेगावात आले व दि २२ सप्टेंबरला गणेश विसर्जन करण्यात आले

आ. निहाल अहमद याच्या कृत्यावर खूपच झोड उठवली गेली, अनेक जण सतप्त झाले, पण आ. अहमद हे जनता पक्षातील समाजवादी असल्याने त्याच्या कृत्यामागे काही विचार, काही तात्त्विक भूमिका असणार हे या सगळयानी गृहीत धरायला हवे होते. खरं म्हणजे ती 'धर्मनिरपेक्ष लाथ' होती. धर्माचा मानवी जीवनावरील प्रभाव कमी झाला पाहिजे, धर्म घरातून रस्त्यावर येऊ नये असा विचार त्या लाथेमागे होता

. पण मोहरमचा ताजिया त्यावेळी आ. अहमद याच्या खाद्यावर होता त्याचे काय? अशा खवचट प्रश्नाकडे आपण दुर्लक्ष करायला पाहिजे.

**२ ऑक्टोबर :** नवी दिल्लीतील महात्मा गाधीच्या राजघाटावरील समाधीजवळ एका तरुणाने पतप्रधान राजीव गाधी याच्या दिशेने गोळीबार केला. त्यात ६ जण जखमी झाले. हल्लेखोरास तात्काळ पकडण्यात आले व सुरक्षा व्यवस्थेतील हलगर्जीपणाबद्दल ६ वरिष्ठ अधिकाऱ्याना निलबित करण्यात आले. या घटनेच्या दुसऱ्याच दिवशी पजाबचे पोलीस महासचालक रिबेरो यांच्यावर हल्ला झाला. पजाब सशस्त्र पोलीस दलाच्या मुख्यालय कार्यालयातच पोलिसी गणवेश घातलेल्या ७ अतिरेक्यानी हा हल्ला केला या हल्ल्यात १ ठार व रिबेरो याच्या पत्नीसह ४ जण जखमी झाले.

भारताच्या सध्याच्या कायदा व सुव्यवस्था परिस्थितीचे आकलन होण्यास या २ घटनाची माहिती पुरेशी आहे. राजघाटावर ज्या दिवशी पतप्रधानावर हल्ला झाला त्याच दिवशी सध्याकाळी वर्धा येथे पतप्रधानाचा कार्यक्रम झाला. यावेळी 'रामराज्या' च्या म गाधीच्या कल्पनेचा आपल्या भाषणात पतप्रधानानी पुरस्कार केला. वास्तविक म. गाधीच्या 'रामराज्य' कल्पनेत लष्कर, पोलीस यांना अजिबात स्थान नव्हते. आणि इथे तर पतप्रधानाना घराबाहेर एक पाऊल टाकायचे म्हटले तर लष्कराची कुमक तैनात करावी लागते आहे. अशा वेळी गाधीवादावरील गप्पाना काय अर्थ आहे?

**१५ ऑक्टोबर :** अमरावतीहून सुमारे १० किमी अंतरावरील वरुड शहरात पहाटे दुर्गादेवी विसर्जन शोभायात्रेच्यावेळी उसळलेला हिंसाचार व त्यानतर झालेल्या पोलीस गोळीबारात २ जण ठार तर ३ जण जखमी झाले. सुमारे ४५ हजार लोक ज्यात सामील झाले होते अशी ही मिरवणूक एका प्रार्थनास्थळावरून जात असताना तिच्यावर अचानक दगडफेक सुरू झाली. या हिंसाचारामुळे येथील ३६ दुर्गामूर्तीचे विसर्जन दुसऱ्या दिवशी करावे लागले.

वरूड येथे झालेल्या या दगलीनतर महाराष्ट्रात धार्मिक दंगलीची एक मालिकाच सुरू झाली नोव्हेंबर व डिसेंबरमध्ये खामगाव, माजलगाव, रत्नागिरी, अमरावती शहर इत्यादी ठिकाणी दंगली झाल्या. या दगली म्हणजे आपल्या सरकार पुढची, विशेषत सत्तारूढ काँग्रेस नेत्यापुढची एक डोकेदुखीच होऊन बसली आहे. यापूर्वी अल्पसख्याकाचे लागूलचालन हे सरकारी धोरणाचे सूत्र होते; पण त्याचाच परिणाम आज महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात शिवसेनेची शक्ती वाढण्यात झाला आहे. शिवसेना ही राजकीय सघटना असल्याने काँग्रेस सरकारला तिची दखल घ्यावीच लागते आहे एका दृष्टीने काँग्रेसचे आधीचे धोरण त्या पक्षाच्या आता चागलेच अंगलट येऊ लागले आहे

**२५ ऑक्टोबर :** मराठी साहित्य समेलनाचे हिरक महोत्सवी अधिवेशन मुबईत ३ दिवस पार पडले. 'बॉम्बे' चे 'मुबई' असे नामकरण करा अशी मागणी समेलनाध्यक्ष विश्राम बेडेकर यानी केली. अनेक परिसवाद, चर्चा, नाटके, कविसमेलन असे भरगच्च कार्यक्रम समेलनात होते.

ज्येष्ठ साहित्यिक विश्राम बेडेकर याचे भावपूर्ण, रसगर्भ आणि विचारानी परिपुष्ट असे अध्यक्षीय भाषण हे या साहित्य संमेलनाचे वैशिष्टय मानावे लागेल. 'मी साहित्यिक व तुम्ही श्रोते म्हणून येथे उपस्थित असलात तरी एकाच समान निर्मितीच्या प्रेरणानी आपल्याला इथे एकत्र आणले आहे. फक्त आमची कलानिर्मिती ही साहित्याच्या, काव्याच्या माध्यमातून व्यक्त होते तर तुमची साहित्यनिर्मिती मनातल्या मनात किंवा तोंडीच होते,' असे सागून बेडेकरानी साहित्यिक व श्रोते याच्यातील अंतरच नष्ट करून टाकले. प्रत्येकाच्यातला 'थोडासा साहित्यिक' त्यामुळे सुखावला आणि खऱ्या अर्थाने त्याना साहित्य संमेलन वाटले.

कुठल्या ना कुठल्या वादग्रस्त मुद्द्यावर समेलन गाजले पाहिजे असा एक अलिखित नियम आहे हे समेलनही त्याला अपवाद नव्हते. पण वाईटातली चागली गोष्ट एवढीच की, या वेळचा विषय जरा नवीन होता. 'भाडवलदार पुरस्कृत कार्यक्रम समेलनात ठेवू नयेत' ही या वेळची मागणी होती या निमित्ताने काहीचे फोटो व मथळे

वृत्तपत्रात छापले गेले मुख्य हेतू साध्य झाल्यामुळे या विषयावर नतर पडदा पडला

## पवार 'स्वगृही'

**३१ ऑक्टोबरला** इकाँ सरचिटणीस जी. के. मूपनार यानी लोकशाहीवादी, पुरोगामी शक्तीनी एकत्र यावे या केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देण्याचा निर्णय सकाँच्या २९ नोव्हेंबरच्या कार्यकारिणी बैठकीत घेण्यात आला व औरगाबाद येथे भरलेल्या दि. ६ ते ८ डिसेंबरच्या अधिवेशनात त्यावर शिक्कामोर्तब करण्यात आले; परतु विलिनीकरणाच्या प्रश्नावरून सकाँमध्ये मतभेद होऊन पक्ष फुटला व केरळचे खा. उन्नीकृष्णन् यानी समाजवादी काँग्रेस पक्ष कायम ठेवण्याचा निर्णय घेतला. सकाँचा पवार गट सधीसाधू असल्याची टीका त्यानी केली. तरीपण औरगाबाद येथील भव्य अधिवेशनाला स्वत पतप्रधान राजीव गाधी स्वागतासाठी उपस्थित राहिले आणि त्याच्याबरोबर जम्मू–काश्मिरचे नवनिर्वाचित मुख्यमत्री डॉ. फारुक अब्दुल्ला हेही होते. पक्षाच्या अ. भा. महासमितीने एकमताने विलिनीकरणाचा ठराव समत केला

या सर्व घटना ज्या पद्धतीने घडल्या ते पाहिल्यानतर शरद पवाराच्या कौशल्याला कोणीही दादच देईल. 'आपल्याला पक्षातर तर करायचे आहे पण त्याला फारसा विरोध होता कामा नये' हे उद्दिष्ट पवारानी मोठ्या कौशल्याने साध्य केले. ज्या जनतेला सर्वसामान्यपणे पक्षातराबद्दल चीड होती, त्या जनतेच्या साक्षीनेच त्यानी पक्षातराचा सोहळा घडवून आणला जी वृत्तपत्रे पक्षांतरविरोधात रकाने भरभरून लिहित होती ती सुद्धा हार–तुरे घेऊन पवाराचा सत्कार करू लागली आणि खुद्द ज्या पतप्रधानानी पक्षातराविरोधी कायदा केला त्याच्या उपस्थितीतच पवारानी आपले उद्दिष्ट साध्य केले.

८ वर्षापूर्वी सत्तारूढ इ. काँ. व रेड्डी काँग्रेस याच्या आघाडीतून फुटून पवार बाहेर पडले व मुख्यमत्री झाले; काही काळानतर आता पुन्हा ते 'आत' जात आहेत या दोन्ही वेळेला आपल्या कृतीला तात्विक मुलामा चढविण्यात ते पूर्ण यशस्वी झाले

पण ज्या वृत्तपत्राकडून राजकीय विचाराची आपण अपेक्षा करतो त्याचे काय? पवाराचे राजकीय सल्लागार असल्याच्या थाटातच लेख–अग्रलेख लिहिले जात होते. त्याच्या दृष्टीने महाराष्ट्राच्या राजकारणापेक्षा पवाराच 'करिअर' महत्त्वाच होत यशवतराव चव्हाण 'स्वगृही' गेले होते तेव्हा केवढा गहजब या वृत्तपत्रानी केला होता! त्याच्या कृतीची टिंगल करणारे, झोड उठविणारे लिखाण प्रसिद्ध केले. काही वर्षांनी पवारानी तेच केले तेव्हा मात्र सगळ्याचे पवित्रे बदलले, पवार जे बोलत होते तेच ती लिहू लागली, हे काय गौडबगाल आहे? हे सगळेही एकवेळ समजू शकते; पण गमत म्हणजे याच लोकाकडून 'नि पक्षपाती' पत्रकारितेवर प्रवचने आपल्याला ऐकायची असतात.

टाईम्स ऑफ इडियामध्ये केवळ ३ ओळीचे पत्र लिहून आपली मार्मिक प्रतिक्रिया एका वाचकाने व्यक्त केली होती. ती अशी–

P. T Usha should teach our cricketers how to run and they should learn from Sharad Pawar how to put their best foot forward at the right time.

**१ नोव्हेंबर**. काश्मिरमध्ये इदिरा काँग्रेस व नॅशनल कॉन्फरन्स याचे सयुक्त मंत्रिमडळ सत्तारूढ होणार असल्याची घोषणा करण्यात आली. यापुढे प्रत्येक निवडणुकीत युती करण्याचे दोन्ही पक्षानी ठरविले. त्यानतर काश्मिरमध्ये विधानसभा बरखास्त करण्यात आली. व मार्चपर्यंत निवडणुका घेण्याचे नवे मुख्यमत्री डॉ फारुक अब्दुल्ला यानी सागितले.

प्रत्येक राज्यात दोन प्रतिस्पर्धी गटाना झुजवत ठेवून राज्य करायचे ही इदिरा गाधीची शैली होती. तर आपल्याला तुल्यबल अशा गटाला–पुढाऱ्यालाच आपल्या सत्ताप्रवाहात सामावून घेऊन विरोध सपवून टाकायचा हे राजीव गाधीचे तत्र आहे. या तत्रानुसारच त्यानी महाराष्ट्रात शरद पवार व काश्मिरात शेख अब्दुल्ला याच्याशी तडजोड केली.

पण ही केवळ सत्तेसाठी तडजोड असूनसुद्धा त्याला तात्त्विक अधिष्ठान देण्याचा या पुढाऱ्याचा प्रयत्न फारच हास्यास्पद आणि काही वेळा केविलवाणाही वाटत होता. इकाँशी केलेल्या युतीनतर बोलताना फारुक अब्दुल्ला म्हणाले, गाधी, नेहरू आणि शेख अब्दुल्ला यानी केलेल्या कार्याचा वारसा पुढे चालविण्यासाठी ही युती आहे 'राष्ट्रीय एकात्मता प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्नाची आवश्यकता' ही वाजवून गुळगुळीत झालेली राजीव याची रेकॉर्ड त्यानीही वाजविली.

सत्तावादी राजकारण करताना नेहरू, शेख अब्दुल्लाचे ठीक आहे पण म. गाधीचे नाव कशासाठी घेतले जाते हे समजू शकत नाही

## बी. एड्. कॉलेजांचे बिंग

**२७ नोव्हेंबर**–मराठवाड्यातील खाजगी बी. एड व डी. एड. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना परिक्षाना बसू देण्यास मराठवाडा विद्यापीठाने नकार दिला. विना अनुदान तत्त्वावरील या महाविद्यालयात भरमसाठ कॅपिटेशन फी देऊन मर्यादेपेक्षा जास्त विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला. मत्र्याचे नातेवाईक व सगेसोयरे याच्या या सस्था असल्याने राज्य सरकारने या व्यवहाराकडे दुर्लक्ष केले. परतु परीक्षा देता येत नाही म्हटल्यावर विद्यार्थ्यानी आदोलन सुरू केले. मुख्यमत्री शकरराव चव्हाण हेही एका शिक्षणसस्थेत अध्यक्ष असल्याने त्याच्या राजीनाम्याची मागणी विविध सघटना व विरोधी पक्षानी केली.

वास्तविक वसतदादा पाटील मुख्यमत्रीपदावर असताना हे प्रकरण सुरू झाले विना अनुदान तत्त्वावरील खाजगी बी एड व डी. एड. महाविद्यालयाना त्यानी सरसकट परवानगी देऊन टाकली आणि राजकीय क्षेत्रात वावरणाऱ्या अनेकाना एक आयतेच चराऊ कुरण उपलब्ध झाले. अडीच हजार ते ५ हजार रु कॅपिटेशन फी घेऊन विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाऊ लागला दादानतर निलगेकरानीही आपल्या कारकिर्दित आणखी काही सस्थाना परवानगी दिली. त्या वेळचे गृहमत्री शकरराव चव्हाण याचे मित्र व नातेवाईक याना मात्र त्यानी परवानगी दिली नाही. निलगेकरही गेले. आणि स्वच्छ, शिस्तप्रिय व कठोर प्रशासक म्हणून मानले जाणारे शकरराव चव्हाण मुख्यमत्रीपदावर आले बेकायदा व्यवहारामुळे होत असलेला अन्याय ते दूर करतील असे वाटू लागले. चव्हाणानीही अगदीच अपेक्षाभग

केला नाही, त्यानी आपले नातेवाईक व मित्र याच्यावरील अन्याय दूर केला, त्यानाही हे कुरण उपलब्ध करून दिले व निलगेकराची जिरविली !

इतके वर्ष बी. एड. कॉलेजचा हा धदा तेजीत शातपणे सुरू होता• विद्यार्थी पैसे देत होते आणि त्या बदल्यात सस्थाचालक त्याच्या पदरात बी. एड. ची पदवी टाकत होते. पण यावर्षी मराठवाडा विद्यापीठाने या बेकायदा कॉलेजमधील विद्यार्थ्यांना परिक्षाना बसू देण्यास मनाई केली. आणि मग विद्यार्थ्यांचे आदोलन सुरू झाले. वाचनालय नाही, शिक्षक नाहीत, वर्ग नाहीत अशा महाविद्यालयात शिकताना कोणी त्याविरुद्ध चिडून उठले नाही. पण परीक्षा नाहीत. म्हटल्यावर हे विद्यार्थी सघटित झाले.

महाराष्ट्राच्या शैक्षणिक जीवनातील या सर्वात मोठ्या भ्रष्टाचार प्रकरणाचे बळी ठरलेल्या हजारो विद्यार्थ्यांचे भवितव्य काय हा प्रश्न आज तरी अनुत्तरित आहे. मात्र यापुढे समाजाला पैशाच्या मोबदल्यात तयार झालेले डॉक्टर, इंजिनिअर व शिक्षकही मिळणार आहेत हे मात्र कटु सत्य आहे.

**२८ नोव्हेंबर :** सोव्हिएट युनियनचे नेते मिखाईल गोर्बाचेव्ह यांनी भारतास प्रथमच भेट दिली. यावेळी त्याचे सरकारी पातळीवर अभूतपूर्व स्वागत करण्यात आले. अण्वस्त्रबदीसाठी आतरराष्ट्रीय परिषद घेण्यात यावी असे आवाहन यावेळी गोर्बाचेव्ह व राजीव गाधी यानी संयुक्तरीत्या केले. नि शस्त्रीकरणात अमेरिकेचा 'स्टार-वॉर' कार्यक्रम हा अडथळा असल्याचे गोर्बाचेव्ह यानी सागितले. दुसऱ्या दिवशी पत्रकार परिषदेत बोलताना भारत–पाक सबंध वेळीच न सुधारल्यास गभीर परिणाम होतील असा इशारा त्यानी दिला.

तमाम दूरदर्शनच्या प्रेक्षकाना या काळात थोडेसे चुकल्या–चुकल्या-सारखे वाटले. दूरदर्शनवरील राजीव गाधीचे असलेले सार्वभौमत्व सपल्यासारखे वाटत होते, इतके दूरदर्शन गोर्बाचेव्हमय झाले होते. एरव्ही 'फॉर्मा'त असलेला मुख्यमत्री पतप्रधानानी राज्यात भेट दिली की जसा दिसतो–वागतो तसेच थोडेसे राजीव गाधी दिसत होते.

चीन व पाकिस्तान ही भारताची शत्रु राष्ट्रे. त्याच्याकडून काही धोका उद्भवल्यास सोव्हिएट युनियन काय भूमिका घेणार असे भारतीय पत्रकारानी उत्सुकतेने पुन्हा पुन्हा विचारले. पण गोर्बाचेव्ह यानी त्याचे उत्तर खुबीने टाळले.

**३० नोव्हेंबर** · होशियारपूर येथील खुद्दा या गावाजवळ २६ बस प्रवाशाची गोळ्या घालून हत्या करण्यात आली. पंजाबातील आजपर्यंतचे हे सर्वात मोठे हत्याकाड होते. होशियारपूर जिल्ह्यातून चाललेल्या बसचा भागोला येथे ४ सशस्त्र अतिरेक्यांनी ताबा घेतला व पिस्तुलाचा धाक दाखवून बस एका निर्जन जागी नेली. तेथे काही प्रवाशाना खाली खेचून त्याच्यावर बेछूट गोळीबार करण्यात आला.

तर याच दिवशी शिरोमणी गुरुद्वारा प्रबंधक समिती अध्यक्षपदाची निवडणूक होऊन त्यात बडखोर अकाली गटाचे नेते गुरुचरणसिग तोहरा हे विजयी झाले. अकाली ( बर्नाला गट ) दल उमेदवाराचा त्यानी १७ मतानी पराभव केला.

त्यानंतर दोनच दिवसानी अतिरेकी कारवायांना आळा घालण्याच्या उपायाचा भाग म्हणून अतिरेक्याना प्रोत्साहन देणाऱ्या बादल व तोहरा यांना अटक करण्यात आली.

## ग्रंथमोहोळ

**६ डिसेंबर :** ग्रथाली वाचक चळवळीने महाराष्ट्रभर 'ग्रथमोहोळ' हा उपक्रम केला. पुणे–मुंबई वगळता ६, ७, ८ डिसेंबरला महाराष्ट्रात ५० ठिकाणी एकाचवेळी सास्कृतिक कार्यक्रम, पुस्तक प्रदर्शने, चर्चा आदी कार्यक्रम करण्यात आले. अनेक लहान–मोठ्या साहित्यिकानी त्यात प्रत्यक्ष भाग घेतला होता. ग्रामीण भागातही या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. सास्कृतिक क्षेत्रात थोडेसे चैतन्य आणण्याचा हा प्रयत्न निश्चितच स्वागतार्ह होता.

**८ डिसेंबर :** 'डेक्कन हेराल्ड' या बगलोरच्या दैनिकात प्रसिद्ध झालेल्या लघुकथेचे निमित्त होऊन दि. ७ व ८ डिसेंबरला बगलोर शहर, म्हैसूर, कोलार, व बिदर येथे हिंसाचार झाला. त्यामुळे पोलिसाना गोळीबार करावा लागला. त्यात एकूण १७ जण मृत्युमुखी पडले. जनता पक्षाचे माजीमत्री सी. एम इब्राहिम याच्यासह १३९ जणाना अटक करण्यात आली. कोलार येथे डेक्कन हेराल्डच्या टॅक्सीवर जमावाने दगडफेक केली व अंकाचे गठ्ठे जाळून टाकले

एका विशिष्ट जमातीच्या भावना दुखावल्याने ही दगल झाली असे या घटनेचे वृत्तपत्रीय शब्दात वर्णन केले गेले. ही विशिष्ट जमात कोणती हे सर्वज्ञात आहे. ही जमात दिवसेदिवस जास्तच नाजूक, सवेदनाक्षम आणि भावनाप्रधान बनत चालली आहे. या जमातीचे हे गुण ओळखण्याची उच्च प्रतीची गुणग्राहकता या प्रकरणात कर्नाटक सरकार, केंद्र सरकार, डेक्कन हेराल्ड हे वृत्तपत्र व विविध राजकीय पुढाऱ्यानी नेहमीप्रमाणे दाखविली व त्यासाठी हिंसाचार व जाळपोळीकडेही त्यांनी दुर्लक्ष केले.

गोष्टी प्रसिद्ध करताना योग्य काळजी घेतली पाहिजे या मुख्यमत्री श्री. हेगडे याच्या सूचनेनुसार वागायचे ठरविले तर प्रसिद्ध करावयाचा मजकूर तज्ज्ञाऐवजी निरनिराळ्या जमात प्रमुखानाच यापुढे दाखविला पाहिजे

**९ डिसेंबर :** माजी मुख्यमत्री शिवाजीराव निलगेकर यांच्या कन्या श्रीमती चद्रकला डावले यांच्या एम. डी परीक्षेच्या निकालामध्ये गुणामध्ये फेरफार करण्याच्या प्रकरणी निलगेकराना दोषमुक्त ठरवता येऊ शकणार नाही असे सर्वोच्च न्यायालयाच्या खडपीठाने स्पष्ट केले. श्रीमती डावले याच्या परीक्षेतील गुणांमध्ये फेरफार हे निलगेकर याच्या सूचनेवरून किंवा त्याची मर्जी सपादन करण्यासाठीच केले असावे असा संशय घेण्यास मोठाच वाव असल्याचे न्यायालयाने सागितले.

सर्वोच्च न्यायालयाला जरी असे वाटत असले तरी निलगेकराना तसे वाटत नाही. घटनेच्या निरनिराळ्या कलमाचा अर्थ लावण्याचे काम न्यायालय करते तसे न्यायालयाच्या निर्णयाचा अर्थ लावण्याचे काम आरोपीने करावयाचे असते अशी श्री. निलगेकराची भूमिका असावी कारण हा निकाल जाहीर झाल्यानंतर नवी दिल्लीत पत्रकाराशी बोलताना श्री. निलगेकर म्हणाले की, 'सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे मी आता पूर्णपणे दोषमुक्त ठरलो आहे. इकाँ. सघटनेत कोणतीही जबाबदारी स्वीकारण्यास आता मी मोकळा

आहे. वृत्तपत्रानी चुकीच्या पद्धतीने ही बातमी प्रसिद्ध केली. या वृत्तपत्रांवर कारवाई करण्याचा माझा सध्या विचार नाही. पण त्यातील कायदेशीर पैलू विचारात घ्यावे लागतील.' या वक्तव्यावर आपल्यासारखी माणसे काय बोलणार ?

**१२ डिसेंबर :** अरुणाचल प्रदेशला राज्याचा दर्जा देणारे विधेयक ससदेत मजूर झाल्यानतर चीनने त्यावर तीव्र आक्षेप घेतला. अरुणाचल हा भारताने हस्तगत केलेला चीनचाच प्रदेश आहे. मॅकमहॉन ही बेकायदा सीमारेषा आम्ही कधीही मान्य करणार नाही असे चीनच्या प्रवक्त्याने सागितले. ही सरळसरळ भारताच्या अतर्गत व्यवहारात ढवळाढवळ असल्याचे सांगून भारताने चीनचा आक्षेप धुडकावून लावला.

'आजपर्यंतचा आमचा इतिहास हेच सागतो की इतिहासापासून आम्ही काहीच शिकत नाही' असे कोणीतरी म्हटले आहे. हे वचन भारताला जितके चागले लागू पडते तितके दुसऱ्या कोणत्या देशाला पडत असेल असे वाटत नाही. नेहरूंच्यावेळेपेक्षा यावेळी इशारे आणि निषेध याची भाषा थोडी अधिक कडक असेल एवढेच काय ते. *सिक्कीमला राज्याचा दर्जा दिला तेव्हासुद्धा चीनने अशीच* आरडाओरड केली होती सध्या तर खुजेराव खिंडीत लष्करी वाहतुकीसाठी चीनने रस्ता तयार केला आहे. अरुणाचल प्रदेशाजवळ भारताच्या हद्दीत चीनने हॅलिपॅड बाधले तेव्हा ससदेत सरकारतर्फे परस्पर विसगत निवेदने करण्यात आली.

**१९ डिसेंबर :** *गोव्यात कोकणी ही राज्यभाषा म्हणून जाहीर* करावी व गोव्याला राज्याचा दर्जा दिला जावा या मागण्यासाठी गोवा मुक्तीदिन रौप्यमहोत्सवाच्या दिवशी कोकणीवाद्यानी केलेल्या हिंसाचारात अनेकजण जखमी झाले. येथील हिंसाचाराचे हे सत्र आठवडाभर चालूच राहिले. या प्रकारात एकूण ८ जण ठार झाले. दि. २३ *ला गोव्याच्या ४ मत्र्यानी नेतृत्वबदलाची मागणी केली व* पक्षश्रेष्ठीकडे राजीनामे दिले. गोव्यातील राजकीय पेच सोडविण्यासाठी इदिरा कॉंग्रेसतर्फे निरीक्षक म्हणून रघुनदनलाल भाटिया यानी दि. ११ जाने रोजी गोव्याला भेट दिली व यावेळी झालेल्या समझोत्यानतर ४ मत्र्यानी राजीनामे मागे घेतले.

आंदोलन, हिंसाचार, दंगेधोपे अचानक उसळलेले दिसतात. सुरुवातीला त्यामागे भाषिक, आर्थिक, सामाजिक वाद आहे असा भास होतो. पण पडद्यामागून सूत्रे हलविणाऱ्या महत्त्वाकाक्षी राजकारण्याचे हेतू मात्र अनेक वेळा लपून राहतात. गोव्यातील या घटनामध्ये मात्र या हेतूवर झगझगीत प्रकाश पडला गोव्याच्या मुख्यमत्रीपदावरून प्रतापसिंग राणे याची उचलबागडी व्हावी यासाठी ४ मत्री प्रयत्नशील होते. पण हा राजकीय वाद बाहेर येण्याऐवजी एकदम हिंसाचाराचा स्फोट झाला. मराठी—कोकणी वाद आणि गोव्याला राज्याचा दर्जा द्या इत्यादी मागण्या सुरुवातीला पुढे करण्यात आल्या होत्या. त्यासाठी झालेल्या हिंसाचारात ८ जणाचे नाहक बळी पडले, आणि मग खरी मागणी बाहेर पडली... 'मुख्यमत्री प्रतापसिंग राणे यानां हटवा.'

## शहाबुद्दिन विरुद्ध इतर सर्व

**२२ डिसेंबर :** देशातील सर्व मुस्लिमानी प्रजासत्ताक दिनावर बहिष्कार टाकावा असे आवाहन करणारा ठराव अ. भा. बाबरी मशीद परिषदेत समत करण्यात आला. या परिषदेचे निमत्रक होते जनता पक्षाचे खासदार सैद शहाबुद्दीन तर परिषदेच्या अध्यक्षस्थानी इडियन युनियन मुस्लिम लीगचे अध्यक्ष इब्राहिम सुलेमान सैत हे होते. बाबरी मशीद प्रश्नावर देशव्यापी आदोलन करण्याचे परिषदेत ठरविण्यात आले.

तलाक विधेयकानतर मुस्लिम धर्मवादाचे राजकारण करणाऱ्याना मिळालेला बाबरी मशीद हा आणखी एक विषय. *तलाक विधेयकानतरच* या देशातील विचारवत, पत्रकार व सर्वसाधारपणे ज्याला पुरोगामी बुद्धिवादी वर्ग म्हटले जाते, त्या वर्गाला या राजकारणाची घातकता जाणवली होती आणि बहिष्कार आवाहनामुळे ती जाणीव आणखी तीव्र बनली. यापूर्वी धर्मांधतेला विरोध करताना जेवढा *मुसलमानाना करू तेवढाच विरोध हिंदूनाही केला पाहिजे असे* विचित्र 'सतुलन' टिकविण्याची या वर्गाची धडपड असे, परतु या २ प्रकरणामुळे हे सतुलन पूर्णपणे बिघडले टाईम्स ऑफ इडिया, इडियन एक्स्प्रेस, टेलिग्राफ, स्टेट्समन एवढेच नव्हे तर आर्थिक विषयाला वाहिलेले इकॉनॉमिक टाईम्स इत्यादी दैनिके, विविध राजकीय पक्षाचे नेते *व कार्यकर्ते, निरनिराळ्या सघटना यानी* एकसमयावच्छेदे करून शहाबुद्दीन व बहिष्काराच्या आवाहनाचा तीव्र निषेध केला. जनता पक्षाची मात्र फारच पचाईत झाली. महाराष्ट्राच्या जनता कार्यकारिणीने केलेला ठराव तर केवळ विनोदी होता. त्यात म्हटले होते, 'बहिष्कार आवाहनातून शहाबुद्दीन यानी आपले अग काढून घ्यावे.' *पक्षातर प्रकरणातून शरद पवारानी आपले अग काढून घ्यावे* असे म्हटले असते तर ते जेवढे हास्यास्पद झाले असते तेवढेच हे आवाहन हास्यास्पद आहे

१ फेब्रु. १९८५ ला अयोध्येतील रामजन्मभूमीस्थळाला लावण्यात आलेले कुलूप काढण्यात यावे असा निर्णय फैजाबाद जिल्हा न्यायालयाने दिला. उमेशचद्र पाडे या एका तरुण वकिलाने हे कुलूप काढावे म्हणून दाखल केलेल्या याचिकेवर विचार करताना न्यायालयाच्या असे लक्षात आले की, या स्थळास कुलूप लावण्याचा आदेश कोणी दिला होता याची कागदपत्रेच सरकारकडे नाहीत व याबद्दल कोणाही सरकारी अधिकाऱ्यास काहीही माहिती नाही. कुलूप लावण्याचा आदेश न्यायालयाचाच असावा असा तोपर्यंत समज होता. परतु तो चुकीचा असल्याचे निष्पन्न झाले. जिल्हा दडाधिकारी आणि जिल्हा वरिष्ठ पोलीस निरीक्षक याच्या यावेळी साक्षी झाल्या. कुलूप लावण्यासंबधीची कागदपत्रे आम्ही पाहिली नाहीत व कुलूपाशिवाय मूर्तीचे सरक्षण व शातता टिकविणे शक्य आहे असे त्यानी साक्षीत सागितले त्यानुसार न्यायाधीश कृष्णमोहन पाडे यानी कुलूप काढण्याचा आदेश दिला. रामजन्मभूमी मुक्त झाल्यानतर तेथे मत्रोच्चार व घटानाद याच्यासह पूर्ववत पूजा सुरू झाली.

या घटनेनतर दिल्ली व उत्तर प्रदेशात दगे घडवून आणले गेले पण त्याचा काहीही उपयोग झाला नाही. जिल्हा न्यायालयाचा निर्णय रद्द ठरवावा अशी याचिका महंमद हशीम यानी केली. उच्च न्यायालयात हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे; परंतु प्रश्न सोडविण्यासाठी न्यायालयाचा मार्ग स्वीकारणे शहाबुद्दीन आदीना मान्य नाही, कारण तसे केले तर आपले नेतृत्व प्रस्थापित करण्याचा मार्ग बद होईल असे त्याना वाटते.

ज्या न्यायाधीशानी हा निर्णय दिला त्याच्याबद्दल बोलताना शहाबुद्दीन म्हणाले की, 'हे गृहस्थ न्यायाधीश होण्यास पात्र नाहीत. एका कटाला बळी पडून त्यानी हा निर्णय दिला आहे.' कलकत्त्यातील एका भाषणात बोलताना ते म्हणाले की, भारतीय प्रजासत्ताक हे हिंदूचे प्रजासत्ताक आहे त्यामुळे त्यावर सर्व मुस्लिमानी बहिष्कार टाकावा.

**२३ डिसेंबर :** कापसाला योग्य भाव मिळावा यासाठी शेतकरी संघटनेने केलेल्या 'चक्का जाम' आंदोलनामुळे विदर्भात वाहतूक ठप्प झाली. मुखेड येथे पोलिसानी केलेल्या गोळीबारात ४ जण जखमी झाले. या आंदोलनात विविध ठिकाणी २० हजाराहून अधिक जणाना अटक करण्यात आली.

याच मागणीसाठी ७ नोव्हेंबरला राज्यात शेतकरी संघटनेने केलेल्या 'रस्ता रोको' आंदोलनात १० हजार जणाना अटक करण्यात आली. 'चक्का जाम' आंदोलन करणाऱ्यावर सुरेगाव येथे गोळीबार करण्यात आला, त्यात २ जण ठार झाले. या गोळीबाराची न्यायालयीन चौकशी करण्याचा निर्णय राज्यशासनाने ११ डिसेंबरला घेतला व याचदिवशी शेतकरी संघटनेचे नेते शरद जोशी याना रा. सु. का. खाली अटक केली विधानसभेत मुख्यमंत्री शकरराव चव्हाण यानी शेतकरी संघटनेवर प्रखर हल्ला चढविला.

'चक्का जाम' सारख्या शेतकरी संघटनेच्या आंदोलनामुळे राज्यातील सत्तारुढ काँग्रेस पक्ष व मंत्री हे जास्त अस्वस्थ होतात याचे कारण सत्तेचे मार्ग 'जाम' करण्याची ताकद या आंदोलनात आहे; पण त्याच्याशी मुत्सद्देगिरीने मुकाबला करण्याऐवजी लाठीमार गोळीबार आणि दडपशाही याचा वापर केला जातो. 'शकरराव चव्हाणासारखा सतापी, हडेलहप्पी मुख्यमंत्री शेतकरी आंदोलनास पोषकच आहे,' या शरद जोशींच्या मार्मिक प्रतिक्रियेची दखल घेतली जाईल असे वाटत नाही.

यात खरी गोची अशी आहे की, शेतकरी संघटनेशी लढा द्यायचा तर तो वैचारिक पातळीवरच द्यावा लागतो. शिवसेनेची शक्ती वाढायला लागली तर जातीय संघटना असा शिक्का मारून झटकून टाकता येते; पण शेतकरी संघटनेने उपस्थित केलेल्या प्रश्नाची उत्तरे इतक्या सहजपणे देता येत नाहीत.

सुरेगाव गोळीबाराची न्यायालयीन चौकशी करा अशी मागणी शरद जोशींनी १० डिसेंबरला केली. ११ डिसेंबरला शकरराव चव्हाणांनी एकीकडे त्याची मागणी मान्य केली आणि दुसऱ्या बाजूला त्यानाच राष्ट्रीय सुरक्षा कायद्याखाली अटक केली. यापुढे आता असेच घडणार आहे शेतकरी संघटनेच्या मागण्या एकीकडे सरकारला मान्य कराव्या लागतील पण त्याचवेळी त्याचे श्रेय शेतकरी संघटनेला मिळू नये यासाठी आटापिटा केला जाईल.

शरद जोशींमुळे राष्ट्राची सुरक्षा कशी काय धोक्यात येत होती ? पण हा राष्ट्रीय सुरक्षा कायदा नसून 'सत्ता सुरक्षा' कायदा आहे त्यामुळेच शरद जोशींना अटक झाली

## दिलीपकुमार म्हणतात...

**लातूर दि १४ जानेवारी** (दै मराठवाडा वार्ताहर) . ग्रीक, इजिप्तसारख्या अनेक संस्कृती भारतात उदयास आल्या नि अस्त झाल्या; परंतु हिंदू संस्कृती मात्र आजही टिकून आहे. याचे श्रेय हिंदू तत्वज्ञानाकडे जाते. हिंदू तत्वज्ञानातील सभ्यता, सुंदरता, सर्वसमावेशकता ही तीन मूल्ये जगात कोठेही शोधून सापडणार नाहीत आज ही मूल्ये धोक्यात असून त्याना वाचविण्यासाठी आपण सर्व भारतीयानी प्रयत्न करावेत, असे कळकळीचे आवाहन प्रसिद्ध हिंदी चित्रपट अभिनेते दिलीपकुमार यानी आज येथे एका जाहीर सभेत केले

येथील सुरतशहावली दर्गा उरुसच्या वतीने टाऊन हॉल येथे आयोजित केलेल्या राष्ट्रीय एकात्मता कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी आमदार श्री. राजाभाऊ उदगीरकर हे होते.

देशातील परिस्थितीचा आढावा घेताना श्री. दिलीपकुमार पुढे म्हणाले की, आज विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रात प्रगती होत आहे देश प्रगतीपथावर वाटचाल करीत आहे, परंतु दुर्दैवाने काही मूठभर वाईट प्रवृत्तीचे लोक धर्माच्या नावावर देशाच्या एकात्मतेला तडा देत आहेत. जनता पक्षाचे खा. शहाबुद्दीन याच्या बहिष्कार आवाहनाचा तीव्र निषेध करून सर्वांनी एकमेकाशी प्रेमाने वागावे असा सल्ला त्यांनी शेवटी दिला. □


*With Best Compliments From*

**CALICO INDUSTRIAL ENGINEERS**

BOMBAY

दादाभाई नवरोजी ते राजीव गांधी
या सहा पिढ्यांच्या नेतृत्वाची घडण
नि त्यांचं कर्तृत्व यांची कहाणी

# बखर काँग्रेसची

लेखक : शिरीष सहस्त्रबुद्धे

मूल्य नव्वद रुपये


राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३०



Which pencil has Unbreakable lead?


Vision 782

Camlin Triveni pencils are unbreakable. The super bond of compressed, smooth writing lead and specially seasoned, soft wood makes Camlin Triveni pencils unbreakable-while sharpening or even in fairly rough use.



Usual breakage area now reinforced through bonding.

Unbreakable camlin TRIVENI



विकसनशील राष्ट्रधर्माची
मांडणी करणारी तीन पुस्तके

लेखक : श्री. ग. माजगावकर

# श्रीग्रामायन

मूल्य पंसवीस रुपये

# बलसागर

मूल्य तीस रुपये

# निर्माणपर्व

मूल्य चाळीस रुपये

राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३०

# एल्‌आय्‌सी प्रस्तुत करीत आहे नावीन्यपूर्ण आयुर्विमा योजना



# विमा संदेश

## 'हप्ता परत' योजना

"आयुष्य ही एक लहान, क्षणभंगुर व क्षुल्लक बाब आहे"

प्रत्येकाला हे ठाऊक आहे–

पण आपल्या आवडत्या व निकटच्या व्यक्तींच्या आयुर्विमा–संरक्षणासाठी पुरेशी व अत्यावश्यक तरतूद करणे अनेकांना काहीसे कठीण जाते. कारण, उत्पन्न ठराविकच असल्यामुळे अशा जादा संरक्षणासाठी येणारा आयुर्विम्याचा खर्च त्यांना काहीसा भारी वाटतो.

**'विमा संदेश'** हा संपूर्ण संरक्षणासाठी त्यांनी चालविलेल्या मार्गशोधनावरील उपाय होय.

या योजनेनुसार, व्यक्तीची आयुर्विम्याची मूलभूत गरज निवडलेल्या मुदतीत भागविली जाते, आणि विमेदार ती मुदत पूर्ण होईपर्यंत हयात राहिल्यास हप्त्याची रक्कम परत दिली जाते.

दुर्दैवाने निधन झाल्यास विम्याची संपूर्ण रक्कम दिली जाते.

ज्यांनी अलिकडे एकादा व्यवसाय स्वीकारला असून ज्यांना सुरुवातीच्या काळात प्राथमिक स्वरूपाचे संरक्षण हवे आहे व जे त्यानंतर आकर्षक बोनसशी निगडित अशा अधिक व्यापक योजना स्वीकारू शकतात अशांसाठी, त्याचप्रमाणे, उच्च उत्पन्नगटात मोडत असूनही ज्यांना आपल्या कुटुंबीयांसाठी–त्यांनी आपल्या व्यवसायांत उच्च यश मिळविलेले असेल अशा वेळी त्यांचे काही कमीजास्त झाल्यास–काहीतरी जादा संरक्षणाची तरतूद करावयाची आहे अशांसाठीसुद्धा ही योजना अत्यंत सोयीस्कर आहे.

ही योजना ५ ते २५ वर्षांपर्यंतच्या सोयीस्कर मुदतीसाठी उपलब्ध असून विम्याची किमान रक्कम १०,००० रु. व कमाल रक्कम १ लाख रु. आहे.

अपघातसंबंधित लाभही विशिष्ट अटींवर व जादा हप्ता भरल्यास उपलब्ध आहे.

या योजनेविषयीच्या अधिक तपशिलासाठी कृपया आपल्या एजंटाशी किंवा एल्.आय.सी. च्या जवळच्या शाखेशी संपर्क साधा.

या विमायोजनेबाबत अधिक माहिती मिळविण्यासाठी हे कूपन मॅनेजर (जनसंपर्क व प्रसिद्धी), एल्.आय.सी. ऑफ इंडिया, पो.ऑ. बॉक्स नं. १९९५३, मुंबई ४०० ०२१ या पत्त्यावर पाठवा.

नाव ______________________

पत्ता ______________________

______________________ पिन कोड ________

लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशन ऑफ इन्डिया

३० वर्षे जनतेच्या सेवेत

Efficient/LIC/154/86 MR